
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७३५

REFBK-0014812



। श्रीराम ।

# रामदास-रसवंती

श्रीसमर्थ रामदासांच्या वाङ्मय-सागरांतील
मूल्यवान मौक्तिकांचा संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनु. क्र. २०८५१ वि: ७१.५४
क्रमांक १५३५ नों. दि: १०/५/६६

REFBK-0014812

REFBK-0014812

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. ९८७२

卐

संपादक

विनायक गोपाळ आपटे

प्रकाशिका :
सौ. मंगला त्रिविक्रम भिडे,
६५१ नारायण पेठ,
अप्पा बळवंत चौक, पुणें २.

रामदास-रसवंती
प्रथम मुद्रण : १९६५

मूल्य ३ रुपये

कंपोज :
बाबर व भंडारी कंपनी,
३४२ नारायण पेठ, पुणे २.

मुद्रक :
स. गु. घोरपडे,
प्रिन्टेक्स्ट, ३४१ सदाशिव पेठ,
पुणे २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
श्रीराम २०८७ / दि:
९७३५ नों. दि:



ती. कै. विनायक कृष्णाजी पटवर्धन

पितृचरणीं

रामदास-रसवंती-पुष्पाचें

भक्तिभावानें

समर्पण

—सौ. मंगलाबाई भिडे

# कै. विनायक कृष्ण पटवर्धन यांचा अल्प परिचय

मूळ गांव साताऱ्याजवळील नांदगिरी. घरची गरीबी. म्हणून शिक्षण अपुरें. रेल्वेंत नोकरी. स्वभाव उद्योगी. नोकरींत मन रमेना. श्री. गोडबोले हुंडेकरी पुणें, यांच्याकडे कांहीं दिवस उमेदवारी. सन १९१८ मध्यें 'दि पॉप्युलर एजन्सी' या नांवानें स्वतंत्रपणें हुंडेकरी-व्यवसायाला प्रारंभ. सचोटी, कष्टाळूपणा व मनमिळावू स्वभाव यामुळें व्यवसायांत मोठा नांवलौकिक संपादिला. फलटण, सासवडमाळी, बृहन्महाराष्ट्र, गोदावरी, चांगदेव इ. साखर कारखाने, लोहगांव विमानतळ, इंदापूर पाणीपुरवठा इत्यादींच्या यंत्रसामुग्रींची वाहतूक त्यांनी तत्परतेनें पार पाडलीं. या शिवाय भवानी-नाना पेठेंतली धान्यदुकानें, केसरी–सकाळ-वृत्तसंस्था यांचीहि कामें प्रसंगोपात्त ते करीत. मनाने धर्मश्रद्ध व गरीबांविषयींचा कनवाळूपणा या कारणाने अनेक होतकरु विद्यार्थ्यांना मुक्त हातांनी साह्य केलें. सज्जनगडावर एका मंदिराचें फरशी काम केलें व एक कुटीहि बांधून दिली. श्रीसमर्थरामदास-त्रिशताब्दि महोत्सवाचें कोषाध्यक्षपद त्यांनी प्रकृती ठीक नसतांहि समर्थभक्तीमुळें स्विकारलें. ते प्रसिद्धिपराङ्मुख होते. जन्मभर जिवापाड कष्ट करावे लागल्याने त्याचा त्यांच्या हृदयावर परिणाम झाला व त्याच रोगाने त्यांचा वयाच्या ६८ व्या वर्षी बळी घेतला ! ( जन्म : दि. २९–१०–१८९०, निधन : ७–११–१९५८ ).

'अचाट प्रयत्नें करोनी' त्यांनी घरीं 'लक्ष्मी' म्हणजे कीर्ति, संपदा, गुणवत्ता व स्नेह्यांचा संभार यांना खेचून आणले. मिळविलेल्या संपत्तीचा त्यांनी सढळ हातांनी सत्कारणीं उपयोग केला. अशा प्रकारें निरहंकारी सदाचाराचें, धर्मनिष्ठ व राष्ट्रप्रेमाचे सुगंधमय जीवन ते जगले. त्यांची सुपुत्री **सौ. मंगलाताई त्रिविक्रम भिडे** यांनी आपल्या पूज्य पिताजींच्या स्मरणार्थ या **रसवंतीचा** सर्व खर्च करून त्यांना ही वाङ्मयीन श्रद्धांजलि भक्तिभावाने समर्पिली आहे.

◇◇◇

श्रीराम वि: नों: दि:

## संपादकाची भूमिका—

भारतीयांच्या जीवनांत आणि विशेषतः महाराष्ट्राच्या इतिहासांत श्रीरामदास स्वामी ही एक असामान्य विभूति होऊन गेली. डोळस विवेक, कडकडीत वैराग्य, प्रखर तपस्या आणि श्रीरामाची अनन्य उपासना यांच्या योगें आपलें आत्मिक जीवन स्वामींनीं संपन्न केलेंच पण त्या जीवनाच्या आधारें आपल्या लोकांचें, देशाचें भौतिक जीवन देखील समर्थ नि श्रीमंत करण्यासाठीं ते जिवापाड झटले. इतकेंच नव्हे तर कांहीं प्रमाणांत त्यांनीं स्वदेश हा स्वतंत्र, सुखी अन् समृद्ध झालेला प्रत्यक्ष पाहिलाहि.

हें साधण्यासाठीं त्यांनीं कडकडीत साधना केली; देशसंचार केला. खूप खूप लिहिलें, अनेकांना उपदेशिलें, कित्येकांना कामालाहि लावलें, लोकांचा मोठा समुदाय त्यांनीं जोडला. नाना देशीं शिष्योपशिष्यांना त्यांनीं धाडलें व लोकजागृति केली. त्यांनीं अनेक योजना केल्या आणि त्या कार्यवाहींतहि आणल्या. त्यांना जें साधायचें होतें त्यासाठीं त्यांनीं प्रचंड प्रयत्न केले आणि अनेकांच्या करवीं करविलेहि.

प्रचंड प्रयत्न, चिकाटी, लोकप्रबोधन, प्रचीति, साक्षेप, संचार, हव्यास परिभ्रमण, सूक्ष्म निरीक्षण, हरिकथा, निरूपण, राजकारण, चातुर्य, इत्यादि अनेक सामाजिक नि राष्ट्रीय सद्गुणांचा आचार, उच्चार नि प्रचार स्वामींनीं जन्मभर केला आणि विस्कळित अन् निर्जीव झालेल्या लोकजीवनांत नव चैतन्य व सुसंघटितपणा त्यांनीं निर्मिला.

'भक्तीचेनि योगें देव। निश्चयें पावती मानव।' यांत सांगितलेली भक्ति किंवा उपासना हें साधन, स्वामींनीं आध्यात्मिक व ऐहिक अशा दोन्ही क्षेत्रांत वापरण्याचा आग्रह धरला. मानवी जीवनाचें परमोच्च साध्य जो 'देव' तो देखील जगदंतरीं वास करणारा 'परमात्मा' आणि जगतावर सत्ता चालविणारा समर्थ 'परमेश्वर' अशा दोन्ही अर्थांनीं स्वामींनीं उपयोजिला आणि

म्हणूनच स्वामी हे जगदंतरींच्या परमात्म्याचे भक्त म्हणून 'राम-दास' झाले आणि दृश्य जगन्नाथाचे म्हणजे परमेश्वराचे उपासक म्हणून 'समर्थ'पण बनले !

सुखी, समृद्ध, संपन्न व समर्थ अशा समाजाची निर्मिति करणें आणि अशा संघटित समाजाची उपासना सेवाभावानें करणें, हीच स्वामी रामदासांच्या मतें जगन्नाथाची खरीखुरी भक्ती होय. ही अशी समर्थ समाजाची घडण यशस्वीरीत्या होण्यासाठींच त्यांनीं 'आत्मारामा'ची उपासना नव्यानें प्रचारांत आणली. 'समर्थ' रामदासांचे जनतेच्या संपन्न स्वातंत्र्यांतलें सामर्थ्य रामदासांना अपेक्षीत होते आणि म्हणूनच त्यांना 'समर्थ' पदवी शोभून दिसते.

अशा रीतीनें स्वामींनीं मानवी जीवनाच्या आत्मिक व ऐहिक अशा दोन्ही अंगांची जोपासना अपेक्षिली व पुरस्कारिली. आत्मिक उन्नतीमुळें माणूस हा व्यक्तिदृष्ट्या उंच होतो; सद्गुणी, सदाचारी व नीतिमान् बनतो. अशा गुणवान् व्यक्तींनीं आपला समाज, आपला देश आणि तद्वारा सारी मानवजाति ही सुखी, समृद्ध, संपन्न व समर्थ करावयाची असते. याचा अर्थ असा कीं, ऐहिक किंवा भौतिक वैभव हें सामूहिक, सामाजिक किंवा राष्ट्रीय असतें, नव्हे असलें पाहिजे. तेथें वैयक्तिकता आली कीं मग समाजाचें वा देशाचें नष्टचर्य ओढवलें म्हणूनच समजावें ! अनेक साधुसंतांनीं ऐहिकतेचा, जडाचा, किंवा भौतिकाचा जो निषेध केला तो व्यक्तिगत स्वार्थाचा केला. हीन प्रतीचे असे सुखाभिलाषा, मत्सर, क्रोध, दंभ इत्यादि जे दुर्गुण लोकांत दिसतात त्यांची त्यांनीं निंदा केली. याचा अर्थ असा नव्हे की, समाजाचें वा राष्ट्राचें सुख-समृद्धि-सामर्थ्य-स्वातंत्र्य या साधुसंतांना अभिप्रेत नव्हतें !

मात्र बहुतेक साधुसंतांनीं समाजाच्या वा देशाच्या ऐहिक कल्याणाची गोष्ट प्रगटपणानें व तपशिलाने लोकांसमोर ठेविली नाहीं. व्यक्तिसुखाची, व देहबुद्धीची निंदा करून तेथेंच ते थांबले. स्वामी रामदासांनींहि वैयक्तिक वासना-कामनांची यथास्थित हेटाळणी केली. पण त्यापुढें जाऊन त्यांनीं स्वदेश-स्वधर्म-स्वातंत्र्य-स्वराज्य या सामूहिक-सामाजिक-राष्ट्रीय उद्दिष्टांवरहि पुरेसा भर दिला; लोकांमध्यें या सामूहिक ध्येयाविषयींची महत्त्वाकांक्षा निर्माण केली; त्यासाठीं ते जातीनें झटले आणि असंख्यांना त्यासाठीं त्यांनीं कामालाहि लावलें.

हें स्वामी रामदासांचें आगळें, अपूर्व व असामान्य वैशिष्ट्य होय. तेंच वैशिष्ट्य ही रसवंती संपादतांना दृष्टीसमोर ठेवलें आणि स्वामींनीं निर्मिलेल्या अफाट लिखाणाच्या रूढ परंपरेची रचना थोडीशी बदलून तिची वेगळी मांडणी येथें केली. स्वामींच्या प्रासादिक लिखाणाचें अक्षरन् अक्षर आणि त्याची पारंपरिक मांडणी ही मंत्रवत् मानणाऱ्या त्यांच्या भाविक भक्तांनीं हा सहेतुक बदल त्यांना क्वचित् रुचला नाहीं तरी पण त्यांनीं तो कृपया गोड करून घ्यावा.

स्वामी रामदासांनीं जो '**परमार्थ**' प्रचारला व जो '**प्रपंच**' विस्तारला तो लोकांनीं नीट समजून घ्यावा, त्याचें त्यांनीं वारंवार चिंतन करावें आणि शक्य तों तों प्रत्यक्ष आचरावा, अशी स्वामींची अपेक्षा होती. तीच अपेक्षा प्रस्तुत लेखकानें रसवंतीच्या द्वारें व्यक्त केली आहे. स्वामींनीं जें कांहीं स्फुटपणानें वा एकत्रितपणें अनेक ठिकाणीं सांगून ठेविलें आहे त्या सर्व साहित्य-संभारांतील प्रमुख विषयांची सुसूत्र मांडणी करून ती जनतेसमोर ठेविली असतां लोकांना स्वामींच्या मनांतला आशय समजणें सोपें होईल, या विश्वासानें रामदासीयांच्या पारंपरिक श्रद्धेला थोडें दुखवूनहि ही 'रसवंती' लोकांसमोर साकारविली आहे.

परमार्थ आणि प्रपंचाचा परमोत्कर्ष हा धर्मानेंच साधतो असा स्वामींचा विश्वास असल्यानें अशा सर्वकल्याणकारी धर्माची स्थापना करण्याची स्वामींची महत्त्वाकांक्षा होती. छत्रपति शिवरायांचा स्वामींनीं 'धर्मस्थापनेचे नर' अशा यथायोग्य शब्दांत जो गौरव केला तो याच कारणासाठीं.

स्वामी रामदासांचे मनःसंकल्प आणि योजना सर्वसामान्य लोकांच्या सहजपणें ध्यानीं याव्या अशा रीतीनें रसवंतीची रचना केली असल्याचें वर सांगितलेंच आहे. केवळ रसवंतीचा अभ्यास, विचार व आचार करणाऱ्यांना स्वामी रामदासांच्या समग्र वाङ्मयाचें हृद्गत हातीं लागेल असा विश्वास वाटतो. निदानपक्षीं या रसवन्तीच्या अध्ययनानें स्वामींच्या समग्र सारस्वताची सरणी अभ्यासकाला सुसंगतरीत्या समजल्याविना निश्चित राहणार नाहीं. स्वामींच्या वाङ्मयाच्या नुसत्या दर्शनापेक्षां त्याचें सेवन होणें हें अगत्याचें असल्यानें रसवन्तीच्या द्वारां त्यांच्या सारस्वताची ही पुनर्रचना वाचकांसमोर मांडली जात आहे.

पांच प्रकरणांत विभागलेल्या रसवंतीचें पहिलें प्रकरण उपक्रमासाठीं आणि अखेरचें उपसंहारासाठी वापरलें आहे. दुसरें प्रकरण 'बहुधा ज्ञान-विज्ञान' म्हणजे अनेक प्रकारच्या भौतिक विज्ञानांचा विचार एकत्रपणानें सांगतें. तिसरें परमार्थाचें आणि चौथें प्रपंचाचें अशीं दोन्ही प्रकरणें महत्त्वाचीं आहेत. परमार्थ आणि प्रपंच या दुहेरी अंगांच्या पूर्ततेमुळें संपूर्ण मानवी जीवन संपन्न होतें. **परमार्थ** हें माणसाच्या आयुष्याचें अंतरंग असून त्याच्या बाह्यांगाला **प्रपंच** हें नांव आहे. हीं दोन्हीं अंगें परस्परावलंबी असल्यानें त्या दोहोंनाहि सारखेंच महत्त्व स्वामींनीं दिलें आहे. प्रत्येक माणसाला आंत म्हणजे त्याच्या स्वतःच्या मानसाच्या प्रांगणांत आणि बाहेर म्हणजे जगाच्या रणक्षेत्रांत आयुष्यभर संचार व संघर्ष करावयाचा असतो.

पारमार्थिक परमोत्कर्ष जो मोक्ष त्याच्या प्राप्तीसाठीं माणसाला अंतरींच्या मानस-क्षेत्रांत यशस्वी होणें आवश्यक असतें.

आणि जगाच्या रणभूमीमध्यें विजयी होण्याकरतां माणसाला सामाजिक प्रपंचांतलें वैभव संपादणें अगत्याचें असतें. केवळ परमार्थ किंवा नुसता प्रपंच यामुळें माणसाची आणि मानवी समूहाची उन्नति साधणें सर्वथा अशक्य होय ! म्हणून मानवी जीवन हें जेव्हां प्रपंच नि परमार्थ या दोन्ही आघाड्यां-वर यशस्वी होईल तेव्हांच तें पूर्णतया संपन्न व समर्थ बनेल !

स्वामी रामदासांच्या वाङ्मयाचा सूक्ष्म रीतीनें अभ्यास करणाऱ्याला कळून येईल कीं, खरा परमार्थी उपासक हा प्रापंचिक वा समाजाचा सेवक सहज-गत्याच होतो. लोककल्याण वा लोकसंग्रह साधणें हा परमार्थी माणसाचा स्वभावच असतो. तसेंच परमार्थावांचून कोणी खरा प्रापंचिक होऊंच शकत नाहीं; याचा अर्थ हाच कीं प्रपंच व परमार्थ हे न्यायतः नि व्यवहारतः एकरूप होत !

रसवंतीच्या **परमार्थ प्रकरणांत** परमार्थाला उपयोगी अशा सर्व प्रमुख विष-यांचा एकत्रितपणें आढळ वाचकांना होईल. मुमुक्षू साधकापासून तों आत्म-ज्ञान्यापर्यंतची वाटचाल करणें त्यामुळें साधकाला सोपें जाईल.

**प्रपंचा**साठीं प्रत्येकानें गुणवान् होण्याची किमान अपेक्षा स्वामींनीं बाळगली आहे. ही गुणवत्ता वैयक्तिक नि कौटुंबिक लाभासाठीं जशी उपयोगी असते तशीच ती समाजहिताकरतांदेखील आवश्यक राहते. म्हणून समाजहितकारी

अशा विविध गुणांचें एकत्रीकरण ‘ लोकोपयोगी विविध गुणांची संपादणी ’ या पोट प्रकरणांत केलें आहे. ‘ लोकसंग्रह-राजकारण ’ या नांवाची फोड ‘ लोककल्याणासाठीं राजकारण करणें ’ अशा शब्दांत करतां येईल. हें लोकहितकारी राजकारण ज्या चातुर्यादि विविध गुणांनीं साधतां येतें अशा अनेक सामाजिक गुणांचा संचय त्या प्रकरणीं जुळवून मांडलेला आहे.

पहिल्या चार प्रकरणांत दासबोधांतलेच अनेक विषय संगतवारीनें रचलेले आहेत. उपसंहारांत दासबोधाव्यतिरिक्त इतर अनेक स्फुट विषयांची संगतवार जुळणी वाचकांना सांपडेल. त्यांत आत्माराम, करुणास्तोत्रें, शक्तिस्तोत्रें, आनंदवनभुवन, रामदास्य या स्वामी रामदासांच्या सर्व महत्त्वाच्या रचना आलेल्या आहेत. सामान्य जनांना उपयोगी पडणारा आणि मुलांना उपयुक्त असा उपदेश दिल्यानंतर शेवटीं मनाच्या बोधांतले निवडक श्लोक देऊन स्वामींच्या शब्दांतच रसवंतीचाहि समारोप केला आहे.

क्वचित् ठिकाणीं मुळांत कानांमात्रांचा वा अक्षरांचा बदल, समजून वा आपाततः झालेला वाचकांना आढळेल, पण भावार्थांत मात्र कोठेंहि फरक न होण्याची पुरेशी काळजी घेतली आहे.

‘ स्वामी समर्थ रामदास ’ ही आतां एखादी व्यक्ति राहिली नाही. आदर्श अशा सामाजिक वा राष्ट्रीय जीवनाचा व सबंध मानवी रचनेचा कल्पनामय आराखडा त्यांच्या सारस्वतांत चित्रित झालेला आढळतो. त्यामुळें परमार्थमार्गी साधुसंतांपासून तों राजकारणी वा प्रापंचिक छत्रपति शिवरायांपावेतोंचे समग्र भारतीय जीवनच ‘ समर्थ रामदास ’ या शब्दांत सामावलें आहे.

अशा त्या थोर राष्ट्रपुरुष संताच्या वाणी-लेखणी-आचरणांतून स्त्रवलेल्या रसवंतीच्या अमृतसिंचनाने चार कोटी महाराष्ट्रीयांचीं साधीं मराठी मने तेजस्वी, ओजस्वी, प्रभावशाली व दृढनिश्चयाची व्हावीत आणि त्यांच्या करवीं उभ्या राष्ट्राचा उत्कर्ष व्हावा इतकींच परमात्मचरणी नम्र प्रार्थना आहे.

● ●

॥ श्रीराम ॥

# रसवंतीचें रसग्रहण

श्रीस्वामी रामदासांच्या ग्रंथांचा वाचक हा शक्यतों स्वावलंबी असावा. स्वतः अर्थ समजून घेऊनच त्यानें रामदासी वाङ्मयाचें वाचन करणें अपेक्षित आहे. शिवाय शब्दशः अर्थ देण्यासारखें स्वामींचें सारस्वत अवघडहि नाहीं. स्वामींच्या लेखनांतील अक्षरें, शब्द किंवा भाषा यांपेक्षा त्यांच्या भावार्थाकडे अभ्यासकानें सर्वाधिक लक्ष देण्याची स्वामींचीच इच्छा आहे. या सर्व गोष्टी ध्यानीं घेऊनच हें ' रस-ग्रहण 'थोडक्यांत दिलेलें आहे.

**उपक्रम :—** दासबोधीं काय बोलिलें-- या ठिकाणीं ' दास-बोधीं ' याचा 'स्वामी रामदासांनीं रचलेल्या समग्र वाङ्मयांत' असा अर्थ करण्यास प्रत्यवाय नाहीं. स्वामींनीं आपल्या बोधांत भक्तिमार्ग विशदपणें किंवा विस्तारानें सांगितलेला आहे. म्हणून या त्यांच्या भक्तिमार्गाच्या विस्तृत विवेचनांत नवविधा भक्ति, ज्ञान, वैराग्य, अध्यात्म-निरूपण, मुख्य भक्ति, शुद्ध ज्ञान, आत्मस्थिति, शुद्ध उपदेश, सायुज्य मुक्ति, शुद्ध स्वरूप, विदेहस्थिति, अलिप्तता, मुख्य देव व भक्त, जीव-शिव, मुख्य ब्रह्म, आपण कोण ? इत्यादींचे निश्चय, तसेंच मुख्य उपासना, नाना कवित्व, चातुर्य, आदींचीं लक्षणें पण येतात हें सारें विवेचन स्वामींनीं भगवद्वाक्याला अनुसरून केलें आहे. अशा या विशद भक्तीच्या अभ्यास-मनन-निदिध्यासानें साधकाला परमेश्वराची प्राप्ती खात्रीनें होईलच, असा दिलासा ( भक्तीचेनि योगें देव। निश्चयें पावती मानव ) त्यांनीं दिलेला आहे. ( पृ. १ ).

' श्रवण केलियाचें फळ ' यांतील श्रवण याचा, श्रवण + मनन व निदिध्यासन असा व्यापक अर्थ केला पाहिजे. " १ नासे अज्ञान, दुःख, भ्रांती। शीघ्रचि येथें ज्ञानप्राप्ती। २. विवेकेंसहित यथायोग्य, चातुर्य कळें ३. अवलक्षणी इसम सुलक्षणी होईल, ४. व्यवहारी अभ्यासक हे धूर्त, तार्किक, विचक्षण (मुत्सद्दी), आणि वेळप्रसंग ओळखणारे होतील, ५. आळसी आहेत ते साक्षेपी-कष्टाळू होतील; पाप्यांना कृतकर्मांचा पस्तावा होईल; भक्तिमार्गाचे निंदक त्याला वंदू

लागतील; बद्ध हे मुमुक्षू होतील; मूर्खांचे अतिदक्ष बनतील आणि भक्तिमार्गानें अभक्त हे मोक्षाला पावतील. देहबुद्धीचे धोके टळतील;संशयांचे अनेक घोटाळे दूर होतील आणि संसारांतील उद्वेग नष्ट होतील. थोडक्यांत सांगायचें म्हणजे या दास-बोधाच्या ( अभ्यास-आचरणानें ) श्रवणानें अधोगती चुकेल आणि मनाला समाधानाची विश्रांति ( शांती ) लाभेल. " असें दास-बोध-श्रवणाचें विविध फल स्वामी सांगतात. ( पृ. २ ).

ज्याच्या मनांत परमार्थाविषयीं थोडीशी का होईना आस्था निर्माण झाली आहे अशानें त्यांतला अर्थ शोधून हा ग्रंथ अभ्यासावा. म्हणजे मग त्याच्या ध्यानीं-मनीं परमार्थ निश्चयानें बाणेलच. ( पृ. ३ )

**२. वंदना** – सर्वांगें सुंदर आणि सकळ विद्यांचा सांठा असलेल्या श्री-गणेशाचें स्तवन व वंदना करतांना चित्तांत परमार्थाची वांछा साधकानें ठेवली पाहिजे. गणनायकाचें येथील रूपवर्णन किती मनोहर आणि यथास्थित आहे हें त्या रूपाचें कल्पनाचित्र वाचकानें मनाच्या पडद्यावर रेखाटलें असतां त्याला कळून येईल. ही गणेशाची मूर्ति कल्पनाचित्रकाराला साजिरी, सुलक्षण, लावण्याची खाणी आणि सुंदर दिसू लागली कीं मग आपलें चित्रण हें ठीक झालें असें त्यानें खात्रीनें समजावें ( पृ. ४ ). वेदमाता शारदेच्या वर्णनांतहि स्वामी फारच रंगले आहेत. जणूं आदिमायाच वाचकांसमोर त्यांनीं साक्षात् उभी केली आहे. हें मूळ मायेचें रूप इतकें व्यापक, सूक्ष्म नि संकीर्ण झालें आहे कीं, सामान्य वाचकाच्या कल्पनेला तें पेलणारच नाहीं ! या वर्णनांत मूळ प्रकृतीचें रूप, गुण आणि कर्म या तिहींचा अंतर्भाव झालेला वाचकांना सांपडेल. तरीपण अभ्यासूनें हें स्वामींचें शारदा-वर्णन एकदां तरी मनःपटावर अवश्य चितारून पाहावेंच ! ( पृ. ४ )

सद्गुरूचें वर्णन देतांना समुद्र, क्षीरसागर, मेरुपर्वत, गगन, जगती, सूर्य, अमृत, चिंतामणि, कामधेनू , हरि-हर-ब्रह्मा, हे सर्व सद्गुरूच्या तुलनेनें कसे अपूर्ण आहेत, हें सांगून सद्गुरूचें वर्णन शब्दांनीं न होणें हेंच त्यांचें खरें वर्णन होय, असा उचित निर्वाळा स्वामींनीं दिला व तें अवर्णनीय वर्णन संपविलें ! ( पृ. ६ )

दास-बोध ग्रंथ ऐकण्यासाठीं मोठी सभा जमली असल्याची स्वामींनीं कल्पना केली. अशा सर्व सभेला आणि त्यांतील जनतेला संत-सज्जन, श्रोते,

कवीश्वर अशा वेगवेगळ्या विशेष नांवांनीं स्वामी वंदन करतात. ( द. १ स. ५, ६, ७ व ८; पृ. ४ ते ९ ).

ग्रंथ-अभ्यासकाला स्वामींची आग्रहाची विनंती अशी कीं, त्यांनीं ग्रंथाच्या भाषेचा मराठी प्राकृतपणा वा सामान्यपणा विचारांत घेऊं नये. लोखंडाच्या पेटीचा विचार न करतां त्यांतलीं नाना रत्नें तेवढीं ध्यानीं घ्यावीं, त्याप्रमाणें ग्रंथांतलें साधें, व सत्प्रचीत असें अद्वैत अध्यात्म तेवढें त्यांनीं अभ्यासावें. साली-टरफलें टाकून त्यांतल्या अर्थरूपी फळाचा आस्वाद त्यांनीं घ्यावा. ( पृ. १० )

**बहुधा ज्ञानविज्ञान** –(बहुधा = नाना प्रकारचें.) या प्रकरणांत अज्ञानी, ज्ञानी, स्वतःला अनुभवी म्हणणारे, आणि भ्रमांत सांपडलेले, अशांचीं अनेक मतें देऊन झाल्यावर ' वस्तु ( परमात्मा, परब्रह्म ) आपणचि होणें । ऐसें वस्तूचें पाहाणें । ' किंवा ' आपण वस्तू मुळीं येक ' अथवा ' निर्गुण ब्रह्मावेगळें, आघवें भ्रमरूप ' असें तात्पर्य काढलें आहे. ( पृ. ११ ते १५ ) पृ. १६ वरील प्रकरणाचें नांव ' उभारणी-संहारणी ' असें वाचावें.

कहाणी ही समजण्याला सोपी आहे. स्त्री-पुरुष = प्रकृति वा माया + पुरुष; पुत्र = विष्णु; त्याचा कुमर ( नातु ) = ब्रह्मदेव; त्याचा अज्ञानी व रागीट असा जेष्ठ पुत्र = शंकर, शिव; या सर्वांपासून विश्व निर्माण झालें. विश्वांत अनंत जगतांचा पसारा झाला. याचा परिणाम वडिलांना कोणीच न मानण्यांत आणि घरकलह वाढण्यांत झाला. विश्वाचें मूळ जो परमात्मा, त्याची ओळख व आठवण जर राहिली नाहीं तर नातू-पणतूंनीं उभारलेला हा सारा विश्वपसारा त्यांच्यासकट नाश पावल्याविना राहणार नाहीं, हाच या कहाणीचा इत्यर्थ. परमेश्वर = मूळ पुरुष= मूळ माया = सर्वेश = जगदीश. ( द. ८-३ )

पुरुष आणि मूळमाया (प्रकृति ); ईश्वर आणि माया; जीव आणि अविद्या ( अविद्यागुणें बोलिजे जीव । मायागुणें बोलिजे शिव । मूळमायागुणें देव । बोलिजे तो ) परमेश्वरापासून तों जीवापर्यंत अशा जोड्या वेदांतांत मानल्या आहेत. ( पृ. १७ )

माया निरूपण करतांना ( द. १४-१० ) माया दिसे परी नासे । ( आत्म ) वस्तू न दिसे परी न नासे; अशा एक ठाम सिद्धांत दास-बोधानें सांगितला आहे. नंतर अनेक दृष्टांतांनीं मायेचें नासकेंपण अथवा मिथ्यापण त्यानें

वर्णिलें आहे. ( पृ. १८, १९ ) नंतर निराकार परब्रह्मामध्यें जरी साकार व सावयव माया दिसली तरी त्या परब्रह्माच्या पूर्णत्वामध्यें थोडाहि कमीपणा येत नाहीं; पण माया मात्र क्षणभर दिसून ब्रह्मांतच लय पावते ( द. ८-३ ); म्हणून 'माया' ही मृगजळ, स्वप्नसृष्टि, मातीचीं चित्रें, जादू, राक्षसी मायावीपणा, यांसारखी खोटी आहे. अविद्येमुळें वा अज्ञानामुळें ती माया आहे असें वाटतें इतकेंच. 'देह म्हणजेच मी' अशा देहबुद्धीच्या बळकट-पणामुळें अज्ञानी झालेल्याला दृश्य माया ही खरी वाटते. पण 'दृष्टीसी दिसे, मनासी भासे । तितुकें कालांतरीं नासे' हीच गोष्ट मायेच्या संबंधांत खरी असल्याचें सांगून मायेचें खोटेंपण सिद्ध केलें आहे. (द. ६-८; पृ. १९ ते २१ ). माणूस पुन्हां जन्माला कां येतो, याचें उत्तर देतांना द. ९ स. ८ ( पृ. २१ ) सांगतो कीं प्राणत्यागाच्या वेळीं त्या प्राणांत माणसाच्या वासनावृत्ति मिसळतात. हेंच वासनामिश्रित सूक्ष्म प्राणतत्त्व पुन्हां जन्म घेतें. द. ८ स. ७ मध्यें, प्राणी संकल्पें बांधिला । जीवपणें बद्ध झाला— 'मी जीव' असा संकल्प । तेणें प्राणी जाला अल्प—'मी जीव' मज बंधन । मज आहे जन्ममरण । केल्या कर्मांचें फळ आपण । भोगीन आतां ॥ पापपुण्य भोग सुटे ना । आणि गर्भवासहि तुटे ना ।' अशा अनेक कारणांमुळें माणूस मरून पुन्हां पुन्हां जन्माला येत असतो, असा निश्चय सांगितला आहे. ( पृ. २१ );

द. ८. ४, द. ११. १., द. १२. ६., द. १०. ४., द. १३. ३ इत्यादि अनेक ठिकाणीं सृष्टिरचना दासबोधानें विवरिली आहे. ( पृ. २२ ते २६. ) परब्रह्म–मूळमाया–त्रिगुणी माया ( गुण क्षोभिणी )–त्यांतल्या तमोगुणापासून पंचभूतें ( जड पृथ्वी, मृदु व ओलें पाणी, उष्ण तेज, चंचल वायु आणि निश्चळ, शून्य आकाश )–पिंडब्रह्मांड रचना. – पंचभूतें आणि तीन गुण मिळून अष्टधा प्रकृति, अशा क्रमानें पृथ्वीपासून औषधी; त्यांतून नाना रस, बीज व अन्नरस; आणि त्यांमधून चौऱ्यांशीं लक्ष योनी–चारी खाणी–च्यारी वाणी... ऐसें हें सृष्टिरचनेचें नवल चोज. दासबोधानें क्रमवार सांगितलें.

पृ. २६ ते ३४ पावेतों सृष्टीचें त्रिविध लक्षण; ( द. २०-२ ) भूत लक्षण, ( द. १५-४ ); महा-प्रलय ( द. १३-४ ); स्थूल-सूक्ष्म शरीराचे पन्नास गुण-धर्म ( द. १७-९ ); चौदा ब्रह्में ( द. ७-३ ); अष्टधा सृष्टि ( द. ६-६ );

पिंडी तेंच ब्रह्मांडीं ( द. ९-५ ) ; पंच प्रलय ( द. १०-५ ) ; आत्म्याचे चार प्रकार, चार तनु-प्रकार (द. १७-९); चार वाणी, प्राणपंचक व ज्ञान-कर्म-विषय-पंचक (द.१७-८) असे शरीरा (पिंडा) संबंधीं व जगता (ब्रह्मांडा) संबंधी विषय चर्चिले गेले आहेत.मुळांत वाचले असतां त्यांचा उलगडा वाचकांना सहज होईल. मनावर हे विषय चांगले ठसण्याकरतां अभ्यासकानें त्यांचीं कोष्टकें बनवावीं.

**परमार्थ खंड**–(पृ. ३५ ते १००) साहजिकच येथें आरंभाला परमार्थाचें स्तवन आलें आहे. (द. १·९, पृ. ३५ ). संसार दुःखाच्या दुसऱ्या प्रकरणांत संसार हा महापूर कसा आहे व त्यांतून कोण तरून जातात (द. ३·१०), मृत्यूचें तांडव व त्यांतून ' जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ' हेच काय ते उरतात ( द. ३·९ ); कल्पना हेंच जन्माचें मूळ होय; ( द. ७·५ ); तीन प्रकारचे ताप ( द. ३·६, ७, व ८ ), बद्ध म्हणजे कोण ( द. ५-७ ); रजो-गुणाचें व तमोगुणाचें कर्तृत्व ( द. २·५, ६ ) हे आवश्यक विषय आले आहेत. संसार-दुःखाची प्रचीती ज्यायोगें येते असेच हे सारे विषय असल्यानें त्यांचा एकत्र संचय या जागीं केलेला आहे.

**सद्‌गुरु-सच्छिष्य सदुपदेश**–परमार्थांत या तीनहि गोष्टींची अत्यावश्यकता असते. म्हणून त्या सर्वांचें पुरेसें स्पष्टीकरण करणाऱ्या ओव्या या भागांत सांपडतील.

चौथें भक्तिमार्गाचें प्रकरण त्याच विषयाची सांगोपांग चर्चा करतें, आत्म-निवेदन भक्ति ही सर्वश्रेष्ठ भक्ति असल्यानें तिचा विचार ( द.४-९, द. १२-५, द. ८·८, पृ. ५९ ते ६२ ) विस्तारानें मांडलेला आहे. सगुण रघुनाथाचें भजन अत्यावश्यक कसें आहे हें (द. ३.१०, व द. ६.७ (पृ. ६३, ६४) यांमध्यें पुरेशा शब्दांत सांगितलें आहे. अजपा जपाचें द-१७·५मध्यें विवेचन आलें आहे.

माणसाच्या श्वास-उच्छ्वासाबरोबर ' सोऽहं ' असा जो सहज ध्वनि होतो, त्यालाच अ-जपेनें परमात्म्याचा जप वा स्मरण करणें म्हणतात. सो–तो पर-मात्मा, अहं=मी आहें, अशी अखंड आठवण, या अजपारूपी माळेनें, स्मरणीनें ठेवण्याचा अभ्यास करणें हें सर्वश्रेष्ठ ईशचिंतन होय. असें केल्यानें ' सहज देव जपध्यानें । सहज चालतें स्तुतिस्तवनें ' अशी सहजपणें उपासना घडते.

परमार्थाच्या या साधनमार्गाचा विचार पांचव्या प्रकरणांत मांडला आहे. त्यांत निष्काम सगुण भक्ति ( १०-७ ), सद्‌गुरूस काय विचारावें (द. १२-३ ) सारशोधन ( द. ६-९ ), नित्यानित्यविवेक ( द. १३-१ व ६ ), सारासार-

विचार ( द. १३-२ ), प्रत्ययज्ञान ( द. २०-३ ), प्रचीतीचें आत्मज्ञान ( द. १०-१० ), आत्मज्ञान लक्षण ( द. ५-६ ), देहातीतावस्था ( द. ८-८ ) विवेक-वैराग्य-विचार ( द.१२-७, द. १७-१० द. १२-४ ), आपला आपण शोध घ्यावा. (द. ६-२), विश्वाचा कर्ता, देव ओळखावा (द. १३-८ द. ६-१), अंतरींचें ठेवणें-अंतरात्म्यापलीकडील देव जाणावा, पाहावा (द. ११-८ व ९), सर्वोत्तमाचें अखंड ध्यान करावें ( द. १४-८ ), आणि अनंतरूपीं अनंताला ओळखावें ( द. २० ४ ) अशा प्रकारें परमार्थाच्या साधन-मार्गावरील खुणा किंवा टप्पे या प्रकरणांत क्रमानें दिले आहेत.

आत्मा-परमात्मा-परब्रह्म हें साहावें प्रकरण त्या वस्तूची आवश्यक ती ओळख पटविण्यास समर्थ आहे. आत्मज्ञानी हें सातवें प्रकरण सत्त्वगुणी भक्त ( द. २-७), संत-साधु महानुभाव–सज्जन (द. ६·१), सिद्ध ( द. ८·९ ), ब्रह्मज्ञानी ( द. ९·३ ), आणि जीवन्मुक्त ज्ञानी याची स्वामींच्या शब्दांतून उत्तम प्रकारें परिचय करून देतें.

**प्रपंच खंड :** ( पृ. १०१ ते १६७ ).

नाना प्रकारच्या प्राण्यांच्या देहामध्ये वरिष्ठ असलेल्या अपूर्व व श्रेष्ठ अशा नरदेहाचें महत्त्व द. १·१०, द. १८·४ व द. २०·५ इ. मध्यें दासबोध सांगतो. अशा या दुर्लक्ष नरदेहाचें सार्थक करणें हें प्रत्येकाचें सर्वप्रथम कर्तव्य असलें पाहिजे (द. २·४). देह आणि जीवात्मा या दोहोंच्या सहकार्यानेंच मनुष्याच्या आयुष्याचा गाडा चालत असल्यानें त्या दोहोंचीहि काळजी मानवानें घ्यावी आणि देह व आत्मा यांच्यायोगें त्रैलोक्यांत कीर्तीचे पवाडे गाजतील असें श्रेष्ठ जीवन जगण्याचा प्रयत्न व्हावा असा दासबोधाचा मोठा विचार आहे. धन्य नरदेह हें प्रपंच-खंडांतलें पहिलें प्रकरण याच गोष्टीचें विवरण करतें. दुसरें प्रकरण हें गुणवान प्रापंचिक कसा असावा, कसा व्हावा हें सांगतें. तो मूर्ख, पढतमूर्ख, करंटा, आळशी, दुश्चित (असावध) व झोपाळू नसावा (द. २·१, द. २·१०, द. १९·३, द. ८·६) हें सांगून झाल्यावर तो उत्तम गुणी (द. २·२), सद्विद्येचा (द. २·८), उत्तम संगतीचा ( द. १७·७ ), वंद्य, चांगल्या गोष्टी मनांत धरणारा ( द. १३·१० ), सुंदर अक्षर असलेला (द. १९·१ ), भाग्यशाली (द. ११·९) आदर्श गृहस्थाश्रमी ( द. १४.७), योग्य प्रकारें दिनचर्या पाळणारा ( द. ११·३ ) आणि प्रपंच साधून परमार्थाकडेहि पुरेसें लक्ष पुरविणारा

( द. ११·३ व १२·१ ) असला पाहिजे, अशी दासबोधाची अपेक्षा आहे.

**लोकसंग्रह** हें प्रपंच खंडांतील तिसरें प्रकरण होय. स्वजन, स्वकीय वा धर्मबांधव या सर्वांच्या ठायीं एकच 'अंतरात्मा' वस्ती करीत असल्यानें अंतरात्म्याच्या उपासनेच्या जाणिवेनें जनतेची वा लोकांची सेवा, शिक्षण, संग्रह, जागरण, प्रबोधन, संतोषन, प्रत्येकानें करणें अवश्य आहे, हें या प्रकरणांत आवर्जून सांगितलें आहे. (द.१०·१, द. १०-१० द. ११-८, द.१८-१, द. १८-२, द. १६-१०) जनतेच्या अंतःकरणांत जाणीवरूपानें असणाऱ्या चैतन्याला, ज्योतीला, ज्ञप्तीला म्हणजे जाणिवेला दासबोधानें अंतरात्मा म्हणून संबोधिलें आहे. आणि या लोकहृदयांत वस्ती करणाऱ्या व्यापक आत्मारामाची उपासना सर्वांसाठी दासबोध आवर्जून सांगतो.

लोकोपासनेंतून लोकांचें प्रचंड सामर्थ्य उत्पन्न जर झालें नाहीं तर 'समर्थाची नाहीं पाठी ( पाठिंबा, आधार ) तयास भलताच ( कोणीहि सामान्य इसम; वाटेल ती नीच व्यक्ति ) कुटी ( मारतो, छळतो ), या कारणें उठाउठी । ( लगबगीनें, त्वरित, सततच्या प्रयत्नानें ) **भजन** करावें ॥–' या ठिकाणीं **भजन** याचा किती व्यापक, खोल नि उंच अर्थ आहे हें ध्यानीं येतें. लोकांत आत्मसामर्थ्याची जाणीव निर्माण करून त्यांची एक अखंड, अभंग शक्ति ज्यायोगें निर्माण होऊं शकेल, अशा अनेकविध प्रयत्नांना दासबोध येथें **भजन** या नांवानें संबोधीत आहे, हें वाचकांनीं ध्यानीं घ्यावें. याच संदर्भात 'उपासनेचा ( भजनाचा ) मोठा आश्रयो । उपासनेवीण निराश्रयो ।' असा दिलासा सबंध समाजाला दासबोधानें दिला आहे, ( द. १६-१० ) ही उपासना वा हें **भजन** न करतां कितीहि प्रयत्न केले तरी यश मिळणें कदापि शक्य नाहीं, असा इशाराहि 'उदंड केले तरी तो जयो । प्राप्त ( होणार ) नाहीं' त्यानें तेथेंच देऊन ठेविला आहे. ज्यानें **लोकसंग्रह** साधतो तीच अंतरात्म्याची खरी उपासना होय किंवा तेंच आत्मारामाचें खरेंखुरें भजन होय, असा दासबोधाचा निश्चय आहे.

लोकोपयोगी अशा कोणत्या विविध गुणांची संपादणी करणें अगत्याचें आहे हें चौथ्या प्रकरणांत सांगितलें आहे. त्यासाठीं लोकांची व देशाची स्थिति नेमकी कशी आहे हें अगोदर समजून घेतलें पाहिजे. हें देश-लोकस्थितीचें वर्णन द. ११·२, द. १४·७ व द. १५·२ मध्यें आलेलें प्रथम दिलें आहे. लोकोपयोगी गुणांची उजळणी करतांना दीर्घसूचना ठेवावी

(द. १२·१), लोकांत बरेंपण राखावें (द. १२·२), विवेकी वागणुकीनें सकल लोकांना राजी (संतुष्ट, स्वसंबंधांत, कोणत्या ना कोणत्या तरी देश-कार्यांत) राखावें (ठेवावें) (द. १३·१०), धीट, पाठ व प्रासादिक अशा त्रिविध कवित्वानें (वक्तृत्व, कीर्तन, प्रवचन, संवाद, चर्चा) लोकजागृति साधावी (द. १४·३), हरिकथा करून जनतेला भक्तिमार्गाला लावावें (द. १४-५), शहाणपणानें लोकांत वागावें (द. १५-३), विश्वांत–लोकांत व्यापून राहिलेल्या नारायणाची पूजा करीत जावी (द. १५-९), आंगीं दीर्घसूचना, विवेक, विचार, श्रमाची आवड जडवून घ्यावी (द. १८-२ व ७), परिस्थितीला धरून जगांत वागावें (द. १९-७), परिभ्रमणानें लोकस्थितीचें बारकाईनें निरीक्षण करावें (द. १९-८), इत्यादि लोकोपयोगी गुणांचें विवरण या प्रकरणांत आलें आहे.

लोकहितकारी गुणांची संपादणी झाल्यानंतर **लोकसंग्रह** साक्षात् साधण्यासाठीं विरक्त (द. २-९), जाणता (द. ९-४), महंत (द. ११ ६), विवेकी पुरुष (द. १२-८), उत्तम पुरुष (द. १२-१०), निःस्पृह (द.१४-१), चतुर (द. १४-६, द. १५-१, द. १५-६, द. १९-२), धर्मस्थापनेचा पुरुष (द. १८-६), भाग्यशाली इसम (द. १९-४), परमार्थी आणि विवेकी (द. १९-६), यांपैकीं एक वा अनेक विशेष गुणांचा वापर करणें आवश्यक ठरतें. या सर्व गुणांच्या समुच्चयाला दासबोध हा राजकारण अशा महत्त्वाच्या नांवानें संबोधितो. या अशा राजकारणानें चहूंकडे मंडळांचीं जाळीं विणलीं पाहिजेत (द. १९-९), लोक-मानसांत विवेक–विचारांची पेरणी करायला हवी (द. १९-१०), आणि त्यायोगें '**समर्थ**' पदवी संपादली पाहिजे (द. १८-१०) असा दासबोधाचा उपदेश आहे.

**उपसंहार** (पृ. १६८ ते २२४)— या प्रकरणीं दासबोधव्यतिरिक्त स्वामींचे जे असंख्य वाङ्मयजलाशय आहेत, त्यांतल्या सर्व महत्त्वाच्या रचना एकत्र मांडल्या आहेत. दासबोधाखालोखाल वा त्याच्या बरोबरीचें स्थान असलेला 'आत्माराम' ४१ ओव्यांत सांगितल्यावर विशेष गुण व भाव यांचा वाचक असलेल्या 'रामदास्य' या आगळ्या शब्दाचे गुणविशेष दुसऱ्या प्रकरणांत एकत्र केले आहेत. त्यांत प्रभु रामरायाविषयींची अनन्य व अत्युत्कृष्ट भावना, रामदासी बाणा, राम हाच कर्ता व भोक्ताहि, तो राम आम्हांला देतो,

विश्वाचा मायबाप श्रीराम इ. स्फुट प्रकरणें दिल्यावर ‘ राघवाचा धर्म जागो ’ हें पांगुळ गाणें दिलें आहे. ब्रह्मपिसा व अद्‌भुत भूत हीं प्रकरणेंहि स्वमींची उत्कृष्ट व एकविध अशी श्रीरामोपासनाच दाखवितात.

करुणास्तोत्र हा स्वामी रामदासांच्या रचनेंतला अपूर्व असा विशेष आहे. एकांतीं, अंतरींच्या आत्मारामासमोर करुणास्वरांत हीं स्तोत्रें एकदां तरी वाचकांनीं स्वतःशीं गुणगुणावीं म्हणजे मग त्यांना त्या करुणास्तोत्राची अमृत-मय माधुरी व सौंदर्य प्रचीतीस येईल.

सर्वतोमुखीं असलेलें लोकप्रिय भीमरूपी स्तोत्रहि त्याचें फलित वगळून दिलें आहे.

चौथ्या प्रकरणांत स्वामींची रामराज्याविषयींची कल्पना नेमकी काय होती याची ओळख पटते. महंतास धाडलेल्या आज्ञापत्रांत (पृ. १८८) स्वामींच्या संघटनाचातुर्याची, लोकहिताच्या तळमळींची आणि त्यांच्या व्यवहारचातुर्याची अगदीं जवळून मैत्री होते.

पांचव्या शक्तिदेवीच्या स्तोत्रांत सहा स्तोत्रांतले उतारे दिले आहेत :

देखिली तुळजा माता । निवालों अंतरीं सुखें;

ऐश्वर्य सर्व शक्तीचें ।; शक्तीनें पावती सुखें ।

शक्तीनें नेटका प्राणी ।; शक्तीवीण दरिद्रता ।

युक्तीला पाहिजे शक्ती । ; तुझा तूं वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखता ।

इ. विचार सांगणारीं सर्वच स्तोत्रें स्फूर्तिदायक आहेत.

**आनंदवनभुवन** : हें सहावें प्रकरण आहे. स्वामींचें धर्मस्थापनेचें साकारलेलें स्वप्न त्यांनीं या जिवंत व जातिवंत काव्यांत रेखाटलें आहे. सारा महाराष्ट्राचा पवित्र परिसर आणि त्यांत सतत तीन तपांच्या अखंड संघर्षातून छत्रपतींनीं भारतीय व मराठी जनतेसाठीं निर्मिलेलें आनंद–उत्साहमय स्वराज्यभुवन ही त्यांच्या बारीक-सारीक खुणांसह, जशींच्या तशीं, वाचकांच्या मनःश्चक्षूंसमोर चालत्याबोलत्या अवस्थेंत स्वामींनीं या अमर काव्यांत उभीं केलीं आहेत. स्वामींच्या जीवनाचा, त्यांच्या आत्मचिंतनाचा, त्यांच्या इच्छा-आकांक्षांचा, त्यांच्या दीर्घ प्रयत्नांचा सबंध पटच्या पटच या दिव्य काव्यांत लोकांसमोर उभा ठाकतो !

उपसंहारांतलें सातवें प्रकरण हें राजकारणी पुरुषानें, भारतीय शासनांतल्या

प्रत्येक घटकानें, प्रत्येक राजपुरुषानें व देशा-देवा-धर्माची थोडीफार चाड वाहणाऱ्या सर्वांनीं पूर्णतया अभ्यासण्याजोगें आहे. थोड्या शब्दांत पण जीवनांतलीं सर्व अंगोपांगें वर्णिलीं जातील अशा ठाशीव व भरीव अक्षरांत स्वामींनीं छत्रपति शिवरायांचा केलेला गौरव छत्रपतींच्या सर्व इतिहासकारांना मागें टाकील इतका तो सरस झाला आहे! राजधर्म, क्षात्रधर्म व सावधता हीं तीन स्फुट प्रकरणें स्वामी रामदासांच्या राजकारणी व चतुर हृदयाची उत्तमपणें साक्ष पटवितील. संभाजीस लिहिलेल्या पत्राच्या अक्षरा-अक्षरांतून आजच्या महाराष्ट्रानें व सर्व भारतानेंहि सर्वच शिकण्यासारखें आहे. '– शिवरायाचा आठवावा प्रताप। शिवरायाचा आठवावा साक्षेप॥ शिवरायाचें कैसें बोलणें। शिवरायाचें कैसें चालणें। शिवरायाची सलगी देणें। कैसी असे —' हें सर्व कांहीं सांगून झाल्यावर मग त्याहून करावें विशेष। तरीच म्हणावें 'पुरुष' अशा शब्दांत उभ्या महाराष्ट्राच्या पौरुष्याला स्वामींनीं आव्हानलें आहे!

संसार धन्य करा, ज्ञानसंपन्न व्हा, पुण्यमार्ग प्रतिष्ठा, लोकांत नीतिन्यायानें वागा, जाणत्याची संगति धरा, भाग्यवान् व्हा, मनानें इतरांच्या मताला जपा, चतुर बना, अशा शब्दांत स्वामींनीं सामान्य जनांला केलेला उपदेश आठव्या प्रकरणांत आला आहे.

मुलांना उपदेश हें नववें प्रकरणहि मुलांसाठीं कांही खास गुण आवर्जून सांगतें.

स्वामींनीं मनास केलेला बोध हें प्रकरणहि स्वामींचें आगळें वैशिष्ट्य दाखवतें. हें सारें प्रकरण अनेक सुभाषितांची, उपदेशाची आणि आशा-अपेक्षांची खाणच म्हणा ना! खरें बोलण्याच्या साध्या नियमापासून तों कैवल्यप्राप्तीच्या अंतिम उद्दिष्टापावेतोंचे सर्व विषय निवडक ऐंशी श्लोकांत आलेले वाचकांना आढळतील.

दासबोधाच्या अखेरीच्या समासांत स्वामींनीं ग्रंथाचा केलेला समारोपच येथें दिला आहे. प्रार्थनेच्या दोन श्लोकांनंतर 'उपासनेला दृढ चालवावें। भू-देव-संतांसि सदा नमावे। सत्कर्मयोगें वय घालवावें। सर्वांमुखीं मंगल बोलवावें। या गोड पद्यमय शब्दांनीं रसवंतीची भपोण्णी घेतली आहे.

पुढील परिशिष्टवजा दोन पृष्ठांत स्वामी समर्थ रामदासांच्या आयुष्यांतल्या ठळक घटना कालानुक्रमानें दिल्या आहेत.

● ●

# श्रीसमर्थ मला कसे दिसतात–

मला श्रीसमर्थ हे महाराष्ट्राचे प्राण भासतात. श्रीसमर्थांची महाराष्ट्रास विस्मृती होईल, तर महाराष्ट्र मेला असें समजा. पण श्रीसमर्थ-चरणावरून महाराष्ट्राची दृष्टि कदापि वळणार नाहीं तर महाराष्ट्र अमर होईल, त्यास कोणी मारूं शकणार नाहीं, हें निश्चित – होय. श्रीसमर्थ हे राष्ट्रगुरु आणि महाराष्ट्र हा त्यांचा भक्त

अशीं दोन्हीं सामर्थ्यें येक होता । काळास नाटोपे सर्वथा
तेथें इतरांचीकोण कथा । कीटकन्यायें ?

...श्री समर्थांनीं मुसलमानी सत्तेला शह देऊन व ती संपुष्टांत आणून श्रीशिवरायाकरवीं रामराज्याची स्थापना केली. धर्माचें रक्षण केलें. भूभार हरण केला. जगदुद्धार केला आणि 'मतेंमतांतरें सगट । प्रत्ययें बोलोन सपाट' केलीं !

...श्रीसमर्थांचे एक चरित्रकार उद्धवसुत यांचें श्रीसमर्थांवर एक अष्टक आहे. त्याचा पहिला श्लोक

शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें ।
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा
नमस्कार माझा तया राम-दासा ॥

असा आहे. त्यांत वैराग्य, ज्ञान, कवित्व या तीन गोष्टीं आल्या आणि एकच राहिली असें मला वाटतें म्हणून या श्लोकाच्या चौथ्या चरणा ऐवजीं

'मला भासला आर्य चाणक्य ऐसा ॥

या ओळीनें समर्थांच्या चतुरंग अधिकाराचें दिग्दर्शन करीन. श्रीसमर्थ हे शुकासारखे सिद्ध होतें. वसिष्ठाप्रमाणें तत्त्वज्ञानी होतें. वाल्मिकीच्या तोलाचे कवी होते आणि आर्य चाणक्याप्रमाणें ते निस्पृह, कर्तृत्ववान्, राजनीतिनिपुणहि होते. हे चारहि अधिकार दर्शविण्यासाठीं क्रमशः प्रॉफेट्, फिलॉसॉफर, पोएट् व पॉलिटीशिअन् असे इंग्रजी शब्द योजतां येतील.

(समर्थभक्त कै. शंकररावजी तथा नानासाहेब देव यांचा 'पहिला सुमनहार' या ग्रंथांतल्या ३५ व्या लेखांतून)

● ●

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम...... .. ... ... .. दि: ... ..............

# समर्थांचें राजकारण

क्रमांक ........................ नों: दि: ..............

...समर्थांना जीवनांतील कर्तरीप्रयोगच शिकायचा होता. 'मरणाआधींच मरून' आपलें मरण डोळ्यांनीं पहावयाचें होतें. 'याचि जन्में येणेंचि काळें' स्वातंत्र्य मिळवावयाचे होतें. म्हणून त्यांनीं स्वतः गृहत्याग केला. आणि 'सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं' अशी सर्व जगास हांक मारिली. 'धर्माचें आचरण लहानपणींच सुरू झालें पाहिजे' ही भगवद्भक्त प्रल्हादाची भागवत धर्मातील आज्ञा त्यांनीं स्वतः शिरसामान्य केली आणि महाराष्ट्रास शिकविली.

......समर्थांना लोकांनीं 'समर्थ' संबोधलें तरी ते स्वतःला 'राम-दास' या नम्र नांवानें संबोधीत असत. आम्हाला कष्टाशिवाय फळ हवें. शिष्यत्वाशिवाय गुरुत्व हवें. उपासनेशिवाय सामर्थ्य हवें. आम्हाला निष्काम कर्मयोग नको. सकाम आळस पाहिजे ! 'रघुनाथ भजनें ज्ञान झालें । रघुनाथ भजनें महत्त्व वाढलें ।' असें आपल्या सामर्थ्याचें बीज समर्थांनीं स्वतःच सांगितलें आहे.

......'नाहीं देहाचा भरंवसा । केव्हां सरेल वयसा । प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे' अशी ही दो-दिवसांची अश्वत्थ वस्ती असल्यामुळें 'याकारणें सावधान असावें । जितकें होईल तितुकें करावें । भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ' ही एकच प्रेरणा समर्थांच्या आत्म्याला लागली होती. म्हणून 'ब्राह्मण-मंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या । संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ।' या उद्योगांत समर्थांनीं आपलें सर्व आयुष्य वेंचलें. 'कोणास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें । विवेकबळें जन लावावें । भजनाकडे,' अशी त्यांची दीक्षा असे. किंबहुना राजकारणाच्या समासांतहि 'उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें । अवकाश कैंचा कृत्रिमें । करावयासी ?' असें आपलें राजकारण त्यांनीं सांगितलें आहे. सर्व उद्योग उपासनेचा सामुदायिक प्रचार करण्याच्या दृष्टीनें केलें पाहिजेत, अशी त्यांची महंतांना आज्ञा होती. स्वतः परमेश्वराची उपासना करणें हा धर्म म्हटला तर समाजाकडून उपासना करविणें हें समर्थांच्या दृष्टीनें राजकारण होय.... 'रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी' हें समर्थांनीं आपलें जीवितकार्य मानलें असून तत्सिध्यर्थ राजकारण आणि सर्व सावधवृत्ती हीं अनिवार्य म्हणून त्यांनीं अंगिकारिली होती.

—मान्यवर विनोबांचें समर्थस्मरण

# रामदास रसवंतींतील विषयानुक्रम


समर्पण :

## उपक्रम

**१ प्रास्ताविक :**

दोन समास, ओवी २९

| | ओवी संख्या | पृष्ठांक |
|---|---|---|
| दासबोधीं काय बोलिलें, | ११ | १ |
| दासबोध–श्रवण–फल | ९ | २ |
| हा ग्रंथ कोणीं पाहावा | ९ | २ |

**२ वंदना :**

सात समास; ओवी ८३

| | | |
|---|---|---|
| ॐ नमोजी गणनायका | १० | ३ |
| आतां वंदीन वेदमाता | १५ | ४ |
| सद्गुरु वर्णवे ना | १५ | ५ |
| आतां वंदीन संतसज्जन | १३ | ६ |
| आतां वंदूं श्रोतेजन | ११ | ७ |
| आतां वंदूं कवीश्वर | १३ | ८ |
| आतां वंदूं सकळ सभा | ६ | ९ |

**३ विनंती :**

एक समास ओळी १०

| | | |
|---|---|---|
| ग्रंथार्थ समजून घ्या | १० | १० |

## बहुधा ज्ञान–विज्ञान

**१ मतमतांतरें :**

दोन समास; ओवी ६२

| | ओवी संख्या | पृष्ठांक |
|---|---|---|
| अज्ञानी माणसांचीं मतें | १८ | ११ |
| ज्ञात्यांचीं मतें | ३ | १२ |
| अनुभविकांचे अनुभव | २१ | १२ |
| भ्रमनिरूपण | २० | १४ |

**२ उभारणी–संहारणी :**

तेवीस समास
ओवी २३७

| | | |
|---|---|---|
| कहाणी | १५ | १६ |
| मूळमाया मूळपुरुष | ७ | १७ |
| प्रकृति-पुरुषमूळ माया | ९ | १७ |
| माया-निरूपण | ७ | १८ |
| निराकारी माया कैसी जाळी | ७ | १९ |
| मिथ्या जग कां दिसतें | १७ | १९ |
| जन्म कैसा वद्धातें | ५ | २१ |
| प्राणी कशानें बांधला जातो | ७ | २१ |
| पिंडब्रह्मांडरचना | ९ | २२ |
| विश्वाची उभारणी | ६ | २२ |
| सृष्टि–उभारणी | १७ | २३ |
| सृष्टिनिर्मितिक्रम | ९ | २४ |
| उभारणी | १५ | २५ |
| सृष्टीचें त्रिविधलक्षण | १० | २६ |
| ‘ भूत ’ म्हणजे काय | ९ | २७ |
| महाप्रलय | १३ | २८ |
| स्थूल–सूक्ष्म–शरीरधर्म | ११ | २९ |
| चौदा–ब्रह्म–परिचय | १५ | २९ |
| सृष्टीचे आठ प्रकार | ५ | ३१ |

पिंडीं तेंच ब्रह्मांडीं ५–३१
पंच प्रलय ४–३१
अष्ट–दश देह २–३२
आत्म्याचे चार प्रकार ११–३२
चार तनु-प्रकार ९–३३
चार वाणी २–३३
अंतःकरणपंचक ७–३४
प्राणपंचक २–३४
ज्ञान–कर्म–विषय–पंचक २–३४

## परमार्थ खंड

**१ परमार्थस्तव :**
एक समास; ओव्या ८
आतां स्तवूं हा परमार्थ ८–३५

**२ संसार दुःख :**
दहा समास; ओव्या ७९
संसार म्हणजे महापूर ६–३६
संसारसागर कोण तरतात १५–३६
नाही मरणासी उधार ४–३७
जीवप्राशक मृत्यु ३–३८
मृत्यूपासून कोण सुटतो ३–३८
जन्माचें मूळ–कल्पना ७–३८
आध्यात्मिक ताप ६–३९
आधिभौतिक ताप ७–३९
आधिदैविक ताप १–४०
बद्ध म्हणजे कोण ९–४०
मुळीं देह त्रिगुणांचा २–४१
रजोगुणाचें कर्तृत्व ७–४१
रजोगुणावर उपाय ४–४१
तमोगुण ५–४२

**३ सद्गुरु–सच्छिष्य–सदुपदेश :**
आठ समास–ओव्या ९६
सद्गुरुस्तव ४–४२
आत्मज्ञान नव्हे सद्गुरुवीण ७–४३
मोक्षदाता सद्गुरु १७–४३
सच्छिष्य वोळखण ९–४५
भगवंताचा विरक्त भक्त १०–४५
ब्रह्मादिकांहून हरिभक्त वरिष्ठ ११–४६
मुमुक्षू १५–४७
साधक १३–४८
आत्मज्ञानोपदेशच विशेष १०–४९

**४ भक्तिमार्ग :**
एकोणीस समास–ओव्या १९१
श्रवण–मनन ११–५०
श्रवण कैसें करावें ९–५१
श्रवण–मोक्षाचें साधन ९–५२
अध्यात्मनिरूपण–श्रवण १८–५३
पहिली भक्ति-श्रवण ८–५४
दुसरी भक्ति-कीर्तन ९–५५
कीर्तनापासून लाभ २–५५
तिसरी भक्ति-स्मरण ७–५६
चौथी भक्ति पादसेवन ९–५६
पांचवी भक्ति-अर्चन ७–५७
सहावी भक्ति-वंदन ५–५७
नमस्कारापासून लाभ ४–५८
सातवी भक्ति-दास्य ५–५८

आठवी भक्ति-सख्य ९–५९
नवमी भक्ति-आत्मनिवेदन ५–५९
'मी'चा विचार नको ९–६०
आत्मनिवेदन ३–६१
त्रिविध आत्मनिवेदन १२–६१
आत्मनिवेदन-लक्षण ९–६२
रघुनाथभजनीं लागावें ६–६३
रघुनाथभजनच कां १०–६३
सगुण भजन कशासाठीं ५–६४
सद्ग्रंथ ५–६४
अजपा-जप वर्णन १५–६५

**५. साधन मार्ग :**

एकवीस समास; ओव्या २६७
निष्काम सगुण भक्ति १८–६६
सद्गुरूस काय पुसावें १३–६७
सारशोधन १९–६८
ब्रह्म केव्हां कळतें ५–७०
नित्यानित्यविवेक १०–७०
नित्यानित्यविवेक १४–७१
सारासार विचार १६–७२
प्रत्ययज्ञानी तो समर्थ ९–७३
प्रचीतीचें आत्मज्ञान ९–७४
आत्मज्ञान-लक्षण १८–७५
परब्रह्म कसें पाहावें ११–७६
विवेकानें विषयत्याग १०–७७
विवेकानें ब्रह्म जाणणें ५–७८
विवेक-वैराग्य-योग १३–७८
आपणच आपला शोध घ्यावा ९–७९
विश्वकर्ता ओळखावा १४–८०
देव ओळखावा ९–८१
अंतरींचें ठेवणें जाणावें ९–८२
अंतरात्म्यातीत देव पाहावा १३–८३
सर्वोत्तमाचें अखंड ध्यान करावें २२–८३
अनंताला ओळखावें २१–८५

**६. परमात्मा-परब्रह्म :**

सात समास; ओव्या १००
अनिर्वाच्य वस्तु १५–८७
ब्रह्मनिरूपण १९–८८
ब्रह्म व आत्मा १२–८९
अंतर्देव-निरूपण १९–९०
परब्रह्म कोंदाटलें ८–९२
जाड परब्रह्मचि आहे २०–९२
सायुज्यमुक्ति व निर्गुणभक्ति ७–९४

**७. आत्मज्ञानी :**

पांच समास, ओवी ७९
परमदुर्लभ सत्त्वगुण २१–९५
संत-साधु-महानुभाव-सज्जन ५-९६
सिद्ध-साधु-लक्षण ३५–९७
ब्रह्मज्ञानी १०–९९
जीवन्मुक्त ज्ञानी ८–१००


## प्रपंच खंड


**१. धन्य नरदेह :**

पांच समास; ओवी ६५
धन्य नरदेह ८–१०१

नरजन्माचें सार्थक करा ११–१०१
देह-जीवात्म्याचा
  सहकार १६–१०२
देहदुर्लभता १७–१०३
परमदुर्लभ नरदेह १३–१०५

**२. गुणवान् प्रापंचिक :**
पंधरा समास; ओवी १८७
मूर्खलक्षण २३–१०६
शहाणे असोनि मूर्ख ११–१०७
करंटलक्षण १३–१०८
दुश्चितपण, आळस,
  निद्रा १८–१०९
उत्तम गुण २१–११०
सद्‌विद्येचीं लक्षणें १५–११२
उत्तम संगती धरावी ९–११३
आदर्श-लेखनक्रिया ७–११४
निंद्य सोडा, वंद्य
  हृदयीं धरा ९–११४
करंटेपण टाका
  भाग्यशाली व्हा १७–११५
भिक्षे ऐसें नाहीं वैराग्य ९–११६
गृहस्थाश्रम ६–११७
प्रपंच-परमार्थ
  दोन्ही करा ९–११७
प्रपंच परमार्थ सावधपणें
  चालवा ५–११८
प्रापंचिकाची दिनचर्या १५–११८

**३. लोकसंग्रहार्थ अंतरात्म्याची उपासना :**
सहा समास; ओवी ४९
सकळांचें एकच
  अंतःकरण ८–१२०
अंतरात्मा १; २ १६–१२०
अंतरात्मा हेंच
  देवांचें मूळ ८–१२२
अंतरात्म्याची
  संगती राखा ८–१२२
आत्मारामोपासनेचा
  मोठा आश्रय ९–१२३

**४. लोकोपयोगी गुणांची संपादणी :**
पंधरा समास; ओवी १८१
लोकस्थिति ११–१२४
देशस्थिति ६–१२५
महाराष्ट्र देशहि
  थोडा उरला ९–१२५
दीर्घ सूचना असावी ७–१२६
लोकांत बरेंपण राखावें १३–१२६
सकळ लोक राजी
  राखावे ८–१२७
कवित्वाचीं लक्षणें ६–१२८
कवित्वाचे तीन प्रकार ६–१२८
प्रासादिक कवित्व लक्षण ९–१२९
कवित्व लक्षण १०–१३०
हरिकथेचा अधिकारी ५–१३०
हरिकथालक्षण ११–१३१

कीर्ति करून मग जावें १५–१३१
विवेकें शहाणपण
शिकावें १४–१३३
विश्वांतल्या नारायणाची
पूजा करावी १५–१३४
उत्तम विवेक पाहावा ९–१३५
कष्ट-दीर्घसूचना-विचार ९–१३५
प्रसंगानुरूप वागावें ११–१३६
परिभ्रमण करावें ७–१३७

५ **लोकसंग्रहार्थ राजकारण–**
एकोणीस समास; ओवी ३९०
विरक्ताचीं लक्षणें १९–१३८
जाणतेपणानें
थोर व्हावें २५–१३९
राजकारणविवरण २३–१४१
जाणता महंत १६–१४३
विवेकी पुरुष ९–१४४
उत्तम-पुरुष लक्षण ३५–१४५
निःस्पृहाची शिकवण ३३–१४७
चातुर्यलक्षण १ ते ४; ७७–१५०
सत्कीर्तीचे पुरुष १२–१५५
निस्पृह शिकवण ९–१५६
राजकारणानें आंतर
शृंगारावें ९–१५७
धर्मस्थापनेचे नर १०–१५८
समर्थ पदवी सार्थ करा १२–१५९
भाग्यशाली व्हा २४–१६०
परमार्थी व
विवेकी व्हा २०–१६१
राजकारणानें मंडळ
वेष्टावें ३०–१६३
विवेकानें सर्वांचीं
अंतरें भरावीं २७–१६५

**उपसंहार**

१. **आत्माराम :**
५ विषय, ओवी ४१
वंदना,
उपदेश, माया सोडा,
साधन, स्वरूपस्थिति ४१–१६८

२. **रामदास्य :**
१७ विषय : ओवी १२५
रामोपासकांना निरोप १२–१७१
श्लाघ्यवाणें रामदास्य ५–१७२
रामदासी बाणा ९–१७२
रघुनाथध्यान ५–१७२
समर्थ रामाचें गुणगान ९–१७३
राम कर्ता-राम भोक्ता १०–१७३
तो राम आम्हांला देतो ४–१७४
विश्वाचा मायबाप
श्रीराम ६–१७४
राघवाचीच कांस धरीन ६–१७५
रात्रंदिन मन राघवीं
असावें ४–१७५
माझा समर्थ स्वामी
श्रीराम ७–१७५
सर्व कांहीं श्रीरामच ५–१७५
राम व दास एकच ४–१७५

राघवाचा धर्म जागो (पांगुळ) १३–१७६
ब्रह्मपिसा १०–१७७
अद्भुत भूत (प्रभुराम) ९–१७७
सोपा मंत्र-हरे राम ७–१७८

**३. करुणा स्तोत्र :**

१४ विषय : श्लोक ९१ — पृष्ठांक
विमल विवेक १७९
उदासीन हा काळ कोठें न कंठे १८०
तुजवीण रामा, मज कंठवे ना १८०
रघूनायका, मागणें हेंचि आतां १८१
धांव रे धांव आतां १८१
तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों. १८२
समर्था, तया काय उत्तीर्ण व्हावें ? १८३
बुद्धि दे, रघुनायका ! १८३
रघूनायका ! काय, कैसें करावें ? १८४
सर्वोत्तमा ! कै मज भेटि देसी ? १८४
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे १८४
श्रीराम राम हे म्हणा १८५
श्रीराम भक्त मूळ रे, प्रसन्न सानुकूळ रे १८५
भीमरूपी स्तोत्र १५–१८६

**४. रामराज्य कल्पना :**

२ विषय : ओवी २४
रामराज्य लक्षण १३–१८७
महंतास आज्ञापत्र ११–१८८

**५. शक्तिदेवींचीं स्तोत्रें :**

६ विषय : ओवी ४८
रामवरदायिनी माता ६–१८९
शक्तीवीण वृथा वृथा ५–१८९
तुझेनि राजकारणें ३–१८९
शक्ति युक्ति एकाच ठायीं १०–१९०
मुक्त केल्या देवकोडी ६–१९०
तुझा तूं वाढवी राजा १८–१९१

**६. आनंद-वनभुवन :** ४३–१९२

**७. धर्मस्थापकांचा गौरव :**

चार विषय ओवी ७१
शिवरायगौरव ११–१९६
राजधर्म १५–१९६
क्षात्रधर्म १३–१९८
सावधता १२–१९९
शिवरायास आठवावें २०–२००

**८. सामान्य जनांस उपदेश :**

९ विषय, ओवी ८२

धन्य संसार
कशानें होतो ? ७–२०१
हा सुकृताचा योग ७–२०२
ज्ञानसंपन्न व्हा ८–२०२
पुण्यमार्ग प्रतिष्ठावा १७–२०३
नीतिन्यायानें वागा १३–२०४
जाणत्याची संगती धरा ८–२०५
भाग्यवान् होऊन
मोक्ष संपादा ८–२०६
तनमनें झिजून पूर्ण व्हा ६–२०६
मनें राखा व चतुर बना ८–२०७

## ९. मुलांना उपदेश :

१७ विषय; ओवी १००
बरें सत्य बोला ७–२०७
रामाजवळ हें मागा १३–२०८
आईची सेवा करा ४–२०९
खूप शिकून जाणते व्हा ४–२०९
धीर धरा २–२०९
बरी संगती धरा ३–२०९
नेणत्यांना जाणते करा ५–२०९
मोठे कार्यकर्ते व्हा ८–२१०
साक्षेपी व्हा ७–२१०
अखंड सावध असा ६–२११
मनीं उपासना धरा ५–२११
प्रबोध घ्या ५–२१२
प्रयत्नशील व्हा ८–२१२
विवेकी-विचारी व्हा ५–२१३
यत्नशील व्हा ५–२१३
अचुक यत्नाला
देव माना ८–२१३
गुणांना जाणा; गुणी व्हा ५–२१४

## १०. मनाला शिकवण :

१० विषय; श्लोक ७९
जीवीं श्रेष्ठ धारिष्ट धर ७–२१५
चित्तीं रघुनायका
दृढ धर १४–२१५
सर्वोत्तम रामाचा
दास हो ९–२१६
प्रभातीं रामाला स्मर ११–२१७
बोलण्यासारखें चाल ५–२१८
वाद तुटणारे
संवाद कर ७–२१८
विचारून बोल
विवंचून चाल ८–२१९
अनंताला शोध ४–२१९
सदा सज्जनसंगती धर ७–२२०
ज्ञानी होऊन
स्वरूप जाण ७–२२०

## ११. ग्रंथाचा समारोप :

३ विषय; ओव्या १९
सकल करणें जगदीशाचें ५–२२१
संसार सफळ जाला ८–२२१
प्रार्थना ६–२२२
श्रीरामदासांच्या आयुष्यांतील
ठळक घटना– पृष्ठ २२३

● ●

| श्रीराम |

# उपक्रम

## १. प्रास्ताविक

### दासबोधीं काय बोलिलें — द. १-१

ग्रंथा नाम दास-बोध | गुरु-शिष्यांचा संवाद
येथ बोलिला विशद | भक्तिमार्ग १

नवविधा भक्ति आणि ज्ञान | बोलिलें वैराग्याचें लक्षण
बहुधा अध्यात्मनिरूपण | निरोपिलें २

'भक्तीचेनि योगें देव | निश्चयें पावती मानव'
ऐसा आहे अभिप्राव | इये ग्रंथीं ३

मुख्य भक्तीचा निश्चय | शुद्ध ज्ञानाचा निश्चय
आत्मस्थितीचा निश्चय | बोलिला असे ४

शुद्ध उपदेशाचा निश्चय | सायुज्यमुक्तीचा निश्चय
मोक्षप्राप्तीचा निश्चय | बोलिला असे ५

शुद्ध स्वरूपाचा निश्चय | विदेहस्थितीचा निश्चय
अलिप्तपणाचा निश्चय | बोलिला असे ६

मुख्य देवाचा निश्चय | मुख्य भक्ताचा निश्चय
जीवशिवाचा निश्चय | बोलिला असे ७

मुख्य ब्रह्माचा निश्चय | नाना मतांचा निश्चय
'आपण कोण' हा निश्चय | बोलिला असे ८

मुख्य उपासनालक्षण | नाना कवित्वलक्षण
नाना चातुर्यलक्षण | बोलिलें असे ९

नाना किंत निवारिले | नाना संशयो छेदिले
नाना आशंका, फेडिले | नाना प्रश्न १०

भगवद्वचनीं अविश्वासे | ऐसा कवण पतित असे ?
भगवद्वाक्याविरहित नसे | बोलणें येथींचें ११

### दासबोध श्रवण केल्याचें फळ   द. १-१

आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ
तुटे संशयाचें मूळ । येकसरा   १

मार्ग सांपडे सुगम । नलगे साधन दुर्गम
सायुज्यमुक्तीचें वर्म । ठायीं पडे   २

नासे अज्ञान, दुःख, भ्रांती । शीघ्रचि येथें ज्ञानप्राप्ती
ऐसी आहे फलश्रुती । इये ग्रंथीं   ३

योगियांचें परम भाग्य । आंगीं बाणे वैराग्य
चातुर्य कळे यथायोग्य । विवेकें सहित   ४

भ्रांत, अवगुणी, अवलक्षण । तेचि होती सुलक्षण
धूर्त, तार्किक, विचक्षण । समयो जाणती   ५

आळसी तेचि साक्षपी होती । पापी तेचि पस्तावती
निंदक तेचि वंदू लागती । भक्तिमार्गासी   ६

बद्धचि होती मुमुक्ष । मूर्ख होती अति दक्ष
अभक्तचि पावती मोक्ष । भक्तिमार्गें   ७

नाना धोके देहबुद्धीचे । नाना किंत संदेहाचे
नाना उद्वेग संसाराचे । नासती श्रवणें   ८

ऐसी याची फलश्रुती । श्रवणें चुके अधोगती
मनास होय विश्रांती । समाधान   ९

### जयास जोडला परमार्थ । तेणें पहावा हा ग्रंथ   द. ७-१

संसार हाचि दीर्घ स्वप्न । लोभें वोसणति जन
माझी कांता, माझें धन । कन्या-पुत्रहि माझे   १

ज्ञान-सूर्य मावळला । तेणें प्रकाश लोपला
अंधकारें पूर्ण जाला । ब्रह्मगोळ अवघा   २

नाही सत्त्वाचें चांदणें । कांहीं मार्ग दिसे जेणें
सर्व भ्रांतीचेनि गुणें । आपेंआप न दिसे   ३

देहबुद्धिअहंकारें। निजेले घोरती घोरें
दुखें आक्रंदती थोरें। विषयसुखाकारणें ४

निजेले असतांच मेले। पुन्हा उपजतांच निजेले
ऐसे आले आणि गेले। बहुत लोक ५

निदसुरेपणेंचि सैरा। बहुतीं केल्या येरझारा
नेणोनिया परमेश्वरा। भोगिले कष्ट ६

तया कष्टाचें निरसन। व्हावया पाहिजे आत्मज्ञान
म्हणोनि हें निरूपण। अध्यात्मग्रंथ ७

याकारणें अद्वैतग्रंथ। अध्यात्मविद्येचा परमार्थ
पाहावया तोचि समर्थ। जो सर्वांगें श्रोता ८

जयास जोडला परमार्थ। तेणें पाहावा हा ग्रंथ
अर्थ शोधितां परमार्थ। निश्चयें बाणे ९

## २. वंदना

**ओं नमो जी गणनायका** द. १-२

ओं नमो जी गणनायका। सर्वसिद्धिफलदायका
अज्ञानभ्रांतीछेदका। बोधरूपा १

तुझिये कृपेचेनि बळें। वितुळती भ्रांतीचीं पडळें
आणि विश्वभक्षक काळें। दास्यत्व कीजे २

जयाचें आठवितां ध्यान। वाटे परम समाधान
नेत्रीं रिघोनिया मन। पांगुळें सर्वांगीं ३

सगुण रूपाची ठेव। महालावण्य लाघव
नृत्य करितां सकळ देव। तटस्त होती ४

सर्वकाळ मदोन्मत्त। सदा आनंदें डुल्लत
हरुषें निर्भर उद्दित। सुप्रसन्नवदनु ५

चतुर्भुज लंबोदर । कासे कसिला पितांबर
फडके दोंदीचा फणिवर । धुधूकार टाकी ६

शोभे फरश आणि कमळ । अंकुश तीक्ष्ण तेजाळ
येके करीं मोदक गोळ । तयावरी अतिप्रीती ७

स्थिरता नाहीं येक क्षण । चपळविषयीं अग्रगण्य
साजिरी मूर्ति सुलक्षण । लावण्यखाणी ८

ऐसा सर्वांगें सुंदर । सकळ विद्यांचा आगरु
त्यासी माझा नमस्कारु । साष्टांग भावें ९

ऐसा गणेश मंगलमूर्ती । तो म्यां स्तविला यथामती
वांच्छा धरून चित्तीं । परमार्थाची १०

## आतां वंदीन वेदमाता द. १-३

आतां वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता
शब्दमूळ वाग्देवता । महामाया १

जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी अपार
जे शब्दाचें अभ्यंतर । उकलून दावी २

जे योगीयांची समाधी । जे धारिष्टांची कृतबुद्धी
जे विद्या-अविद्या-उपाधी । तोडून टाकी ३

जे महापुरुषाची भार्या । अति संलग्न अवस्था तुर्या
जयेकरितां महत्कार्या । प्रवर्तले साधू ४

जे महंतांची शांती । जे ईश्वराची निजशक्ती
जे ज्ञानियांची विरक्ती । नैराशशोभा ५

जे अनंत ब्रह्मांडें घडी । लीळा विनोदेंचि मोडी
आपण आदिपुरुषीं दडी । मारून राहे ६

जे प्रत्यक्ष पाहातां आडळे । विचार घेतां तरी नाडळे
जयेचा पार न कळे । ब्रह्मादिकांसी ७

जे लावण्यस्वरूपाची शोभा । जे परब्रह्मसूर्याची प्रभा
जे शब्दीं वदोनि, उभा । संसार नासी ८

जे परमार्थमार्गींचा विचार । निवडून दावी सारासार
भवसिंधूचा पैलपार । पाववी शब्दबळें ९
जे ब्रह्मादिकांची जननी । हरिहर जयेपासुनी
सृष्टिरचना लोक तीनी । विस्तार जियेचा १०
जे परमार्थाचें मूळ । ना तरी सद्विद्याचि केवळ
नितांत निर्मळ, निश्चळ । स्वरूपस्थिती ११
जे निर्गुणाची वोळखण । जे अनुभवाची खूण
जे व्यापकपणें संपूर्ण । सर्वांघटीं १२
नाना विद्या, कळा, सिद्धी । नाना निश्चयाची बुद्धी
जे सूक्ष्म वस्तूची शुद्धी । ज्ञप्तिमात्र १३
जे हरिभक्तांची निजभक्ती । अंतर्निष्ठांची अंतरस्थिती
जे जीवन्मुक्तांची मुक्ती । सायोज्यता ते १४
म्हणोनि थोरांहून थोर । जे ईश्वराचा ईश्वर
तयेसी माझा नमस्कार । तदंशेंचि आता १५

## म्हणोनि सद्गुरु वर्णवे ना — द. १-४

आतां सद्गुरु वर्णवे ना । जेथें माया स्पर्शों शके ना
तें स्वरूप मज अज्ञाना । काय कळे ? १
होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा
आतां असाल तैसे असा । सद्गुरुस्वामी २
नातुडे मुख्य परमात्मा । म्हणोनि करावी लागे प्रतिमा
तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्गुरूचा ३
जयजयाजी सद्गुरुराजा । विश्वंभरा, विश्वबीजा
परमपुरुषा, मोक्षध्वजा । दीनबंधू ४
आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्रह्मांड भरे
निसी जाल्यानंतरें । पुन्हा काळोखें ५
तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्ममृत्यू वाव
समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ६

उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंतचि क्षार
अथवा म्हणों क्षीरसागर । तरी तो नासेल कल्पांतीं ७
उपमे द्यावा जरी मेरू । तरी तो जड पाषाण कठोरू
तैसा नव्हे की सद्गुरु । कोमल दीनाचा ८
उपमे म्हणो गगन । तरी गगनापरीस ते निर्गुण
याकारणें दृष्टांत हीन । सद्गुरूस गगनाचा ९
धीरपणें उपमू जगती । हेहि खचेल कल्पांतीं
म्हणोनि धीरत्वास दृष्टांतीं । हीण वसुंधरा १०
आता उपमावा गभस्ती । तरी गभस्तीचा प्रकाश किती ?
शास्त्रें मर्यादा बोलती । सद्गुरू अमर्याद ११
सद्गुरूसि उपमावे अमृत । तरी अमर धरिती मृत्युपंथ
सद्गुरूकृपा यथार्थ । अमर करी १२
चिंतामात्र नाही मनीं । कोण पुसे चिंतामणी ?
कामधेनूचीं दुभणीं । निःकामासी न लगती १३
हरिहरब्रह्मादिक । नाश पावती सकळिक
सर्वदा अविनाश येक । सद्गुरुपद १४
म्हणोनि सद्गुरु वर्णवे ना । हे गे हेचि माझी वर्णना
अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती १५

## आतां वंदीन संत-सज्जन द. १-५

आतां वंदीन सज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान
जयांचेनि गुह्य ज्ञान । प्रगटे जनीं १
जे 'वस्तु' परम दुल्लभ । जयेचा अलभ्य लाभ
तेंचि होय सुलभ । संतसंगें करूनी २
जया सूर्याचेनि प्रकाशें । ऊर्णतंतु तोहि दिसे
नाना सूक्ष्म पदार्थ भासे । अणुरेणादिक ३
चिरलें बालाग्र तेंहि प्रकाशी । परी तो दावी ना वस्तूसी
तें जयाचेनि साधकांसी । प्राप्त होय ४

जेथें आक्षेप आटले । जेथें प्रत्न पस्तावले
जेथें तर्क मंदावले । तर्कितां निजवस्तूसी ५

तेचि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे
त्याचा महिमा वचनीं सांगे । ऐसा कवण ? ६

विचित्र कला या मायेची । परी वोळखी न संगवे वस्तूची
मायातीत अनंताची । संत सोय सांगती ७

संत आनंदाचें मूळ । संत सुखचि केवळ
नाना संतोषाचें मूळ । ते हे संत ८

संत धर्माचें धर्मक्षेत्र । संत स्वरूपाचें सत्पात्र
ना तरी पुण्याची पवित्र । पुण्यभूमी ९

संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार
नातरी बोलिजे माहेर । सायोज्यमुक्तीचें १०

संत सत्याचा निश्चयो । संत सार्थकाचा जयो
संत प्राप्तीचा समयो । सिद्धरूप ११

मोक्षश्रिया आलंकृत । ऐसे हे संत श्रीमंत
जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले १२

ऐसी संतांची महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा
जयांचेनी मुख्य परमात्मा । प्रगट होये १३

## आतां वंदूं श्रोतेजन द. १-६

आता वंदूं श्रोतेजन । भक्त, ज्ञानी, संत, सज्जन
विरक्त, योगी, गुणसंपन्न । सत्यवादी १

येक सत्त्वाचे सागर । येक बुद्धीचे आगर
येक श्रोते वैरागर । नाना शब्दरत्नांचे २

जे नाना अर्थामृताचे भोक्ते । जे प्रसंगीं वक्तयाचे वक्ते
नाना संशयातें छेदिते । निश्चयी पुरुष ३

ज्यांची धारणा अपार । जे ईश्वराचे अवतार
नातरी प्रत्यक्ष सुरवर । बैसले जैसे ४

कीं हे ऋषीश्वरांची मंडळी । शांतस्वरूप सत्त्वागळी
जयांचेनि सभामंडळी । परमशोभा ५

हृदयीं वेदगर्भ विलसे । मुखीं सरस्वती विलासे
साहित्य बोलतां जैसे । भासती देवगुरु ६

जे पवित्रपणें वैश्वानर । जे स्फूर्तिकिरणाचे दिनकर
ज्ञातेपणें दृष्टीसमोर । ब्रह्मांड न ये ७

जे अखंड सावधान । जयांस त्रिकाळाचें ज्ञान
सर्वकाळ निरभिमान । आत्मज्ञानी ८

ज्यांचे दृष्टीखालून गेलें । ऐसें कांहीच नाही उरलें
पदार्थमात्रासी लक्षिलें । मनें जयांच्या ९

जें जें कांही आठवावें । तें तें तयांस पूर्वींच ठावें
तेथें काय अनुवादावें । ज्ञातेपणें करूनी ? १०

परंतु हे गुणग्राहक । म्हणोनि बोलतों निःशंक
भाग्यपुरुष काय एक । सेवीत नाही ? ११

**आतां वंदूं कवीश्वर ।** **द. १-७**

आतां वंदूं कवीश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर
नातरी हे परमेश्वर । वेदावतारी १

अध्यात्म ग्रंथांची खाणी । की हे बोलके चिंतामणी
नाना कामधेनूंचीं दुभणीं । बोळलीं श्रोतयांसी २

की हे निरंजनाची खूण । की हे निर्गुणाची वोळखण
माया विलक्षणाचें लक्षण । ते हे कवी ३

कीं हा श्रुतीचा भावगर्भ । की हा परमेश्वराचा अलभ्य लाभ
नातरी होय सुलभ । निजबोध कविरूपें ४

कवि मुमुक्षाचें अंजन । कवि साधकाचें साधन
कवि सिद्धांचें समाधान । निश्चयात्मक ५

कवि स्वधर्माचा आश्रयो । कवि मनाचा मनोदयो
कवि धार्मिकाचा विनयो । विनयकर्ते ६

कवि वैराग्याचें संरक्षण । कवि भक्तांचें भूषण
नाना स्वधर्मरक्षण । ते हे कवि ७
आधी कवीचा वाग्विलास । तरी मग श्रवणीं तुंबळे रस
कवीचेनि मतिप्रकाश । कवित्वास होये ८
कवि व्युत्पन्नाची योग्यता । कवि सामर्थ्यवंतांची सत्ता
कवि विचक्षणाची कुशलता । नाना प्रकारें ९
नस्ता कवींचा व्यापार । तरी कैंचा अस्ता जगदोद्धार ?
म्हणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी १०
मागा वाल्मीक--व्यासादिक । जाले कवीश्वर अनेक
तयांपासून विवेक । सकळ जनांसी ११
की हे अमृताचे मेघ वोळले । की हे नवरसांचे वोघ लोटले
नाना सुखांचें उचंबळले । सरोवर हे १२
आतां असो हा विचार । जगास आधार कवीश्वर
तयांसी माझा नमस्कार । साष्टांगभावें १३

**आतां वंदूं सकळ सभा ।** द. १-८

नाहीं वैकुंठीच्या ठांई । नाही योगीयांचां हृदयीं
माझे भक्त गाती ठाईं ठाईं । तेथें मी तिष्ठत नारदा १
याकारणें सभा श्रेष्ठ । भक्त गाती तें वैकुंठ
नामघोषें घडघडाट । जयजयकारें गर्जती २
प्रेमळ भक्तांचीं गायनें । भगवत्कथा हरिकीर्तनें
वेदव्याख्यान पुराण श्रवणें । जेथें निरंतर ३
परमेश्वराचे गुणानुवाद । नाना निरूपणांचे संवाद
अध्यात्मविद्या भेदाभेद—। मंथन जेथें ४
ऐसिये सभेचा गजर । तेथें माझा नमस्कार
जेथे नित्यनिरंतर । कीर्तन भगवंताचे ५
कलौ कीर्तन वरिष्ठ । जेथें होय ते सभा श्रेष्ठ
कथाश्रवणें नाना नष्ट । संदेह मावळती ६

# ३. विनंती

**भाषा दुर्लक्षून ग्रंथार्थ समजून घ्या.** द. ७-१

जयास जोडला परमार्थ। तेणें पहावा हा ग्रंथ
अर्थ शोधितां परमार्थ। निश्चयें त्राणे १

येक म्हणती मराठी काय। हें तो भल्यासी ऐको नये
तीं मूर्खें नेणती सोय। अर्थान्वयाची २

लोहाची मांदूस केली। नाना रत्नें सांठविलीं
ते अभाग्यानें त्यागिली। लोखंड म्हणोनी ३

तैसी भाषा प्राकृत। अर्थ, वेदान्त आणि सिद्धान्त
नेणोनि त्यागी भ्रांत। मंद बुद्धिस्तव ४

आहाच सांपडतां धन। त्याग करणें मूर्खपण
द्रव्य घ्यावें, सांठवण। पाहोंच नये ५

तैसें प्राकृतीं अद्वैत। सुगम आणि सप्रचीत
अध्यात्म लाभे अकस्मात। तरी अवश्य घ्यावें ६

न करितां व्युत्पत्तीचा श्रम। सकळ शास्त्रार्थ होय सुगम
सत्समागमाचें वर्म। तें हें ऐसें असें ७

भाषा पालटे कांही। अर्थ वाया जात नाही
कार्यसिद्धि ते सर्वही। अर्थाचपासी ८

तथापि प्राकृताकरितां। संस्कृताची सार्थकता
येरवी त्या गुप्तार्था। कोण जाणे ! ९

आतां असो हें बोलणें। भाषा त्यागून अर्थ घेणें
उत्तम घेऊन, त्याग करणें। साली-टरफलांचा १०

●●●

। जय जय रघुवीर समर्थ ।

अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ...........

। श्रीराम ।

# बहुधा ज्ञान-विज्ञान

## १. मतमतान्तरें

### अज्ञानी माणसांचीं नाना मतें—कथाकल्लोळ द. ८-१०

येक म्हणती हा संसार । करितां, पाविजे पैलपार
आपला नव्हे कीं जोजार । जीव देवाचे १

येक म्हणती स्वभावें । संसार करावा सुखें नावें ( सुखेनैव )
कांहीं दान-पुण्य करावें । सद्गतीकारणें २

येक म्हणती संसार खोटा । वैराग्यें घ्यावा देशवटा (देशधडी)
येणें स्वर्गलोकींच्या वाटा । मोकळ्या होती ३

येक म्हणती कोठें जावें । व्यर्थचि कासया हिंडावें
आपुलें आश्रमीं असावें । आश्रमधर्म करूनी ४

येक म्हणती कैंचा धर्म । अवघा होतसे अधर्म
ये संसारीं नाना कर्म । करणें लागे ५

येक म्हणती बहुतांपरी । वासना असावी बरी
येणेंचि तरिजे संसारीं । अनायासें ६

येक म्हणती कारण भाव । भावेंचि पाविजे देव
येर हें अवघेंचि वाव । गाथागोवी ७

येक म्हणती देव ब्राह्मण । त्यांचें करावें पूजन
मायबाप नारायण । विश्वजनांचा ८

येक म्हणती शास्त्र पाहावें । तेथें निरोपिलें देवें
तेणें प्रमाणेंचि जावें । परलोकासी ९

येक म्हणती अहो जना । शास्त्र पाहतां पुरवेना
याकारणें साधुजनां । शरण जावें १०

येक म्हणती येकचि बरवें । आपुल्या आचारें असावें
अंतकाळीं नाम घ्यावें । सर्वोत्तमाचें ११

येक म्हणती जीत असावें । तंवचि सार्थक करावें
येक म्हणती फिरावें । तीर्थाटण १२

येक म्हणती तीर्थ स्वभावें । कारण मन आवरावें
येक म्हणती कीर्तन करावें । सावकाश १३

येक म्हणती योग बरवा । मुख्य तोचि आधीं साधावा
देहो अमरचि करावा । अकस्मात १४

येक म्हणती ज्ञान बरवें । येक म्हणती साधन करावें
येक म्हणती मुक्त असावें । निरंतर १५

येक म्हणती निःशेष । करूं नये निंदा-द्वेष
येक म्हणती सावकाश । दुष्टसंग त्यागावा १६

येक म्हणती सांडा गोठी । आधी पाहिजे ते रोटी
मग करावी चाउटी । सावकाश १७

येक म्हणती पूर्व ठेवा । येक म्हणती प्रेत्न करावा
येक म्हणती भार घालावा । देवावरी १८

## ज्ञात्यांचीं मतें

येक म्हणती करावी भक्ती । श्रीहरि देईल सद्गती
येक म्हणती ब्रह्मप्राप्ती । कर्मेंचि होय १९

येक म्हणती भोग सुटेना । जन्ममरण हें तुटेना
येक म्हणती उर्मी नाना । अज्ञानाच्या २०

-येक म्हणती सर्व ब्रह्म । तेथें कैचें क्रिया-कर्म ?
येक म्हणती हा अधर्म । बोलोंचि नये २१

## अनुभविकांचे अनुभवही वेगळालेच !

१. येक साक्षत्वें वर्तती । साक्षी वेगळाचि म्हणती
'आपण द्रष्टा' ऐसी स्थिती । स्वानुभवाची २२

दृश्यापासून द्रष्टा वेगळा। ऐसी अलिप्तपणाची कळा
आपण साक्षत्वें निराळा। स्वानुभवें २३
येक ऐसें स्वानुभवें। म्हणती, साक्षत्वें वर्तावें
दृश्य असोनी वेगळे व्हावें। द्रष्टपणें २४

२. येक म्हणती नाही भेद। 'वस्तु' ठायींच अभेद
तेथें कैंचा मतिमंद। द्रष्टा आणला ! २५
प्रपंच-परब्रह्म-अभेद। भेदवादी मानिती भेद
परी हा आत्मा स्वानंद। आकारला २६
विघुरलें तूप थिजलें। तैसें निर्गुणचि गुणा आलें
तेथें काय वेगळें केलें। द्रष्टेपणें ? २७
म्हणोनि द्रष्टा आणि दृश्य ! अवघा एकचि जगदीश
द्रष्टेपणाचे सायास। कासयासी ? २८

३. ऐका तिसरा अनुभव। प्रपंच सारूनिया सर्व
'कांही नाही' तोचि देव। ऐसें म्हणती २९
दृश्य अवघें वेगळें केलें। केवळ अदृश्यचि उरलें
तेंचि 'ब्रह्म' अनुभविलें। म्हणती येक ३०

परिहार :–परी तें ब्रह्म म्हणो नये। उपायासारिसा अपाये
शून्यत्वास ब्रह्म काय। म्हणो येईल ? ३१
दृश्य अवघें वोलांडिलें। अदृश्य शून्यत्वीं पडिलें
ब्रह्म म्हणोनि मुरडलें। तेथोनि मागें ३२
इकडे दृश्य तिकडे देव। मध्यें शून्यत्वाचा ठाव
तयास प्राणी मंदबुद्धिस्तव। ब्रह्म म्हणे ! ३३
रायास नाही वोळखिलें। सेवकास रावसें कल्पिलें
परी तें अवघें व्यर्थ गेलें। राजा देखतां ३४
तैसें शून्यत्व कल्पिलें ब्रह्म। पुढें देखतां परब्रह्म
शून्यत्वाचा अवघा भ्रम। तुटोनि गेला ३५
आधीं दृश्य सोडिलें। मग शून्यत्व वोलांडिलें
मूळमायेपरतें देखिलें। परब्रह्म ३६

भिन्नपणें अनुभविलें । तयास ‘ शून्य ’ ऐसें बोलिलें
‘ वस्तु ’ लक्षितां अभिन्न जालें । पाहिजे आधीं ३७

‘ वस्तु आपणचि होणें, ’ ऐसें वस्तूचें पाहणें
निश्चयेंसी भिन्नपणें । शून्यत्व लाभे ३८

याकारणें ‘ शून्य ’ कांहीं । परब्रह्म होणार नाहीं
वस्तुरूप होऊनि पाही । स्वानुभवें ३९

आपण ‘ वस्तु ’ सिद्धचि आहे । ‘ मन मी ’ ऐसें कल्पूं नये
साधू सांगती उपाये । ‘ तूंची आत्मा ’ ४०

संतवचनीं ठेवितां भाव । तोचि शुद्ध स्वानुभव
मनाचा तैसाचि स्वभाव । ‘ आपण वस्तू ’ ४१

‘ आपण वस्तू ’ मुळीं येक । ऐसा ज्ञात्याचा विवेक. ४२

## ऐक आतां भ्रमासी । निरोपिजेल द.१०-६

येक परब्रह्म संचलें । कदापी नाही विकारलें
त्यावेगळें भासलें । तें भ्रमरूप १

जयासी बोलिला कल्पांत । त्रिगुण आणि पंचभूत
हें अवघेंचि समस्त । भ्रमरूप २

‘ मी-तूं ’ हा भ्रम । उपासना ही भ्रम
ईश्वरभावहि भ्रम । निश्चयेंसी ३

याकारणें सृष्टि भासत । परंतु भ्रमचि हा समस्त
यामध्यें जे विचारवंत । तेचि धन्य ४

भ्रमण करिती दूरी देसी । दिशाभूली आपणासी
कां वोळखी मोडे जिवलगासी । या नांव भ्रम ५

कां उन्मत्त द्रव्य सेविलें । तेणें अनेक भासों लागलें
नाना वेथा, कां झडपिलें । भूतें, तो भ्रम ६

ठेविला ठाव तो विसरला । का मार्गीं जातां मार्ग चुकला
पट्टणामधें भांबावला । या नांव भ्रम ७

वस्तु आपणांपासी असतां। गेली म्हणोनि होय दुश्चिता
आपलें आपण विसरतां। या नांव भ्रम ८

दुश्चिन्हें अथवा अपशकुन। मिथ्या वार्तेने भंगे मन
वचके पदार्थ देखोन। या नांव भ्रम ९

वृक्ष, काळ देखिलें। मनास वाटे भूत आलें
कांहींच नस्ता हडबडिलें। या नांव भ्रम १०

आतां जे जे देइजे तें। तें तें पुढें पाविजेतें
मेलें माणूस भोजना येतें। या नांव भ्रम ११

ये जन्मीचें पुढिले जन्मीं। कांहीं येक पावेन मी
प्रीति गुंतली मनुष्याचे नामीं। या नांव भ्रम १२

मेलें माणूस स्वप्नीं आलें। तेणें कांहीं मागीतलें
मनीं अखंड बैसलें। या नांव भ्रम १३

कर्मठपणे ज्ञान विटे। का ज्ञानेपणें बळें भ्रष्टे
कोणीयेक सीमा फिटे। या नांव भ्रम १४

देशाभिमान, कर्माभिमान। जात्यभिमान, कुलाभिमान
ज्ञानाभिमान, मोक्षाभिमान। या नांव भ्रम १५

मागील कांही आठवेना। पुढील विचार सुचेना
अखंड आरूढ अनुमाना। या नांव भ्रम १६

प्रचीतीविण औषध घेणें। प्रचीत नस्तां पथ्य करणें
प्रचीतीवीण ज्ञान सांगणें। या नांव भ्रम १७

फलश्रुतीवीण प्रयोग। ज्ञानेंवीण नुस्ता योग
उगाच शरीरें भोगिजे भोग। या नांव भ्रम १८

ब्रह्मा लिहितो अदृष्टीं। आणि वाचून जाते सटी
ऐशा प्रकारींच्या गोष्टी। या नांव भ्रम १९

भ्रमरूप विश्वस्वभावें। तेथें काय म्हणोनि सांगावें
निर्गुण ब्रह्मावेगळें आघवें। भ्रमरूप २०

# २. उभारणी-राह्रोंवणी

**कहाणी** द. १३-५

कोणी येक दोघेजण। पृथ्वी फिरती उदासीन
काळक्रमणें लागून। कथा आरंभिली १

येके स्त्रीपुरुषें होती। उभयेतांमध्ये बहु प्रीती
येकरूपेंचि वर्तती। भिन्न नाही २

ऐसा कांही येक काळ लोटला। तयास येक पुत्र जाला
कार्यकर्ता आणि भला। सर्वविषयीं ३

पुढें त्यासचि जाला कुमर। तो पित्याहून आतुर
कांही तदर्ध चतुर। व्यापकपणें ४

तेणें व्याप उदंड केला। बहुत कन्यापुत्र व्याला
उदंड लोक संचिला। नानाप्रकारें ५

त्यांचा पुत्र ज्येष्ठ। तो अज्ञान आणि रागिष्ट
अथवा चुकतां नीट। संहार करी ६

पिता उगाच बैसला। लेकें बहुत व्याप केला
सर्वत्र जाणता भला। ज्येष्ठ पुत्र ७

नातू त्याचें अर्ध जाणे। पणतू तो कांहींच नेणें
चुकतां संहारणें। माहा क्रोधी ८

लेक सकलांचें पालण करी। नातू मेळवी वरिच्यावरी
पणतू चुकल्या संहार करी। अकस्मात ९

नेमस्तपणें वंश वाढला। विस्तार उदंडचि जाला
ऐसा बहुत काळ गेला। आनंदरूप १०

विस्तार वाढला, गणवेना। वडिलांस कोणीच मानी ना
परस्परें किंत मना। बहुत पडिला ११

उदंड घरकलहो लागला। तेणें कित्येक संहार जाला
विपट पडिलें थोरथोराला। बेबंद जाले १२

नेणपणें भरी भरले । मग ते अवघेचि संहारिले
जैसे यादव निमाले । उन्मत्तपणें १३

बाप, लेक, नातू, पणतू । सकळांचा जाला निपातू
कन्या, पुत्र हेतु मातु । अणुमात्र नाही १४

ऐसी कहाणी जो विवरला । तो जन्मापासून सुटला
श्रोता–वक्ता धन्य जाला । प्रचीतीने १५

## मूळ माया तोच मूळ पुरुष द. ८-३

परमात्मा परमेश्वर । सर्वकर्ता जो ईश्वर
तयापासूनि विस्तार । सकळ जाला १

ऐसी अनंत नामें धरी । अनंत शक्ति निर्माण करी
तोचि जाणावा चतुरीं । 'मूळ पुरुष' २

त्या मूळ पुरुषाची वोळखण । ते 'मूळ माया'चि आपण
सकळ कांहीं कर्तेपण । तेथेचि जालें ३

देवापासून सकळ जालें । हें सर्वांस मानलें
परी त्या देवास वोळखिलें । पाहिजे कीं ४

अविद्यागुणें बोलिजे 'जीव' । मायागुणें बोलिजें 'शिव'
मूळमायागुणें 'देव' । बोलिजे तो ५

'मूळमाया' तोचि मूळपुरुष । तोचि सर्वांचा ईश
अनंतनामी जगदीश । तयासीच बोलिजें ६

अवघी माया विस्तारिली । परी हे विशेष नाथिली
ऐसिया वचनाची खोली । विरळा जाणे ७

## पुरुष-प्रकृति=मूळमाया द. १० ९

आकाशीं वायो जाला निर्माण । तैसी ब्रह्मीं मूळमाया जाण
त्या वायोमध्यें त्रिगुण । आणि पंचभूतें १

बीजरूप मूळ माया । विस्तार जाला तेथूनिया
तिचें स्वरूप शोधूनिया । बरें पहावें २

तेथें दोनी भेद दिसती । विवेकें पाहावी प्रचीती
निश्चळीं जे चंचल स्थिति । तोचि वायू ३

तयामध्यें जाणीवकळा । जगज्जोतीचा जिव्हाळा
वायो, जाणीव मिळोन मेळा । मूळमाया बोलिजे ४

वायो, जाणीव, जगज्जोती । तयास मूळमाया म्हणती
पुरुष आणि प्रकृती । याचेंच नांव ५

वायोस म्हणती प्रकृती । आणि पुरुष म्हणती जगज्जोती
पुरुष-प्रकृति, शिव-शक्ति । याचेंच नांव ६

वायोमध्यें जाणीव विशेष । तोचि प्रकृतीमध्यें पुरुष
ये गोष्टीचा विश्वास । धरिला पाहिजे ७

वायो शक्ती, जाणीव ईश्वर । अर्धनारीनटेश्वर
लोक म्हणती निरंतर । येणें प्रकारें ८

वायोमध्यें जाणीव गुण । तेंचि ईश्वराचें लक्षण
तयापासून त्रिगुण । पुढें जाले ९

वायू=प्रकृति=शक्ति; जाणीव=जगज्जोती=पुरुष=शिव [वायू+जाणीव] =[ प्रकृति+पुरुष ]=मूळमाया=[ शक्ति+शिव ]; मूळमाया=ईश्वर= अर्धनारीनटेश्वर

## माया-निरूपण द. १४-१०

माया दिसे परी नासे । 'वस्तु' न दिसे परी न नासे
माया सत्य वाटे परी मिथ्या असे । निरंतर १

द्रव्यदारेचें स्वप्नवैभव । नानाविलासें हावभाव
क्षणिक वाटे परी माव । तैसी माया २

गगनीं गंधर्वनगरें । दिसतात नानाप्रकारें
नानारूपें नानाविकारें । तैसी माया ३

मेल्याचा महोत्सव करणें । सतीचें वैभव वाढवणें
मसणीं जाऊन रुदन करणें । तैसी माया ४

राखेसी म्हणती लक्ष्मी । दुसरी भारदोरी लक्ष्मी
तिसरी नाममात्र लक्ष्मी । तैसी माया ५
मुळीं बालाविधवा नारी। तिचें नांव जन्मसावित्री
कुबेर हिंडे घरोघरीं । तैसी माया ६
सावली आणि अंधकार । येक होतां तेथीचा विचार
उगाचि दिसे भासमात्र । तैसी माया ७

## निराकारीं कैसी जाली । मूळ माया ? द. ८-३

आकाश असतां निश्चळ । मधें वायो जाला चंचळ
तैसी जाणावी केवळ । मूळ माया १
रूप वायोचें जालें । तेणें आकाश भंगलें
ऐसें हें सत्य मानलें । न वचे की कदा २
तैसी मूळमाया जाली । आणि निर्गुणता संचली
येणें दृष्टांतें तुटली । समूळ आशंका ३
वायु नव्हता पुरातन । तैसी मूळमाया जाण
साच म्हणतां पुन्हां लीन । होतसे ४
तैसें मायेकरितां निर्गुण । वाटे जालें सगुण
परी तें पाहातां संपूर्ण । जैसें तैसें ५
दृष्टिबंधनाचा खेळ । तैसी माया हे चंचळ
वस्तु शाश्वत निश्चळ । जैसी तैसी ६
ऐसी वस्तु निरावेव । माया दाखवी सावेव
इचा ऐसाच स्वभाव । नाथिलीच हे ७

## दृश्य जर मिथ्या आहे, तर तें कां दिसतें? द. ६-८

देखिलें तें सत्यचि मानावें । हें ज्ञात्याचें देखणें नव्हे
जड-मूढ-अज्ञान-जीवें । हें सत्य मानिजे १
येक्या देखिल्यासाठीं । लटिक्या कराव्या ग्रंथकोटी
संतमहंतांच्या गोष्टी । त्याहि मिथ्या माना्व्या २

'माझें दिसतें हेंचि खरें । येथें चाले ना दुसरें'
ऐसिया संशयाच्या भरें । भरोंचि नये ३

मृगें देखिलें मृगजळ । तेथें धावतें बरळ
'जळ नव्हे, मिथ्या सकळ' । त्या पशूस कोणें म्हणावें ? ४

रात्रौ स्वप्न देखिलें । बहुत द्रव्य सांपडलें
बहुत जनांसी वेव्हारिलें । तें खरें कैसें मानावें ? ५

कुशल चितारी, विचित्र । तेणें निर्माण केलें चित्र
देखतां उठे प्रीति मात्र । परंतु तेथें मृत्तिका ६

सृष्टि बहुरंगीं असत्य । बहुरूपाचें हें कृत्य
तुज वाटे 'दृश्य' सत्य । परी ते जाण 'अविद्या' ७

मिथ्या साचासारिखें देखिले । परी तें पाहिजे विचारिलें
दृष्टि तरळतां भासलें । तें सत्य कैसें मानावें ? ८

माया मिथ्या बाजीगिरी । दिसे साचाचिये परी
परी हे जाणत्याने खरी । मानूंचि नये की ९

लटिकें सत्यासारिखें भावावें । तरी पारखी कासया असावें ?
एवं ये अविद्येचे यावे । ऐसीचि असती १०

मनुष्यांची बाजीगिरी । राक्षसांची वोडंबरी
भगवंताची नाना परी । विचित्र माया ११

तथापि असो, तुजला । भासचि सत्य वाटला
तरी येथें चुका पडला । ऐक बापा १२

'दृश्य'-भास अविद्यात्मक । तुझाहि देह तदात्मक
म्हणोनि हा अविवेक । तेथें संचरला १३

अविद्येने अविद्या देखिली । म्हणोनि गोष्टी विश्वासली
तुझी काया अवघी संचली । अविद्येची १४

तेंचि काया 'मी आपण' । हें देहबुद्धीचें लक्षण
येणेंकरितां जालें प्रमाण । 'दृश्य' अवघें १५

देहबुद्धि केली बळकट । आणि ब्रह्म पाहो गेला धीट
तों दृश्यानें रुंधिली वाट । परब्रह्माची १६

दृष्टीसी दिसे, मनासी भासे । तितुकें काळांतरीं नासे
म्हणोनि दृश्यातीत असें । परब्रह्म तें १७

## जन्म कैसा बद्धातें ? द. ९-८

पंचप्राण स्थळें सोडिती । प्राणरूप वासनावृत्ति
वासनामिश्रित प्राण जाती । देह सोडूनिया १

वायोसरिसी वासना गेली । ते वायोरूपेंचि राहिली
पुन्हा जन्म घेऊन आली । हेतुपरत्वें २

संकल्पासरिसा वायो गेला । तेथें वायोसुत निर्माण जाला
म्हणोन वायोरूप वासनेला । जन्म आहे ३

मनाच्या वृत्ति नाना । त्यांत जन्म घेते वासना
वासना पाहतां दिसेना । परंतु आहे ४

वासना जाणिजे जाणीवहेत । जाणीव मुळीचा मूळतंतू
मूळमायेंत असे मिश्रित । कारणरूपें ५

## प्राणी कशाने बांधला जातो ? द. ८-७

प्राणी संकल्पें बांधला । जीवपणें बद्ध जाला
तो विवेकें मुक्त केला । साधुजनीं १

'मी जीव' ऐसा संकल्प । दृढ धरितां गेले कल्प
तेणें प्राणी जाला अल्प । देहबुद्धीचा २

'मी जीव, मज बंधन । मज आहे जन्ममरण
केल्या कर्माचें फळ आपण । भोगीन आतां ३

पापपुण्यभोग सुटे ना । आणि गर्भवासहि तुटे ना'
ऐसी जयाची कल्पना । दृढ जाली ४

तया नांव बांधला । जीवपणें बद्ध जाला
जैसा स्वयें बांधोन कोसला । मृत्यू पावे ५

तैसा प्राणी तो अज्ञान । नेणे भगवंताचें ज्ञान
म्हणे माझें जन्ममरण । सुटेच्चिना ६
नरदेहीं ज्ञानेवीण । कदा न चुके जन्ममरण
भोगणें लागती दारुण । नाना नीच योनी ७

## ब्रह्मापासून तों पिंडब्रह्मांडरचनेपर्यंत. द. ८-४

ब्रह्मीं मूळमाया जाली । तिच्या पोटीं माया आली
सांग तें गुणां प्रसवली । म्हणोनि गुणक्षोभिणी १
पुढें तिजपासोन कोण । सत्त्वरजतमोगुण
तमोगुणापासोन निर्माण । जालीं पंचभूतें २
ऐसीं भूतें उद्भवलीं । पुढें तत्त्वें विस्तारलीं
एवं तमोगुणापासून जालीं । पंचमहाभूतें ३
जें जें जड आणि कठिण । तें तें पृथ्वीचें लक्षण
मृदु आणि वोलेपण । तितुकें आप ४
जें जें ऊष्ण आणि सतेज । तें तें जाणावें पै तेज
आतां वायोच्चि सहज । निरोपिजेल ५
चैतन्य आणि चंचळ । तो हा वायोच्चि केवळ
सून्य आकाश निश्चळ । आकाश जाणावें ६
भूतीं गुण मेळविजे । त्यासी अष्टधा बोलिजे
पंचभूतिक जाणिजे । अष्टधा प्रकृती ७
गुणांपासून भूतें । पावलीं स्पष्ट दशेतें
जडत्वा येऊन समस्तें । तत्त्वें जालीं ८
पुढें तत्त्वविवंचना । पिंडब्रह्मांड तत्त्वरचना
बोलिली असे, ते जना । प्रगटच्चि आहे ९

## विश्वाची उभारणी द. ११-१

आकाशापासून वायो होतो । हा तो प्रत्यये येतो
वायोपासून अग्नी जो तो । सावध ऐका १

वायोची कठीण घिसणी । तेथें निर्माण जाला वन्ही
मंद वायो, सीतळ पाणी । तेथूनि जाले २
आपापासून जाली पृथ्वी । ते नाना बीजरूप जाणावी
बीजापासून उत्पत्ति व्हावी । हा स्वभावचि आहे ३
पांच भूतें, तीन गुण । आठ जालीं दोनी मिळोन
म्हणोनि ' अष्टधा प्रकृति ' जाण । बोलिजेते ४
मुळीं जाली ते ' मूळमाया ' । त्रिगुण जाले ते 'गुणमाया'
जडत्व पावली ते 'अविद्यामाया' । सृष्टिरूपें ५
पुढें च्यारी खाणी जाल्या । च्यारी वाणी विस्तारल्या
नाना योनि प्रगटल्या । नाना व्यक्ती ६

**सृष्टीची उभारणी** द. १२-६

ब्रह्म निर्मळ, निश्चळ । शाश्वत, सार, अमळ, विमळ
अवकाश, घन, पोकळ । गगनाऐसें १
तयास करणें, ना धरणें । तयास जन्म ना मरणें
तेथें जाणणें ना नेणणें । शून्यातीत २
तें रचेना ना खचेना । तें होयेना ना जायेना
मायातीत निरंजना । पारचि नाहीं ३
पुढें संकल्प उठिला । षड्गुणेश्वर बोलिजे त्याला
अर्धनारीनटेश्वराला । बोलिजेतें ४
सर्वेश्वर, सर्वज्ञ । साक्षी, द्रष्टा, ज्ञानघन
परेश, परमात्मा, जगजीवन । मूळ पुरुष ५
ते मूळ माया बहुगुणी । अधोमुखें गुणक्षोभिणी
गुणत्रय तिजपासुनी । निर्माण जाले ६
पुढें विष्णु जाला निर्माण । जाणती कळा सत्त्वगुण
जो करिताहे पाळण । त्रैलोक्याचें ७
पुढें जाणीव-नेणीवमिश्रित । ब्रह्मा जाणावा निश्चित
त्याच्या गुणें उत्पत्ती होत । भुवनत्रयीं ८

पुढें रुद्र तमोगुण । सकळ संहाराचें कारण
सकळ कांही कर्तेपण । तेथेंचि आलें ९

तेथून पुढें पंच-भूतें । पावलीं स्पष्ट दशेतें
अष्टधा प्रकृतीचें स्वरूप तें । मुळींच आहे १०

निश्चळीं जालें चळण । तेंचि वायोचें लक्षण
पंचभूतें आणि त्रिगुण । सूक्ष्म अष्टधा ११

आकाश म्हणिजे अंतरात्मा । प्रत्ययें पाहावा महिमा
त्या आकाशापासून जन्मा– । वायो आला १२

तया वायोच्या दोन झुळुका । उष्ण–सीतळ ऐका
सीतळापासून तारा–मयंका । जन्म जाला १३

उष्णापासून रवि–वन्ही । विद्युल्लता आदिकरूनी
सीतळ–उष्ण मिळोनी । तेज जाणावें १४.

तया तेजापासून जालें आप । आप मिळोन पृथ्वीचें रूप
पुढें औषधी अमूप । निर्माण जाल्या १५

औषधींपासून नाना रस । नाना बीज, अन्नरस
चौऱ्यांसी लक्ष योनींचा वास । भूमंडळीं १६

ऐसी जाली सृष्टिरचना । विचार आणला पाहिजे मना
प्रत्ययेंवीण अनुमाना । पात्र होइजे १७

## सृष्टिनिर्मितीचा क्रम द. १०-४

ब्रह्मीं मूळमाया जाली । तेचि अष्टधा प्रकृति बोलिली
भूतीं त्रिगुणीं कालवली । मूळमाया १

ते मूळमाया वायोस्वरूप । वायोमध्ये जाणीवेचें रूप
तेचि इच्छा, परी आरोप । ब्रह्मीं न घडे २

'माया' ब्रह्मीं जो समीर । त्यांत जाणता तो 'ईश्वर'
ईश्वर आणि सर्वेश्वर । तयासीच बोलिजे ३

तोचि ईश्वर गुणांसी आला । त्याचा त्रिगुणभेद जाला
ब्रह्मा विष्णु-महेश उपजला । तये ठाईं ४

जाणता विष्णु भगवान । जाणता-नेणता चतुरानन
नेणता महेश पंचानन । अत्यंत भोळा ५

म्हणोनि वायोस्वरूप देह धरिले । ब्रह्मा-विष्णु-महेश जाले
पुढें तेचि विस्तारले । पुत्रपौत्रीं ६

पुढें ब्रह्मयाने सृष्टि कल्पिली । इच्छेसरिसी सृष्टि जाली
जीवसृष्टि निर्माण केली । ब्रह्मदेवें ७

जाणते नेणते प्राणी निर्मिले । वेद वदोन मार्ग लाविले
ब्रह्मयानें निर्माण केले । येणें प्रकारें ८

मग शरीरांपासोन शरीरें । सृष्टि वाढली विकारें
सकळ शरीरें येणें प्रकारें । निर्माण जालीं ९

## उभारणी — द. १३-३

ब्रह्म घन आणि पोकळ । आकाशाहून विशाळ
निर्मळ आणि निश्चळ । निर्विकारी १

ऐसेंचि असतां कित्येक काळ । तेथें आरंभला भूगोळ
तया भूगोळाचें मूळ । सावध ऐका २

परब्रह्म असतां निश्चळ । तेथें 'संकल्प' उठिला चंचळ
तयास बोलिजे केवळ । आदि-नारायण ३

मूळ माया, जगदीश्वर । त्यासीच म्हणिजे षड्गुणेश्वर
अष्टधा प्रकृतीचा विचार । तेथें पाहा ४

ऐलीकडे गुणक्षोभिणी । तेथें जन्म घेतला त्रिगुणी
मूळ ओंकाराची मांडणी । तेथून जाणावी ५

अ-कार, उ-कार, म-कार । तिनी मिळोनि ॐकार
पुढें पंचभूतांचा विस्तार । विस्तारला ६

आकाश म्हणिजे अंतरात्म्यासी । तयापासून जन्म वायोसी
वायोपासून तेजासी । जन्म जाला ७

वायोचा कातरा घसवटे । तेणें उष्णें वन्ही पेटे
सूर्यबिंब तें प्रगटे । तये ठांई ८

वारा वाजतो सीतळ । तेणें निर्माण जालें जळ
तें जळ आळोन भूगोळ । निर्माण जाला ९

त्या भूगोळाच्या पोटीं । अनंत बीजांचिया कोटी
पृथ्वी-पाण्या होतां भेटी । अंकुर निघती १०

पृथ्वी वल्ली नाना रंग । पत्रें पुष्पांचे तरंग
नाना स्वाद ते मग । फळें जालीं ११

पत्रें पुष्पें फळें मुळें । नाना वर्ण नाना रसाळें
नाना धान्यें अन्नें केवळें । तेथून जालीं १२

अन्नापासून जालें रेत । रेतापासून प्राणी निपजत
ऐसी हे रोकडी प्रचीत । उत्पत्तीची १३

अंडज जारज श्वेतज उद्भिज । पृथ्वी पाणी सकळांचें बीज
ऐसें हें नवल चोज । सृष्टिरचनेचें १४

च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यांसी लक्ष जीवयोनी
निर्माण जाले लोक तीनी । पिंड-ब्रह्मांड १५

**सृष्टीचें त्रिविध लक्षण । विशद करूं निरूपण** द. २०-२

(१) मूळमाया जाणिवेची । मुळीं सूक्ष्म कल्पनेची
जैसी स्थिती परा-वाचेची । तद्रूपचि ते १

अष्टधा प्रकृतीचें मूळ । ते हे मूळमायाच केवळ
सूक्ष्मरूप बीज सकळ । मूळींच आहे २

जड पदार्थ चेतविते । म्हणोनी चैतन्य बोलिजेते
सूक्ष्मरूपें संकेतें । समजोन घ्यावी ३

प्रकृतिपुरुषाचा विचार । अर्धनारीनटेश्वर
अष्टधाप्रकृतीचा विचार । सकळ कांहीं ४

गुप्त त्रिगुणांचें गूढत्व । म्हणोनि संकेत महत्तत्त्व
गुप्तरूपें शुद्धसत्त्व । तेथेंचि वसे ५

(२) जेथूनि गुण प्रगटती । तीस गुणक्षोभिणी म्हणती
त्रिगुणांचीं रूपें समजती । धन्य ते साधू ६

मूळमायेपासून त्रिगुण । चंचळ एकदेसी लक्षण
प्रत्ययें पाहातां खूण । अंतरीं येते ७

त्रिगुणापासून पृथ्वीवरी । दुसऱ्या जिनसाऱ्याची परी
दोनी जिनस याउपरी । तिसरा ऐका ८

(३) पृथ्वी नाना जिनसांचें बीज । अंडज, जारज, स्वेदज, उद्भिज
चारी खाणी चारी वाणी सहज । निर्माण जाल्या ९

खाणीवाणी होती जाती । परंतु तैसीच आहे जगती
ऐसे होती आणि जाती । उदंड प्राणी १०

**'भूत' म्हणजे निर्माण जालें । पुन्हा मागुतें निमालें** द. १५-४

पृथ्वीपासोन जालीं झाडें । झाडापासून होतीं लाकडें
लाकडें भस्मोन पुढें । पृथ्वीच होय १

नाना तृणें पदार्थ कुजती । पुढें त्यांची होय माती
नाना किडे मरोन जाती । पुढें पृथ्वी २

नाना बीजांचिया राशी । विरूढोन लागती गगनासी
पुढें सेवटीं पृथ्वीसी । मिळोन जाती ३

पत्रें, पुष्पें, फळें येती । नाना जीव खाऊन जाती
ते जीव मरतां जगती । नेमस्त होय ४

जितुका कांहीं जाला आकार । तितक्यास पृथ्वीचा आधार
होती-जाती प्राणिमात्र । सेवट पृथ्वी ५

आप आळोन पृथ्वी जाली । पुन्हा आपींच विराली
अग्नियोगें भस्म जाली । म्हणोनिया ६

आप जालें तेजापासुनी । पुढें तेजें घेतलें सोखुनी
तें तेज जालें वायोचेनी । पुढें वायो झडपी ७

वायो गगनीं निर्माण जाला । पुढे गगनींच विराला
ऐसें खांजणी-भांजणीला । बरें पाहा ८

जें जें येथें निर्माण होतें । तें तें तेथें लया जातें
येणें रीती पंचभूतें । नाश पावती ९

**महाप्रलय** द. १३-४

पृथ्वीस होईल अंत । भूतांस मांडेल कल्पांत
ऐसा समाचार साद्यंत । शास्त्रीं निरोपिला १
शतवरुषें अनावृष्टी । तेणें जळेल हे सृष्टी
पर्वत माती ऐसी पृष्ठी । भूमीची तरके २
बारा कळीं सूर्यमंडळा । किरणांपासून निघती ज्वाळा
शतवरुषें भूगोळा । दहन होये ३
तेथें महाभूतें खवळती । प्रळयवात सुटती
प्रळयपावक वाढती । चहूंकडे ४
वायो-विजांचे तडाखे । तेणें पृथ्वी अवघी तरके
कठीणत्व अवघेंचि फांके । चहूंकडे ५
पृथ्वीनें विरी सांडिली । अवघी धगधगायमान जाली
ब्रह्मांडभटी जळोन गेली । येकसरा ६
जळोन विरी सांडली । विशेष महावृष्टि जाली
तेणें पृथ्वी विराली । जळामध्यें ७
सिंधु नद्या एकवटल्या । नेणो नभींहून रिचवल्या
संधीच नाही धारा मिळाल्या । अखंड पाणी ८
सप्त सिंधु आवर्णी गेले । आवर्णवेडे मोकळे जाले
जळरूप जालिया खवळले । प्रळयपावक ९
तेणें आटोन गेलें पाणी । असंभाव्य माजला वन्ही
तया वन्हीस केली झडपणी । प्रळयवातें १०
दीपास पालव घातला । तैसा प्रळयपावक विजाला
पुढें वायो प्रबळला । असंभाव्य ११
उदंड पोकळी थोडा वारा । तेणें वितळोन गेला सारा
पंचभूतांचा पसारा । आटोपला १२
दृश्य हलकल्लोळें नेलें । जड चंचळ वितुळलें
याउपरी शाश्वत उरलें । परब्रह्म तें १३

## स्थूळ-सूक्ष्म शरीराचे पन्नास गुणधर्म — द. १७-९

अस्थि, मांस, त्वचा, नाडी, रोम । हे पांचही पृथ्वीचे गुणधर्म
प्रत्यक्ष शरीरी हें वर्म । शोधून पाहावें १

शुक्रीत, शोणीत, लाळ, मूत्र, स्वेद । हे आपाचे पंचक भेद
तत्त्वें समजोन विशद । करून घ्यावीं २

क्षुधा, तृषा, आलस्य, निद्रा, मैथुन । हे पांचहि तेजाचे गुण
या तत्त्वांचें निरूपण । केलेंचि करावें ३

चळण, वळण, प्रसारण । निरोधन आणि आकुंचन
हे पांचहि वायोचे गुण । श्रोतीं जाणावे ४

काम, क्रोध, शोक, मोह, भय । हा आकाशाचा पर्याय
हे विचारल्यावीण काय । समजों जाणे ? ५

असो ऐसे स्थूळ शरीर । पंचवीस तत्त्वांचा विस्तार
आतां सूक्ष्म देहाचा विचार । बोलिजेल ६

अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त, अहंकार । आकाश पंचकाचा विचार
पुढें वायो निरोत्तर । होऊन ऐका ७

व्यान, समान, उदान । प्राण आणि अपान
ऐसे हे पांचहि गुण । वायो तत्त्वाचे ८

श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा, घ्राण । हे पांचहि तेजाचे गुण
आतां आप सावधान । होऊन ऐका ९

वाचा, पाणी, पाद, शिस्न, गुद । हे आपाचे गुण प्रसिद्ध
आतां पृथ्वी विशद । निरोपिली १०

शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध । हे पृथ्वीचे गुण विशद
ऐसे हे पंचवीस तत्त्वभेद । सूक्ष्म देहाचे ११

## चौदा ब्रह्मांची ओळख — द. ७-३

पहिलें तें शब्द-ब्रह्म । दुजें मितिकाक्षरब्रह्म
तिसरें खं-ब्रह्म । बोलिली श्रुती १

चौथें जाण सर्वब्रह्म । पांचवें चैतन्यब्रह्म
साहावें सत्ताब्रह्म । साक्षब्रह्म सातवें २

आठवें सगुणब्रह्म । नववें निर्गुणब्रह्म
दाहावें वाच्यब्रह्म । जाणावें पैं ३

अनुभव तें आकावें । आनंदब्रह्म बारावें
तदाकार तेरावें । चौदावें अनिर्वाच्य ४

अनुभवेंवीण भ्रम । या नांव शब्दब्रह्म
आतां मितिकाक्षरब्रह्म । तें येकाक्षर ५

खं-शब्दें आकाशब्रह्म । महदाकाश व्यापकधर्म
आतां बोलिलें सूक्ष्म । सर्वब्रह्म ६

पंचभूतांचें कुवाडें । जें जें तत्त्व दृष्टी पडे
तें तें ब्रह्मचि चोखडें । बोलिजेत आहे ७

या नांव सर्वब्रह्म । श्रुति आश्रयाचें वर्म
आतां चैतन्यब्रह्म । बोलिजेल ८

पंचभूतादि मायेतें । चैतन्यचि चेतवितें
म्हणोनि त्या चैतन्यातें । चैतन्यब्रह्म बोलिजे ९

चैतन्यास ज्याचि सत्ता । तें सत्ताब्रह्म तत्त्वतां
तये सत्तेस जाणता । या नांव साक्षब्रह्म १०

साक्षत्व जयापासुनी । तेंहि आकळिलें गुणीं
सगुणब्रह्म हें वाणी । तयास वदे ११

जेथें नाही गुणवार्ता । तें निर्गुणब्रह्म तत्त्वता
वाच्यब्रह्म तेंहि आतां । बोलिजेल १२

जें वाचें बोलतां आलें । तें वाच्यब्रह्म बोलिलें
अनुभवासी कथिलें । न वचे सर्वथा १३

या नांव अनुभवब्रह्म । आनंदवृत्तीचा धर्म
परंतु याचेंहि वर्म । बोलिजेल १४

ऐसें हें ब्रह्म आनंद । तदाकार तें अभेद
अनिर्वाच्यीं संवाद । तुटोन गेला १५

## सृष्टीचे आठ प्रकार द. ६-६

येके कल्पनेचे पोटीं । बोलिजेती अष्ट सृष्टी
तया सृष्टीची गोष्टी । सावध ऐका १
येकी कल्पनेची सृष्टी । दुजी शाब्दिक सृष्टी
तिजी प्रत्यक्ष सृष्टी । जाणती सर्व २
चौथी चित्रलेप सृष्टी । पांचवी स्वप्नसृष्टी
साहावी गंधर्वसृष्टी । ज्वरसृष्टी सातवी ३
आठवी दृष्टिबंधन । ऐशा अष्ट-सृष्टी जाण
यांमधे श्रेष्ठ कोण । सत्य मानावी ? ४
म्हणोनी सृष्टी नाशिवंत । जाणती संतमहंत
सगुणीं भजावें निश्चित । निश्चयाकारणें ५

## जें पिंडीं तेंच ब्रह्मांडीं द. ९-५

स्थूळ, सूक्ष्म, कारण, माहाकारण । हे पिंडीचे च्यारी देह जाण
विराट, हिरण्य, अव्याकृत, मूळप्रकृति हे खूण । ब्रह्मांडींची १
पिंडीं आहे अंतःकरण । तरी ब्रह्मांडीं विष्णु जाण
पिंडीं बोलिजेतें मन । तरी ब्रह्मांडीं चंद्रमा २
पिंडीं बुद्धि ऐसें जाणिजे । तरी ब्रह्मांडीं ब्रह्मा ऐसें जाणिजे
पिंडीं चित्त, ब्रह्मांडीं वोळखिजे । नारायण ३
पिंडीं बोलिजे अहंकार । ब्रह्मांडीं रुद्र हा निर्धार
ऐसा बोलिला विचार । शास्त्रांतरीं ४
पांच भूतें ते ब्रह्मांडीं । आणि पांचचि वर्तती पिंडीं
याची पाहावी रोकडी । प्रचीत आतां ५

## पांच प्रळय द. १०-५

ऐक प्रळयाचें लक्षण । पिंडीं दोनी प्रळय जाण
येक निद्रा, येक मरण । देहांतकाळ १
देहधारक तिनी मूर्ती । निद्रा जेव्हा संपादिती
तो निद्राप्रळय श्रोतीं । ब्रह्मांडींचा जाणावा २

तिनी मूर्तीस होईल अंत । ब्रह्मांडास मांडेल कल्पांत
तेव्हां जाणावा नेमस्त । ब्रह्मप्रळयो जाला ३
दोनी पिंडीं, दोनी ब्रह्मांडीं । चारी प्रळय नवखंडीं
पांचवा प्रळय उदंडी । जाणिजे विवेकाचा ४

## अष्टदेह–दशदेह

स्थूळ, सूक्ष्म, कारण । माहाकारण, विराट, हिरण्य
अव्याकृत, मूळप्रकृति जाण । ऐसे अष्टदेह १
च्यारी पिंडी, च्यारी ब्रह्मांडीं । ऐसी अष्टदेहाची प्रौढी
प्रकृति–पुरुषांची वाढी । दशदेह बोलिजे २

## एकाच आत्म्याचे चार प्रकार

येक जीवात्मा, दुसरा शिवात्मा । तिसरा परमात्मा जो विश्वात्मा
चौथा जाणिजे निर्मलात्मा । ऐसे चारी आत्मे १
भेद उंच-नीच भासती । परी चारी येकचि असती
ये विषयीं दृष्टांत संमती । सावध ऐका २
घटाकाश, मठाकाश । महदाकाश, चिदाकाश
अवघे मिळोनि आकाश । येकचि असे ३
घटीं व्यापक जें आकाश । तया नांव घटाकाश
पिंडीं व्यापक ब्रह्मांश । त्यास 'जीवात्मा' बोलिजे ४
मठीं व्यापक जें आकाश । तया नांव मठाकाश
तैसा ब्रह्मांडीं जो ब्रह्मांश । त्यास 'शिवात्मा' बोलिजे ५
मठाबाहेरील आकाश । तया नाव महदाकाश
ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांश । त्यास 'परमात्मा' बोलिजे ६
उपाधीवेगळें आकाश । तया नांव चिदाकाश
तैसा 'निर्मलात्मा' परेश । तो उपाधीवेगळा ७
उपाधीयोगें वाटे भिन्न । परी तें आकाश अभिन्न
तैसा आत्मा स्वानंदघन । येकचि असे ८

ऐसें आत्म्याचें लक्षण । जाणतां, नाही जीवपण
उपाधी शोधितां अभिन्न । मुळींच आहे ९
विवेकें पाहिल्यावीण । जो जो उपाय तो तो सीण
विवेकें पाहातां, आपण । आत्माच असे १०
आत्मयाच्या ठाईं कांही । बद्ध मोक्ष दोनी नाही
जन्ममृत्यू हें सर्वही । आत्मत्वीं न घडे ११

## चार प्रकारच्या तनु द. १७-९

स्थूळ, सूक्ष्म, कारण, महाकारण । ऐसे हे चत्वार देह जाण
जागृति, स्वप्न, सुषुप्ति, पूर्ण । तुर्या जाणावी १
विश्व, तैजस, प्राज्ञ, । प्रत्यगात्मा हे अभिमान
नेत्रस्थान, कंठस्थान, हृदयस्थान । मूर्धनि ते २
स्थूळभोग, प्राविविक्तभोग । आनंदभोग, आनंदावभास भोग
ऐसे हे चत्वार भोग । चौ देहांचे ३
अकार, उकार, मकार । अर्धमात्रा तो ईश्वर
ऐशा मात्रा चत्वार । चौ देहांच्या ४
तमोगुण, रजोगुण । सत्त्वगुण, शुद्ध सत्त्वगुण
ऐसे हे चत्वार गुण । चौ देहांचे ५
क्रियाशक्ती, द्रव्याशक्ती । इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती
ऐशा चत्वार शक्ती । चौ देहांच्या ६
ऐसीं हे बत्तीस तत्त्वें । दोहींचीं पन्नास तत्त्वें
अवघीं मिळोन ब्याशीं तत्त्वें । अज्ञान आणि ज्ञान ७
ऐसी हे तत्त्वें जाणावीं । जाणोनि माईक ओळखावीं
आपण 'साक्षी' निरसावीं । येणें रीती ८
'साक्षी' म्हणजे ज्ञान । ज्ञानें वोळखावें अज्ञान
ज्ञानाज्ञानाचें निरसन । देहासरिसें ९

## चार वाणी द. १७-८

नाभीपासून उन्मेषवृत्ती । तेचि 'परा' जाणिजे श्रोतीं
ध्वनीरूप 'पश्यंती' । हृदयीं वसे १

कंठापासून नाद जाला । ' मध्यमा ' वाचा बोलिजे त्याला
उच्चार होतां अक्षराला । ' वैखरी ' बोलिजे २

**अंतःकरणपंचकाचा । निवाडा ऐसा** द. १७-८

निर्विकल्प जें स्फुरण । उगेंच असतां आठवण
तें जाणावें ' अंतःकरण ' । जाणती कळा १
अंतःकरण आठवलें । पुढें होय-नव्हेसें गमलें
करूं-न करूं ऐसें वाटलें । तेंची मन २
संकल्प-विकल्प तेंचि ' मन ' । जेणें करतां अनुमान
पुढें निश्चयो तो जाण । रूप बुद्धीचें ३
करीनचि अथवा न करी । ऐसा निश्चयोचि करी
तेचि ' बुद्धि ' हे अंतरीं । विवेकें जाणावी ४
जे वस्तूचा निश्चयो केला । पुढें तेंचि चिंतूं लागला
तें ' चित्त ' बोलिल्या बोला । यथार्थ मानावें ५
पुढें कार्याचा अभिमान धरणें । हें कार्य तों अगत्य करणें
ऐशा कार्यास प्रवर्तणें । तोचि ' अहंकारू ' ६
ऐसें अंतःकरणपंचक । पंचवृत्ति मिळोन येक
कार्यभागें प्रकारपंचक । वेगळाले ७

**प्राणपंचक** द. १७ ८

तैसे पांचहि प्राण । कार्यभागें वेगळाले जाण
नाहींतरी वायोचें लक्षण । येकचि असे १
सर्वांगीं 'व्यान', नाभीं 'समान' । कंठीं 'उदान,' गुदीं 'अपान'
मुखीं-नासिकीं ' प्राण ' । नेमस्त जाणावा २

**ज्ञान-कर्म-विषय-पंचक** द. १७-८

बोलिलें हें प्राणपंचक । आतां ज्ञान-इंद्रियें पंचक
श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा, नासिक । ऐसीं हीं ज्ञानेंद्रियें १
वाचा, पाणी, पाद, शिस्न, गुद । हीं कर्मेंद्रियें प्रसिद्ध
शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध । ऐसें हें विषय पंचक २

● ● ●

। जय जय रघुवीर समर्थ ।

| श्रीराम |

# परमार्थ खंड

## १. आतां स्तवूं हा परमार्थ

**आतां स्तवूं हा परमार्थ** द. १-९

आतां स्तवूं हा परमार्थ । जो साधकांचा निजस्वार्थ
नातरी समर्थांमध्ये समर्थ । योग हा १

आहे तरी परम सुगम । परी जनासी जाला दुर्गम
का, जयाचें चुकलें वर्म । सत्समागमाकडे २

आहे तरी चहूंकडे । परी अणुमात्र दृष्टीं न पडे
उदास, परी येकीकडे । पाहतां दिसे ना ३

अपूर्वता या परमार्थाची । वार्ता नाहीं जन्ममृत्यूची
आणि पदवी सायोज्यतेची । संनिधचि लाभे ४

प्रपंच वाटे लटिका । माया वाटे लापणिका
शुद्ध आत्मा, विवेका– । अंतरीं आला ५

परमार्थ सकळांस विसांवा । सिद्ध-साधु-महानुभावा
सेखीं सात्त्विक जडजीवां । सत्संगें करूनी ६

परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी
या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ! ७

भल्यानें परमार्थी भरावें । शरीर-सार्थक करावें
पूर्वजांस उद्धरावें । हरिभक्ति करूनी ८

• •

# २. संसार-दुःख

**संसार म्हणजे महापूर.** **द. ३-१०**

संसार म्हणजे महापूर । माजी जळचरें अपार
डंखूं धांवती विखार । काळसर्प १
' आशा, ममता ' देहीं वेडी । सुसरी करिताती तडातोडी
नेऊनि दुःखाचे सांकडी–माजी घालती २
' अहंकार '–नक्रें उडविलें । नेऊनि पाताळीं बुडविलें
तेथूनिया सोडविलें । न वचे प्राणी ३
' काम '–मगरमिठी सुटे ना । तिरस्कार लागला तुटे ना
' मद-मत्सर ' वोहटे ना । भूली पडली ४
' वासना '–धामीण पडली गळां । घालूनि वेंटाळें, वमी गरळा
जिव्हा लाळी वेळोवेळां । भयानक ५
माथा प्रपंचाचें वोझें । घेऊन, म्हणे ' माझें माझें '
बुडतांहि न सोडी, फुंजे । कुळाभिमानें ६

**संसारसागरांतून कोण तरून जातात ?** **द. ३-१०**

भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला
संकटीं पावे, भाविकाला । रक्षितसे १
जयास भगवंत आवडे । तयाचें देवासी सांकडें
संसारदुःख सकळ उडे । निजदासाचें २
जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे
धन्य तेचि दैवाचे । भाविकजन ३
जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणीमात्राचा ४
जरी भाव असला मायिक । तरी देव होये महा ठक
नवल तयाचें कौतुक । जैशास तैसा ५

जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव जाला
जो जैसें भजे, त्याला । तैसाचि बोळे ६

भावें परमार्थाचिया वाटा । वाहाती भक्तीचिया पेठा
भरला मोक्षाचा चोहटा । सज्जनसंगें ७

आपण स्वयें तरले । जनासही उपेगा आले
कीर्तिश्रवणें जाले । अभक्त भावार्थी ८

धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं
तेहींच येक जन्म जनीं । सार्थक केला ९

तयांची वर्णू काय थोरी । जयांचा भगवंत कैवारी
कासे लावून, उतरी । पार दुःखांचा १०

बहुतां जन्मांचे सेवटीं । जेणे चुके आटाटी
तो हा नरदेह, भेटी । करी भगवंतीं ११

म्हणोनि धन्य ते भाविक जन । जेंहीं जोडलें 'हरि'–निधान
अनंत जन्मांतरींचें पुण्य । फळासी आलें १२

आयुष्य हेचि रत्नपेटी । माजी भजनरत्नें गोमटीं
ईश्वरीं अर्पूनियां, लुटी । आनंदाची करावी १३

धरूनि ईश्वराची कास । केली संसाराची निरास
तयां भाविकां, जगदीश । सबाह्य सांभाळी १४

जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा
जयांचा जनावेगळा । ठेवा अक्षयी १५

**नाहीं मरणासी उधार** द. ३-९

'संसार' म्हणजे सवेचि स्वार । नाहीं मरणासी उधार
मापीं लागलें शरीर । घडीनें घडी १

नित्य काळाची संगती । न कळे होणाराची गती
कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देशीं-विदेशीं २

सरतां संचिताचें शेष । नाहीं क्षणाचा अवकाश
भरतां न भरतां निमिष । जाणें लागे ३

मृत्यूकाळ-काठी निकी । बैसे बळियांचे मस्तकीं
महाराजे बळिये लोकीं । राहों न सकती ४

**सकळ जीवांस मृत्यु प्राशन करतो**

मृत्यु न म्हणे हा क्रूर । मृत्यु न म्हणे हा झुंजार
मृत्यु न म्हणे संग्रामशूर । समरंगणीं १

मृत्यु न म्हणे हा बळाढ्य । मृत्यु न म्हणे धनाढ्य
मृत्यु न म्हणे हा आढ्य । सर्व गुणे २

मृत्यु न म्हणे हा भूपती । मृत्यु न म्हणे हा चक्रवर्ती
मृत्यु न म्हणे हा करामती । कैवाड जाणे ३

**मृत्युपासोनि सुटिजे कोणे ?**

श्रोतीं कोप न करावा । हा मृत्युलोक सकळांस ठावा
उपजला प्राणी जाईल बरवा । मृत्युपंथें १

ऐसें जाणोनिया जीवें । याचें सार्थकचि करावें
जनीं मरोनि उरवावें । कीर्तिरूपें २

असो, ऐसे सकळहि गेले । परंतु येकचि राहिले
जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ३

**कल्पना जन्माचें मूळ** द. ७ ५

द्वैत पाहतां ब्रह्म नसें । ब्रह्म पाहतां द्वैत नासे
द्वैताद्वैत भासे । कल्पनेसी १

कल्पना माया निवारी । कल्पना ब्रह्म थावरी
संशय धरी आणि वारी । ते ही कल्पना २

कल्पना करी बंधन । कल्पना दे समाधान
ब्रह्मीं लावी अनुसंधान । ते ही कल्पना ३

कल्पना द्वैताची माता । कल्पना ज्ञप्ति तत्त्वता
बद्धता आणि मुक्तता । कल्पनागुणें ४

कल्पना अंतरीं सबळ । नस्ते दावी ब्रह्मगोळ
क्षणा येकातें निर्मळ । स्वरूप कल्पी ५

कल्पना जन्माचें मूळ । कल्पना भक्तीचें फळ
कल्पना तेचि केवळ । मोक्षदाती ६
म्हणोनि सर्वांचें मूळ । ते हे कल्पनाच केवळ
इचें केलिया निर्मूळ । ब्रह्मप्राप्ती ७

**अध्यात्मिक ताप आतां । सावध ऐका** द. ३-६

देह, इंद्रिय आणि प्राण । यांचेनि योगें आपण
सुखदुःखें शिणे जाण । या नांव अध्यात्मिक १
देहामधून जें आलें । इंद्रिय-प्राणें दुःख जालें
तें अध्यात्मिक बोललें । तापत्रई २
शैत्य, ऊष्ण आणि तृषा । क्षुधा, निद्रा आणि दिशा
विषयतृष्णेची दुर्दशा । या नांव अध्यात्मिक ३
आळसी, मूर्ख आणि अपेशी । भय उद्‌भवे मानसीं
विसराळू, दुश्चित अहर्निशीं । या नांव अध्यात्मिक ४
कर्णदुःख, नेत्रदुःख । नाना दुःखें घडे शोक
गर्भांध आणि नपुंसक । या नांव अध्यात्मिक ५
वृद्धपणीच्या आपदा । नाना रोग होती सदा
देह क्षीण सर्वदा । या नांव अध्यात्मिक ६

**आतां अधिभौतिक तो कोण । सांगिजेल** द. ३-७

सर्व भूतांचेनि संयोगें । सुखदुःख उपजों लागे
ताप होता मन भंगे । या नांव अधिभौतिक १
बहु रोग, बहु औषधें । सांगतां अपारें अगाधें
प्राणी दुखवे तेणें खेदें । या नांव अधिभौतिक २
अग्नीचेनि जाळे-पोळे । तेणें दुःखें प्राणी हरंबळे
हानी जालिया विवळे । या नांव अधिभौतिक ३
हारपे, विसरे, आणि सांडे । नासे, गहाळे, फुटे, पडे
असाध्य होये कोणीकडे । या नांव अधिभौतिक ४

वीज पडे, हींव पडे, । प्राणी प्रभंजनीं सांपडे
कां तो महापुरीं बुडे । या नांव अधिभौतिक ५
नाना शस्त्रें भेदिला । नाना स्वापदीं भक्षिला
नाना बंदीं पडिला । या नांव अधिभौतिक ६
नाना कुवांसें निर्बुजे । नाना अपमानें लाजे
नाना शोकें प्राणी झिजे । या नांव अधिभौतिक ७

## आतां बोलिजेल अधिदैविक द. ३-८

शुभाशुभ कर्मानें जना– । देहांतीं यमयातना
स्वर्ग-नर्क-भोग नाना । या नांव अधिदैविक १

## बद्ध म्हणिजे तो कोण ? द. ५-७

आतां बद्ध जो जाणिजे ऐसा । अंधारींचा अंध जैसा
चक्षूवीण दाही दिशा । शून्याकार १
भक्त, ज्ञाते, तापसी । योगी, वीतरागी, संन्यासी
पुढें देखतां, दृष्टीसी । येणार नाहीं २
न दिसे, नेणे कर्माकर्म । न दिसे, नेणे धर्माधर्म
न दिसे, नेणे सुगम । परमार्थपंथ ३
तयास न दिसे सच्छास्त्र । सत्संगति, सत्पात्र
सन्मार्ग जो कां पवित्र । तोहि न दिसे ४
न कळे सारासारविचार । न कळे स्वधर्म, आचार
न कळे कैसा परोपकार । दानपुण्य ५
नाहीं पोटीं भूतदया । नाहीं शुचिष्मंत काया
नाहीं जनासी विनवावया । वचन मृदु ६
न कळे भक्ति, न कळे ज्ञान । न कळे वैराग्य, न कळे ध्यान
न कळे मोक्ष, न कळे साधन । या नांव बद्ध ७
परमार्थाविषयीं अज्ञान । प्रपंचाचें उदंड ज्ञान
नेणे स्वयें समाधान । या नांव बद्ध ८

नाना चिंता, नाना उद्वेग । नाना दुःखाचे संसर्ग
करी परमार्थाचा त्याग । या नांव बद्ध ९

## मुळीं देह त्रिगुणांचा द. २–५

मुळीं देह त्रिगुणांचा । सत्त्व–रज–तमाचा
त्यामध्यें सत्त्वाचा । उत्तम गुण १

सत्त्वगुणें भगवद्भक्ती । रजोगुणें पुनरावृत्ती
तमोगुणें अधोगती । पावती प्राणी २

## रजोगुणाचें कर्तृत्व द. २–५

'माझें घर, माझा संसार । देव कैंचा आणला थोर ?'
ऐसा करी जो विचार । तो रजोगुण १

माता, पिता आणि कांता । पुत्र, सुना आणि दुहिता
इतुकियांची वाहे चिंता । तो रजोगुण २

बरें खावें, बरें जेवावें । बरें ल्यावें, बरें नेसावें
दुसऱ्याचें अभिलाषावें । तो रजोगुण ३

कैंचा धर्म, कैंचें दान । कैंचा जप, कैंचें ध्यान
विचारी ना पापपुण्य । तो रजोगुण ४

मी तरुण, मी सुंदर । मी बलाढ्य, मी चतुर
मी सकळांमध्यें थोर । म्हणे, तो रजोगुण ५

दुसऱ्याचें सर्व जावें । माझेंचि बरें असावें
ऐसें आठवे स्वभावें । तो रजोगुण ६

असो, ऐसा रजोगुण । लोभें दावी जन्ममरण
प्रपंचीं तो सबळ जाण । दारुण दुःख भोगवी ७

## रजोगुण सुटण्याचा उपाय द. २–५

उपाय येक भगवद्भक्ती । जरी ठाके ना विरक्ती
तरी यथानुशक्ती । भजन करावें १

काया, वाचा आणि मनें । पत्रें, पुष्पें, फळें, जीवनें
ईश्वरीं अर्पूनिया मनें । सार्थक करावें २

यथानुशक्ति दानपुण्य । परी भगवंतीं अनन्य
सुखदुःखें परी चिंतन । देवाचेंचि करावें ३

आदिअंतीं येक देव । मध्येंचि लाविली माव
म्हणोनिया पूर्ण भाव । भगवंतीं असावा ४

**तमोगुण सांगिजेल.** द. २-६

संसारीं दुःखसंबंध । प्राप्त होतां उठे खेद
कां अद्‌भुत आला क्रोध । तो तमोगुण १

दुसऱ्याचा प्राण घ्यावा । कां आपण स्वयें द्यावा
विसरवी जिवाभावा । तो तमोगुण २

सत्कर्मे ते नावडती । नाना दोष ते आवडती
पाप-भय नाहीं चित्तीं । तो तमोगुण ३

परपीडेचा संतोष । निष्ठुरपणाचा हव्यास
संसाराचा नये त्रास । तो तमोगुण ४

ऐसें वर्ते तो 'तमोगुण' । परी हा पतनासी कारण
मोक्षप्राप्तीचें लक्षण । नव्हें येणें ५

● ●

## ३. सद्‌गुरु–सच्छिष्य–सदुपदेश

**सद्‌गुरुस्तवन** द. ५-१

जयजय जी सद्‌गुरु पूर्णकामा । परमपुरुषा आत्मयारामा
अनिर्वाच्य तुमचा महिमा । वर्णिला न वचे १

जें वेदांसी सांकडें । जें शब्दांसी कानडें
तें सच्छिष्यासी रोकडें । अलभ्य लाभे २

जें योगीयांचें निजवर्म । जें शंकराचें निजधाम
जें विश्रांतीचें निजविश्राम । परम गुह्य, अगाध ३
तें ब्रह्म तुमचेनि योगें । स्वयें आपणचि होईजे आंगें
दुर्घट संसाराचेनि पांगें । पांगिजे ना सर्वथा ४

## आत्मज्ञान नव्हे सद्गुरुवीण द. ५-१

स्वधर्मकर्मीं पूज्य ब्राह्मण । परी ज्ञान नव्हे सद्गुरुवीण
ब्रह्मज्ञान नस्ता सीण । जन्ममृत्यु चुके ना १
ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासी मूळ जालें
म्हणोनि सद्गुरूचीं पाउलें । सुदृढ धरावीं २
जयास वाटे देव पाहावा । तेणें सत्संग धरावा
सत्संगेंवीण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ३
तरी सद्गुरु-कृपेविरहित । सर्वथा न घडे स्वहित
यमपुरीचा अनर्थ । चुके ना येणें ४
ध्यान, धारणा, मुद्रा, आसन । भक्ति, भाव आणि भजन
सकळहि फोल, ब्रह्मज्ञान । जंव तें प्राप्त नाहीं ५
सद्गुरुचेनि अभयकरें । प्रगट होइजे ईश्वरें
संसारदुःखें अपारें । नासोनि जातीं ६
असो, जयासी मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा
सद्गुरुवीण मोक्ष पावावा । हें कल्पांतीं न घडे ७

## मोक्षदाता सद्गुरु ऐसा असे द. ५-२

जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञान-अंधार निरसी
जीवात्मया शिवात्मयासी । ऐक्यता करी १
वि-घडले देव आणि भक्त । जीव–शिवपणें द्वैत
तया देवभक्तां येकांत । करी, तो ‘ सद्गुरु ’ २
भव-व्याघ्रें घालोनि उडी । गोवत्सास तडातोडी
केली, देखोनि सीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ३

प्राणी मायाजाळीं पडले । संसारदुःखें दुखवले
ऐसे जेणें मुक्त केले । तो सद्गुरू जाणावा ४
फोडूनि शब्दाचें अंतर । 'वस्तु' दाखवी निजसार
तोचि गुरु माहेर । अनाथांचें ५
जीव येकदेसी बापुडें । तयासि ब्रह्मचि करी रोकडें
फेडी संसारसाकडें । वचनमात्रें ६
जें वेदांचें अभ्यंतरीं । तें काढून अपल्यापरी
शिष्य श्रवणीं कवळ भरी । उद्गारवचनें ७
संदेह निःशेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी
वेदविरहित टवाळी । करूंच नेणे ८
जेथें शुद्ध ब्रह्मज्ञान । आणि स्थूळ क्रियेचें साधन
तोचि सद्गुरु, निधान । दाखवी डोळां ९
निःशेष कामनारहित । ऐसा तो विरुळा संत
अवघ्या वेगळें मत । अक्षई ज्याचें १०
म्हणोनि निःकामनाविचारू । दृढ बुद्धीचा निर्धारु
तोचि सद्गुरु पैलपारू । पाववी भवाचा ११
मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमलज्ञान
निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिती १२
याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ
विशेष आचारें निर्मळ । स्वधर्मविषयीं १३
याहीवरी अध्यात्मश्रवण । हरिकथा-निरूपण
जेथें परमार्थविवरण । निरंतर १४
जेथें सारासारविचार । तेथें होय जगदुद्धार
नवविधाभक्तीचा आधार । बहुत जनांसी १५
अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन
तेथें बहु भक्तजन । विश्रांती पावती १६
नाना सद्विद्येचे गुण । याहीवरी कृपाळूपण
हें सद्गुरूचें लक्षण । जाणिजे श्रोतीं १७

## सच्छिष्याची वोळखण
द. ५-३

मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण
अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य १
शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारशीळ
शिष्य पाहिजे केवळ । विरक्त, अनुतापी २
शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे शुचिष्मंत
शिष्य पाहिजे नेमस्त । सर्व प्रकारीं ३
शिष्य पाहिजे साक्षेपी विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष
शिष्य पाहिजे अलक्ष । लक्षी, ऐसा ४
शिष्य पाहिजे अतिधीर । शिष्य पाहिजे अतिउदार
शिष्य पाहिजे अतितत्पर । परमार्थविषयीं ५
शिष्य पाहिजे परोपकारी । शिष्य पाहिजे निर्मत्सरी
शिष्य पाहिजे अर्थांतरीं । प्रवेशकर्ता ६
शिष्य पाहिजे परम शुद्ध । शिष्य पाहिजे परम सावध
शिष्य पाहिजे अगाध । उत्तम गुणांचा ७
शिष्य पाहिजे धारिष्टाचा । शिष्य पाहिजे दृढव्रताचा
शिष्य पाहिजे उत्तम कुळींचा । पुण्यशीळ ८
असो, ऐसे गुणावेगळे । ते सच्छिष्य आगळे
दृढभावार्थें सोहळे । भोगिती स्वानंदाचे ९

## ऐसा भगवंताचा भक्त । विशेष अंतरीं विरक्त
द.१४-७

पुरश्चरणी, कायाक्लेशी । दृढव्रती, परम सायासी
जगदीशावेगळें जयासी । थोर नाहीं १
काया–वाचा जीवें–प्राणें । कष्टे भगवंताकारणें
मनें घेतलें धरणें । भजनमार्गी २
ऐसा भगवंताचा भक्त । विशेष अंतरीं विरक्त
संसार सांडून जाला मुक्त । देवाकारणें ३

अंतरापासून वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य
लोलंगतेयेवढें अभाग्य । आणीक नाहीं ४

राजे राज्य सांडून गेले । भगवंताकारणें हिंडले
कीर्तिरूपें पावन जाले । भू-मंडळीं ५

ऐसा जो का योगेश्वर । अंतरीं प्रत्ययाचा विचार
उकलूं जाणे अंतर । प्राणीमात्रांचें ६

ऐसी वृत्ती उदासीन । त्याहीवरी विशेष आत्मज्ञान
दर्शनमात्रें समाधान । पावती लोक ७

बहुतांसी करी उपाय । तो जनाच्या वाट्या न ये
अखंड जयाचें हृदय । भगवद्रूप ८

जनांस दिसे हा दुश्चित । परी तो आहे सावचित्त
अखंड जयाचें चित्त । परमेश्वरीं ९

उपासना–मूर्तिध्यानीं । अथवा आत्मानुसंधानीं
नाहीतरी श्रवणमननीं । निरंतर १०

## हरिभक्त, ब्रह्मादिकां वरिष्ठ ! द. ३-१०

जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे
धन्य तेची दैवाचे । भाविक जन १

जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणीमात्रांचा २

जैसा भाव प्रतिबिंबिला । तयाचाचि देव जाला
जो जैसें भजे, त्याला । तैसाचि बोळे ३

भावें परमार्थाचिया वाटा । वाहाती भक्तीचिया पेठा
भरला मोक्षाचा चोहटा । सज्जनसंगें ४

आपण स्वयें तरले । जनांसहि उपेगा आले
कीर्तिश्रवणें जाले । अभक्त भावार्थी ५

धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं
तिहींच येक जन्म जनीं । सार्थक केला ! ६

म्हणोनि धन्य ते भाविकजन । जेही जोडले हरिनिधान
अनंत जन्मांतरीचें पुण्य । फळासी आलें ७

हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ
सदासर्वदा संतुष्ट । नैराश्यबोधें ८

धरूनि ईश्वराची कास । केली संसाराची निरास
तया भाविकां जगदीश । सबाह्य सांभाळी ९

जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंद-सोहळा
जयांचा जनावेगळा । ठेवा अक्षय १०

ते अक्षयसुखें सुखावले । संसारदुःखें विसरले
विषयरंगीं वो रंगले । श्रीरंगरंगीं ११

## ऐसा मुमुक्षु जाणिजे द. ५-८

संसारदुःखें दुखवला । त्रिविधतापें पोळला
निरूपणें पस्तावला । अंतर्यामीं १

जाला प्रपंचीं उदास । मनें घेतला विषयत्रास
म्हणे आतां पुरे सोस । संसारीचा २

प्रपंच जाईल सकळ । येथील श्रम तो निष्फळ
आतां कांही आपुला काळ । सार्थक करूं ३

ऐसी बुद्धि पस्ताविली । पोटीं अवस्था लागली
म्हणे माझी वयसा गेली । व्यर्थचि अवघी ४

आपले दोष आच्छादिले । भल्यांस गुणदोष लाविले
देवा म्यां व्यर्थच निंदिले । संत, साधु, सज्जन ५

नाहीं वोळखिले संत । नाहीं अर्चिला भगवंत
नाहीं अतीत-अभ्यागत । संतुष्ट केले ६

नाहीं कष्टविलें शरीर । नाहीं केला परोपकार
नाहीं रक्षिला आचार । काममदें ७

भक्ती-माता हे बुडविली । शांति-विश्रांती मोडिली
मूर्खपणें म्यां विघडिली । सद्बुद्धि, सद्वासना ८

सत्य तेंचि उच्छेदिलें । मिथ्य तेंचि प्रतिपादलें
ऐसें नाना कर्म केलें । उदरंभराकारणें ९

ऐसा पोटीं पस्तावला । निरूपणें पालटला
तोचि 'मुमुक्षु' बोलिला । ग्रंथांतरीं १०

पुण्यमार्ग पोटीं धरी । सत्संगाची वांछा करी
विरक्त जाला संसारीं । या नांव मुमुक्षु ११

नाना तीर्थें धुंडाळिलीं । शमदमादि साधनें केलीं
नाना ग्रंथांतरें पाहिलीं । शोधूनिया १२

अहंता सांडूनि दुरी । आपणास निंदी नाना परी
मोक्षाची अपेक्षा करी । या नांव मुमुक्षु १३

ज्याचें थोरपण लाजे । परमार्थाकारणें झिजे
संतापायीं विश्वास उपजे । या नांव मुमुक्षु १४

स्वार्थ सांडूनि प्रपंचाचा । हव्यास धरिला परमार्थाचा
'अंकित होईन सज्जनाचा' । म्हणे तो 'मुमुक्षु' १५

**आतां परिसा सावधान । 'साधक' तो कैसा** द. ५ ९

जो संतांसी शरण गेला । संतजनीं आश्वासिला
मग तो साधक बोलिला । ग्रंथांतरीं १

उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन
दृढतेकारणें करी साधन । या नांव साधक २

देहबुद्धि विवेकें वारी । आत्मबुद्धि सुदृढ धरी
श्रवण, मनन केलेंचि करी । या नांव साधक ३

उत्तम साधूंचीं लक्षणें । अंगिकारी निरूपणें
बळेंचि स्वरूपाकार होणें । या नांव साधक ४

अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणांचा अभ्यास
स्वरूपीं लावी निजध्यास । या नांव साधक ५

जें या जनास चोरलें । मनास न वचे अनुमानलें
तेंचि जेणें दृढ केलें । या नांव साधक ६

जेथें मनचि मावळें । जेथें तर्कचि पांगुळे
तेंचि अनुभवा आणी बळें । या नांव साधक ७
स्वानुभवाचेनि योगें । वस्तु साधी लागवेगें
तेंचि वस्तु होये आंगें । या नांव साधक ८
मीपण मागें सांडिलें । स्वयें आपणांस धुंडिलें
तुर्येसही वोलांडिलें । या नांव साधक ९
जयास अखंड स्वरूपस्थिती । नाहीं देहाची अहंकृती
सकळ संदेह-निवृत्ती । या नांव साधक १०
ज्ञान-विवेकें माजला । तेथें निश्चयो बळावला
अवगुणांचा संहार केला । वैराग्यबळें ११
अभ्यासाचा संग धरिला । साक्षेपासरिसा निघाला
प्रेत्न सांगाती भला । साधनपंथें १२
सावध, दक्ष तो साधक । पाहे नित्यानित्यविवेक
संग त्यागूनि, येक । सत्संग धरी १३

**आत्मज्ञानाचाच उपदेश विशेष** द. ५-४

ऐका उपदेशाचीं लक्षणें । बहुविध कोणकोणें
सांगतां ते असाधारणें । परी कांहींयेक सांगों १
बहुतेक मंत्र उपदेसिती । कोणी नाममात्र सांगती
येक ते जप करवीती । 'ओं' काराचा २
शिवमंत्र, भवानीमंत्र । विष्णुमंत्र, महालक्ष्मीमंत्र
अवधूतमंत्र, गणेशमंत्र । मार्तंडमंत्र सांगती ३
येक सांगती सगुण । येक निरोपिती निर्गुण
येक उपदेशिती तीर्थाटन । फिरावें म्हणुनी ४
येक महावाक्यें सांगती । त्यांचा जप करावा म्हणती
येक उपदेश करिती । सर्व ब्रह्म म्हणोनी ५
ऐसे उपदेश अनेक । परी ज्ञानेंवीण निरर्थक
येविषयीं असे येक । भगवद्वचन ६

'नानाशास्त्रं पठेल्लोको नानादैवतपूजनं
आत्मज्ञानंविना पार्थ सर्वकर्म निरर्थकं'
'शैवशाक्तागमाद्या ये अन्ये च बहवो मताः
अपभ्रंशसमास्तेऽपि जीवानां भ्रांतचेतसां'
'न हि ज्ञानेन सदृशं पवित्र इह विद्यते'
याकारणें ज्ञानासमान । प्रवित्र उत्तम न दिसे आन
म्हणोनि आधी 'आत्मज्ञान' । साधिलें पाहिजे ७
सकळ उपदेशीं विशेष । आत्मज्ञानाचा उपदेश
येविषईं जगदीश । बहुतां ठाईं बोलिला ८
'यस्य कस्य च वर्णस्य ज्ञानं देहे प्रतिष्ठितं
तस्य दासस्य दासोऽहं भवे जन्मनि जन्मनि'
आत्मज्ञानाचा महिमा । नेणे चतुर्मुख ब्रह्मा
प्राणी बापुडा जीवात्मा । काय जाणे ! ९
सकळ तीर्थांची संगती । स्नानदानाची फलश्रुती
त्याहूनि ज्ञानाची स्थिती । विशेष कोटिगुणे १०
'पृथिव्यां यानि तीर्थानि स्नानदानेषु यत्फलं
तत्फलं कोटिगुणितं ब्रह्मज्ञानसमोपमं'

● ●

# ४ भक्तिमार्ग : नवविधाभक्ति-सगुणभक्ति

## परमार्थाचीं साधनें : श्रवण-मनन द. ७-८

ऐका परमार्थाचें साधन । जेणें होय समाधान
तें तूं जाण गा श्रवण । निश्चयेंसी १
श्रवणें आतुडे भक्ती । श्रवणें उद्भवे विरक्ती
श्रवणें तुटे आसक्ती । विषयांची २

श्रवणें घडे चित्तशुद्धी । श्रवणें होय दृढबुद्धी
श्रवणें तुटे उपाधी । अभिमानाची
सत्संगावरी श्रवण । तेणें कळे निरूपण
श्रवणें होईजे आपण । तदाकार
ऐकिल्यावीण कळेना । हें ठाऊक आहे जना
याकारणें मूळ प्रेत्ना । श्रवण आधीं
श्रवणाचा विचार कळे । तरीच भाग्यश्री प्रगटे वे[illegible]
मुख्य परमात्माच आकळे । स्वानुभवासी ६

या नांव जाणावें मनन । अर्थालागीं समाधान
निजध्यानें समाधान । होत असे ७

बोलिल्याचा अर्थ कळे । तरीच समाधान निवळे
अकस्मात अंतरीं बोळे । निःसंदेहता ८

संदेह जन्माचें मूळ । तें श्रवणें होय निर्मूळ
पुढे सहजचि प्रांजळ । समाधान ९

तस्मात् श्रवण करावें । साधन मनीं धरावें
नित्यनेमें तरावें । संसारसागरीं १०

सेवितेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन
तैसें श्रवण-मनन । केलेंचि करावें ११

## आतां श्रवण कैसें करावें ? कोण्या ग्रंथास पाहावें ? द. ७-८

जेथे संशय तुटती । होय आशंकानिवृत्ती
अद्वैतग्रंथ परमार्थी । श्रवण करावें १

जो मोक्षाचा अधिकारी । तो परमार्थपंथ धरी
प्रीति लागली अंतरीं । अद्वैतग्रंथाची २

जेणें सांडिला इहलोक । जो परलोकींचा साधक
तेणें पहावा विवेक । अद्वैतशास्त्रीं ३

तैसा जो आत्मज्ञानी नर । तयास नावडे इतर
तेथें पाहिजे सारासार– । विचारणा ते ४

आता असो हें बोलणें । जयासी स्वहित करणें
तेणें सदा विचरणें । अद्वैतग्रंथीं ५

आत्मज्ञानी येकचित्त । तेणें पाहावें अद्वैत
येकांतस्थळीं निवांत । समाधान ६

बहुतप्रकारें पाहातां । ग्रंथ नाहीं अद्वैतापरता
परमार्थास तत्त्वता । तारूंच कीं ७

आता असो हें बहुत । ऐकावा परमार्थ ग्रंथ
परमार्थ-ग्रंथेवीण व्यर्थ । गाथागोवी ८

म्हणोनि नित्यानित्यविचार । जेथें बोलिला सारासार
तोचि ग्रंथ पैलपार । पाववी विवेकें ९

## मोक्षाचें अनायास साधन : श्रवण द. ८-६

मनाच्या तोडून वोढी । श्रवणीं बैसावें आवडी
सावधपणें घडीनें घडी । काळ सार्थक करावा १

अर्थ-प्रमेय ग्रंथांतरीं । शोधून घ्यावें अभ्यंतरीं
दुश्चितपण आलें तरी । पुन्हा श्रवण करावें २

अर्थांतर पाहिल्यावीण । उगेंच करी जो श्रवण
तो श्रोता नव्हे, पाषाण । मनुष्यवेषें ३

सावध, साक्षेपी आणि दक्ष । तयास तत्काळचि मोक्ष
इतरांस तें अ-लक्ष । लक्षिलें न वचे ४

येथें शिष्य-प्रज्ञाच केवळ । प्रज्ञावंता न लगे वेळ
अनन्यास तत्काळ । मोक्ष लाभे ५

प्रज्ञावंत आणि अनन्य । तयास न लगे एक क्षण
अनन्य भावार्थेंवीण । प्रज्ञा खोटी ६

प्रज्ञेवीण भावार्थ न कळे । विश्वासेंवीण वस्तु ना कळे
प्रज्ञा-विश्वासें गळे । देहाभिमान ७

देहाभिमानाचे अंतीं । सहजचि वस्तुप्राप्ती
सत्संगें सद्गती । विलंब नाहीं ८

सावध, साक्षेपी, दक्ष । प्रज्ञावंत आणि विश्वास
तयासि साधनीं सायास । करणेंचि न लगे ९

**श्रवणामध्यें सार श्रवण । तें हें अध्यात्मनिरूपण** द. १७-३

श्रवणामध्ये सार श्रवण । तें हें अध्यात्मनिरूपण
सुचित करून अंतःकरण । ग्रंथामध्यें विवरावें १
श्रवणमननाचा विचार । निजध्यासें साक्षात्कार
रोकडा मोक्षाचा उधार । बोलोंच नये २
येकांतीं नाजुक कारभार । तेथें असावें अतितत्पर
त्याच्या कोटिगुणें विचार । अध्यात्मग्रंथीं ३
कहाण्या, कथा, गोष्टी, पवाड । नाना अवतार चरित्रें वाड
त्या समस्तांमध्यें जाड । अध्यात्मविद्या ४
गत गोष्टीसी ऐकिलें । तेणें काय हातासि आलें ?
म्हणती पुण्य प्राप्त जालें । परी तें दिसेना की ५
तैसें नव्हे अध्यात्मसार । हा प्रचीतीचा विचार
कळतां, अनुमानाचा संहार । होत जातो ६
मोठे मोठे येऊन गेले । आत्म्याकरतांच वर्तले
त्या आत्म्याचा महिमा बोले । ऐसा कवणू ? ७
युगानुयुगे येकला येक । चालवितो तिन्ही लोक
त्या आत्म्याचा विवेक । पाहिलाच पाहावा ८
ऐसें वरिष्ठ आत्मज्ञान । दुसरें नाहीं यासमान
सृष्टीमध्यें विवेकी सज्जन । तेचि हें जाणती ९
पृथ्वी आणि आप, तेज । यांचा पृथ्वीमध्यें समज
अंतरात्मा तत्त्वबीज । तें वेगळेंचि राहिलें १०
वायोपासून पैलीकडे । जो कोणी विवेकें पवाडे
जवळीच आत्मा सापडे । तया पुरुषासी ११
वायो, आकाश, गुण माया । प्रकृति-पुरुष, मूळमाया
सूक्ष्मरूपें प्रचीत याया । कठीण आहे १२

मूळमाया चौथा देह । जाला पाहिजे विदेह
देहातीत होऊन राहे । धन्य तो साधू १३
विचारें ऊर्ध्व चढती । तयासीच ऊर्ध्वगती
येरां सकळां अधोगती । पदार्थज्ञानें १४
याकारणें पदार्थज्ञान । नाना जिनसींचा अनुमान
सर्व सांडून निरंजन । धुंडीत जावें १५
अष्टांग योग, पिंडज्ञान । त्याहून थोर तत्त्वज्ञान
त्याहून थोर आत्मज्ञान । तें पाहिलें पाहिजे १६
मूळमायेच्या शेवटीं । हरिसंकल्प मुळीं उठी
उपासनायोगें मिठी । तेथें घातली पाहिजे १७
मग त्यापैलीकडे जाण । निखळ ब्रह्म निर्गुण
निर्मळ निश्चळ, त्याची खूण । गगनासारिखी १८

## नवविधा भजन : एक श्रवण द. ४-१

प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथा पुराणश्रवण
नाना अध्यात्म-निरूपण । ऐकत जावें १
कर्ममार्ग, उपासनामार्ग । ज्ञानमार्ग, सिद्धांत मार्ग
योगमार्ग, वैराग्यमार्ग । ऐकत जावें २
नाना माहात्में, नाना स्थानें । नाना मंत्र, नाना साधनें
नाना तपें, पुरश्चरणें । ऐकत जावीं ३
रागज्ञान, ताळज्ञान । नृत्यज्ञान, वाद्यज्ञान
अमृत-वेळ, प्रसंगज्ञान । कैसें तें ऐकावें ४
कैशा नवविधा भक्ती । कैशा चतुर्विधा मुक्ती
कैसी पाविजे उत्तम गती । ऐसें तें ऐकावें ५
पिंडब्रह्मांडाची रचना । नाना तत्त्वविवंचना
सारासार विचारणा । कैसी ते ऐकावी ६
ऐसें श्रवण सगुणाचें । अध्यात्मनिरूपण निर्गुणाचें
विभक्ती सांडूनि, भक्तीचें । मूळ शोधावें ७

ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधूनि घ्यावें
असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवणभक्ति ८

**दुसरें कीर्तन ऐका** **द. ४-२**

सगुण हरिकथा करावी । भगवत्कीर्ति वाढवावी
अखंड वैखरी वदवावी । यथायोग्य १
बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रंथांतर
भगवत्कथा निरंतर । करीत जावी २
आपुलिया सुखस्वार्था । केलीच करावी हरिकथा
हरिकथेवीण सर्वथा । राहोंचि नये ३
नित्य नवा हव्यास धरावा । साक्षेप अत्यंतचि करावा
हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ अवघा ४
भक्ति-ज्ञान-वैराग्य-लक्षण । नीति-न्याय-स्वधर्मरक्षण
साधन-मार्ग, अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें ५
प्रसंगें हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ति धरावी
निर्गुण प्रसंगें वाढवावी । अध्यात्म विद्या ६
ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें
गुरुपरंपरा निर्धारें । चळोंच नेदावी ७
करावें वैराग्यरक्षण । रक्षावें ज्ञानाचें लक्षण
परमदक्ष विचक्षण । सर्वही सांभाळी ८
सगुणकथा या नांव 'कीर्तन' । अद्वैत म्हणजे 'निरूपण'
सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ९

**कीर्तनापासूनचे लाभ :**

कीर्तनें महादोष जाती । कीर्तनें होय उत्तम गती
कीर्तनें भगवत्प्राप्ती । यदर्थीं संदेह नाहीं १
कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तनें होय सत्पात्र
हरिकीर्तनें प्राणिमात्र । सुशील होती २

**विष्णोःस्मरणं** द. ४-३

स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें
नामस्मरणें पावावें । समाधान १
नित्यनेम प्रातःकाळीं । माध्यान्हकाळीं, सायंकाळीं
नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें २
सुख, दुःख, उद्वेग, चिंता । अथवा आनंदरूप असतां
नामस्मरणेंवीण सर्वथा । राहोंच नये ३
चालतां, बोलतां, धंदा करितां । खातां, जेवितां, सुखी होतां
नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ४
वैभव, सामर्थ्य आणि सत्ता । नाना पदार्थ चालतां
उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडूं नये ५
चहूं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लहान, थोर
जड, मूढ पैलपार । पावती नामें ६
म्हणोनि नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें
तिसरी भक्ति स्वभावें । निरोपिली ७

**ऐका पादसेवन** द. ४-४

पादसेवन तेंचि जाणावें । काया-वाचा-मनोभावें
सद्गुरूचे पाय सेवावे । सद्गतीकारणें १
सद्गुरुकृपेवीण पाही । भवतरणोपाय तो नाहीं
याकारणें लवलाही । सद्गुरु-पाय सेवावे २
सद्वस्तु दाखवी सद्गुरु । सकळ सारासारविचारू
परब्रह्माचा निर्धारू । अंतरीं बाणे ३
संगत्याग आणि निवेदन । विदेहस्थिती, अलिप्तपण
सहजस्थिती, उन्मनी, विज्ञान । हे सप्तही येकरूप ४
याहीं वेगळीं नामाभिधानें । समाधानाचीं संकेत-वचनें
सकळ कांहीं पादसेवनें । उमजों लागे ५

बहुधा अनुभवाचीं आंगें । सकळ कळती संतसंगें
चौथे भक्तीचे प्रसंगें । गोप्य तें प्रगटे ६

असो हीं अनुभवाचीं द्वारें । कळती सारासारविचारें
सत्संगें करोनी सत्योत्तरें । प्रत्यया येती ७

जें अभ्यासें अभ्यासितां न ये । जें साधनें असाध्य होये
तें हें सद्गुरूवीण काये । उमजों जाणें ? ८

याकारणें ज्ञानमार्ग । कळाया, धरावा सत्संग
सत्संगेंवीण प्रसंग । बोलोंचि नये ९

## अर्चन भक्ति द. ४-५

पांचवी भक्ति तें अर्चन । अर्चन म्हणजे देवतार्चन
शास्त्रोक्त पूजाविधान । केलें पाहिजे १

नाना आसनें, उपकरणें । वस्त्रें, आळंकार, भूषणें
मानसपूजा, मूर्तिध्यानें । या नांव पांचवी भक्ती २

काया, वाचा आणि मनें । चित्तें, वित्तें, जीवें, प्राणें
सद्भावें भगवंत अर्चणें । या नांव अर्चन भक्ती ३

ऐसेंचि सद्गुरूचें भजन । करून असावें अनन्य
या नांव भगवद्भजन । पांचवी भक्ती ४

ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करीत जावी
मानसपूजा अगत्य व्हावी । परमेश्वरासी ५

मनें भगवंतासि पूजावें । कल्पूनि सर्वही समर्पावें
मानसपूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ६

जें जें आपणास पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे
येणें प्रकारें कीजे । 'मानस पूजा' ७

## सहावी भक्ति तें वन्दन द. ४-६

सहावी भक्ति तें वन्दन । करावें देवासी नमन
संत, साधु आणि सज्जन । नमस्कारीत जावे १

सूर्यासी करावे नमस्कार । देवासी करावे नमस्कार
सद्गुरूसी करावे नमस्कार । साष्टांग भावें २

साष्टांग–नमस्कारासी अधिकारू । नाना प्रतिमा, देव, गुरु
अन्यत्र नमनाचा विचारू । अधिकारें करावा ३

जेथें दिसती विशेष गुण । तें सद्गुरूचें अधिष्ठान
याकारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ४

सर्व देवांसी नमस्कारिलें । तें येका देवासी पावलें
यदर्थी येक वचन बोलिलें । आहे, तें ऐका ५

' आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरं
सर्वदेव-नमस्कारः केशवं प्रति गच्छति '

## नमस्कारापासून होणारा लाभ

नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे
नमस्कारें सख्य घडे । नाना सत्पात्रांसी १

नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमती
नमस्कारें मोडलीं, जडतीं । समाधानें २

नमस्कारासि वेंचावें नलगे । नमस्कारास कष्टावें नलगे
नमस्कारास कांहींच नलगे । उपकरणसामग्री ३

याकारणें नमस्कार श्रेष्ठ । नमस्कारें वोळती वरिष्ठ
येथें सांगीतली स्पष्ट । सहावी भक्ती ४

## सातवें भजन ' दास्य ' जाणावें द. ४-७

देवाचें वैभव सांभाळावें । न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें
चढतें वाढतें वाढवावें । भजन देवाचें १

नाना रचना जीर्ण, जर्जर । त्याचे करावे जीर्णोद्धार
पडिलें कार्य तें सत्वर । चालवीत जावें २

पुष्पवाटिका नाना वनें । नाना तरुवरांचीं बनें
पावतीं करावीं जीवनें । तया वृक्षांसी ३

वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं
अंतरें निवती सकळांचीं । ऐसें वदावें ४
ऐसी ही सातवी भक्ती । निरोपिली यथामती
प्रत्यक्ष न घडे तरी चितीं । मानसपूजा करावी ५

## सखा मानावा भगवंत द. ४-८

देवासी परम सख्य करावें । प्रेम-प्रीतीनें बांधावें
आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें १
देवास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणें रीती
येणेंकरतां भगवंतीं । सख्य घडे नेमस्त २
भक्ति, भाव आणि भजन । निरूपण आणि कथाकीर्तन
प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा ३
देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सोडून देणें
अनन्य भावें, जीवें, प्राणें । शरीर तेंहि वेंचावें ४
देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी
सर्व अर्पावें, सेवटीं । प्राण तोहि वेंचावा ५
देव म्हणजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण
परम प्रीतीचें लक्षण । ऐसें असें ६
देव सख्यत्वें राहे आपणापासीं । तें तों वर्म आपणाचि पासीं
आपण वचनें बोलावीं जैसीं । तैसीं येती पडसादें ७
सखा मानावा भगवंत । माता, पिता, गणगोत
विद्या, लक्ष्मी, धन, वित्त । सकळहि परमात्मा ८
सख्य देवाचें तुटे ना । प्रीति देवाची विटे ना
देव कदा पालटे ना । शरणांगतांसी ९

## नवमी 'निवेदन' जाणावें द. ४-९

ऐका निवेदनाचें लक्षण । देवासी वाहावें आपण
करावें तत्त्वविवरण । म्हणजे कळे १

'मी भक्त' ऐसें म्हणावें । आणि विभक्तपणेंचि भजावें
हें अवघेंचि जाणावें । विलक्षण २
'भक्त' म्हणजे विभक्त नव्हे । आणि विभक्त म्हणजे भक्त नव्हे
विचारेंवीण कांहींच नव्हे । समाधान ३
तस्मात् विचार करावा । 'देव कोण,' ओळखावा
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ४
तत्त्वें तत्त्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे
'आत्मनिवेदन' येणें प्रकारें । सहजचि जालें ५
येक 'मुख्य परमेश्वर' । दुसरी प्रकृति जगदाकार

**मी-आपण याचा विचारच नको**

तिसरा, 'आपण' कैंचा चोर । आणिला मध्यें ! ६
ऐसें हें सिद्धचि असतां । नाथिलीच लागे देह-अहंता
परंतु विचारें पाहों जातां । कांहींच नाहीं ७
तत्त्वें साक्षित्वें वोसरतीं । साक्षित्व नुरे आत्मप्रचीतीं
'आत्मा' असे आदि-अंतीं । 'आपण' कैंचा ? ८
'आत्मा' एक, स्वानंदघन । आणि 'अहं आत्मा' हें वचन
तरी मग 'आपण' कैंचा भिन्न । उरला तेथें ? ९
'आत्मा' निर्गुण, निरंजन । तयासी असावें अनन्य
अनन्य म्हणजे नाहीं अन्य । 'आपण' कैंचा तेथें ? १०
'आत्मा' म्हणिजे तो अद्वैत । जेथें नाहीं द्वैताद्वैत
तेथें 'मी' पणाचा हेत । उरेल कैंचा ? ११
'आत्मा' पूर्णत्वें परिपूर्ण । जेथें नाहीं गुणागुण
निखळ निर्गुणीं 'आपण' । कोण कैंचा ? १२
'त्वं' पद, 'तत्' पद, 'असि' पद । निरसुनि सकळ भेदाभेद
वस्तु ठांईची भेदाभेद । 'आपण' कैंचा ? १३
निरसितां जीव-शिव-उपाधी । जीवशिवचि कैंचे आधी
स्वरूपीं होतां दृढबुद्धी । 'आपण' कैंचा ? १४

## या नांव आत्मनिवेदन

' आपण ' मिथ्या, साच ' देव ' । देव-भक्त अनन्यभाव
या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती १५

या नांव ' आत्मनिवेदन ' । ज्ञानियाचें समाधान
नववे भक्तीचें लक्षण । तें हें निरोपिलें १६

पंचभूतांमध्यें ' आकाश ' । सकळ देवांमध्यें ' जगदीश '
नवविधा भक्तींमध्यें विशेष । भक्ति नवमी १७

## त्रिविध आत्मनिवेदन द. १२-५

तत्त्वांमध्यें मुख्य तत्त्व । तें जाणावें शुद्ध सत्त्व
अर्धमात्रा, महत्तत्त्व । मूळ माया १

नाना तत्त्वें लहानथोरें । मिळोन अष्टही शरीरें
अष्टधा प्रकृतीचें वारें । निघोन जातें २

वारें नसतां जैसें गगन । तैसें परब्रह्म सघन
अष्ट देहाचें निरसन । करून पाहावें ३

ब्रह्मांडपिंडभार । पिंडब्रह्मांडसंहार
दोहोंवेगळें सारासार । विमळ ब्रह्म ४

पदार्थ जड, आत्मा चंचळ । विमळ ब्रह्म तें निश्चळ
विवरोन विरे तत्काळ । तद्रूप होय ५

' पदार्थ, मनें, काया, वाचा । मी हा अवघाचि देवाचा '
' जड ' आत्मनिवेदनाचा । विचार ऐसा ६

' चंचळकर्ता तो जगदीश । प्राणीमात्र त्याचा अंश
त्याचा तोचि आपणास । ठाव नाहीं ' ७

' चंचळ ' आत्मनिवेदन । याचें सांगीतलें लक्षण
कर्ता देव तो आपण । कोठेंच्चि नाहीं ८

चंचळ चळे स्वप्नाकार । निश्चळ देव तो निराकार
आत्मनिवेदनाचा प्रकार । जाणिजे ऐसा ९

ठावचि नाहीं चंचळाचा । तेथें आधीं आपण कैंचा
'निश्चळ' आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा १०

तिहीं प्रकारें आपण । नाहीं नाहीं दुजेपण
आपण नसतां मीपण । नाहींच कोठें ११

पाहतां, पाहातां अनुमानिलें । कळतां, कळतां कळों आलें
पाहातां अवघेंचि निवांत जालें । बोलणें आतां १२

## आत्मनिवेदनाचें लक्षण द. ८-८

आत्मनिवेदनाचें लक्षण । आधीं पाहावें 'मी कोण'
मग परमात्मा निर्गुण । तो वोळखावा १

देवाभक्ताचें शोधन । करितां होतें आत्मनिवेदन
देव आहे पुरातन । भक्त पाहे २

देवास वोळखो जातां । तेथें जाली तद्रूपता
देवभक्तविभक्तता । मुळींच नाहीं ३

विभक्त नाहीं म्हणोनि भक्त । बंधन नाही म्हणोनि मुक्त
अयुक्त नाहीं, बोलणें युक्त । शास्त्राधारें ४

देव-भक्ताचें पाहातां मूळ । होय भेदाचें निर्मूळ
एक परमात्मा सकळ । दृश्यावेगळा ५

आत्मनिवेदनाचे अंतीं । जे कां घडली अभेदभक्ती
तये नांव सायोज्यमुक्ती । सत्य जाणावी ६

आपुलिया स्वानुभवें । आपणास निवेदावें
आत्मनिवेदन जाणावें । ऐसें असे ७

आपणास निवेदिती । ऐसे भक्त थोडे असती
तयांस परमात्मा मुक्ती । तत्काळ देतो ८

देवभक्त दोनी येक । ज्यासी कळला विवेक
साधुजनीं मोक्षदायक । तोचि जाणावा ९

## रघुनाथभजनीं लागावें द. ३-१०

तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार ?
आतां येक भगवंत साचार । धरीं भावार्थबळें १
जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी
मां जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ? २
ऐसा कृपाळू देवाधिदेव । नेणवें जयाचें लाघव
जो सांभाळी सकळ जीव । कृपाळूपणें ३
ऐसा सर्वात्मा श्रीराम । सांडूनि धरिती विषयकाम
ते प्राणी दुरात्मे अधम । केलें पावती ! ४
सांडूनि राम आनंदघन । जयाचे मनीं विषयचिंतन
त्यासी कैचें समाधान । लोलंगतासी ? ५
जयास वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें
स्वजन सकळहि त्यागावे । दुःखमूळ जे ६

## रघुनाथभजनींच कां लागावें ? द. ६-७

आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ
जो समर्थांचाहि समर्थ । देवां सोडविता १
त्याचे आम्ही सेवकजन । सेवेकरतां जालें ज्ञान
तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं ! २
' मी थोर ' वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी
विचार पाहतां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ३
तरी आतां ऐसें न करावें । रघुनाथभजनीं लागावें
तेणेंचि ज्ञान बोलावें । चळेना ऐसें ४
करी दुर्जनांचा संहार । भक्तजनांसी आधार
ऐसा हा तो चमत्कार । रोकडा चाले ५
मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोनि जातें
कृपा केलिया रघुनाथें । प्रचीत येते ६

रघुनाथभजनें ज्ञान जालें । रघुनाथभजनें महत्त्व वाढलें
म्हणोनिया तुवां केलें- । पाहिजे आधीं ७

हें तो आहे सप्रचीत । आणि तुज वाटे ना प्रचीत
साक्षात्कारें नेमस्त । प्रत्ययो करावा ८

रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । तें तत्काळचि सिद्धि पावे
'कर्ता राम' हें असावें । अभ्यंतरीं ९

'कर्ता राम, मी नव्हे, आपण' । ऐसें सगुण निवेदन
निर्गुणीं तें अनन्य । निर्गुणचि होइजे १०

## नासिवंत सगुणाचें भजन कां करावें द. ६-७

करणें लागे भोजन । करणें लागे उदक-प्राशन
मळमूत्र-त्यागलक्षण । तेंहि सुटेना १

जनाचें समाधान राहावें । आपुलें पारिखें वोळखावें
आणि भजनचि मोडावें । हें कोण ज्ञान ? २

ज्ञान विवेकें मिथ्या जालें । परंतु अवघें नाहीं टाकिलें
तरी मग भजनेंचि काय केलें । सांग बापा ! ३

साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें
आणि देवास न मानावें । हें कोण ज्ञान ? ४

हरिहर ब्रह्मादिक । हे जयाचे आज्ञाधारक
तूं येक मानवी रंक । भजेसि ना तरी काय गेलें ? ५

## सद्ग्रंथ द. ७-९

जेणें परमार्थ वाढे । आंगीं अनुताप चढे
भक्तिसाधन आवडे । त्या नांव ग्रंथ १

जो ऐकतांच गर्व गळे । कां ते भ्रांतीच मावळे
ना तरी एकसरें वोळे । मन भगवंतीं २

जेणें होय उपरती । अवगुण पालटती
जेणें चुके अधोगती । त्या नांव ग्रंथ ३

जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे
जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ४
जेणें परत्र-साधन । जेणें ग्रंथें होय ज्ञान
जेणें होइजे पावन । या नांव ग्रंथ ५

**ऐसी हे 'अजपा' सकळांसी । परंतु कळे जाणत्यासी** द. १७-५

येकवीस सहस्र सहार्शें जपा । नेमून गेली ते अजपा
विचार पाहातां सोपा । सकळ कांही १
मुखीं नासिकीं असिजे प्राणें । तयास अखंड येणें-जाणें
याचा विचार पाहाणें । सूक्ष्मदृष्टी २
परे वाचेहूनि अर्ते । आणि पश्यंती खालतें
स्वराचें जन्मस्थान तें । तेथून उठे ३
येकांतीं मौन धरून बैसे । सावध पाहातां कैसें भासे
'सोऽहं सोऽहं' ऐसे । शब्द होती ४
उच्चारेवीण जे शब्द । ते जाणावे सहज शब्द
प्रत्यया येती, परंतु नाद । कांहींच नाहीं ५
ते शब्द सांडून बैसला । तो मौनी म्हणावा भला
योगाभ्यासाचा गल्बला । याकारणें ६
येकांतीं मौन धरून बैसला । तेथें कोण शब्द जाला
'सोऽहं' ऐसा भासला । अंतर्यामीं ७
धरितां 'सो', सांडितां 'हं' । अखंड चाले 'सोऽहं' 'सोऽहं'
याचा विचार पाहातां बहू । विस्तारला ८
ऐसी हे 'अजपा' सकळांसी । परंतु कळे जाणत्यासी
सहज सांडून, सायासीं । पडोंच नये ९
सहज देव असतचि असे । सायासें देव फुटे-नासे
नासिवंत देवास विश्वासे । ऐसा कवणू ? १०
जगदंतराचें दर्शन । सहज घडे अखंड ध्यान
आत्मइच्छेने जन । सकळ वर्तती ११

आत्मयाचें समाधान । घडे तैसेंचि अशन
सांडलें-फिटलें समर्पण । तयासीच होय १२

अग्निपुरुष पोटीं बसती । तयास अवदानें सकळ देती
लोक आज्ञेमध्यें असती । आत्मयाचे १३

सहज देवजपध्यानें । सहज चालणें स्तुतिस्तवनें
सहज घडे तें भगवानें । मान्य कीजे १४

अंतरीं वसतां नारायणें । लक्ष्मीस काय उणें
ज्याची लक्ष्मी, तो आपणें । बळकट धरावा १५

● ●

# ५. परमार्थाच्या मार्गावर : साधनमार्ग

**निष्काम सगुण भक्ति** द. १०-७

याकारणें पुण्यमार्गें चालावें । भजन देवाचें वाढवावें
न्याय सांडून न जावें । अन्यायमार्गें १

नाना पुरश्चरणें करावीं । नाना तीर्थाटणें फिरावीं
नाना सामर्थ्यें वाढवावीं । वैराग्यबळें २

निश्चयें बैसे वस्तूकडे । तरी ज्ञानमार्गेंहि सामर्थ्य चढे
कोणीयेक येकांत मोडे । ऐसें न करावें ३

येक गुरु, येक देव । कोठेंतरी असावा भाव
भावार्थ नसतां वाव । सर्व कांहीं ४

निर्गुणीं ज्ञान जालें । म्हणोन सगुण अ-लक्ष केलें
तरी ते ज्ञाते नागवले । दोहींकडे ५

नाहीं भक्ति, नाहीं ज्ञान । मधेंच पैसावला अभिमान
म्हणोनियां जपध्यान । सांडूंच नये ६

सांडील सगुण भजनासी । तरी तो ज्ञाता परी अपेसी
म्हणोनियां सगुण-भजनासी । सांडूंच नये ७

निष्काम बुद्धीचिया भजना । त्रैलोकीं नाहीं तुळणा
समर्थेंवीण घडेना । निष्कामभजन ८

नाना फळें देवापासी । आणि फळ अंतरीं भगवंतासी
याकारणें भगवंतासी । निष्काम भजावें ९

निष्काम भजनाचें फळ आगळें । सामर्थ्य चढे मर्यादेवेगळें
तेथें बापुडीं फळें । कोणीकडे ! १०

भक्तें जें मनीं धरावें । तें देवें आपणचि करावें
तेथें वेगळें भावावें । न लगे कदा ११

दोनी सामर्थ्यें येक होतां । काळास नाटोपे सर्वथा
तेथें इतरांची कोण कथा । कीटकन्यायें १२

म्हणोन निष्काम भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान
तयास तुळितां त्रिभुवन । उणें वाटे १३

येथें बुद्धीचा प्रकाश । आणिक न चढे विशेष
प्रताप, कीर्ति आणि येश । निरंतर १४

निरूपणाचा विचार । आणि हरिकथेचा गजर
तेथें होती तत्पर । प्राणिमात्र १५

सारासारविचार करणें । न्याय-अन्याय अखंड पाहणें
बुद्धि, भगवंताचें देणें । पालटे ना १६

भक्त भगवंतीं अनन्य । त्यासी बुद्धि देतो आपण
यदर्थीं भगवद्वचन । सावध ऐका १७

" ददामि बुद्धियोगं तं येन मां उपयांति ते "
म्हणोनि सगुण भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान
प्रत्ययाचें समाधान । दुर्लभ जगीं १८

## सद्गुरूस काय पुसावें ? द. १२-२

सद्गुरूस काय पुसावें । हेंहि कळे ना स्वभावें
अनन्यभावें, एकभावें । दोन गोष्टी पुसाव्या १

दोन गोष्टी त्या कोण ? । ' देव कोण, आपण कोण '
या गोष्टींचें विवरण । केलेंचि करावें २

आधी ' मुख्य देव तो कोण ' ! मग ' आपण भक्त तो कोण '
पंचीकरण, महावाक्य-विवरण । केलेंचि करावें ३

सकळ केलियाचें फळ । शाश्वत वोळखावें निश्चळ
आपण कोण ' हा केवळ । शोध घ्यावा ४

तें परब्रह्म धुंडावें । विवेकें त्रैलोक्य हिंडावें
माईक विचारें खंडावें । परीक्षावंतीं ५

खोटें सांडून खरें घ्यावें । परीक्षावंतीं परीक्षावें
मायेचें अवघेंचि जाणावें । रूप माईक ६

दिसेल तितुकें नासेल । उपजेल तितुकें मरेल
रचेल तितुकें खचेल । रूप मायेचें ७

शाश्वत देव तो निर्गुण । ऐसी अंतरीं बाणली खूण
देव कळला, ' मी कोण ' । कळलें पाहिजे ८

' मी कोण ' पाहिजे कळलें । देहतत्त्व तितुकें शोधलें
मनोवृत्तीच्या ठाईं आलें । मी-तूंपण ९

सकळ देहाचा शोध घेतां । मीपण दिसेना पाहातां
मी-तूं पण हें तत्त्वतां तत्त्वीं मावळलें १०

मीपण हें बुडालें । विवेकें वेगळेपण गेलें
निवृत्तिपदास प्राप्त जालें । उन्मनीपद ११

नाना किंत निवारले । धोके अवघेचि तुटले
ज्ञानविवेकें पावन जाले । बहुत लोक १२

पतीतपावनाचे दास । तेहि पावन करिती जगास
ऐसी हे प्रचीत मनास । बहुतांच्या आली १३

**सारशोधन** द.६-९

गुप्त ठेविलें उदंड अर्थ । आणि प्रगट दिसती पदार्थ
शाहाणे शोधिती स्वार्थ । अंतरीं असे १

तैसें ' दृश्य ' हें मायिक । पाहात असती सकळ लोक
परी जयांस ठाउका विवेक । ते तदंतर जाणती २
तैसे ज्ञाते ते समर्थ । तिहीं वोळखिला परमार्थ
इतर ते करिती स्वार्थ । दृश्य पदार्थांचा ३
कावाडी वाहाती काबाड । श्रेष्ट भोगिती रत्नें जाड
हें जयाचें तयास गोड । कर्मयोगें ४
जयांस आहे विचार । ते सुखासनीं जाले स्वार
इतर जवळील भार । वाहातचि गेले ५
सार सेविजे श्रेष्ठीं । असार सेविजे वृथापृष्टी
सारासाराची गोष्टी । सज्ञान जाणती ६
तैसा ज्ञानी योगेश्वर । गुप्तार्थलाभाचा ईश्वर
इतर ते पोटाचे किंकर । नाना मतें धुंडिती ७
तस्मात् सार तें दिसे ना । आणि असार तें दिसे जना
सारासार-विवंचना । साधु जाणती ८
इतरांस हें काय सांगणें । खरें-खोटें कोण जाणे
साधुसंतांचिये खुणे । साधुसंत जाणती ९
दिसे ना जें गुप्त धन । तयासी करणें लागे अंजन
गुप्त परमात्मा सज्जन- । संगतीं शोधावा १०
सद्वस्तूस लाभे सद्वस्तू । अव्यावेस्तास अव्यावेस्तू
प्रशस्तासी प्रशस्तू । विचार लाभे ११
म्हणोनि हें दृश्यजात । अवघेंचि आहे अशाश्वत ।
परमात्मा अच्युत अनंत । तो या दृश्यावेगळा १२
दृश्यावेगळा दृश्यांतरीं । सर्वात्मा तो सचराचरीं
विचार पाहातां अंतरीं । निश्चयो बाणे १३
संसारत्याग न करतां । प्रपंच-उपाधी न सांडितां
जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होय १४
हें प्रचीतीचें बोलणें । विवेकें प्रचीत पाहाणें
प्रचीत पाहे ते शाहाणे । अन्यथा नव्हे १५

सप्रचीत आणि अनुमान । उधार आणि रोकडें धन
मानसपूजा प्रत्यक्ष दर्शन । यांत महदंतर १६

याचि जन्में, येणेचि काळें । संसारीं होइजे निराळें
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें १७

हें यथार्थचि आहे बोलणें । विवेकें शीघ्रचि मुक्त होणें
असोनी कांहींच नसणें । जनामध्यें १८

देहींच विदेह होणें । करून कांहींच न करणें
जीवन्मुक्ताचीं लक्षणें । जीवन्मुक्त जाणे १९

## म्हणजे ' ब्रह्म ' कळे — द. ९-२

करावें तत्त्व-विवरण । शोधावें ब्रह्म निर्गुण
पाहावें आपणांस आपण । म्हणजे कळे १

हें न बोलतांच विवरिजे । विवरोन विरोन राहिजे
मग अबोलणेंचि साजे । महापुरुषीं २

शब्दचि निःशब्द होती । श्रुति ' नेति नेति ' म्हणती
हें तों आलें आत्मप्रचीतीं । प्रत्यक्ष आतां ३

जेथें सर्वही अशेष जालें । तेथें विशेष कैचें आलें
मी मौनी म्हणतां भंगलें । मौन्य जैसें ४

आतां मौन्य न भंगावें । करूनि, कांहींच न करावें
असोनि, निःशेष बसावें । विवेकबळें ५

## नित्यानित्यविवेक — द. १३-१

आत्मानात्माविवेक करावा । करून बरवा विवरावा
विवरोन सुदृढ धरावा । जीवामध्यें १

नाना प्रकारींचीं शरीरें । सृष्टींत दिसती अपारें
तयांमध्यें निर्धारें । आत्मा कवण २

दृष्टीमध्यें पाहातो । श्रवणामध्यें ऐकतो
रसनेमध्यें स्वाद घेतो । प्रत्यक्ष आतां ३

घ्राणामध्यें वास घेतो । सर्वांगीं तो स्पर्शतो
वाचेमध्यें बोलवितो । जाणोनि शब्द ४

सावधान आणि चंचळ । चहूंकडे चळवळ
येकलाचि चालवी सकळ । इंद्रियद्वारां ५

आनंद, विनोद, उद्वेग, चिंता । काया, छाया, माया, ममता
आत्मत्त्वें पावे नाना व्यथा । तोचि आत्मा ६

विद्या-कुविद्या दोहींकडे । आनंदरूप वावडे
जेथें तेथें सर्वांकडे । तोचि आत्मा ७

आत्मा नसतां देहांतरीं । मग तें प्रेत सचराचरीं
देहसंगें आत्मा करी । सर्व कांहीं ८

देह अनित्य, आत्मा नित्य । हाचि विवेक नित्यानित्य
अवघें सूक्ष्माचें कृत्य । जाणती ज्ञानी ९

मुळींहुनी सेवटवरी । ब्रह्मादि पिपीलिका देहधारी
नित्यानित्यविवेक चतुरीं । जाणिजे ऐसा १०

## नित्य-अनित्यविवेक द. १३-६

पंचभूतांचा विचार । नांवरूप सारासार
तोचि बोलिला निर्धार । सावध ऐका १

पृथ्वी, आप, तेज, वायो, आकाश । नांवें बोलिलीं सावकाश
आतां रूपाचा विश्वास । श्रवणें धरावा २

पृथ्वी म्हणजे ते धरणी । आप म्हणजे तें पाणी
तेज म्हणजे अग्नी, तरणी । सतेजादिक ३

वायो म्हणजे तो वारा । आकाश म्हणजे पैस सारा
आतां शाश्वत तें विचारा । आपले मनीं ४

येक शीत चांचपावें । म्हणजे वर्म पडे ठावें
तैसें थोड्या अनुभवें । बहुत जाणावें ५

पृथ्वी रचते आणि खचते । हें तों प्रत्ययास येतें
नाना रचना होत जाते । सृष्टीमध्यें ६

म्हणोनि रचतें तें खचतें । आप तेंहि आटोनि जातें
तेजहि प्रगटोन विझतें । वारेंहि राहे ७

अवकाश नाममात्र आहे । तेंहि विचारितां न राहे
एवं पंचभूतिक राहे । हें तों घडे ना ८

ऐसा पांचा भूतांचा विस्तार । नाशवंत हा निर्धार
शाश्वत आत्मा निराकार । सत्य जाणावा ९

तो आत्मा कोणास कळे ना । ज्ञानेंवीण आकळे ना
म्हणोनिया संतजना । विचारावें १०

विचारितां सज्जनासी । ते म्हणती की अविनाशी
जन्म-मृत्यू आत्मयासी । बोलोंच नये ११

निराकार जाणावा नित्य । आकार जाणावा अनित्य
यास बोलिजे ' नित्य-अनित्य । विचारणा ' १२

परमात्मा तो निराकार । जाणिजे हा विचार सार
आणि आपण कोण, हा विचार । पाहिला पाहिजे १३

म्हणोन ज्ञाता धन्य धन्य । जो निर्गुणेसी अनन्य
आत्मनिवेदनें मान्य । परम पुरुष १४

## सारासार-विचार द. १३-२

ऐका सारासार-विचार । उभारिलें जगडंबर
त्यांत कोण सार, कोण असार । विवेकें वोळखा १

दिसेल तें नासेल । आणि येईल तें जाईल
जें असतचि असेल । तेंचि सार २

मुळीं जे राहिली वृत्ती । जाली पाहिजे निवृत्ती
सारासार-विचार श्रोतीं । बरा पाहावा ३

चळे म्हणोनि तें चंचळ । न चळे म्हणोनि निश्चळ
निश्चळीं उडे चंचळ । निश्चयेसी ४

क्षयचि नाहीं जो अ-क्षयी । व्यापकपणें सर्वां ठाईं
तेथें हेत-संदेह नाहीं । निर्विकारी ५

जें उदंड, घनदाट । आद्य–मध्य–सेवट
अचळ, अढळ, अतूट । जैसें तैसें ६

पाहातां जैसें गगन । गगनाहून तें सघन
अंजनचि नाहीं निरंजन । सदोदित ७

संगत्यागेवीण कांही । परब्रह्म होणार नाहीं
संगत्याग करून पाहीं । मौन्यगर्भा ८

निरसतां अवघेंचि निरसलें । चंचळ तितुकें निघोन गेलें
निश्चळ परब्रह्म उरलें । तेंचि सार ९

'सोऽहं,' 'हंसः,' 'तत्-त्वं-असि' । 'तें ब्रह्म तूं आहेसी'
विचार पाहातां स्थिती ऐसी । सहजचि होते १०

दिसेना ना भासेना । उपजेना ना नासेना
तें येईना ना जाईना । परब्रह्म तें ११

तें भिजेना ना वाळेना । तें विझेना ना जळेना
जयास कोणीच नेईना । परब्रह्म तें १२

जें सन्मुखचि चहूंकडे । जेथें दृश्यभास उडे
धन्य साधू तो पवाडे । निर्विकारीं १३

खोटें सांडून खरें घ्यावें । तरीच परीक्षावंत म्हणवावें
असार सांडून सार घ्यावें । परब्रह्म तें १४

जाणतां जाणतां जाणीव जाते । आपली वृत्ती तद्रूप होते
आत्मनिवेदन-भक्ति ते । ऐसी आहे १५

सद्रूप, चिद्रूप आणि तद्रूप । स्वस्वरूप म्हणजे आपलें रूप
आपलें रूप म्हणजे अरूप । तत्त्वनिरसनाउपरी १६

### प्रत्ययज्ञानी तो समर्थ द. २०-३

सकळ सृष्टीचें बीज । मूळमायेंत असे सहज
अवघे समजतां सज्ज । परमार्थ होतो १

समजलें माणूस चावळे ना । निश्चयी अनुमान धरीना
सावळागोंदा करी ना । परमार्थ कदा २

शब्दातीत बोलतां आलें । त्यास वाच्यांश बोलिलें
शुद्ध लक्षांश लक्षिलें । पाहिजे विवेकें ३
पूर्वपक्ष म्हणजे माया । सिंद्धांतें जाय विलया
माया नसतां मग तया । काय म्हणावें ४
अन्वय आणि व्यतिरेक । हा पूर्वपक्षाचा विवेक
सिद्धांत म्हणजे शुद्ध येक । दुसरें नाहीं ५
अधोमुखें भेद वाढतो । ऊर्ध्वमुखें भेद तुटतो
निःसंगपणें निर्गुणी तो । महायोगी ६
उदंड हुडकावे संत । सापडे प्रचीतीचा महंत
प्रचीतीवीण स्वहित । होणार नाहीं ७
प्रपंच अथवा परमार्थ । प्रचीतीवीण अवघें व्यर्थ
प्रत्ययज्ञानी तो समर्थ । सकळांमध्ये ८
म्हणोनि पाहिलेंचि पाहावें । शोधिलेंचि शोधावें
अवघें कळता स्वभावें । संदेह तुटती ९

## प्रचीतीचें आत्मज्ञान

द. १०-१०

'उत्तम पुरुष' तो आणिक । निःप्रपंच, निःकलंक
निरंजन परमात्मा येक । निर्विकारी १
चारी देह निरसावे । साधकें देहातीत व्हावें
देहातीत होतां जाणावे । अनन्य भक्त २
निश्चळ परब्रह्म येक । चंचळ जाणावें माईक
ऐसा प्रत्यय निश्चयात्मक । विवेकें पाहावा ३
असार त्यागून घेइजे सार । म्हणोन सारासार विचार
नित्यानित्य निरंतर । पाहाती ज्ञानी ४
जेथें ज्ञानेंचि होइजे विज्ञान । जेथें मनचि होतें उन्मन
तेथें कैचें चंचळपण । आत्मयासी ? ५
सांगणेंवांगणीचें काम नव्हे । आपुल्या अनुभवें जाणावें
प्रत्ययावीण सिणावें । तेंचि पाप ६

सत्यायेवढें सुकृत नाहीं । असत्यायेवढें पाप नाहीं
प्रचीतीवीण कोठेंचि नाही । समाधान ७
सत्य म्हणजे स्वरूप जाण । असत्य माया हें प्रमाण
येथें निरोपिलें पापपुण्य । रूपेंसहित ८
' दृश्य '- पाप वोसरलें । पुण्य ' परब्रह्म ' उरलें
अनन्य होतांच जालें । नामातीत ९

## आत्मज्ञानाचें लक्षण द. ५-६

ऐका ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान
पाहावें आपणासी आपण । या नांव ज्ञान १
मुख्य देवासि जाणावें । सत्य स्वरूप वोळखावें
नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान २
जेथें दृश्य प्रकृति सरे । पंचभूतिक वोसरे
समूळ द्वैत निवारे । या नांव ज्ञान ३
मन–बुद्धि–अगोचर । न कळे तर्काचा विचार
उल्लेख परेहूनि पर । या नांव ज्ञान ४
ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरूपचि आपण
या नांव शुद्ध स्वरूपज्ञान । जाणिजे श्रोतीं ५
महावाक्यांचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण
शुद्ध लक्षांशें आपण । वस्तूचि आहे ६
आपला आपणासि लाभ । हें ज्ञान परम दुल्लभ
जें आदिअंतीं स्वयंभ । स्वरूपचि स्वयें ७
जें या चराचराचें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ
या नांव ज्ञान केवळ । वेदांत मतें ८
शोधितां आपलें मूळस्थान । सहजचि उडे अज्ञान
या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायक ९
' मी कोण ' ऐसा हेत । धरूनि पाहतां देहातीत
अवलोकितां नेमस्त । स्वरूपचि होय १०

ऐक शिष्या, येथींचें वर्म । स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म
येविषयीं संदेह, भ्रम । धरूंचि नको ११

दृश्य पदार्थ आटतां । आपणहि नुरे तत्त्वतां
ऐक्यरूपें ऐक्यता । मुळींचि आहे १२

ज्ञानवन्ही प्रगटे । तेणें दृश्यकेर आटे
तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचें १३

'देह मी' वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा
देहाभिमानें येरझारा । भोगिल्याच भोगी १४

कोणासीच नाहीं बंधन । भ्रांतीस्तव भुलले जन
दृढ घेतला देहाभिमान । म्हणोनियां १५

शिष्या, येकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें
तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा १६

अखंड घडे श्रवण, मनन । तरीच पाविजे समाधान
पूर्ण जालिया ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे आंगीं १७

विषईं वैराग्य उपजलें । तयासीच पूर्ण ज्ञान जालें
मणी टाकतांच लाधलें । जेवी राज्य १८

**देहातीत होऊन परब्रह्म कसें पावावें ?** द. ८-८

देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहे
देहसंग हा न साहे । तुज विदेहासी १

'सोऽहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूंचि जाण'
हेंचि साधूचें वचन । सदृढ धरावें २

माहावाक्याचें अंतर । तूंचि ब्रह्म निरंतर
ऐसिया वचनाचा विसर । पडोंचि नये ३

माया असोनीच नाहीं । देह असतांच विदेही
ऐसें समाधान कांहीं । वोळखावें ४

चौ देहांचा अंत । आणि जन्ममूळाचा प्रांत
अंत-प्रांतासी अलिप्त । तो तूं आत्मा ५

जयासी ऐसी आहे गती । तयास ज्ञानें आत्मगती
गति आणि अवगती । वेगळाचि तो ६
मति खुंटली वेदांची । तेथें गति आणि अवगति कैंची
आत्मशास्त्र–गुरुप्रचीती । ऐक्यता आली ७
जीवपणाची फिटली भ्रांती । वस्तु आणि आत्मप्रचीती
प्राणी पावला उत्तम गती । सद्गुरुबोधें ८
सद्गुरुबोध जेव्हां जाला । चौ देहांस अंत आला
तेणें विचारधारा लागला । सस्वरूपीं ९
तेणें निजध्यासें प्राणी । ध्येयचि जाला निर्वाणीं
सायोज्यमुक्तीचा धनी । होऊन बैसला १०
दृश्य पदार्थ वोसरतां । अवघा आत्माचि तत्वतां
नेहटून विचारें पाहतां । दृश्य मुळींच नाहीं ११

**विवेकानें विषयत्याग करणें** द. १२-७

वैराग्यें करावा त्याग । तरीच परमार्थयोग
प्रपंचत्यागें सर्व सांग । परमार्थ घडे १
मागें ज्ञानी होऊनि गेले । तेहीं बहुत कष्ट केले
तरी मग विख्यात जाले । भूमंडळीं २
वैराग्यापरतें नाही भाग्य । वैराग्य नाहीं ते अभाग्य
वैराग्य नसतां योग्य । परमार्थ नव्हे ३
प्रत्ययज्ञानी, वीतरागी । विवेकबळें सकळ-त्यागी
तो जाणिजे महायोगी । ईश्वरी पुरुष ४
वैराग्यें करून भ्रष्टेना । ज्ञानी भजन सांडीना
व्युत्पन्न आणि वाद घेना । ऐसा थोडा ५
कष्ट करितां सेत पिके । उंच वस्तू तत्काळ विके
जाणत्या लोकांच्या कौतुकें । उड्या पडती ६
सबळ विषय त्यागणें । शुद्ध कार्याकारण घेणें
विषयत्यागाचीं लक्षणें । वोळखा ऐसीं ७

सकळ कांहीं कर्ता देव । नाहीं प्रकृतीचा ठाव
विवेकाचा अभिप्राव । विवेकी जाणती ८

त्यागात्याग तार्किक जाणे । बोला ऐसें चालों जाणे
पिंडब्रह्मांड सकळ जाणे । यथायोग्य ९

ऐसा जो ' सर्वजाणता ' । उत्तम लक्षणीं पुरता
तयाचेनी सार्थकता । सहजची होय १०

**विवेकानें परब्रह्म जाणावें** द. १७-१०

तयास परब्रह्म म्हणावें । जें उपाधीवेगळें स्वभावें
जेथें सूक्ष्ममायेच्या नावें । शून्याकार १

दृष्टीचें देखणें ' दृश्य ' । मनाचें देखणें ' भास '
मनातीत निराभास । विवेकें जाणावें २

दृश्य-भास अवघा बिघडे । विवेक तेथें पवाडे
भूमंडळीं ज्ञाते थोडे । सूक्ष्म दृष्टीचे ३

जें दृष्टीस न पडे ठावें । तें ऐकोन जाणावें
श्रवणमननें पडे ठावें । सकळ कांही ४

म्हणोनि संतसंगें जावें । सच्छास्त्रचि श्रवण करावें
उत्तम गुणास अभ्यासावें । नाना प्रयत्नें ५

**विवेक-वैराग्य-योग पाहिजे** द. १२-४

महद्भाग्य हातासी आलें । परंतु भोगूं नाहीं जाणीतलें
तैसें वैराग्य उत्पन्न जालें । परी विवेक नाहीं १

विवेकेंवीण वैराग्य केलें । तरी अविवेकें अनर्थीं घातलें
अवघे व्यर्थचि गेलें । चोहींकडे २

ना प्रपंच, ना परमार्थ । अवघे जिणेंचि जालें व्यर्थ
अविवेकें अनर्थ । ऐसा केला ३

वैराग्येंवीण ज्ञान । तो व्यर्थचि साभिमान
लोभ-दंभें घोळसून । कासावीस केला ४

हें येकेवीण येक । तेणें उगाच वाढे शोक
आतां वैराग्य आणि विवेक । योग ऐका ५
विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला
अंतर्बाह्य मोकळा जाला । निःसंग योगी ६
जैसें मुखें ज्ञान बोलें । तैसीच सर्वे क्रिया चाले
दीक्षा देखोनि चकित जाले । सुचिस्मंत ७
आस्था नाही त्रैलोक्याची । स्थिति ज्ञाणली वैराग्याची
यत्नविवेक-धारणेची । सीमा नाही ८
तत्कालचि सन्मार्ग लागे । ऐसा अंतरीं विवेक जागे
वक्तृत्त्व करितां न भंगे । साहित्य प्रत्ययाचें ९
सन्मार्गें जगास मिळाला । म्हणिजे जगदीश वोळला
प्रसंग पाहिजे कळला । कोणीयेक १०
प्रखर वैराग्य उदासीन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान
स्नानसंध्या, भगवद्भजन । पुण्य मार्ग ११
विवेक-वैराग्य तें ऐसें । नुस्तें वैराग्य हेंकाडपिसें
शब्दज्ञान येळीलसें । आपणचि वाटे १२
म्हणोनि विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य
रामदास म्हणे योग्य । साधु जाणती १३

**आतां आपणचि आपला . शोध घ्यावा.** **द. ६-२**

माझें शरीर, ऐसें म्हणतो । तरी जाण देहावेगळाचि तो
मन माझें, ऐसें जाणतो । तरी तो मनहि नव्हे १
पाहातां देहाचा विचार । अवघा तत्त्वांचा विस्तार
तत्त्वें तत्त्व झाडितां सार । आत्माच उरे २
तत्त्वांचें गाठोडें शरीर । याचा पाहतां विचार
येक आत्मा निरंतर । आपण नाहीं ३
देहबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला
देहातीत होतां पावला । मोक्षपद ४

झालें जन्माचें सार्थक । निर्गुण आत्मा आपण येक
परंतु हा विवेक । पाहिलाच पाहावा ५

आपणांस निवेदावें । आपण विवेकें तुरावें
'आत्मनिवेदन' जाणावें । याचें नांव ६

आत्मनिवेदना उपरी । निखळ वस्तु निरंतरी
'अहं आत्मा' हा अंतरीं । बोध जाला ७

यासी म्हणिजे 'आत्मज्ञान' । थेणें पाविजे समाधान
परब्रह्मीं अभिन्न । भक्तचि जाला ८

संसारीं पडावें चुकलें । देवां–भक्तां ऐक्य जालें
मुख्य देवास ओळखिलें । सत्संगें करूनी ९

## विश्वाचा कर्ता कसा ओळखावा ? द. १३-८

श्रोता म्हणे वक्तयासी । कोण कर्ता निश्चयेसी
सकळ सृष्टि ब्रह्मांडासी । कोणें केलें ? १

जिहीं जो देव मानिला । कर्ता म्हणती तयाला
ऐसा लोकांचा गल्बला । वोसरे ना २

आपुलाल्या साभिमाने । निश्चयेचि केला मनें
याच्या विचार पाहणें । घडेचि ना ३

बहु लोकांचे बहु विचार । अवघा राहों द्या बाजार
परंतु याचा विचार । ऐसा आहे ४

जें जें कर्तयानें केलें । तें तें त्याउपरी जालें
कर्त्यापूर्वी आडळलें । न पाहिजे की ५

केलें तें पंचभूतिक । आणि पंचभूतिक ब्रह्मादिक
तरी भूतांसें पंचभूतिक । केलें तें घडे ना ६

पंचभूतांस वेगळें करावें । मग कर्त्यास वोळखावें
पंचभूतिक तें स्वभावें । कर्त्यास आलें ७

पंचभूतां वेगळें निर्गुण । तेथें नाही कर्तेपण
निर्विकारास विकार कोण । लावूं शके ? ८

निर्गुणास कर्तव्य न घडे । सगुण जाळ्यांत सांपडे
आतां कर्तव्यता कोणीकडे । बरें पाहा ९
लटिक्याचा कर्ता कोण । हें पुसणेंचि अप्रमाण
म्हणोनि हेंच प्रमाण । जें स्वभावेंचि जालें १०
येक सगुण, येक निर्गुण । कोठें लावूं कर्तेपण ?
या अर्थाचें विवरण । बरें पाहा ११
सगुणें सगुण केलें । तरी तें पूर्वींच आहे जालें
निर्गुणास कर्तव्य लाविलें । न वचे कीं कदा १२
येथें कर्ताच दिसे ना । प्रत्ययें आणावा अनुमाना
दृश्य सत्यत्वें असेना । म्हणोनियां १३
केलें तें अवघेंचि लटिकें । तरी कर्ता हें बोलणेंचि फिकें
वक्ता म्हणे रे विवेकें । बरें पाहा १४

## म्हणोनि देव वोळखावा द. ६-१

कोणी येके ग्रामीं अथवा देसीं । राहणें आहे आपणासीं
न भेटतां तेथल्या प्रभूसी । सौख्य कैंचें ? १
म्हणोनि रायापासून रंक । कोणी येक तरी नायक
त्यास भेटणें, हा विवेक । विवेकी जाणती २
राष्ट्राचा प्रभु तो राजा । बहुराष्ट्र तो महाराजा
महाराजाचाहि राजा । तो चक्रवर्ती ३
असो ऐसिया समस्तां । येक ब्रह्मा निर्माण कर्ता
त्या ब्रह्मयासहि निर्मिता । कोण आहे ? ४
ब्रह्मा, विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता तोचि थोर
तो वोळखावा परमेश्वर । नाना यत्नें करूनी ५
जेणें संसारीं घातलें । अवघें ब्रह्मांड निर्माण केलें
त्यासी नाहीं वोळखिलें । तोचि पतित ६
म्हणोनि 'देव' वोळखावा । जन्म सार्थकचि करावा
न कळे तरी सत्संग धरावा । म्हणिजे कळे ७

‘देव’ वोळखावा येक । तेंचि ‘ज्ञान’ तें सार्थक
येर अवघेंचि निरर्थक । पोट-विद्या ८
याकारणें ज्ञाता पाहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा
सारासार-विचारें जीवा । मोक्ष प्राप्त ९

## अंतरींचें ठेवणें जाणावें द. ११-८

उदंड ऐकिलें, देखिलें । अंतरात्म्यास न वचे पुरवलें
प्राणी देहधारी बाहुलें । काय जाणे ? १
पूर्णास अपूर्ण पुरेना । कां जें अखंड विवरे ना
विवरतां विवरतां उरे ना । देवावेगळा २
विभक्तपणें नसावें । तरीच भक्त म्हणवावें
नाहींतरी व्यर्थचि सिणावें । खटाटोपें ३
देहसंगें विषय भोगिले । देहसंगें प्राणी मिरवले
देहधर्त्यास चुकले । नवल मोठें ! ४
ऐसे लोक अविवेकी । आणि म्हणती आम्ही विवेकी
बरें, ज्याची जैसी टाकी । तैसें करावें ५
अंतरीं ठेवणें चुकलें । दारोदारीं धुंडूं लागले
तैसें अज्ञानास जालें । देव न कळे ६
या देवाचें ध्यान करी । ऐसा कोण सृष्टीवरी
वृत्ति एकदेसी तर्तरी । पवाडेल कोठें ? ७
तत्त्वें तत्त्व जेव्हां उडे । तेव्हां देहबुद्धि झडे
निर्मळ निश्चळ चहूंकडे । निरंजन ८
भल्यानें विवेक धरावा । दुस्तर संसार तरावा
अवघा वंशचि उद्धरावा । हरिभक्ति करूनी ९

## अंतरात्म्यापलीकडील देव पाहावा. द. ११-९

आधीं कर्माचा प्रसंग । कर्म केलें पाहिजे सांग
कदाचित पडिलें व्यंग । तरी प्रत्यवाय घडे १

म्हणोनि कर्म आरंभिलें । कांहीं येक सांग घडलें
जेथ जेथें अंदर पडलें । तेथें हरिस्मरण करावें २
'तरी तो हरि आहे कैसा' । विचार पाहावा ऐसा
संधेपूर्वी जगदीशा । चोवीस नामीं स्मरावें ३
चोवीसनामी, सहस्रनामी । अनंतनामी तो अनामी
तो आहे कैसा 'अंतर्यामीं'। विवेकें ओळखावा ४
तैसा परमात्मा परमेश्वर । बरा वोळखावा पाहोन विचार
तरीच पाविजे पार । भ्रमसागराचा ५
देहपुरामधे ईश । म्हणोन तया नांव 'पुरुष'
जगामधे जगदीश । तैसा वोळखावा ६
जाणीवरूपें जगदांतरें । प्रस्तुत वर्तती शरीरें
अंतःकरण विष्णु येणे प्रकारें । वोळखावा ७
तो विष्णु आहे जगदांतरीं । तोचि आपुले अंतरीं
कर्ता-भोक्ता चतुरीं । 'अंतरात्मा' वोळखावा ८
त्रैलोकीं वर्ततो येक । म्हणोनी त्रैलोक्य-नायक
ऐसा प्रत्ययाचा विवेक । पाहा ना कैसा ९
ऐसा 'अंतरात्मा' बोलिला । परी तोहि तत्त्वांमधें आला
पुढें विचार पाहिजे केला । महावाक्याचा १०
आधीं देखिला देहधारी । मग पाहावें जगदांतरीं
तयाचेनिया उपरी । परब्रह्म पाहावें ११
अष्टदेह स्थान मान । जाणोन जालिया निरसन
पुढें उरे निरंजन । विमल ब्रह्म १२
विचारेंचि अनन्य जाला । पाहाणारावीण प्रत्यय आला
तेहि वृत्ति-निवृतीला । बरें पाहा १३

**अखंड ध्यानचि करावें : सर्वोत्तमाचें** द. १४-८

बरें, ऐसा प्रसंग आला । जाला तो होऊन गेला
आतां परी ब्राह्मणीं आपणाला । शाहाणें करावें १

आधीं देवास वोळखावें । मग अनन्यभावें भजावें
अखंड ध्यानचि करावें । सर्वोत्तमाचें २
सर्वांमध्यें जो उत्तम । तया नांव सर्वोत्तम
आत्मानात्मविवेकें वर्म । ठायीं पाडावें ३
जाणजाणों देह रक्षी । 'आत्मा' द्रष्टा अंतरसाक्षी
पदार्थमात्रास परीक्षी । जाणपणें ४
'तो' सकल देहांमध्यें वर्ततो । इंद्रियग्राम चेष्टवितो
प्रचीतीने प्रत्यया येतो । प्राणीमात्रीं ५
प्राणीमात्रीं जगदंतरें । म्हणोनि राखावीं अंतरें
दाता-भोक्ता परस्परें । सकळकांहीं ६
'देव' वर्ततो जगदंतरीं । तोचि आपुले अंतरीं
त्रैलोकीचे प्राणीमात्रीं । बरें पाहा ७
मुळीं पाहाणारा 'तो' येकला । सकळां ठायीं विभागला
देहप्रकृतीने जाला । भिन्न भिन्न ८
भिन्न भासे देहाकारें । प्रस्तुत येकचि अंतरें
बोलणें-चालणें निर्धारें । त्यासीच घडे ९
समस्त जाणीवेने वर्तती । रोकडी पाहावी प्रचीती
'त्याची' आपुली संगती । अखंड आहे १०
जगदंतरें वोळला धणी । किती येकवटिले प्राणी
परी ते वोळखायाची करणी । आपणाचपासी ११
हें आपणाकडेच येतें । राजी राखिजे समस्तांतें
देहासी बरें करावें तें । आत्मयास पावे १२
आत्मत्वीं दिसतो भेद । हा अवघाचि देहसंबंध
येका जीवनें नाना स्वाद । औषधी-भेदें १३
गरळ आणि अमृत जालें । परी आप-पण नाहीं गेलें
साक्षत्वें आत्मयास पाहिलें । पाहिजे तैसें १४
अंतरनिष्ठ जो पुरुष । तो आंतरनिष्ठेनें विशेष
जगामध्यें जो जगदीश । तो तयास वोळखे १५

नयनेंच पाहावा नयन । मनेंचि शोधावें मन
तैसाचि हा भगवान । सकळां घटीं १६
तेणेंवीण कार्यभाग आडे । सकळ कांहीं तेणेंचि घडे
प्राणी विवेकी पवाडे । तेणेंचि योगें १७
अखंड ध्यानाचें लक्षण । अखंड देवाचें स्मरण
याचें करतां विवरण । सहजचि घडे १८
देह देऊळ, आत्मा देव : कोठें धरू पाहातां भाव
देव वोळखोन, जीव । तेथेंचि लावावा १९
अखंड ध्यानें न घडे हित । तरी तो जाणावा पतित
हाचि अर्थ सावचित्त । बरा पाहावा २०
ध्यान धरितें तें कोण । ध्यानीं आठवतें तें कोण
दोनीमध्यें अनन्य लक्षण । असलें पाहिजे २१
अनन्य सहजचि आहे । साधक शोधून न पाहे
ज्ञानी तो विवरोनि राहे । समाधानें २२

**अनंतरूपीं अनंता । वोळखावें** द. २०-४

सकळ जनांस प्रार्थना । उगेंच उदास करावें ना
निरूपण आणावें मना । प्रत्ययाचें १
पृथ्वीमधें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें
नाना सुखें येणें द्वारें । प्राप्त होती २
मूळ जाणत्या पुरुषाचि सत्ता । शरीरीं विभागली तत्त्वता
सकळ कळा चातुर्यता । तेथें वसे ३
सकळ पुरांचा ईश । जगामधे तो जगदीश
नाना शरीरीं सावकास । करूं लागे ४
पाहातां सृष्टीची रचना । ते येकाचेन चाले ना
येकचि चालवी, नाना । देह धरूनी ५
नाहीं उंच-नीच विचारलें । नाहीं बरेंवाईट पाहिलें
कार्य चालों, ऐसें जालें । भगवंतासी ६
जगदांतरीं अनुसंधान । बरें पाहाणें हेंचि ' ध्यान '
ध्यान आणि तें ज्ञान । येकरूप ७

प्रगट रामाचें निशाण । आत्माराम ज्ञानघन
विश्वंभर विद्यमान । भाग्यें कळे ८
' द्रष्टा ' म्हणजे पाहाता । ' साक्षी ' म्हणजे जाणता
अनंतरूपीं अनंता । वोळखावें ९
संगती असावी भल्यांची । घाटी कथानिरूपणाची
कांहीयेक मनाची । विश्रांती आहे १०
त्याहीमधें प्रत्ययज्ञान । जाळून टाकिला अनुमान
प्रचीतीवीण समाधान । पाविजेल कैंचें ? ११
मूळसंकल्प तो हरिसंकल्प । मूळमायेमधील साक्षेप
जगदांतरीं तेंचि रूप । देखिजेतें १२
उपासना ज्ञानस्वरूप । ज्ञानीं चौथा देह, आरोप
याकारणें सर्व संकल्प । सोडून द्यावा १३
पुढे परब्रह्म विशाळ । गगनासारखें पोकळ
घन, पातळ, कोमळ । काय म्हणावें ? १४
उपासना म्हणिजे ज्ञान । ज्ञानें पाविजे निरंजन
योगीयांचें समाधान । येणें रीतीं १५
विचार नेहटूनसा पाहे । तरी उपासना आपणचि आहे
येक जाये येक राहे । देह धरूनी १६
सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें
परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे १७
कर्ता जगदीश हें तों कळलें । परी विभाग जाला पृथगाकारें
तेथें अहंतेचें काविरें । बाधिजे ना १८
हरिर्दाता, हरिर्भोक्ता । ऐसें चालतें तत्त्वतां
ये गोष्टीचा आतां । विचार पाहावा १९
सकळ कर्ता जगदीश्वरू । आरला माईक विचारू
जैसें कळेल तैसें करूं । जगदांतरें २०
देवायेवढें चपळ नाहीं । ब्रह्मायेवढे निश्चळ नाहीं
पायरीने पायरी चढोन पाहीं । मूळपरियंत २१

● ●

# ६. आत्म–परमात्मा–परब्रम्हा

ऐक अनुभवाचे बोल, अनिर्वाच्य वस्तु । द. ६-१०

सांगतां नये, तें सांगणें । गोडी कळाया गूळ देणें
ऐसें हें सद्गुरुविणें । होणार नाहीं १

सद्गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधील आपणासी
पुढें कळे अनुभवासी । आपेंआप वस्तु २

दृढ करूनिया बुद्धी । आधीं घ्यावी आपशुद्धी
तेणें लागे समाधी । अकस्मात ३

आपलें मूळ बरें शोधितां । आपली तों माईक वार्ता
पुढें वस्तूचि तत्त्वतां । समाधान ४

पदार्थज्ञान जेव्हां सरे । द्रष्टा द्रष्टेपणें नुरे
ते समईं फुंज उतरे । मीपणाचा ५

जेथें मुरालें ' मी 'पण । तेचि अनुभवाची खूण
अनिर्वाच्या समाधान । याकारणें बोलिजे ६

भूस सांडून कण घ्यावा । तैसा ' वाच्यांश ' त्यजावा
कण ' लक्ष्यांश ' लक्षावा । शुद्ध स्वानुभवें ७

दृश्यावेगळें बोलिजे । त्यासी ' वाच्यांश ' म्हणिजे
त्याचा अर्थ तो जाणिजे । शुद्ध ' लक्ष्यांश ' ८

ऐसा जो शुद्ध लक्ष्यांश । तोचि जाणावा पूर्वपक्ष
स्वानुभव तो अलक्ष । लक्षिला न वचे ९

' आहे ' तितुके ' नाही ' झाले । ' नाही ' नाहीपणीं निमालें
' आहे–नाही ' जाऊनि उरलें । नसोनि कांहीं १०

शून्यत्वातीत शुद्धज्ञान । तेणें जालें समाधान
ऐक्यरूपें अभिन्न । सहजस्थिती ११

अद्वैत निरूपण होतां । निमाली द्वैताची वार्ता
ज्ञानचर्चा बोलो जातां । जागृति आली १२

श्रोतीं व्हावें सावधान । अर्थीं घालावें मन
खुणे पावतां समाधान । अंतरीं कळे १३
तेणें जितुकें ज्ञान कथिलें । तितुकें स्वप्नावारी गेलें
अनिर्वाच्य सुख उरलें । शब्दातीत १४
म्हणोनि तें समाधान । बोलतांचि नये, ऐसें जाण
निशब्दाची ऐसी खूण । वोळखावी १५

## ब्रह्मनिरूपण द. ७-२

ब्रह्म निर्गुण निराकार । ब्रह्म निसंग निर्विकार
ब्रह्मासी नाहीं पारावार । बोलती साधू १
ब्रह्म सर्वांस व्यापक । ब्रह्म अनेकीं येक
ब्रह्म शाश्वत, हा विवेक । बोलिला शास्त्रीं २
ब्रह्म अच्युत अनंत । ब्रह्म सदोदित संत
ब्रह्म कल्पनेरहित । निर्विकल्प ३
ब्रह्म सकळाहूनि थोर । ब्रह्माऐसें नाहीं सार
ब्रह्म सूक्ष्म अगोचर । ब्रह्मादिकांसी ४
ब्रह्म शब्दीं ऐसें तैसें । बोलिजे त्याहून अनारिसें
परी तें श्रवण-अभ्यासें । पाविजे ब्रह्म ५
तेथें सुख असे वाड । नाहीं मनास पवाड
मनेंवीण कैवाड । साधनांचा ६
त्याची मनेंवीण प्राप्ती । की वासनेवीण तृप्ती
तेथें न चले व्युत्पत्ती । कल्पनेची ७
तें परेहून पर । मनबुद्धिअगोचर
संग सोडितां सत्वर । पाविजे तें ८
संग सोडावा आपुला । मग पाहावें तयाला
अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ९
आपण म्हणजे मीपण । मीपण म्हणजे जीवपण
जीवपण म्हणजे अज्ञान- । संग जडला १०

सोडितां तया संगासी । ऐक्य होय निःसंगासी
कल्पनेवीण प्राप्तीसी । अधिकार ऐसा ११
' मी कोण ' ऐसें नेणिजे । तया नांव अज्ञान बोलिजे
अज्ञान गलिया पाविजे । परब्रह्म तें १२
देहबुद्धीच्या अंतीं । सकळांसी एकचि प्राप्ती
' येक ब्रह्म द्वितीयं नास्ति ' । हें श्रुतिवचन १३
साधू दिसती वेगळाले । परी ते स्वरूपीं मिळाले
अवघे मिळोनी येकचि जाले । देहातीत वस्तू १४
देहबुद्धीचा संशयो । करी समाधानाचा क्षयो
चुके समाधानसमयो । देहबुद्धियोगें १५
म्हणोनि देहबुद्धि झडे । तरीच परमार्थ घडे
देहबुद्धीनें बिघडे । ऐक्यता ब्रह्मीची १६
विचक्षणें याकारणें । देहबुद्धि त्यजावी श्रवणें
सत्यब्रह्मीं साचारपणें । मिळोनि जावें १७
परमात्मा ज्ञानघन । येकरूप पुरातन
चिद्रूप चिन्मात्र जाण । नामें अनाम्याचीं १८
तो विश्रांतीचा विश्राम । आदिपुरुष आत्माराम
तें येकचि परब्रह्म । दुसरें नाहीं १९

**ब्रह्म व आत्मा** द. १३-७

निर्मळ, निश्चळ, निराभास । तयास दृष्टांत आकाश
आकाश म्हणिजे अवकाश । पसरला पैस १
आधीं पैस मग पदार्थ । प्रत्ययें पाहतां यथार्थ
प्रत्ययेंवीण पाहातां व्यर्थ । सकळ कांहीं २
ब्रह्म म्हणजे तें निश्चळ । आत्मा म्हणजे तो चंचळ
तयास दृष्टांत केवळ । वायो जाणावा ३
घटाकाश दृष्टांत ब्रह्माचा । घटबिंब दृष्टांत आत्म्याचा
विवरतां अर्थ दोहींचा । भिन्न आहे ४

भूत म्हणजे जितुकें जालें । जालें तितकें निमालें
चंचळ आले आणि गेले । ऐसें जाणावें ५

अविद्या जड, आत्मा चंचल । जड कर्पूर आत्मा अनळ
दोन्हीं जळोन तात्काळ । विझोन जाती ६

ब्रह्म–आकाश निश्चळ जाती । आत्मा–वायो चंचळ जाती
परीक्षावंत परीक्षिती । खरें कीं खोटें ७

जड अनेक, आत्मा येक । ऐसा आत्मानात्मविवेक
जगा वर्तवीत जगन्नायक । तयास म्हणावें ८

जड अनात्म चेतवी आत्मा । सर्वी वर्ते सर्वात्मा
अवघा मिळोन चंचळात्मा । निश्चळ नव्हे ९

निश्चळ तें परब्रह्म । जेथें नाहीं दृश्य–भ्रम
विमळ ब्रह्म तें निर्भ्रम । जैसें तैसें १०

आधीं आत्मानात्मविवेक थोर । मग सारासारविचार
सारासारविचारें संहार । प्रकृतीचा ११

विचारें प्रकृति संहारे । दृश्य असतांच वोसरे
अंतरात्मा निर्गुणीं संचरे । अध्यात्म-श्रवणें १२

**अंतर्देवनिरूपण** द. १८-८

देवाचा ठावचि लागे ना । ‘ येक देव ’ नेमस्त कळे ना
बहुत देवीं अनुमाने ना । येक देव १

म्हणोनी विचार असावा । विचारें देव शोधावा
बहुत देवांचा गोवा । पडोंचि नये २

देव क्षेत्रीं पाहिला । त्यासारिखा धातूचा केला
पृथ्वीमध्ये दंडक चालिला । येणें रीतीं ३

‘ क्षेत्र-देव ’ पाषाणाचा । विचार पाहातां तयाचा
तंतू लागला मूळाचा । अवताराकडे ४

‘ अवतारी देव ’ संपले । देह धरूनी वर्तोन गेले
त्याहुन थोर अनुमानिले । ‘ ब्रह्मा-विष्णु-महेश ’ ५

त्या तिहीं देवांस ज्याची सत्ता । तो 'अंतरात्मा'चि पाहातां
कर्ताभोक्ता तत्त्वता । प्रत्यक्ष आहे ६

युगानुयुगें तिन्ही लोक । येकचि चालवी अनेक
हा निश्चयाचा विवेक । वेदशास्त्रीं पाहावा ७

आत्मा वर्तवितो शरीर । तोचि देव उत्तरोत्तर
जाणीवरूपें कळिवर । विवेकें वर्तवी ८

तो 'अंतर्देव' चुकती । धावा घेऊन तीर्थांस जाती
प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां ९

मग विचारिती अंतःकरणीं । जेथें तेथें धोंडा-पाणी
उगेचि वणवण हिंडोनी । काय होतें ? १०

ऐसा ज्यासी विचार कळला । तेणें सत्संग धरिला
सत्संगें देव सांपडला । बहुत जनांसी ११

अंतरवेधी अंतर जाणे । बाहेर मुद्रा कांहीच नेणे
म्हणोन विवेकी शाहाणे । अंतर शोधिती १२

विवेकेवीण जो भाव । तो भावचि अभाव
'मूर्खस्य प्रतिमा देव' । ऐसें वचन १३

पाहात समजत शेवटा गेला । तोचि विवेकी भला
तत्त्वें सांडूनी पावला । निरंजनीं १४

अरे, जें आकारासी येतें । तें अवघेंचि नासोन जातें
मग गल्बल्यावेगळें तें । परब्रह्म जाणावें १५

कांहीं अनुमानलें विचारें । देव आहे जगदंतरें
सगुणाकरितां निर्धारें । निर्गुण पाविजे १६

सगुण पाहातां मुळास गेला । सहजचि निर्गुण पावला
संगत्यागें मोकळा जाला । वस्तुरूप १७

परमेश्वरीं अनुसंधान । लावितां होइजे पावन
मुख्य ज्ञानेंचि विज्ञान । पाविजेते १८

ऐसीं हीं विवेकाचीं विवरणें । पाहावीं सुचित अंतःकरणें
नित्यानित्यविवेकश्रवणें । जगदुद्धार १९

**दृश्य विवेकें काढलें । मग परब्रह्म कोंदाटलें** द. २०-२

मूळमाया नस्ता चंचळ । निर्गुण ब्रह्म तें निश्चळ
जैसें गगन अंतराळ । चहूंकडे १

दृश्य आलें आणि गेलें । परी तें ब्रह्म संचलें
जैसें गगन कोंदाटलें । चहूंकडे २

जिकडे पाहावें तिकडे अपार । कोणेकडे नाहीं पार
येकजिनसी स्वतंत्र । दुसरें नाहीं ३

दृश्य विवेकें काढलें । मग परब्रह्म कोंदाटलें
कोणासीच अनुमानिलें । नाहीं कदा ४

दृश्य चळे, ब्रह्म चळे ना । दृश्य कळे, ब्रह्म कळे ना
दृश्य आकळे, ब्रह्म आकळे ना । कल्पनेसी ५

कल्पना म्हणजे कांहींच नाहीं । ब्रह्म दाटलें ठायींचा ठायीं
वाक्यार्थ विवरत जाई । म्हणजे बरें ६

परब्रह्मायेवढें थोर नाहीं । श्रवणापरतें साधन नाहीं
कळल्यावीण कांहींच नाहीं । समाधान ७

ऐसें परब्रह्म येकजिनसी । कांहींच तुळे ना तयासी
महानुभाव पुण्यरासी । तेथें पवाडती ८

**जड-चंचळ जातां, जाड । परब्रह्मचि आहे ।** द. २०-७

अनिर्वाच्य समाधान जालें । तें पाहिजे बोलिलें
बोलल्यासाठी समाधान गेलें । हें तों घडे ना १

कांहीं सांडावें लागत नाहीं । कांहीं मांडावें लागत नाहीं
येक विचार शोधून पाही । म्हणजे कळे २

पिंडाचा बरा शोध घ्यावा । तत्त्वांचा पिंड शोधावा
तत्त्वें शोधितां पिंड आघवा । कळों येतो ३

जड देह भूतांचा । चंचळ गुण आत्मयाचा
निश्चळ, ब्रह्मावेगळा ठाव कैंचा । जेथें तेथें ४

निश्चळ, चंचळ आणि जड । पिंडीं करावा निवाड
प्रत्ययावेगळें जाड । बोलणें नाहीं ५

पिंडामधून आत्मा जातो । तेव्हां निवाडा कळों येतो
देह जड हा पडतो । देखत देखतां ६

जड तितुकें पडलें । चंचळ तितकें निघोन गेलें
जड चंचळाचें रूप आलें । प्रत्ययासी ७

निश्चळ आहे सकळां ठायीं । हें तो पाहाणें नलगे कांहीं
गुणविकार तेथें नाहीं । निश्चळासी ८

जैसें पिंड तैसें ब्रह्मांड । विचार दिसतो उघड
जड चंचळ जातां, जाड । परब्रह्मचि आहे ९

महाभूतांचा खंबीर केला । आत्मा घालून पुतळा जाला
चालला सृष्टीचा गल्बला । येणें रीतीं १०

आत्मा–माया विकार करी । आळ घालती ब्रह्मावरी
प्रत्ययें सकळ कांहीं विवरी । तोचि भला ११

ब्रह्म व्यापक अखंड । वरकड व्यापकता खंड
शोधून पाहातां जड । कांहींच नाहीं १२

न कळतां वाटे कोडें । कळतां अवघें दिसे उघडें
म्हणोनी येकांतीं निवाडे । विचार पाहावा १३

मिळतां प्रत्ययाचे संत । येकांतापरीस येकांत
केली पाहिजे सावचीत । नाना चर्चा १४

पाहिल्यावेगळें कळत नाहीं । कळतां कळतां संदेह नाहीं
विवेक पाहातां कोठेंचि नाही । मायाजाळ १५

मुळापासूनि सेवटवरी । विवेकी विवेकें विवरी
तोचि निश्चय थावरी । चळेना ऐसा १६

वरकड निश्चय अनुमानाचे । अनुमानें बोलतां काय वेचे
जाणते पुरुष प्रचीतीचे । ते तों मानीत ना १७

उगेच बोलणें अनुमानाचें । अनुमानाचें कोण्या कामाचें ?
येथें सगट विचाराचें । काम नाहीं १८

सगट विचार तो ' अविचार ' । कित्येक म्हणती येकंकार
येकंकार भ्रष्टाकार । करूं नये १९

कृत्रिम अवघें सांडावें । कांहींयेक शुद्ध घ्यावें
जाणजाणों निवडावें । सारासार २०

## सायुज्यमुक्ति व निर्गुणभक्ति द. ४-१०

येथें ज्या देवाचें भजन करावें । तेथें ते देवलोकीं राहावें
' स्वलोकता ' मुक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें १

लोकीं राहावें ते ' सलोकता ' । समीप असावें ते ' समीपता '
स्वरूपचि व्हावें ते ' सरूपता ' । तिसरी मुक्ती २

देवस्वरूप जाला देही । श्रीवत्स-कौस्तुभ-लक्ष्मी नाही !
सरूपतेचें लक्षण पाही । ऐसें असें ३

तिन्ही मुक्ति नासिवंत । ' सायुज्यमुक्ति ' ते शाश्वत
तेहि निरोपिजेल सावचित्त । ऐक आतां ४

ब्रह्मांड नासेल कल्पांतीं । पर्वतासहित जळेल क्षिती
तेव्हां अवघेचि देव जाती । मा मुक्ति कैच्या तेथें ? ५

तेव्हां निर्गुण परमात्मा निश्चळ । निर्गुण भक्ति तेहि अचळ
' सायुज्यमुक्ति ' ते केवळ । जाणिजे ऐसी ६

निर्गुणीं अनन्य असतां । तेणें होय सायुज्यता
सायुज्यता म्हणिजे स्वरूपता । निर्गुण भक्ति ७

● ●

# ७. आत्मज्ञानी

आतां ऐका सत्त्वगुण । परम दुर्लभ जो द. २-७

ईश्वरीं प्रेमा अधिक । प्रपंच संपादी लौकिक
सदा संनिध विवेक । तो सत्त्वगुण १

संसारदुःख विसरवी । भक्तिमार्ग विमळ दावी
भजनक्रिया उपजवी । तो सत्त्वगुण २

परमार्थाची आवडी । उठे भावार्थाची गोडी
परोपकारी तातडी । तो सत्त्वगुण ३

स्नान, संध्या पुण्यशीळ । अभ्यंतरींचा निर्मळ
शरीरवस्त्रें सोज्वळ । तो सत्त्वगुण ४

यजन आणि याजन । अध्ययन आणि अध्यापन
स्वयें करी दानपुण्य । तो सत्त्वगुण ५

निरूपणाची आवडी । जया हरिकथेची गोडी
क्रिया पालटे रोकडी । तो सत्त्वगुण ६

देहाभिमान गळे । विषयीं वैराग्य प्रबळे
'मिथ्या माया' ऐसें कळे । तो सत्त्वगुण ७

जेणें जिंकली रसना । तृप्त जयाची वासना
जयास नाहीं कामना । तो सत्त्वगुण ८

एका भगवंताकारणें । सर्व सुख सोडलें जेणें
केलें देहाचें सांडणें । तो सत्त्वगुण ९

विषयीं धावे वासना । परी तो कदा डळमळी ना
ज्याचें धारिष्ट चळे ना । तो सत्त्वगुण १०

श्रवण आणि मनन । निदिध्यासें समाधान
शुद्ध झालें आत्मज्ञान । तो सत्त्वगुण ११

जयास अहंकार नसे । नैराश्यता विलसे
जयापाशीं कृपा वसे । तो सत्त्वगुण १२

सकळांसी नम्र बोले । मर्यादा धरूनि चाले
सर्व जन तोषविले । तो सत्त्वगुण १३

स्वकार्याहूनि जीवीं । परकार्यसिद्धि करावी
मरोन कीर्ति उरवावी । तो सत्त्वगुण १४

मन भलतीकडे धावें । तें विवेकें आवरावें
इंद्रियें दमन करावें । तो सत्त्वगुण १५

सत्क्रिया आचरावी । असत्क्रिया त्यागावी
वाट भक्तीची धरावी । तो सत्त्वगुण १६

सन्मार्ग दाखवी जना । जो लावी हरिभजना
ज्ञान शिकवी अज्ञाना । तो सत्त्वगुण १७

परपीडेचें वाहे दुःख । परसंतोषाचें सुख
वैराग्य देखोनि हरिख । वाटे, तो सत्त्वगुण १८

परभूषणें भूषण । परदूषणें दूषण
परदुःखें शिणे जाण । तो सत्त्वगुण १९

ऐसा हा सत्त्वगुण सात्त्विक । संसारसागरीं तारक
येणें उपजे विवेक । ज्ञानमार्गाचा २०

सत्त्वगुणें भगवद्भक्ती । सत्त्वगुणें ज्ञानप्राप्ती ।
सत्त्वगुणें सायोज्यमुक्ती । पाविजेते २१

**संत, साधु, महानुभाव, सज्जन । द. ६-१**

जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे ' संत '
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी १

चळे ना, ढळे ना ' देव ' । ऐसा ज्याचा आंतर्भाव
तोचि जाणिजे ' महानुभाव–। संत-साधू ' २

जो जनामध्यें वागे । परी जनांवेगळी गोष्टी सांगे
ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तोचि ' साधू ' ३

जाणिजे परमात्मा निर्गुण । त्यासीच म्हणावें ' ज्ञान '
त्यावेगळें तें ' अज्ञान ' । सर्व कांहीं ४

ऐसें जयापासीं ज्ञान । तोचि जाणावा 'सज्जन'
तयापासीं समाधान । पुसलें पाहिजे ५

## सिद्ध-साधु-लक्षण

द. ८-९

जालें आत्मज्ञान बरवें । हें कैसेनि पां जाणावें ?
म्हणोनि बोलिलीं स्वभावें । साधुलक्षणें १
ऐक सिद्धांचें लक्षण । सिद्ध म्हणजे स्वरूप जाण
तेथें पाहतां वेगळेपण । मुळींच नाहीं २
सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण
जनीं असोनि आपण । जनांवेगळा ३
स्वरूपीं दृष्टी पडतां । तुटोनि गेली संसारचिंता
पुढें लागली ममता । निरूपणाची ४
तें साधकाचें लक्षण । परी सिद्धाअंगीं असे जाण
सिद्धलक्षण साधकेंवीण । बोलोंच नये ५
बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं
सिद्धलक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें ६
संदेहरहित साधन । तेंचि सिद्धाचें लक्षण
अंतर्बाह्य समाधान । चळे ना ऐसें ७
अचळ आणि अंतरस्थिती । तेथें चळणास कैंची गती ?
स्वरूपीं लागतां वृत्ती । स्वरूपचि जाली ८
येथें कारण अंतरस्थिती । अंतरींच पाहिजे निवृत्ती
अंतर लागलें भगवंतीं । तोचि 'साधू' ९
बाह्य भलतैसें असावें । परीं अंतर स्वरूपीं लागावें
लक्षणें दिसती स्वभावें । साधुअंगीं १०
अभ्यासाचा मुगुटमणी । वृत्ती राहावी निर्गुणीं
संतसंगें निरूपणीं । स्थिती बाणे ११
स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैंची उरेल कामना ?
म्हणोनिया साधूजना । कामचि नाही १२

कल्पिला विषयो हातींचा जावा । तेणें गुणें क्रोध यावा
साधुजनाचा अक्षै ठेवा । जाणार नाहीं १३
जेथें नाही दुसरी परी । क्रोध यावा कोणावरी ?
क्रोधरहित सचराचरीं । साधुजन वर्तती १४
आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद ?
याकारणे वादवेवाद । तुटोनि गेला १५
साधू स्वरूप निर्विकार । तेथें कैंचा तिरस्कार ?
आपला आपण, मत्सर । कोणावरी करावा ? १६
साधु वस्तु अनायासें । याकारणें मत्सर नसे
मदमत्सराचें पिसें । साधूसी नाहीं १७
साधू स्वरूप स्वयंभ । तेथें कैंचा असेल दंभ
जेथें द्वैताचा आरंभ । जालाच नाहीं १८
जेणें दृश्य केलें विसंच । तयास कैंचा हो प्रपंच ?
याकारणें निःप्रपंच । साधू जाणावा १९
अवघें ब्रह्मांड ज्याचें घर । पंचभूतिका हा जोजार
मिथ्या जाणोन सत्वर । त्याग केला २०
याकारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे
जयासी वासना समरसे । शुद्धस्वरूपीं २१
आपुला आपण आघवा । स्वार्थ कोणाचा करावा ?
म्हणोनि साधु तो जाणावा । शोकरहित २२
मोहें झळंबावें मन । तरी तें जाहलें उन्मन
याकारणें साधुजन । मोहातीत २३
साधु वस्तु अद्वय । तेथें कैंचें वाटेल भय ?
परब्रह्म तें निर्भय । तोचि साधू २४
याकारणें भयातीत । साधु निर्भय, निवांत
सकळांस मांडेल अंत । साधु अनंतरूपी २५
जेथें नाहीं द्वंद्व–भेद । आपला आपण, अभेद
तेथें कैंचा उठेल खेद । देहबुद्धीचा ? २६

आपण येकला ठाईंचा । स्वार्थ करावा कोणाचा ?
दृश्य नसतां, स्वार्थाचा । ठावचि नाहीं २७
आशा धरतां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची
म्हणोन नैराशता साधूची । वोळखण २८
स्वरूपाच्या संयोगीं । स्वरूपचि जाला योगी
याकारणें वीतरागी । निरंतर २९
स्थिती बाणतां स्वरूपाची । चिंता सोडिली देहाची
याकारणें होणाराची । चिंता नसे ३०
स्वरूपीं लागतां बुद्धी । तुटे अवघी उपाधी
याकारणें निरोपाधी । साधूजन ३१
अलक्षास लावी लक्ष । म्हणोनि साधु परम दक्ष
वोहूं जाणती कैपक्ष । परमार्थाचा ३२
स्वरूपीं न साहे मळ । म्हणौन साधु तो निर्मळ
साधु स्वरूपचि केवळ । म्हणोनिया ३३
सकळ धर्मामध्यें धर्म । स्वरूपीं राहणें स्वधर्म
हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधु लक्षणाचें ३४
ऐसीं साधूचीं लक्षणें । अंगीं बाणती निरूपणें
परंतु स्वरूपीं राहणें । निरंतर ३५

**‘ब्रह्मज्ञानी’** द. ९-३

जो ज्ञानें गुप्त जाला । जो विवेकें विराला
जो अनन्यपणें उरला । नाहींच कांहीं १
तयास कैसें गिवसावें ? । शोधूं जातां तोचि व्हावें
तोचि होतां, म्हणावें । नलगेचि कांहीं २
दिसतो तरी देहधारी । परी कांहींच नाहीं अंतरीं
तयास पाहातां बरिवरी । कळेल कैसा ३
कळाया शोधावें अंतर । तंव तो नित्य, निरंतर
जयास धुंडितां विकार । निर्विकार होती ४
तो परमात्माचि केवळ । तयास नाहीं मायामळ
अखंड, हेतूचा विटाळ । जालाचि नाहीं ५

ऐसा जो कां योगीराज । तो आत्मा सहजीं सहज
पूर्णब्रह्म वेदबीज । देहाकारें कळेना ६
'ज्ञानी' तो सत्यस्वरूप । अज्ञानें केलें मनुष्यरूप
भावासारिखा फलद्रूप । देव तैसा ७
देव निराकार निर्गुण । लोकें मानिती पाषाण
पाषाण फुटला, निर्गुण । फुटेल कैसा ? ८
देव सदोदित संचला । लोकीं बहुविध केला
परंतु बहुविध जाला । हें तों घडेना ९
तैसा साधू आत्मज्ञानी । बोधें पूर्ण समाधानी
विवेकें आत्मनिवेदनीं । आत्मरूपी १०

## जीवन्मुक्त ज्ञानी द. ७-१०

मागा जालें निरूपण । देखिलें आपणांसी आपण
तेणें बाणली खूण । परमार्थाची १
तेणें समाधान जालें । चित्त चैतन्यीं मिळालें
निजस्वरूपें वोळखिलें । निजवस्तूसी २
प्रारब्धीं टाकिला देह । बोधें फिटला संदेह
आतांचि पडो अथवा राहो । मिथ्या कलेवर ३
ज्ञानियांचें जें शरीर । तें मिथ्यत्वें निर्विकार
जेथें पडे तेंचि सार । पुण्यभूमी ४
जे कां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचें शरीर पडो रानीं
अथवा पडो स्मशानीं । तरी धन्य जालें ५
जो जन्मलाच नाहीं ठाईंचा । त्यास मृत्यू येईल कैंचा ?
विवेकबळें जन्ममृत्यूचा । घोट भरला जेणें ६
तो जीतचि अस्ता मेला । मरणास मारून जियाला
जन्ममृत्यु न स्मरे त्याला । विवेकबळें ७
तो जनीं दिसतो परी वेगळा । वर्ततां भासे निराळा
'दृश्य' पदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं ८

●●●

# प्रपंच खंड

## १. धन्य नरदेह

**धन्य नरदेह** द. १-१०

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो
जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धीतें १
या नरदेहाचेनि लागवेगें । येक लागले भक्तिसंगें
येकी परमवीतरागें । गिरिकंदरें सेविलीं २
ऐसे सिद्ध, साधु, संत । स्वहिता प्रवर्तले अनंत
ऐसा हा नरदेह विख्यात । काय म्हणोनि वर्णावा ३
या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें
मुख्य सारासार विचारें । बहुत सुटले ४
या नरदेहाचेनि संबंधें । बहुत पावले उत्तम पदें
अहंता सांडून स्वानंदें । सुखी जाले ५
म्हणोनि नरदेह श्रेष्ठ । नाना देहांमध्ये वरिष्ठ
जयाचेनि चुके आरिष्ट । यमयातनेचें ६
नरदेह हा स्वाधेन । सहसा नव्हे पराधीन
परंतु हा परोपकारीं झिजवून । कीर्तिरूपें उरवावा ७
देह परमार्थी लाविलें । तरीच याचें सार्थक जालें
नाहींतरी हें वेर्थचि गेलें । नाना आघातें मृत्युपंथें ८

**जन्माचें सार्थक करावें** द. २-४

नाना सुकृतांचें फळ । तो हा नरदेह केवळ
त्याहीमधे भाग्य सफळ । तरीच सन्मार्ग लागे १
नरदेहीं विशेष ब्राह्मण । त्याहीवरी संध्यास्नान
सद्वासना, भगवद्भजन । घडे पूर्वपुण्यें २

भगवद्भक्ति हे उत्तम । त्याहीवरी सत्समागम
काळसार्थक हाचि परम । लाभ जाणावा ३
प्रेमप्रीतीचा सद्भाव । आणि भक्तांचा समुदाव
हरिकथा महोत्साव । तेणें प्रेमा दुणावे ४
नरदेहीं आलिया येक । कांहीं करावें सार्थक
जेणें पाविजे परलोक । परम दुर्लभ जो ५
नाना शास्त्रें धांडोळावीं । अथवा तीर्थें तरी करावीं
अथवा पुरश्चरणें बरवीं । पापक्षयाकारणें ६
अथवा कीजे परोपकार । अथवा ज्ञानाचा विचार
निरूपणीं सारासार । विवेक करणें ७
काया, वाचा आणि मनें । पत्रें, पुष्पें, फळें, जीवनें
कांहीतरी येका भजनें । सार्थक करावें ८
जन्मा आलियाचें फळ । कांहीं करावें सफळ
ऐसें न करतां निर्फळ । भूमिभार होय ९
नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित
यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें १०
पुण्यसामग्री पुरती । तयासीच घडे भगवद्भक्ती
जे जे जैसें करिती । ते पावती तैसेंची ११

**देह-जीवात्म्याचा सहकार** **द. १३-९**

आत्मयास शरीरयोगें । उद्वेग, चिंता करणें लागे
शरीरयोगें आत्मा जगे । हे तों प्रगटचि आहे १
देह अन्नचि खाये ना । तरी आत्मा कदापी जगे ना
आत्म्यावीण चेतना । देहास कैंची ? २
हे येकावेगळे येक । करूं जातां निरर्थक
उभययोगें कोणीयेक । कार्य चाले ३
देहाला नाहीं चेतना । आत्म्यास पदार्थ उचले ना
स्वप्न-भोजनें भरे ना । पोट कांहीं ४
उन्मत्त द्रव्य देह खातो । देहयोगें आत्मा भुलतो
विस्मरणें शुद्धि सांडतो । सकळ कांहीं ५

देहानें घेतलें विष । आत्मा जाय सावकाश
वाढणें, मोडणें आत्मयास । नेमस्त आहे ६
वाढणें, मोडणें, जाणें, येणें । सुखदुःख देहाचेनि गुणें
नाना प्रकारें भोगणें । आत्मयास घडे ७
तृषेनें शोषलें शरीर । आत्म्यास कळे हा विचार
मग उठवून शरीर । चालवी उदकाकडे ८
उदक मागे, शब्द बोलवी । मार्ग पाहोन शरीर चालवी
शरीर अवघेंचि हालवी । प्रसंगानुसार ९
देहीं सुखदुःखभोक्ता । तो येक आत्माचि पाहातां
आत्म्यावीण देह वृथा । मढें होय १०
मनाच्या अनंत वृत्ती । जाणणें, तेचि आत्मस्थिती
त्रैलोक्यीं जितुक्या व्यक्ती । तदांतरीं आत्मा ११
जगामध्यें जगदात्मा । विश्वामध्यें विश्वात्मा
सर्व चालवी सर्वात्मा । नाना रूपें १२
शरीरा बरें केलें । तें आत्मयास पावलें
शरीरयोगें जालें । आत्मयास समाधान १३
देहावेगळे उपाय नाना । करितां आत्मयास पावे ना
समाधान पावे वासना । देहाचेनी १४
देह–आत्मयाचें कौतुक । पाहों जातां हें अनेक
देहावेगळी आडणुक । आत्मयास होय १५
येक असतां उदंड घडे । वेगळें पाहातां कांहीं न घडे
विवेकें त्रैलोक्यीं पवाडे । देहात्मयोगें १६

**देहदुर्लभता** **द. १८-४**

देहाकरतां कवित्वें चालती । देहाकरतां अध्ययनें करिती
देहाकरतां अभ्यासिती । नाना विद्या १
देहाकरतां महाज्ञानी । सिद्ध, साधु, ऋषि, मुनी
देहाकरतां तीर्थाटनीं । फिरती प्राणी २
देहाकरतां श्रवण घडे । देहाकरतां मननीं पवाडे
देहाकरतां देहीं आतुडे । मुख्य परमात्मा ३

देहाकरतां कर्ममार्ग । देहाकरतां उपासनामार्ग
देहाकरतां ज्ञानमार्ग । भूमंडळीं ४

योगी, वीतरागी, तापसी । देहाकरतां नाना सायासी
देहाकरतां आत्मयासी । प्रगटणें घडे ५

देहाकरतां नवविधाभक्ति । देहाकरतां चतुर्विधा मुक्ती
देहाकरतां नाना युक्ती । नाना मतें ६

देह सकळांमध्यें उत्तम । देहीं राहिला आत्माराम
सकळां घटीं पुरुषोत्तम । विवेकी जाणती ७

देह परलोकींचें तारू । नाना गुणांचा गुणागरू
नाना रत्नांचा विचारू । देहाचेनी ८

देह ब्रह्मांडाचें फळ । देह दुर्लभचि केवळ
परी या देहास निवळ । उमजवावें ९

जे जे देह धरून आले । ते ते कांहीं करून गेले
हरिभजनें पावन जाले । कितीयेक १०

हरिसंकल्प मुळीं होता । तोचि फळीं पाहावा आतां
नाना देहांतरीं तत्त्वता । शोधितां कळे ११

असो, कांहीं येक करणें । कैसें घडे देहाविणें
देह सार्थकीं लावणें । म्हणजे बरें १२

आत्म्याकरतां देह जाला । देहाकरतां आत्मा तगला
उभययोगें उदंड चालला । कार्यभाग १३

चोरून गुप्तपणें करावें । तें आत्म्यास पडे ठावें
कर्तृत्व याचेन स्वभावें । सकळ कांहीं १४

देहावेगळी पूजा पावेना । देहावीण पूजा फावेना
जनीं जनार्दन, म्हणोनि जना । संतुष्ट करावें १५

उदंड प्रगटला विचार । धर्मस्थापना तदनंतर
येथंच पूजेस अधिकार । पुण्यशरीरीं १६

सकळ जगदांतरींचा देव । क्षोभतां राहाण्या कोठें ठाव
जगावेगळा जनास उपाव । आणीक नाहीं १७

## नरदेह परमदुर्लभ  द. २०-५

नाना शब्द, नाना स्पर्श । नाना रूप, नाना रस
नाना गंध ते विशेष । नरदेह जाणे १
अमोल्य रत्नें, नाना वस्त्रें । नाना यानें नाना शस्त्रें
नाना विद्या, कला, शास्त्रें । नरदेह जाणे २
दृश्य अवघेंचि पाहावें । स्थानमान सांभाळावें
सारासार विचारावें । नरदेहीं आलिया ३
इहलोक आणि परलोक । नाना प्रकारींचा विवेक
विवेक आणि अविवेक । मनुष्य जाणे ४
नाना पिंडीं ब्रह्मांडरचना । नाना मुळींची कल्पना
नाना प्रकारीं धारणा । मनुष्य जाणे ५
अष्टभोग नवरस । नाना प्रकारींचा विलास
वाच्यांश, लक्ष्यांश, सारांश । मनुष्य जाणे ६
मनुष्यें सकळांस आळिलें । त्या मनुष्यास देवें पाळिलें
ऐसें हें अवघें कळलें । नरदेहयोगें ७
नरदेह परम दुर्लभ । येणें घडे अलभ्य लाभ
दुर्लभ ते सुलभ । होत आहे ८
बरकड देह हें काबाड । नरदेह मोठें घबाड
परंतु पाहिजे जाड । विवेक रचना ९
येथें जेणें आळस केला । तो सर्वस्व बुडाला
देव नाहीं ओळखिला । विवेकबळें १०
नर तोचि नारायेण । जरी प्रत्ययें करी श्रवण
मननशीळ अंतःकरण । सर्वकाळ ११
जेणें स्वयेंचि पोहावें । त्यास कासेस नलगे लागावें
स्वतंत्रपणें शोधावें । सकळ कांहीं १२
सकळ शोधून राहिला । संदेह कैंचा तयाला ?
पुढें विचार कैसा जाला । त्याचा तोच जाणे १३

●●●

# २. गुणवान् प्रापंचिक

**मूर्खलक्षण । त्यागार्थ बोलिले** द. २-१

जे प्रापंचिक जन । जयांस नाहीं आत्मज्ञान
जे केवळ अज्ञान । त्यांचीं लक्षणें १
जन्मला जयांचे उदरीं । तयांस जो विरोध करी
सखी मानली अंतुरी । तो येक मूर्ख २
समर्थावरी अहंता । अंतरीं मानी समता
सामर्थ्येंवीण करी सत्ता । तो येक मूर्ख ३
आपली आपण करी स्तुती । स्वदेशीं भोगी विपत्ती
सांगे वडिलांची कीर्ती । तो येक मूर्ख ४
आपुली धरुनिया दुरी । पराव्यासी मैत्री करी
परन्यून बोले रात्रीं । तो येक मूर्ख ५
घरीं विवेक उमजे । आणि सभेमध्यें लाजे
शब्द बोलतां निर्बुजे । तो येक मूर्ख ६
औषध न घे असोनि व्यथा । पथ्य न करी सर्वथा
न मिळे आलिया पदार्था । तो येक मूर्ख ७
आपणांस जेथें मान । तेथें अखंड करी गमन
रक्षूं नेणें मानापमान । तो येक मूर्ख ८
घरिच्यावरी खाय दाढा । बाहेर दीन बापुडा
ऐसा जो का मूढ वेडा । तो येक मूर्ख ९
स्वयें नेणें परोपकार । उपकाराचा अनुपकार
करी थोडें, बोले फार । तो येक मूर्ख १०
तपीळ, खादाड, आळसी । कुश्चीळ, कुटीळ मानसीं
धारिष्ट नाहीं जयापासीं । तो येक मूर्ख ११
विद्या, वैभव ना धन । पुरुषार्थ, सामर्थ्य ना मान
कोरडाच वाहे अभिमान । तो येक मूर्ख १२
दंत, चक्षु आणि घ्राण । पाणी, वसन आणि चरण
सर्वकाळ जयाचे मळिण । तो येक मूर्ख १३

क्रोधें, अपमानें, कुबुद्धीं । आपणास आपण वधी
जयास नाहीं दृढबुद्धी । तो येक मूर्ख १४

जीवलगांस परमखेदी । सुखाचा शब्द तोही नेदीं
नीच जनांस वंदी । तो येक मूर्ख १५

पुत्र, कलत्र आणि दारा । इतुकाचि मानूनिया थारा
विसरोन गेला ईश्वरा । तो येक मूर्ख १६

' जैसें जैसें करावें । तैसें तैसें पावावें '
हें जयास नेणवे । तो येक मूर्ख १७

परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख
गेले वस्तूचा करी शोक । तो येक मूर्ख १८

सांडूनियां जगदीशा । मनुष्याचा मानी भरंवसा
सार्थकेवीण वेंची वयसा । तो येक मूर्ख १९

समर्थाचिये मनींचा तुटे । जयाचेनि सभा विटे
क्षणा बरा, क्षणा पालटे । तो येक मूर्ख २०

अनीतीनें द्रव्य जोडी । धर्म, नीति, न्याय सोडी
संगतीचें मनुष्य तोडी । तो येक मूर्ख २१

आपुले अर्थ दुसऱ्यापासीं । आणि दुसऱ्याचे अभिलासी
पर्वत करी हीनासी । तो येक मूर्ख २२

आपण वाची ना कधीं । कोणास वाचाया नेदी
बांधोनि ठेवी बंदीं । तो येक मूर्ख २३

**तात्पर्य :**

उत्तम लक्षणें घ्यावीं । मूर्ख लक्षणें त्यागावीं ।

**आतां परिसा, शहाणे । असोनि मूर्ख.** **द. २-१०**

बहुश्रुत आणि व्युत्पन्न । प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान
दुराशा आणि अभिमान । धरीं, तो येक पढतमूर्ख १

मुक्तक्रिया प्रतिपादी । सगुणभक्ति उच्छेदी
स्वधर्म आणि साधन निंदी । तो येक पढतमूर्ख २

आपलेन ज्ञातेपणें । सकळांस शब्द ठेवणें
प्राणीमात्रांचें पाहे उणें । तो येक पढतमूर्ख ३
समूळ ग्रंथ पाहिल्यावीण । उगाच ठेवी जो दूषण
गुण सांगतां पाहे अवगुण । तो येक पढतमूर्ख ४
वक्ता अधिकारेंवीण । वक्तृत्वाचा करी शीण
वचन जयाचें कठीण । तो येक पढतमूर्ख ५
दोष ठेवी पुढीलांसी । तेचि स्वयें आपणापासी
ऐसें न कळे जयासी । तो येक पढतमूर्ख ६
नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन
क्रियेवीण बोले ब्रह्मज्ञान । तो येक पढतमूर्ख ७
रात्रंदिवस करी श्रवण । न संडी आपले अवगुण
स्वहित आपलें नेणें आपण । तो येक पढतमूर्ख ८
ज्ञान बोलोनि करी स्वार्थ । कृपणां ऐसा साची अर्थ
अर्थासाठीं लावी परमार्थ । तो येक पढतमूर्ख ९
वर्तल्यावीण शिकवी । ब्रह्मज्ञान लावणी लावी
पराधेन गोसावी । तो येक पढत मूर्ख १०
प्रपंच गेला हातींचा । लेश नाहीं परमार्थाचा
द्वेषी देवा-ब्राह्मणांचा । तो येक पढतमूर्ख ११

**ऐका, करंट लक्षण,** द. १९-३

पापाकरतां दरिद्र प्राप्त । दरिद्रें होय पापसंचित
ऐसेंचि होत जात । क्षणक्षणा १
करंट्यास आळस आवडे । यत्न कदापि नावडे
त्याची वासना वावडे । अधर्मीं सदा २
लेहों नेणें, वाचूं नेणें । सवदासुत घेऊं नेणें
हिशेब-कितेब राखों नेणें । धारणा नाहीं ३
हारवी, सांडी, पाडी, फोडी । विसरे, चुके, नाना खोडी
भल्याचे संगतीची आवडी । कदापी नाहीं ४
दीर्घ सूचना सुचेचि ना । न्याय नीति हे रुचे ना
पर-अभिलाषी वासना । निरंतर ५

जनांसी मैत्री करी ना । कठीण शब्द बोले नाना
मूर्खपणें आवरे ना । कोणी येकासी ६
शब्द सांभाळून बोले ना । आवरितां आवरे ना
कोणीयेकासी मानवेना । बोलणें त्याचें ७
कोणीयेकासी विश्वास नाहीं । कोणीयेकासी सख्य नाहीं
विद्या-वैभव कांहींच नाहीं । उगाचि ताठा ८
'राखावीं बहुतांचीं अंतरें । भाग्य येतें तदनंतरें'
ऐसीं हें विवेकाचीं उत्तरें । ऐकणार नाहीं ९
कल्पना करी उदंड कांहीं । प्राप्तव्य तों कांहींच नाहीं
अखंड पडिला संदेहीं । अनुमानाचे १०
झिजल्यावांचून कीर्ति कैंची । मान्यता नव्हे कीं फुकाची
जिकडे तिकडे होते ची ची । अवलक्षणें ११
भल्याची संगति धरी ना । आपणासी शाहाणे करी ना
तो आपला आपण वैरी जाणा । स्वहित नेणें १२
याकारणें अवगुण त्यागावे । उत्तम गुण समजोन घ्यावे
तेणें मनासारिखें फावे । सकळ कांहीं १३

## दुश्चितपण, आळस, निद्रा द. ८-६

आतां असो हें बोलणें । घात होतो दुश्चितपणें
दुश्चितपणाचेनि गुणें । प्रपंच ना परमार्थ १
दुश्चितपणें कार्य नासे । दुश्चितपणें चिंता वसे
दुश्चितपणें स्मरण नसे । क्षण येक पाहतां २
दुश्चितपणें शत्रुजिणें । दुश्चितपणें जन्ममरणें
दुश्चितपणाचेनि गुणें । हानी होये ३
दुश्चितपणें नव्हे निश्चयो । दुश्चितपणें न घडे जयो
दुश्चितपणें होये क्षयो । आपुल्या स्वहिताचा ४
दुश्चितपणें न घडे श्रवण । दुश्चितपणें न घडे विवरण
दुश्चितपणें निरूपण । हातीचें जाये ५
दुश्चित बैसलाचि दिसे । परी असतचि नसे
चंचळ चक्रीं पडिलें असें । मानस तयाचें ६

वेडें पिशाच्च निरंतर । अंध, मुके आणि बधिर
तैसा जाणावा संसार । दुश्चित प्राणियांचा ७
सावध असोन उमजेना । श्रवण असोन ऐके ना
ज्ञान असोन कळे ना । सारासार विचार ८
ऐसा जो दुश्चित आळसी । परलोक कैंचा त्यासी !
जयाचे जीवीं अहर्निशीं । आळस वसे ९
दुश्चितपणापासोनि सुटला । तरी तो सवेंच आळस आला
आळसाहातीं प्राणियांला । उसंतचि नाहीं १०
आळसें राहिला विचार । आळसें बुडाला आचार
आळसें नव्हे पाठांतर । कांहीं केल्या ११
आळसें घडे ना श्रवण । आळसें नव्हे निरूपण
आळसें परमार्थाची खूण । मळीण जाली १२
आळसें नित्यनेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला
आळसें आळस वाढला । असंभाव्य १३
आळसें गेली धारणा धृती । आळसें मळीण जाली वृत्ती
आळसें विवेकाची गती । मंद जाली १४
आळसें निद्रा वाढली । आळसें वासना विस्तारली
आळसें सून्याकार जाली । सद्बुद्धि निश्चयाची १५
दुश्चितपणासवें आळस । आळसें निद्राविलास
निद्राविलासें केवळ नास । आयुष्याचा १६
निद्रा, आळस, दुश्चितपण । हेंचि मूर्खाचें लक्षण
येणेंकरितां निरूपण । उमजेचि ना १७
हें तिन्ही लक्षणें जेथें । विवेक कैंचा असेल तेथें !
अज्ञानास यापरतें । सुखचि नाहीं १८

**आतां सांगतों उत्तम गुण ।** **द. २-२**

अति-वाद करूं नये । पोटीं कपट धरूं नये
शोधिल्यावीण करूं नये । कुळहीन कांता १
विचारेंवीण बोलों नये । विवंचनेवीण चालों नये
मर्यादेवीण हालों नये । कांहीं येक २

जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ३
निंदा-द्वेष करूं नये । असत्संग धरूं नये
द्रव्य-दारा हरूं नये । बळात्कारें ४
वक्तयास खोडूं नये । ऐक्यतेसी फोडूं नये
विद्याभ्यास सोडूं नये । कांहीं केल्या ५
तोंडाळासीं भांडों नये । वाचाळासीं तंडों नये
संतसंग खंडों नये । अंतर्यामीं ६
अतिक्रोध करूं नये । जीवलगांस खेदूं नये
मनीं वीट मानूं नये । सिकवणेचा ७
क्षणाक्षणा रुसों नये । लटिका पुरुषार्थ बोलों नये
केल्यावीण सांगों नये । आपला पराक्रम ८
बोलिला बोल विसरूं नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये
केल्यावीण निखंदूं नये । पुढिलांसी कदां ९
आळसें सुख मानूं नये । चहाडी मनाशीं आणूं नये
शोधिल्यावीण करूं नये । कार्य कांहीं १०
सुखा अंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सांडों नये
कष्ट करतां त्रासों नये । निरंतर ११
बहुत चिंता करूं नये । निसुगपणें राहों नये
परस्त्रीतें पाहों नये । पापबुद्धीं १२
कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखो नये
परपीडा करूं नये । विश्वासघात १३
व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये
आपलें वोझें घालूं नये । कोणीयेकासी १४
चहाडी चोरी करूं नये । परद्वार करूं नये
मागें उणे बोलों नये । कोणीयेकाचे १५
अल्पधनें माजों नये । हरिभक्तीसी लाजों नये
मर्यादेवीण चालों नये । पवित्र जनीं १६

स्नान-संध्या सांडूं नये । कुळाचार खंडों नये
अनाचार मांडूं नये । चुकारपणें १७
हरिकथा सांडूं नये । निरूपण तोडूं नये
परमार्थास मोडूं नये । प्रपंचबळें १८
सभा देखोनि गळों नये । समयीं उत्तर टळों नये
धिःकारतां चळों नये । धारिष्ट आपुलें १९
सत्यमार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा २०
अपकीर्ती ते सांडावी ! सत्कीर्ति वाढवावी
विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची २१

## ऐका सद्विद्येचीं लक्षणें द. २-८

सद्विद्येचा जो पुरुष । तो उत्तम लक्षणीं विशेष
त्याचे गुण ऐकतां संतोष । परम वाटे १
भाविक, सात्त्विक, प्रेमळ । शांति-क्षमा-दया-शीळ
लीन, तत्पर, केवळ । अमृतवचनी २
परम सुंदर आणि चतुर । परम सबळ आणि धीर
परम संपन्न आणि उदार । अतिशयेंसी ३
परम ज्ञाता आणि भक्त । महापंडित आणि विरक्त
महातपस्वी आणि शांत । अतिशयेंसी ४
वक्ता आणि नैराश्यता । सर्वज्ञ आणि सादरता
श्रेष्ठ आणि नम्रता । सर्वत्रांसी ५
राजा आणि धार्मिक । शूर आणि विवेक
तारुण्य आणि नेमक । अतिशयेंसी ६
साधु, पवित्र, पुण्यशीळ । अंतरशुद्ध, धर्मात्मा कृपाळ
कर्मनिष्ठ, स्वधर्में निर्मळ । निर्लोभ, अनुतापी ७
मित्रपणें परहितकारी । वाङ्माधुर्यें परशोकहारी
सामर्थ्यपणें वेषधारी । पुरुषार्थें जगमित्र ८
वेत्रादरहित संवादी । संगरहित निरुपाधी
दुराशारहित अक्रोधी । निर्दोष, निर्मत्सरी ९

सुखरूप, संतोषरूप । आनंदरूप, हास्यरूप
ऐक्यरूप, आत्मरूप । सर्वत्रांसी १०
यशवंत, कीर्तिवंत । शक्तिवंत, सामर्थ्यवंत
वीर्यवंत, वरदवंत । सत्यवंत, सुकृती ११
युक्तिवंत, गुणवंत, वरिष्ठ । बुद्धिवंत, बहुधारिष्ट
दीक्षावंत, सदासंतुष्ट । निःस्पृह, वीतरागी १२
असो ऐसे उत्तम गुण । हें सद्विद्येचें लक्षण
अभ्यासाया, निरूपण । अल्पमात्र बोलिलें १३
ऐसी हे सद्विद्या बरवी । सर्वत्रांपासी असावी
परी विरक्त पुरुषें अभ्यासावी । अगत्यरूप १४
रूप, लावण्य अभ्यासितां नये । सहज गुणांस न चले उपाये
कांहींतरी धरावी सोये । अगांतुक गुणांची १५

## उत्तम संगती धरावी द. १७-७

आत्मा आत्मपणें असतो । देहसंगें विकारतो
स्वाभिमानें भरीं भरतो । भलतीकडे १
आठरा भार वनस्पती । गुण सांगावे ते किती ?
नाना देहाचे संगती । आत्मयास होते २
त्यामधें कोणी भले । ते संतसंगें निघाले
देहाभिमान सांडून गेले । विवेकबळें ३
जो आपला आपण घातकी । तो आत्महत्यारा पातकी
याकारणें विवेकी । धन्य ते साधू ४
उत्तम संगती धरावी । आपली आपण चिंता करावी
अंतरीं बरी विवरावी । बुद्धि जाणत्याची ५
जाणता देवाचा अंश । नेणता म्हणजे तो राक्षस
यामधें जें विशेष । तें जाणोन घ्यावें ६
साक्षेपी शहाण्याची संगतीं । तेणें साक्षेपी शहाणे होती
आळसी मूर्खाची संगतीं । आळसी मूर्ख ७
शाहाणा यत्न त्याच्या गुणें । पाहों जातां काय उणे
सुख संतोष भोगणें । नाना श्लाघ्यता ८

देह जैसें केलें तैसें होतें । यत्न केल्या कार्य होतें
तरी मग कष्टावें तें । काय निमित्त ? ९

## लेखनक्रिया द. १९-१

ब्राह्मणें बाळबोध अक्षर । घडसून करावें सुंदर
जें देखतांचि चतुर । समाधान पावती १
वाटोळें, सरळें, मोकळें । वोतलें मसीचें काळें
कुळकुळीत ओळी चालिल्या ढाळें । मुक्तमाळा जैशा २
अक्षरमात्र तितुकें नीट । नेमस्त पैस, काने नीट
आडव्या मात्रा त्याही नीट । अर्कुली वेलांट्या ३
पहिलें अक्षर जें काढिलें । ग्रंथ संपेतों पाहात गेले
येका टाकेंचि लिहिलें । ऐसें वाटे ४
अक्षराचें काळेपण । टांकाचें ठोसरपण
तैसेंचि वळण वाकण । सारिखेंचि ५
ओळीस ओळ लागे ना । अर्कुली मात्रा भेदी ना
खालील ओळीस स्पर्शे ना । अथवा लंबाक्षर ६
ज्याचें वय आहे नूतन । त्यानें ल्याहावें जपोन
जनासी पडे मोहन । ऐसें करावें ७

## निंद्य सोडून द्यावें । वंद्य तें हृदयीं धरावें द. १३-१०

देव, दानव, मानव । नीच योनी, हीन जीव
पापी-सुकृती-अभिप्राव । उदंड आहे १
येकांशें जग चाले । परी सामर्थ्य वेगळालें
येकासंगें मुक्त केले । येकासंगें रवरव २
साकर-माती पृथ्वी होये । परी ते माती खातां नये
गरळ आप नव्हे काये ? । परी तें खोटें ३
पुण्यात्मा आणि पापात्मा । दोहींकडे अंतरात्मा
साधू-भोंदू-सीमा । सांडूच नये ४
मनुष्य आणि गधडे । राजहंस आणि कोंबडे
राजे आणि माकडें । येक कैसीं ? ५

भागीरथीचे जल आप । मोरी-संवदणी तेंहि आप
कुश्चिळ उदक अल्प । सेववे ना ६

याकारणें आचारशुद्ध । त्याउपरी विचारशुद्ध
वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ७

जीवनाचेंच जालें अन्न । अन्नाचें जालें वमन
परी वमनाचें भोजन । करतां नये ८

तैसें निंद्य सोडून द्यावें । वंद्य तें हृदयीं धरावें
सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ९

**करंटेपण टाकून भाग्यशाली व्हावें** **द. ११-२**

लहानथोर काम नाहीं । केल्यावेगळें होत नाहीं
करंट्या ! सावध पाही । सदैव होसी १

अंतरीं नाहीं सावधानता । यत्न ठाके ना पुरता
सुखसंतोषाची वार्ता । तेथ कैंची ? २

म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ३

प्रातःकाळीं उठत जावें । 'प्रातःस्मरामि' करावें
नित्यनेमें स्मरावें । पाठांतर ४

मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट
बाष्कळपणाची वटवट । करूंच नये ५

सुंदर अक्षर लिहावें । स्पष्ट नेमस्त वाचावें
विवरविवरों जाणावें । अर्थांतर ६

नेमस्त नेटकें पुसावें । विषद करून सांगावें
प्रत्ययेंवीण बोलावें । हेंचि पाप ७

सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी
जनांस माने ऐसी करावी । क्रियासिद्धी ८

आलिपाचें समाधान । हरिकथा, निरूपण
सर्वदा प्रसंग पाहोन । वर्तत जावें ९

बहुतांचें समाधान राखावें । बहुतांस मानेल तें बोलावें
विलग पडों नेदावें । कथेमधें १०

लोकांस उदंड वाजी आणूं नये । लोकांचें उकलावें हृदय
तरी मग स्वभावें होय । नामघोष ११

भक्ति, ज्ञान, वैराग्य, योग । नाना साधनांचे प्रयोग
जेणें तुटे भवरोग । मननमात्रें १२

जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें
मग महंतलीळा स्वभावें । आंगीं बाणे १३

युक्तीवीण साजिरा योग । तो दुराशेचा रोग
संगतीच्या लोकांचा भोग । उभा ठेला १४

ऐसें न करावें सर्वथा । जनास पाववूं नये व्यथा
हृदयीं चिंतावें समर्था । रघुनाथजीशी १५

उदासवृत्तीस मानवे जन । विशेष कथा-निरूपण
रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी १६

घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहून जाड
तेथें कैंचे आणिलें द्वाड । करंटपण ? १७

## भिक्षेऐसें नाहीं वैराग्य — द. १४-२

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागीतली पाहिजे भीक्षा
' ॐ भवति ' या पक्षा । रक्षिलें पाहिजे १

भिक्षा मागून जो जेविला । तो निराहारी बोलिला
प्रतिग्रहावेगळा जाला । भिक्षा मागतां २

भिक्षाहारी निराहारी । भिक्षा नैव प्रतिग्रहः
असंतो वापि संतो वा । सोमपानं दिने दिने ॥

दत्त गोरक्ष आदि करूनी । सिद्ध भिक्षा मागती जनीं
निस्पृहता भिक्षेपासुनी । प्रगट होय ३

नित्यनूतन हिंडावें । उदंड देशाटन करावें
तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणे ४

अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटे ना परदेश
जिकडे तिकडे स्वदेश । लोकत्रयीं ५
भिक्षेनें वोळखी होती । भिक्षेनें भ्रम चुकती
सामान्य भिक्षा मान्य करिती । सकळ प्राणी ६
भिक्षा म्हणजे निर्भय स्थिती । भिक्षेनें प्रगटे महंती
स्वतंत्रता, ईश्वरप्राप्ती । भिक्षागुणें ७
भिक्षेऐसें नाहीं वैराग्य । वैराग्यापरतें नाहीं भाग्य
वैराग्य नसतां अभाग्य । येकदेशी ८
सुखरूप भिक्षा मागणें । ऐसीं निस्पृहतेचीं लक्षणें
मृदु वाग्विलास करणें । परमसौख्यकारी ९

## सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम — द. १४-७

नाना वेष, नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम
जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी १
देव, ऋषि, मुनि, योगी । नाना तापसी वीतरागी
पितृआदीकरून विभागी । अतीत–अभ्यागत २
गृहस्थाश्रमीं निर्माण जाले । आपला आश्रम टाकून गेले
परंतु गृहस्थागृहीं हिंडों लागले । कीर्तिरूपें ३
याकारणें गृहस्थाश्रम । सकळांमध्यें उत्तमोत्तम
परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया ४
जेथें षड्कर्मे चालती । विध्युक्त क्रिया आचरती
वाग्माधुर्यें बोलती । प्राणीमात्रांसी ५
सर्व प्रकारें नेमक । शास्त्रोक्त करणें कांहीं येक
त्याहीमध्यें अलोलिक । तो हा भक्तिमार्ग ६

## प्रपंच-परमार्थ दोन्ही करावी — द. ११-३

बहुतां जन्मांचा शेवट । नरदेह सांपडे अवचट
येथें वर्तावें चोखट । नीतिन्यायें १
प्रपंच करावा नेमक । पाहावा परमार्थ-विवेक
जेणेंकरतां उभय लोक । संतुष्ट होती २

शत वरुषें वय नेमिलें । त्यांत बालपण नेणतां गेलें
तारुण्य अवघें वेंचलें । विषयांकडे ३
वृद्धपणीं नाना रोग । भोगणें लागे कर्मभोग
आतां भगवंताचा योग । कोणे वेळे ? ४
तरी आतां ऐसें न करावें । बहुत विवेकें वर्तावें
इहलोक-परत्र साधावें । दोहींकडे ५
साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढें सुरवाडती
खाती, जेविती, सुखी होती । यत्नें करूनी ६
आळस, उदास नागवणा । आळस, प्रयत्न-बुडवणा
आळसें करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ७
म्हणोनि आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा
अरत्रीं-परत्रीं जीवा । समाधान ८
प्रयत्न करावा तो कोण । हेंचि ऐका निरूपण
सावध करून अंतःकरण । निमिष येक ९

### प्रपंच-परमार्थ सावधपणें चालवावा द. १२-१

आधीं प्रपंच करावा नेटका । मग ध्यावें परमार्थविवेका
येथें आळस करूं नका । विवेकी हो १
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल
प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी २
प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळे ना खायाला
मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ? ३
प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ४
म्हणोनि सावधानपणें । प्रपंच-परमार्थ चालवणें
ऐसें न करतां, भोगणें । नाना दुःखें ५

### प्रापंचिकाची दिनचर्या द. ११-३

प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें
यथानुशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी १

मुखमार्जन, प्रातःस्नान । संध्यातर्पण, देवतार्चन
पुढें वैश्वदेव-उपासन । यथासांग २
कांहीं फलाहार घ्यावा । मग संसारधंदा करावा
सुशब्दें राजी राखावा ! सकळ लोक ३
ज्याचा ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबर्दार
दुश्चितपणें तरी पोर । वेढा लावी ४
चुके, ठके, विसरे, सांडी । आठवण जालिया चर्फडी
दुश्चित–आळसाची रोकडी । प्रचीत पहा ५
याकारणें सावधान । सदा येकाग्र असावें मन
तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ६
पुढें, भोजन जालियावरी । कांहीं वाची, चर्चा करी
येकांतीं जाऊन विवरी । नाना ग्रंथ ७
तरीच प्राणी शहाणा होतो । नाहींतरी मूर्खचि राहातो
लोक खाती, आपण पाहातो । दैन्यवाणा ! ८
ऐक सदैवपणाचें लक्षण । रिकामा जाऊं नेदी येक क्षण
प्रपंच-व्यवसायाचें ज्ञान । बरें पाहे ९
कांहीं मेळवी, मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी
शरीर कारणीं लावी । कांहींतरी १०
कांहीं धर्मचर्चा, पुराण । हरिकथा, निरूपण
वायां जाऊं नेदी क्षण । दोहींकडे ११
ऐसा जो ‘ सर्वसावध ’ । त्यास कैंचा असेल खेद
विवेकें तुटला संबंध । देहबुद्धीचा १२
‘ आहे तितुकें देवाचें ’ । ऐसें वर्तणें निश्चयाचें
मूळ तुटे उद्वेगाचें । येणे रीतीं १३
प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचीकरण
महावाक्याचें विवरण । करितां सुटे १४
कर्म, उपासना आणि ज्ञान । येणें राहे समाधान
परमार्थाचें जें साधन । तेंचि ऐकत जावें १५

● ●

# ३. लोकसंग्रह–अंतरात्म्याची उपासना

**सकळांचें अंतःकरण एकच** द. १०-१

अंतःकरण म्हणजे 'जाणीव'। जाणीव, जाणतां स्वभाव
देहरक्षणाचा उपाव। जाणती कळा १
सर्प जाणोन डंखूं आला। प्राणी जाणोन पळाला
दोहींकडे जाणीवेला। बरें पहा २
दोन्हींकडे जाणीवेसी पाहिलें। तरी अंतःकरण येकचि जालें
विचारितां प्रत्यया आलें। जाणीव-रूपें ३
जाणीवरूपें अंतःकरण। सकळांचें येक, हें प्रमाण
जीवमात्रांस जाणपण। येकचि असे ४
पशु, पक्षी, किडा, मुंगी। जीवमात्र निर्माण जगीं
जाणीव-कळा सर्वांलागी। येकचि आहे ५
सर्वांस जळ तें सीतळ। सर्वांस अग्नि तेजाळ
सर्वांस अंतःकरण केवळ। जाणती कळा ६
सर्वांचें अंतःकरण येक। ऐसा निश्चयो निश्चयात्मक
जाण तयाचें कौतुक। चहूंकडे ७
जाणीव म्हणजे अंतःकरण। अंतःकरण विष्णूचा अंश जाण
विष्णु करितो पाळण। येणें प्रकारें ८

**अंतरात्मा–१** द. १०-१०

आत्मा, जगज्जोती, सर्वज्ञपण। तिनी मिळोनि येकचि जाण
अंतःकरणचि प्रमाण। ज्ञतिमात्र १
सकळ चाळितां येक। अंतरात्मा वर्तवी अनेक
मुंगीपासून ब्रह्मादिक। तेणेंचि चालती २
तो कळतो परी दिसे ना। प्रचीत येते परी भासे ना
शरीरीं असे परी बसे ना। येके ठाईं ३

तीक्ष्णपणें गगनीं भरे । सरोवर देखतांच पसरे
पदार्थ लक्षून उरे । चहूंकडे ४
जैसा पदार्थ दृष्टीस दिसतो । तो त्यासारिखाच होतो
वायोहूनि विशेष तो । चंचल विषईं ५
ऐशा जाणे अंतर्कळा । सकळांमधें परी निराळा
पाहातां त्याची अगाध लीळा । तोचि जाणे ६
तो चालवी सकळ देहासी । 'करून अकर्ता' म्हणती त्यासी
तो क्षेत्रज्ञ क्षेत्रवासी । देहीं कूटस्थ बोलिजे ७

### अंतरात्मा–२ द. ११-८

आधीं वंदू सकळ कर्ता । समस्त देवांचा जो भर्ता
त्याचे भजनीं प्रवर्ता । कोणीतरी १
तेणेंवीण कार्य न चले । पडिलें पर्ण तेंहि न हाले
अवघें त्रैलोक्यचि चाले । जयाचेनी २
तो 'अंतरात्मा' सकळांचा । देव-दानव-मानवांचा
चत्वारखाणी-चत्वारवाणींचा । प्रवर्तक ३
तो येकलाचि सकळां घटीं । करी भिन्न भिन्न राहाटी
सकळ सृष्टीची गोष्टी । किती म्हणोनि सांगावी ? ४
ऐसा जो गुप्तेश्वर । त्यास म्हणावें ईश्वर
सकळ ऐश्वर्य थोरथोर । जयाचेनि भोगिती ५
ऐसा जेणें वोळखिला । तो विश्वंभरचि जाला
समाधी-सहजस्थितीला । कोण पुसे ? ६
पाहातां ऐसा कोण आहे । तो 'अंतरात्मा' विवरोन पाहे
अल्पस्वल्प कळोन राहे । समाधान ७
अरे, हें पाहिलेंचि पाहावें । विवरलेंचि मागुतें विवरावें
वाचिलेंचि वाचावें । पुन्हापुन्हा ८
अंतरात्मा केवढा ? कैसा ? । पाहाणाराची कोण दशा ?
देखिल्या-ऐकिल्या ऐसा । विवेक सांगे ९

## सकळ देवांचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ द. १८-१

सकळ देवांचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ
भूमंडळीं भोग सकळ । त्यासीच घडे १
नाना देव होऊन बैसला । नाना शक्तिरूपें जाला
भोक्ता सकळ वैभवाला । तोचि येक २
कीर्ति आणि अपकीर्ति । उदंड निंदा, उदंड स्थिती
सर्वत्रांची भोगप्राप्ती । अंतरात्म्यासीच घडे ३
कोण देहीं काय करितो । कोण देहीं काय भोगितो
भोगी-त्यागी-वीतरागी तो । येकचि आत्मा ४
प्राणी साभिमानें भुलले । देहाकडे पाहात गेले
मुख्य अंतरात्म्यास चुकले । अंतरीं असोनी ५
अरे, या आत्मयाची चळवळ पाहे । ऐसा भूमंडळीं कोण आहे ?
अगाध पुण्यें अनुसंधान राहे । कांहीं येक ६
त्या अनुसंधानासरिसें । जळोनी जाइजे किल्मिषें
अंतरनिष्ठ ज्ञानी ऐसे । विवरोन पाहाती ७
अंतरनिष्ठ तितुके तरले । अंतरभ्रष्ट तितुके बुडाले
बाह्यात्कारें भरंगळले । लोकाचारें ८

## सर्वज्ञ अंतरात्म्याची सदैव संगति राखावी द. १८-२

जाणता येक अंतरात्मा । त्याचा काय सांगावा महिमा !
विद्याकळा–गुण–सीमा । कोणें करावी ? १
परमेश्वराचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद
तेणें करतां आनंद । उदंड होतो २
परमेश्वरें निर्मिलें तें । अखंड दृष्टीस पडतें
विवर विवरों समजावें तें । विवेकी जनीं ३
जितुकें कांहीं निर्माण जालें । तितुकें जगदीश्वरें निर्मिलें
निर्माण वेगळें केलें । पाहिजे आधीं ४

जो निर्माण करितो जना । परी पाहों जातां दिसे ना
विवेकबळें अनुमाना । जाणीत जावा ५
त्याचें अखड लागतां ध्यान । कृपाळूपणें देतो अशन
सर्वकाळ संभाषण । तदंशेंचि करावें ६
ध्यान धरी ना तो अभक्त । ध्यान धरील तो 'भक्त'
संसारापासून मुक्त । भक्तांसि करी ७
उपासनेचे सेवटीं । देवां–भक्तां अखंड भेटी
अनुभवी जाणेल गोष्टी । प्रत्ययाची ८

## आत्माराम उपासनेचा मोठा आश्रयो द. १६-१०

अगाध गुण भगवन्ताचे । शेष वर्णू न शके वाचे
वेदविधि तेहि काचे । देवेवीण १
आत्माराम सकळां पाळी । अवघे त्रैलोक्य सांभाळी
तया येकेवीण धुळी । होय सर्वत्रांची २
जेथें आत्माराम नाहीं । तेथें उरो न शके कांहीं
त्रैलोकीचे प्राणी सर्वही । प्रेतरूपी ३
आत्मा नसतां येती मरणें । आत्म्यावीण कैंचें जिणें ?
बरा विवेक समजणें । अंतर्यामीं ४
समजणें जें विवेकाचें । तेंहि आत्म्यावीण कैंचें ?
कोणी येकें जगदीशाचें । भजन करावें ५
उपासना प्रकट जाली । तरी ते विचारणा कळली
याकारणें पाहिजे केली । विचारणा देवाची ६
उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेवीण निराश्रयो
उदंड केले तरी तो जयो । प्राप्त नाहीं ७
समर्थाची नाहीं पाठी । तयास भलताच कुटी
याकारणें उठाउठी । भजन करावें ८
भजन–साधन–अभ्यास । येणें पाविजे परलोकास
दास म्हणे हा विश्वास । धरिला पाहिजे ९

● ●

# ४. लोकोपयोगी विविध गुण-संपादणी

**लोकस्थिति** द. ११-२

नाना मतें निर्माण जालीं । नाना पाषांडें वाढलीं
नाना प्रकारींचीं उठिलीं । नाना बंडें १

जैसा प्रवाह पडिला । तैसाचि लोक चालिला
कोण वारील कोणाला ? । 'येक' नाहीं ! २

पृथ्वीचा जाला गळांठा । येकाहून येक मोठा
कोण खरा, कोण खोटा । कोण जाणे ! ३

आचार बहुकचित पडला । कित्येक पोटासाठीं बुडाला
अवघा वरपंगचि जाला । साभिमानें ४

देव जाले उदंड । देवांचें मांडलें भंड
भूतादेवतांचें थोतांड । येकचि जालें ५

' मुख्य देव ' तो कळे ना । काशास कांहींच मिळे ना
येकास येक वळे ना । अनावर ६

ऐसा नासला विचार । कोण पाहतो सारासार
कैंचा लहान, कैंचा थोर । कळेचि ना ! ७

शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गलबला जाला
लोक कामनेच्या व्रताला । झोंबोन पडती ८

ऐसें अवघें नासलें । सत्यासत्य हारपलें
अवघें ' अ-नायेक ' जालें । चहूंकडे ९

मतामतांचा गल्बला । कोणी पुसेना कोणाला
जो जे मतीं सांपडला । तयास तेंचि थोर १०

असत्याचा अभिमान । तेणें पाविजे पतन
म्हणोनियां ज्ञानी जन । सत्य शोधिती ११

**देशस्थिती :** द. १४-७

**राज्य नेलें म्लेंच्छ-क्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं.**

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे १
कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती
कित्येक तुरुक होती । आपले इच्छेनें २
हें ब्राह्मणास कळे ना । त्याची वृत्तीच वळे ना
मिथ्या अभिमान गळे ना मूर्खपणाचा ३
राज्य नेलें म्लेंच्छ क्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं
आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ! ४
ब्राह्मणास ग्रामणीनें बुडविलें । विष्णूनें श्रीवत्स निरविले
त्याच विष्णूनें शापिलें । परशरामें ५
आम्हीहि तेचि ब्राह्मण । दुःखें बोलिलें हें वचन
वडिल गेले ग्रामणी करून । आम्हां भोंवतें ६

**महाराष्ट्रदेश थोडा उरला** द. १५-२

कित्येक म्लेंछ होऊन गेले । कित्येक फिरंगणांत आटले
देशभाषानें रुंधिले । कितीयेक १
महाराष्ट्रदेश थोडा उरला । राजकारणें लोक रुधिला
अवकाश नाहीं जेवायाला । उदंड कामें २
कित्येक युद्धप्रसंगीं गुंतले । तेणें गुणें उन्मत्त जाले
रात्रंदिवस करूं लागले । युद्धचर्चा ३
उदम्यास व्यासंग लागला । अवकाश नाहींसा जाला
अवघा पोटधंदाच लागला । निरंतर ४
षड्दर्शनें–नाना मतें । पाषांडें वाढलीं बहुतें
पृथ्वीमध्यें जेथें तेथें । उपदेशिती ५
स्मार्तीं आणि वैष्णवीं । उरलींसुरलीं नेलीं आघवीं
ऐसी पाहातां गोवी । उदंड जाली ६

कित्येक कामनेचे भक्त । ठायीं ठायीं जाले आसक्त
युक्त अथवा अयुक्त । पाहातो कोण ? ७

या गल्बल्यामध्यें गल्बला । कोणी कोणी वाढविला
त्यास देखो शकैनासा जाला । वैदिक लोक ८

त्याहीमध्यें हरिकीर्तन । तेथें बोढले कित्येक जन
प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान । कोण पाहे ? ९

## दीर्घसूचना असावी द. १२-१

पर्णाळी पाहोन उचले । जीवसृष्टि विवेकें चाले
आणि पुरुष होऊन भ्रमले । यासी काय म्हणावें ! १

म्हणोनि असावी दीर्घसूचना । अखंड करावी चाळणा
पुढील होणार अनुमाना । आणून सोडावें २

सुखी असतो खबर्दार । दुःखी होतो बेखबर
ऐसा हा लौकिक विचार । दिसतचि आहे ३

म्हणोनि सर्व सावधान । धन्य तयाचें महिमान
जनीं राखे समाधान । तोचि येक ४

चाळणेचा आळस केला । तरी अवचिता पडेल घाला
ते वेळे सावरायाला । अवकाश कैंचा ! ५

म्हणोनि दीर्घसूचनेचे लोक । त्यांचा पाहावा विवेक
लोकांकरितां लोक । शाहाणे होती ६

परी ते शाहाणे वोळखावे । गुणवंतांचे गुण घ्यावे
अवगुण देखोन सांडावे । जनामधें ७

## लोकांत बरेंपण राखावें द. १२-२

अचूक येत्न करवे ना । म्हणोनि केलें तें सजे ना
आपला अवगुण जाणवे ना । कांहीं केल्या १

जो आपला आपण नेणें । तो दुसऱ्याचें काय जाणें ?
न्याय सांडितां दैन्यवाणे । होती लोक २

लोकांचें मनोगत कळे ना । लोकांसारिखें वर्तवे ना
मूर्खपणें लोकीं नाना । कलह उठती ३

ऐसी नव्हे वर्तणूक । परीक्षावे नाना लोक
समजलें पाहिजे नेमक । ज्याचें त्यापरी ४

बोलतो खरें, चालतो खरें । त्यास मानिती लहानथोरें
न्याय-अन्याय परस्परें । सहजचि कळे ५

जोंवरी चंदन झिजे ना । तोंवरी सुगंध कळेना
चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ६

जंव उत्तम गुण न कळे । तों या जनांस काय कळे ?
उत्तम गुण देखतां, निवळे । जगदांतर ७

जगदांतर निवळत गेलें । जगदांतरीं सख्य जालें
मग जाणावें वोळलें । विश्वजन ८

जनीं जनार्दन वोळला । तरी काय उणें तयाला
राजी राखावें सकळांला । कठीण आहे ९

लौकिकीं बरेपण केलें । तेणें सौख्य वाढलें
उत्तरासारिखें आलें । प्रत्योत्तर १०

हें आवघें आपणांपासीं । तेथें बोल नाहीं जनांसी
सिकवावें आपल्या मनासी । क्षणक्षणा ११

थोर-लहान समान । आपले-पारिखे सकळ जन
चढतें-वाढतें संनेधान । करितां बरें १२

हरिकथा, निरूपण । बरेपणें राजकारण
प्रसंग पाहिल्यावीण । सकळ खोटें १३

**वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक** **द. १३-१०**

सांडा अवघें करंटपण । धरावें उत्तम लक्षण
हरिकथा, पुराण श्रवण । नीतिन्यायें १

वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक
हळुहळू पुण्यश्लोक । करीत जावें २

मुलाच्या चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें
तैसें जनास सिकवावें । हळूहळू ३
मुख्य मनोगत राखणें । हेचि चातुर्याचीं लक्षणें
चतुर तो चतुरास जाणे । इतर तीं वेडीं ४
वेड्यास वेडे म्हणों नये । वर्म कदापी बोलों नये
तरीच घडे दिग्विजय । निस्पृहासी ५
उदंड स्थळीं उदंड प्रसंग । जाणोनि करणें यथासांग
प्राणिमात्रांचा अंतरंग । होऊन जावे ६
मनोगत राखोन जातां । परस्परें होय अवस्था
मनोगत तोडतां, वेवस्था । बरी नाहीं ७
याकारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत
मनोगत राखतां समस्त । वोढोन येती ८

**कवित्वाचीं लक्षणें । बोलिजे तीं** **द. १४-३**

कवित्व, शब्द-सुमन-माळा । अर्थ परिमळ आगळा
तेणें संतषट्पदकुळा । आनंद होय १
ऐसी माळा अंतःकरणीं । गुंफून पूजा रामचरणीं
ॐकारतंतू अखंडपणीं । खंडूंच नये २
परोपकाराकारणें । कवित्व आगत्य करणें
तया कवित्वाचीं लक्षणें । बोलिजे तीं ३
जेणें घडे भगवद्भक्ती । जेणें घडे विरक्ती
ऐसी कवित्वाची युक्ती । आधीं वाढवावी ४
क्रियेवीण शब्दज्ञान । तया न मानिती सज्जन
म्हणोनी देव प्रसन्न । अनुतापें करावा ५
देवाचेनि प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें
तं तं अत्यंत श्लाघ्यवाणें या नांव 'प्रासादिक' ६

**धीट, पाठ, प्रासादिक । हा त्रिविध विवेक** **द. १४-३**

'धीट' म्हणजे धीटपणें केलें । जें जें आपुल्या मनास आलें
बळेंचि कवित्व रचिलें । या नांव 'धीट' बोलिजे १

‘ पाठ ’ म्हणजे पाठांतर । बहुत पाहिलें ग्रंथांतर
तयासारखा उतार । आपणहि केला २

शीघ्रचि कवित्व जोडिलें । दृष्टी पडलें तेंचि वर्णिलें
भक्तीवांचोन जें केलें । त्या नांव ‘ धीट-पाठ ’ ३

कामिक, रसिक, शृंगारिक । वीर, हास्य, प्रास्ताविक
कौतुक, विनोद अनेक । या नांव ‘ धीट-पाठ ’ ४

मन जालें कामाकार । तैसेंचि निघती उद्गार
धीट-पाठें परपार । पाविजेत नाहीं ५

व्हावया उदर-शांती । करणें लागे नरस्तुती
तेथें केली जे व्युत्पत्ती । या नांव ‘ धीट-पाठ ’ ६

**आतां प्रासादिक तें कैसें । सांगिजेल** द. १४-३

वैभव, कांता, कांचन । जयास वाटे हें वमन
अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें १

जयास घडीनें घडी । लागे भगवंतीं आवडी
चढती-वाढती गोडी । भगवद्भजनाची २

जो भगवद्भजनेंवीण । जाऊं नेदी येक क्षण
सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ३

जया अंतरीं भगवंत । अचल राहिला निवांत
तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण ४

भगवंतीं लागलें मन । तेणें नाठवे देहभान
शंका, लज्जा पळोन । दुरी ठेली ५

तो प्रेमरंगें रंगला । तो भक्तिमदें मातला
तेणें अहंभाव घातला । पायातळीं ६

ऐसा भगवंतीं रंगला । आणीक कांहीं नलगे त्याला
स्वइच्छा वर्णूं लागला । ध्यान-कीर्ति-प्रताप ७

असो ऐसा भगवद्भक्त । जो ये संसारीं विरक्त
तयास मानिती मुक्त । साधुजन ८

त्याचे भक्तीचें कौतुक । तया नांव ' प्रासादिक '
सहज बोलतां विवेक । प्रगट होय ९

**ऐका कवित्व लक्षण** द. १४-३

कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें सरळ
कवित्व असावें प्रांजळ । अन्वयाचें १

कवित्व असावें भक्तिबळें । कवित्व असावें अर्थागळें
कवित्व असावें वेगळें । अहंतेसी २

कवित्व असावें सोपें । कवित्व असावें अल्परूप
कवित्व असावें सुलभ । चरण-बंद ३

मृदु, मंजुळ, कोमळ । भव्य, अद्‌भुत, विशाळ
गौल्य, माधुर्य, रसाळ । भक्तिरसें ४

शंका-आशंका, प्रत्योत्तरें । नाना काव्यें शास्त्राधारें
तुटे संशयो निर्धारें । निर्धारितां ५

जेणें अनुताप उपजे । जेणें लौकिक लाजे
जेणें ज्ञान उमजे । या नांव कवित्व ६

जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ती हे मावळे
जेणें भक्तिमार्ग कळे । या नांव कवित्व ७

जेणें देहबुद्धि तुटे । जेणें भवसिंधु आटे
जेणें भगवंत प्रगटे । या नांव कवित्व ८

जेणें सद्‌बुद्धि लागे । जेणें पाषांड भंगे
जेणें विवेक जागे । या नांव कवित्व ९

जेणें होय समाधान । जेणें तुटे संसारबंधन
जया मानिती सज्जन । त्या नांव कवित्व १०

**हरिकथेचें लक्षण । परिसोत आतां** द. १४-५
**हरिकथेचा अधिकारी**

हरिकथा कैसी करावी । रंगें कैसी भरावी
जेणें पाविजे पदवी । रघुनाथकृपेची १

सोनें आणि परिमळें । इक्षुदंडा लागती फळें
गोल्य–माधुर्य–रसाळें । तरी ते अपूर्वता २

तैसा हरिदास आणि विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त
व्युत्पन्न आणि वादरहित । तरी हेहि अपूर्वता ३

रागज्ञानी, ताळज्ञानी । सकळकळा, ब्रह्मज्ञानी
निरभिमानें वर्ते जनीं । तरी हेहि अपूर्वता ४

मत्सर नाहीं जयासी । जो अत्यंत प्रिय सज्जनासी
चतुरंग जाणे मानसीं । अंतरनिष्ठ ५

**परिस लक्षणें आतां । हरिकथेचीं**

सगुण मूर्तीपुढें भावें । करुणाकीर्तन करावें
नाना ध्यानें वर्णावें । प्रतापकीर्तीतें ६

देवाचें वर्णावें वैभव । नाना प्रकारें महत्त्व
सगुणीं ठेवूनियां भाव । हरिकथा करावी ७

लाज सांडूनिया जनाची । आस्था सांडून धनाची
नित्य नवी कीर्तनाची । आवडी धरावी ८

मूर्ति नसतां सगुण । श्रवणीं बैसले साधुजन
तरी अद्वैतनिरूपण । आवश्य करावें ९

नाहीं मूर्ति, नाहीं सज्जन । श्रवणीं बैसले भाविकजन
तरी करावें कीर्तन । प्रास्ताविक वैराग्य १०

मन ठेवून ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी
तोचि ये संसारीं । धन्य जाला ११

**एसी कीर्ति करून जावें । तरीच संसारास यावें** द. १५-२

याकारणें ज्ञान दुर्लभ । पुण्यें घडे अलभ्य लाभ
विचारवंता सुलभ । सकल कांहीं १

त्याहीमध्यें जो तीक्ष्ण । रिकामा जाऊं नेदी क्षण
धूर्त तार्किक, विचक्षण । सकळां माने २

नाना जिनस उदंड पाठ । वदो लागला घडघडाट
अव्हाटचि केली वाट । सामर्थ्यबळें ३

प्रबोधशक्तीचीं अनंत द्वारें । जाणे सकळांचीं अंतरें
निरूपणें तदनंतरें । चटक लागे ४

मतें-मतांतरें सगट । प्रत्यय बोलोन करी सपाट
दंडक सांडून नीट । वेधी जना ५

नेमकें-भेदकें वचनें । अखंड पाहे प्रसंगमान
उदास वृत्तीच्या गुमानें । उठोन जातो ६

प्रत्यय बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकांला
नाना मार्ग सांडून त्याला । शरण येती ७

ठाईं ठाईं भजन लावी । आपण तेथून चुकावी
मत्सर-मतांची गोवी । लागोच नेदी ८

खनाळामध्यें जाऊन राहे । तेथें कोणीच न पाहे
सर्वत्रांची चिंता वाहे । सर्व काळ ९

अवघड स्थळीं कठीण लोक । तेथें राहणें नेमक
सृष्टीमध्यें सकळ लोक । धुंडीत येती १०

तेथें कोणाचें चाले ना । अणुमात्र अनुमाने ना
कट्ट घालून राजकारणा । लोक लावी ११

लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद जाले
भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें १२

ठाईं ठाईं उदंड तावे । मनुष्य मात्र तितुके झोंबे
चहूंकडे उदंड लांबे । परमार्थबुद्धी १३

उपासनेचा गजर । स्थळोस्थळीं थोरथोर
प्रत्ययानें प्राणीमात्र । सोडविले १४

ऐसे कैवाड उदंड जाणें । तेणें लोक होती शाहाणे
जेथें तेथें प्रत्यय बाणे । प्राणीमात्रासी १५

**याकारणें कोणीयेक । शहाणपण सिकावे विवेकें** **दं. १५-३**

विवेकें बहुत पैसावले । म्हणून ‘ अवतारी ’ बोलिले
मनु चक्रवर्ती जाले । येणेंचि न्यायें १

जेथें उदंड जाणीव । तेचि तितुके ‘ सदेव ’
थोडे जाणीवेने निर्देव । होती लोक २

व्याप–आटोप करिती । धके–चपेटे सोसती
तेणें प्राणी सदेव होती । देखतादेखता ३

ऐसें हें आतां वर्ततें । मूर्ख लोकांस कळे ना तें
विवेकी मनुष्य समजतें । सकळ कांहीं ४

थोर–लहान बुद्धीपासी । सगट कळे ना लोकांसी
आधी उपजलें तयासी । थोर म्हणती ! ५

गुणेंवीण वडीलपण । हें तों अवघेंचि अप्रमाण
त्याची प्रचीत-प्रमाण । थोरपणीं ६

याकारणें कोणीयेक । शहाणपण सिकावें विवेकें
विवेक न सिकता तुके । तुटोनि जाती ७

तुक तुटलें म्हणजे गेले । जन्मा येऊन काय केलें ?
बळेंचि सांदीस घातलें । आपणासी ! ८

ऐसें कोणीयेकें न करावें । सर्व सार्थकचि करावें
कळे ना तरी विवरावें । ग्रंथांतरीं ९

शहाण्यास कोणीतरी वाहती । मूर्खास लोक दवडून देती
जीवास आवडे संपत्ती । तरी शहाणे व्हावें १०

अहो ! या शहाणपणाकारणें । बहुतांचे कष्ट करणें
परंतु शहाणपण शिकणें । हें उत्तमोत्तम ११

जो बहुतांस मानला । तो जाणावा शहाणा जाला
जनीं शहाण्या मनुष्याला । काय उणें ? १२

आपलें हित न करी लोकिकीं । तो जाणावा आत्मघातकी
मूर्खायेवढा पातकी । आणिक नाहीं ! १३

आपण संसारीं कष्टतो । लोकांकरवीं रागेजोन घेतो
जनांमध्यें शहाणा तो । ऐसें न करी १४

**नारायण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी** द. १५-९

मुळ्या चालिल्या पाताळीं । अग्रें धावतीं अंतराळीं
नाना पत्रीं, पुष्पीं, फळीं । लिगडलीं झाडें १

फळांवडील सुमनें । सुमनावडील पानें
पानावडील अनुसंधानें । काष्टें अवघीं २

काष्ठावडील मुळ्या बारिक । मुळ्यांवडील तें उदक
उदक आळोन कौतुक । भूमंडळाचें ३

याची ऐसी आहे प्रचीती । तेव्हां सकळावडील जगती
जगतीवडील मूर्ती । आपोनारायणाची ४

तयावडील अग्निदेव । अग्नीवडील वायोदेव
वायोदेवावडील स्वभाव । अंतरात्म्याचा ५

सकळावडील अंतरात्मा । त्यासी नेणे, तो ‘ दुरात्मा ’
दुरात्मा म्हणजे दूरी आत्मा । अंतरला तया ६

म्हणोनि सकळावडील देव । त्यासी होता अनन्यभाव
मग हे प्रकृतीचा स्वभाव । पालटों लागे ७

करी आपुला व्यासंग । कदापी नव्हे ध्यानभंग
बोलणें-चालणें व्यंग । पडोंच नेदी ८

तो वडील जेथ चेतला । तोची भाग्यपुरुष जाला
अल्पचेतनें तयाला । अल्पलाभ ९

तया नारायणास मनीं । अखंड आठवावें ध्यानीं
मग ते लक्ष्मी तयापासुनी । जाईल कोठें ? १०

नारायण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी
याकारणें तोषवावी । कोणीतरी काया ११

उपासना शोधून पाहिली । तों ते विश्वपाळिती जाली
न कळे लीला परीक्षिली । न वचे कोणा १२

देवाची लीला देवेंवीण । आणिक दुसरा पाहे कोण ?
पाहणें तितुकें आपण । देवचि असे १३
उपासना सकळा ठाईं । आत्माराम कोठें नाहीं ?
याकारणें ठाईं ठाईं । रामें आटोपिलें १४
ऐसी माझी उपासना । आणितां नये अनुमाना
नेऊन घाली निरंजना- । पैलीकडे १५

**न पाहातां उत्तम विवेक । अवघा होतो अविवेक** द. १८-२

दुर्लभ शरीर दुर्लभ आयुष्य । याचा करूं नये नास
दास म्हणे सावकास । विवेक पाहावा १
न पाहातां उत्तम विवेक । अवघा होतो अविवेक
अविवेकें प्राणी रंक । ऐसा दिसे २
हें आपलें आपण केलें । आळसें उदास वागविलें
वाईट संगतीनें बुडविलें । देखत देखतां ३
मूर्खपणाचा अभ्यास जाला । बाष्कळपणें घातला घाला
काम-चांडाळ उठला । तरुणपणीं ४
मूर्ख आळसी आणि तरुण । सर्वांविषीं दैन्यवाणा
कांहीं मिळे ना कोणा । काय म्हणावें ! ५
जें जें पाहिजे तें तें नाहीं । अन्न-वस्त्र तेंही नाहीं
उत्तम गुण कांहींच नाहीं । अंतर्यामीं ६
बोलतां ये ना, बैसतां ये ना । प्रसंग कांहींच कळे ना
शरीर-मन हें वळे ना । अभ्यासाकडे ७
लिहिणें नाहीं, वाचणें नाहीं । पुसणें नाहीं, सांगणें नाहीं
नेमस्तपणाचा अभ्यास नाहीं । बाष्कळपणें ८
आपणास कांहींच ये ना । आणि सिकवलेंहि माने ना
आपण वेडा, आणि सज्जना । बोल ठेवी ९

**कष्ट-दीर्घसूचना- विवेक-विचार** द. १८-७

कष्टेंवीण फळ नाहीं । कष्टेंवीण राज्य नाहीं
केल्यावीण होत नाहीं । साध्य जनीं १

आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें
कष्टाकडे चुकवि ते । हीन जन २

आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते सुखाचें फळ भोगिती
आधीं आळसें सुखावती । त्यांसी पुढें दुःख ३

इहलोक अथवा परलोक । दोहोंकडे सारखाच विवेक
दीर्घसूचनेचें कौतुक । कळलें पाहिजे ४

मेळविती तितुकें भक्षिती । ते कठीण काळीं मरोन जाती
दीर्घसूचनेनें वर्तती । तेचि भले ५

इहलोकींचा संचितार्थ । परलोकींचा परमार्थ
संचितेंवीण व्यर्थ । जीत मेले ! ६

विवेकाचा लाभ घडे । जेणें परमात्मा ठाईं पडे
विवेक पाहातां सांपडे । विवेकी जनीं ७

जिहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ८

विचारें इहलोक परलोक । विचारें होतसे सार्थक
विचारें नित्यानित्यविवेक । पाहिला पाहिजे ९

**अनकूळ पडेल तैसी । वर्तणूक करावी** द. १९-७

कथेचें घमंड भरून द्यावें । निरूपणीं विवरावें
उणें पडों नेदावें । कोणी येकाविषीं १

थोडें बोलोन समाधान करणें । रागेजोन तरी मन धरणें
मनुष्य वेधींच लावणें । कोणी येक २

कोण कोण राजी राखिले । कोण कोण मनीं भंगले
क्षणक्षणा परीक्षले । पाहिजे लोक ३

जिकडे तिकडे कीर्ती माजे । सगट लोकांस हव्यास उपजे
लोक राजी राखोन कीजे । सकळ कांहीं ४

परलोकीं वास करावा । समुदाव उगाच पाहावा
मागण्याचा तगादा न लावावा । कांहीं येक ५

जिकडे जग तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक
रात्रंदिवस विवेकी लोक । सांभाळीत जाती ६
अभ्यासें प्रगट व्हावें । नाहीं तरी झांकोन असावें
प्रगट होऊन नासावें । हें बरें नव्हे ७
मंद हळूहळू चालतो । चपळ कैसा आटोपतो ?
अरबी फिरवणार तो ! कैसा असावा ८
हीं धकाधकीचीं कामें । तीक्ष्ण बुद्धीचीं वर्में
भोळ्या भावार्थें, संभ्रमें । कैसें घडे ? ९
जरी चढतीवाढती आवडी उठे । तरी परमार्थ प्रगटे
घसघस करितां विटे । सगट लोकू १०
आतां हें आपणाचि पासी । बरें विचारावें आपणासी
अनुकूळ पडेल तैसी । वर्तणूक करावी ११

## परिभ्रमणें कळे कौतुक द. १९-८

सृष्टीमध्ये बहु लोक । परिभ्रमणें कळे कौतुक
नाना प्रकारींचे विवेक । आडळो लागती १
किती प्रपंची जन । अखंड वृत्ती उदासीन
सुखदुःखें समाधान । दंडळे ना २
स्वभावेंचि नेमक बोलती । सहजचि नेमक चालती
अपूर्व बोलण्याची स्थिती । सकळांसि माने ३
सहजचि तालज्ञान येतें । स्वभावेंचि रागज्ञान उमटतें
सहजचि कळत जातें । न्यायनीति लक्षण ४
येखादा आडळे गाजी । सकळ लोक अखंड राजी
सदासर्वदा आवडी ताजी । प्राणीमात्रांची ५
चुकोन उदंड आडळतें । भारी मनुष्य दृष्टीस पडतें
महंताचें लक्षणसें वाटतें । अकस्मात ६
ऐसा आडळतां लोक । चमत्कारें गुणग्राहिक
क्रिया, बोलणें नेमक । प्रत्ययाचें ७

# ५. लोकसंग्रह–राजकारण

## ऐका विरक्ताचीं लक्षणें ( विरक्त पुरुष ) द. २-९

हे लक्षणें श्रवण कीजे । आणि सुद्दढ जीवीं धरिजे
तरी मग विख्यात होइजे । भूमंडळीं १

विरक्तें विवेकें असावें । विरक्तें अध्यात्म वाढवावें
विरक्तें धारिष्ट धरावें । दमन विषईं २

विरक्तें राखावें साधन । विरक्तें लावावें भजन
विरक्तें विशेष ब्रह्मज्ञान । प्रगटवावें ३

विरक्तें असावें परमदक्ष । विरक्तें असावें अंतरसाक्ष
विरक्तें वोढावा कैपक्ष । परमार्थाचा ४

विरक्तें अभ्यास करावा । विरक्तें साक्षेप धरावा
विरक्तें वक्तृत्वें उभारावा । मोडला परमार्थ ५

विरक्तें विमळ ज्ञान बोलावें । विरक्तें वैराग्य स्तवीत जावें
विरक्तें निश्चयाचें करावें । समाधान ६

पर्वें करावीं अचाटें । चालवावीं भक्तांची थाटें
नाना वैभवें कचाटें । उपासना मार्गं ७

हरिकीर्तनें करावीं । निरूपणें माजवावीं
भक्तिमार्गें लाजवावी । निंदक-दुर्जनें ८

बहुतांस करावे परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार
पुण्यमार्गाचा विस्तार । बळेंचि करावा ९

द्दढ निश्चयो धरावा । संसार सुखाचा करावा
विश्व-जन उद्धरावा । संसर्ग-मात्रें १०

विरक्तें असावें धीर । विरक्तें असावें उदार
विरक्तें असावें तत्पर । निरूपणविषईं ११

विरक्तें सावध असावें । विरक्तें शुद्धमार्गें जावें
विरक्तें झिजोनि उरावें । सत्कीर्तीसी १२

विरक्तें विरक्त धुंडावे । विरक्तें साधु वोळखावे
विरक्तें मित्र करावे । संत, योगी, सज्जन १३

विरक्तें उपाधी करावी । आणि उदासवृत्ती न संडावी
दुराशा जडों नेदावी । कोणयेकाविषंई १४

विरक्तें असावें अंतरनिष्ठ । विरक्तें नसावें क्रियाभ्रष्ट
विरक्तें न व्हावें कनिष्ठ । पराधीनपणें १५

विरक्तें समय जाणावा । विरक्तें प्रसंग वोळखावा
विरक्त चतुर असावा । सर्व प्रकारें १६

विरक्तें येकदेसी नसावें । विरक्तें सर्व अभ्यासावें
विरक्तें अवघें जाणावें । ज्याचें त्यापरी १७

विरक्तें असावें जगमित्र । विरक्तें असावें स्वतंत्र
विरक्तें असावें विचित्र । बहुगुणी १८

विरक्तें शुद्ध मार्ग सांगावा । विरक्तें संशय छेदावा
विरक्तें आपला म्हणावा । विश्वजन १९

**जाणतेपणाची थोरवी** द. ९-४

**प्रश्न** : पृथ्वीमध्यें लोक सकळ । येक संपन्न, येक दुर्बळ
येक निर्मळ, येक वोंगळ । काय निमित्य ?

**उत्तर** : हे सकळ गुणांपासीं गती । सगुण भाग्यश्री भोगती
अवगुणासि दरिद्रप्राप्ती । यदर्थी संदेह नाहीं १

जो जो जेथें उपजला । तो तो ते वेवसाईं उमजला
तयासी लोक म्हणती भला । कार्यकर्ता २

'जाणता' तो कार्य करी । नेणता कांहींच न करी
जाणता तो पोट भरी । नेणता भीक मागे ३

हें तों प्रगटचि असे । जनीं पाहातां प्रत्यक्ष दिसे
विद्येवीण करंटा वसे । विद्या तो भाग्यवन्त ४

वडील आहे करंटा । आणि समर्थ होय धाकुटा
कां, जे विद्येनें मोठा । म्हणोनिया ! ५

विद्या नाहीं, बुद्धि नाहीं । विवेक नाहीं, साक्षेप नाहीं
कुशळता नाहीं, व्याप नाहीं । म्हणोनि प्राणी 'करंटा' ६

वडिल समर्थ, धाकुटा भिकारी । ऐका याची कैसी परी
वडिल-ऐसा व्याप न करी । म्हणोनिया ७

जैसी विद्या तैसी हांव । जैसा व्याप तैसें वैभव
तोलासारिखा हावभाव । लोक करिती ८

विद्या नसे, वैभव नसे । तेथें निर्मळ कैचा असे ?
करंटेपणें वोखटा दिसे । वोंगळ आणि विकारी ९

गुण नाहीं, गौरव नाहीं । सामर्थ्य नाहीं, महत्त्व नाहीं
कुशळता नाहीं, तर्क नाहीं । प्राणीमात्रांसी १०

याकारणें उत्तम गुण । तेंचि भाग्याचें लक्षण
लक्षणेंवीण अवलक्षण । सहजचि जालें ११

जनांमध्यें जो जाणता । त्यास आहे मान्यता
कोणी येक विद्या असतां । महत्त्व पावे १२

प्रपंच अथवा परमार्थ । 'जाणता' तोचि समर्थ
नेणता जाणिजे व्यर्थ । निष्कारण १३

कोण कर्ता निश्चयेसी । बद्ध–मोक्ष तो कोणासी
ऐसें जाणतां प्राणियांसी । सुटका घडे १४

जाणिजे देव निर्गुण । जाणिजे 'मी' तो कोण
जाणिजे अनन्य लक्षण । म्हणजे मुक्त १५

जितुकें जाणोन सांडिलें । तितुकें दृश्य वोलांडिलें
जाणत्यास जाणतां, तुटलें । मूळ 'मी'पणाचें १६

माया ब्रह्म वोळखावें आपणांस आपण जाणावें
इतुक्यासाठीं स्वभावें । चुके जन्म १७

जाणतां समर्थाचें अंतर । प्रसंगें वर्तें तदनंतर
भाग्य, वैभव अपार । तेणेंचि पावे १८

म्हणोनि 'जाणणें' नव्हे सामान्य । जाणतां होईजे सर्वमान्य
कांहींच नेणता अ-मान्य । सर्वत्र करिती १९

जाणत्यास कळे वर्म । नेणत्याचें खोटें कर्म
सकळ कांही धर्माधर्म । जाणतां कळे २०

म्हणोनियां नेणणें खोटें । नेणते प्राणी ते करंटे
जाणतां–विवरतां तुटे । जन्म-मरण २१

म्हणोनि अ–लक्ष करूं नये । 'जाणणें' हाचि उपाय
जाणतां सांपडे सोय । परलोकाची २२

जाणणें सकळांस प्रमाण । मूर्खास वाटे अप्रमाण
परंतु अलिप्तपणाची खूण । जाणतां कळे २३

जाणणें म्हणजे स्मरण । नेणणें म्हणजे विस्मरण
दोहोंमध्यें कोण प्रमाण । शहाणे जाणती २४

जाणते लोक ते शहाणे । नेणते वेडे दैन्यवाणे
विज्ञान तेंहि जाणपणें । कळों आलें २५

## राजकारणविवरण द. ११-५

कर्म केलेंचि करावें । ध्यान धरलेंचि धरावें
विवरलेंचि विवरावें । पुनः पुनः १

अनन्य राहे समुदाव । इतर जनास उपजे भाव
ऐसा आहे अभिप्राव । उपायाचा २

मुख्य हरिकथा-निरूपण । दुसरें तें राजकारण
तिसरें तें सावधपण । सर्व विषईं ३

चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप
अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे ४

जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर
नीति-न्यायासी अंतर । पडोंचि नेदावें ५

संकेतें लोक वेधावा । येकूण येक बोधावा
प्रपंचहि सावरावा । येथानुशक्त्या ६

प्रपंचसमयो वोळखावा । धीर बहुत असावा
संबंध पडों नेदावा । अतिपरिचयाचा ७

उपाधीसी विस्तारावें । उपाधींत न सांपडावें
नीचत्व पहिलेंच घ्यावें । आणि मूर्खपण ८
दोष देखोन झांकावे । अवगुण अखंड न बोलावे
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ९
तऱ्हें भरोंच नये । सुचावे नाना उपाये
नव्हे तेचि करावें कार्य । दीर्घ प्रेत्नें १०

फड नासोचि न द्यावा । पडिला प्रसंग सावरावा
अतिवाद न करावा । कोणीयेकासी ११
दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तरी वाटून घ्यावें
बरें-वाईट सोसावें । समुदायाचें १२
अपार असावें पाठांतर । संनिधचि असावा विचार
सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी १३
शांती करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी
क्रिया करून करवावी । बहुतांकरवीं १४
करणें असेल अपाय । तरी बोलोन दाखवूं नये
परस्परेंचि प्रत्यय । प्रचीतीस आणावा १५
जो बहुतांचें सोसी ना । त्यास बहुत लोक मिळे ना
अवघेंचि सोसितां उरे ना । महत्त्व आपुलें १६
राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच नेदावें
परपीडेवरी नसावें । अंतःकरण १७
लोक पारखून सांडावे । राजकारणें अभिमान झाडावे
पुन्हां मेळवून घ्यावें । दुरील दोरें १८
हिरवटासी दुरी धरावें । कचरटासी न बोलावें
संबंध पडतां सोडून जावें । येकीकडे १९
ऐसें असो राजकारण । सांगतां तें असाधारण
सुचित असतां अंतःकरण । राजकारण जाणे २०
वृक्षीं रुढास उचलावें । युद्धकर्त्यास ढकलून द्यावें
कारबाराचें सांगावें । अंग कैसें २१

पाहातां तरी सांपडे ना । कीर्ति करूं तरी राहे ना
आलें वैभव अभिलासी ना । कांहीं केल्या २२
येकाची पाठी राखणें । येकास देखों न सकणें
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याचीं २३

**जाणता महंत** द. ११-६

हरिकथा, निरूपण । नेमस्तपणें राजकारण
वर्तायाचें लक्षण । तेंहि असावें १
पुसों जाणे, सांगों जाणे । अर्थांतर करूं जाणे
सकळिकांचें राखों जाणे । समाधान २
दीर्घसूचना आधीं कळे । सावधपणें तर्क प्रबळे
जाणजाणोनि निवळे । यथायोग्य ३
ऐसें जाणे जो समस्त । तोचि ' महंत ' बुद्धिवंत
यावेगळें अंतवंत । सकळ कांहीं ४
ताळ वेळ, तानमाने । प्रबंध, कविता, जाड वचनें
मजालसीं, नाना चिन्हें । सुचती जया ५
जो येकांतास तत्पर । आधीं करीं पाठांतर
अथवा शोधी अर्थांतर । ग्रंथगर्भीचें ६
आधींच शिकोन जो सिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी
गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ७
अक्षर सुंदर, वाचणें सुंदर । बोलणें सुंदर, चालणें सुंदर
भक्ति-ज्ञान-वैराग्य सुंदर । करून दावी ८
जयास यत्नचि आवडे । नाना प्रसंगीं पवाडे
धीटपणें प्रगटे, दडे । ऐसा नव्हे ९
सांकडीमधें वर्तों जाणे । उपाधीमधें मिळों जाणे
अलिप्तपणें राखों जाणे । आपणासी १०
आहे तरी सर्वांठाईं । पाहों जातां कोठेंचि नाहीं
जैसा अंतरात्मा ठाईंचा ठाईं । गुप्त जाला ११

त्यावेगळें कांहींच नसे । पाहों जातां तो न दिसे
न दिसोनि वर्तवीतसे । प्राणिमात्रांसी १२
तैसाचि हाहि नानापरी । बहुत जनांस शाहाणे करी
नाना विद्या त्या विवरी । स्थूल-सूक्ष्मा १३
आपणाकरितां शाहाणे होती । ते सहजचि सोय धरिती
जाणतेपणाची महंती । ऐसी असे १४
राखों जाणें नीति-न्याय । न करी, न करवी अन्याय
कठीण प्रसंगीं उपाय । करूं जाणे १५
ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा
दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा १६

## विवेकी पुरुष

द. १२-८

प्रवृत्ति चाले अधोमुखें । निवृत्ति धांवे ऊर्ध्वमुखें
ऊर्ध्वमुखें नाना सुखें । विवेकी जाणती १
ब्रह्मांडरचना जेथून जाली । तेथें विवेकी दृष्टि घाली
विवरतां विवरतां लाधली । पूर्वापर स्थिति २
प्रपंचीं असोन परमार्थ पाहे । तोचि ये स्थितीतें लाहे
प्रारब्धयोगें करून राहे । लोकांमध्यें ३
सकळांचें येकचि मूळ । येक जाणते, येक बाष्कळ
विवेकें करून तत्काळ । परलोक साधावा ४
तरीच जन्माचें सार्थक । भले पाहाती उभय लोक
कारण मुळींचा विवेक । पाहिला पाहिजे ५
पदार्थी असावें उदास । विवेक पाहावा विशेष
येणेंकरितां जगदीश । अलभ्य लाभे ६
जगदीशापरता लाभ नाहीं । कार्याकारण सर्व कांहीं
संसार करीत असतांही । समाधान ७
मागां होते जनकादिक । राज्य करितांहि अनेक
तैसेचि आतां पुण्यश्लोक । कित्येक असती ८

हाट भरला संसाराचा । नफा पाहावा देवाचा
तरीच कांहीं या कष्टाचा । पर्याय होतो ९

## उत्तम पुरुषाचीं लक्षणें द. १२-१०

आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वांटणें
परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे १
तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनांस सांगावें
तरतेनें बुडों नेदावें । बुडतयासी २
उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे
वर्तल्यावीण बोलावे । ते शब्द मिथ्या ३
स्नान-संध्या-देवार्चन । येकाग्र करावें जपध्यान
हरिकथा, निरूपण । केलें पाहिजे ४
शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें
उणें पडों नेदावें । कोणीयेकाचें ५
आडलें, जाकसलें जाणावें । यथानुशक्ति कामास यावें
मृदु वचनें बोलत जावें । कोणीयेकासीं ६
दुसऱ्याच्या दुःखें दुखवावें । परसंतोषें सुखी व्हावें
प्राणिमात्रांस मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ७
बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे
आपल्यापरीस व्हावे । पारखे जन ८
दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें
लोकांस परीक्षीत जावें । नाना प्रकारें ९
नेमकचि बोलावें । तत्काळचि प्रतिवचन द्यावें
कदापि रागास न यावें । क्षमारूपें १०
आळस अवघाच दवडावा । यत्न उदंडचि करावा
शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ११
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा
सावधपणें करीत जावा । संसार आपला १२

मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें
मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें १३
ऐसा उत्तमगुणीं विशेष । तयास म्हणावें पुरुष
जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होय १४
उत्तम गुणीं शृंगारला । ज्ञानवैराग्यें शोभला
तोचि येक जाणावा भला । भूमंडळीं १५
स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोशीत जावें
झिजोन कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें १६
कीर्ति पाहों जातां सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ती नाहीं
विचारेंवीण कोठेंच नाहीं । समाधान १७
आपलें अथवा परावें । कार्य अवघेंचि करावें
प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे १८
बरें बोलतां सुख वाटतें । हें तो प्रत्ययास येतें
आत्मवत परावें तें । मानीत जावें १९
कठीण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें
तरी मग वाईट बोलावें तें । काय निमित्त ? २०
जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी
आपणास घात करी । कोणीयेक प्रसंगीं २१
पेरिलें तें उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें
तरी मग कर्कश बोलावें तें । काय निमित्त ! २२
आपल्या पुरुषार्थ-वैभवें । बहुतांस सुखी करावें
परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ! २३
जो उत्तम गुणें शोभला । तोचि पुरुष महा भला
कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती २४
क्रियेवीण शब्दज्ञान । तेंचि श्वानाचें वमन
भले तेथें अवलोकन । कदापी न करिती २५
मनापासून भक्ति करणें । उत्तम गुण आगत्य धरणें
तया महापुरुषाकारणें । धुंडीत येती २६

ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव
भक्तियोगें देवाधिदेव । आपुला करावा २७
आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी
आपणामागे जगदीशासी । भजत जावें २८
याकारणें समुदाव । जाला पाहिजे महोत्साव
हातोपातीं देवाधिदेव । वोळेसा करावा २९
आतां समुदायाकरणें । पाहिजेत दोनी लक्षणें
श्रोतीं येथें सावधपणें । मन घालावें ३०
जेणें बहुतांस घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ती
बहुतांचें मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ३१
बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें
तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ३२
जें जें जनास माने ना । तें तें जनही मानी ना
आपण येकला जन नाना । सृष्टीमध्यें ३३
म्हणोनि सांगाती असावें । मानत मानत सिकवावे
हळूहळू सेवटा न्यावे । विवेकानें ३४
परंतु हे विवेकाचीं कामें । विवेकी करील नेमें
इतर ते बापुडे भ्रमें । भांडोंचि लागले ! ३५

## ऐका, निस्पृहाची सिकवण द. १४-१

ऐका निस्पृहाची सिकवण । युक्ति, बुद्धि, शहाणपण
जेणें राहे समाधान । निरंतर १
सोपा मंत्र परी नेमस्त । साधें औषध गुणवंत
साधें बोलणें सप्रचीत । तैसें माझें २
तत्काळचि अवगुण जाती । उत्तम गुणांची होय प्राप्ती
शब्दऔषध तीव्र श्रोतीं । साक्षेपें सेवावें ३
निस्पृहता धरूं नये । धरिली तरी सोडूं नये
सोडिली तरी हिंडूं नये । वोळखीमध्यें ४

कांता दृष्टीं राखों नये । मनास गोडी चाखवूं नये
धारिष्ट चळतां दाखवूं नये । मुख आपुलें ५
विरक्ती गळो देऊं नये । धारिष्ट चळो देऊं नये
ज्ञान मळीन होऊं नये । विवेकबळें ६
करुणाकीर्तन सोडूं नये । अंतर्ध्यान मोडूं नये
प्रेमतंतू तोडूं नये । सगुणमूर्तीचा ७
पोटीं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये
समयीं धीर सांडूं नये । कांहीं केल्या ८
लोक-लाज धरूं नये । लाजवितां लाजों नये
खिजवितां खिजों नये । विरक्त पुरुषें ९
तपीळपण धरूं नये । भांडवितां भांडों नये
उडवितां उडवूं नये । निजस्थिती आपुली १०
येक वेष धरूं नये । येक साज करूं नये
येकदेशी होऊं नये । भ्रमण करावें ११
नित्य नेम सांडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये
परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या १२
स्वतंत्रता मोडूं नये । निरापेक्षा तोडूं नये
परापेक्षा होऊं नये । क्षणक्षणा १३
वैभव दृष्टीं पाहों नये । उपाधीसुखें राहों नये
येकांत मोडूं देऊं नये । स्वरूपस्थितीचा १४
परंपरा तोडूं नये । उपाधी मोडूं देऊं नये
ज्ञानमार्ग सोडूं नये । कदाकाळीं १५
कर्ममार्ग सांडूं नये । वैराग्य मोडूं देऊं नये
साधन-भजन खंडूं नये । कदाकाळीं १६
अतिवाद करूं नये । अनीति पोटीं धरूं नये
रागें भरी भरों नये । भलतीकडे १७
कांहीं उपाधी करूं नये । केली तरी धरूं नये
धरली तरी सांपडों नये । उपाधीमध्यें १८

अधिकारेंवीण सांगो नये । दाटून उपदेश देऊं नये
कानकोंडा करूं नये । परमार्थ कदा १९
कठीण शब्द बोलों नये । कठीण आज्ञा करूं नये
कठीणता धरूं नये । कांहीं केल्या २०
आपण आसक्त होऊं नये । केल्यावीण सांगों नये
बहुसाल मागों नये । शिष्यवर्गासी २१
थोरपण चुकों नये । न्यायनीति सांडूं नये
अप्रमाण वर्तों नये । कांहीं केल्या २२
सावधपण सोडूं नये । व्यापकपण सांडूं नये
कदा सुख मानूं नये । निसुगपणाचें २३
प्रसंगेंवीण बोलों नये । अन्वयेवीण गाऊं नये
विचारेंवीण जाऊं नये । अविचारपंथें २४
परोपकार सांडूं नये । परपीडा करूं नये
विकल्प पडों देऊं नये । कोणीयेकासी २५
संशयात्मक बोलों नये । बहुत निश्चय करूं नये
निर्वाहेंवीण धरूं नये । ग्रंथ हातीं २६
मोलें सुकृत करूं नये । मोलपुजारी होऊं नये
दिल्हा तरी घेऊं नये । इनाम निस्पृहें २७
कोठें मठ करूं नये । केला तरी तो धरूं नये
मठपती होऊन बैसों नये । निस्पृह पुरुषें २८
निस्पृहें अवघेंचि करावें । परी आपण तेथें न संपडावें
परस्परें उभारावें । भक्तिमार्गासी २९
प्रयत्नेंवीण राहों नये । आळस दृष्टीस आणूं नये
देह असतां पाहों नये । वियोग उपासनेचा ३०
आशाबद्धक बोलों नये । विवेकेंवीण चालों नये
समाधान हालों नये । कांहीं केल्या ३१
निस्पृहें वक्तृत्व सांडूं नये । आशंका घेतां भांडों नये
श्रोतयांचा मानूं नये । वीट कदा ३२

शिकवण धरितां चितीं । सकळ सुखें बोळंगती
आंगीं आणे महंती । अकस्मात २३

## चातुर्यलक्षण–१ द. १४ ६

रूप–लावण्य अभ्यासितां न ये । सहजगुणासी न चले उपाय
कांहींतरी धरावी सोय । अगांतुक गुणांची १

अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती
कुविद्या सांडून शिकती । शहाणे विद्या २

मूर्खपण सांडितां जातें । शाहाणपण शिकतां येतें
कारभार करितां उमजतें । सकळ कांहीं ३

मान्यता आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा करावी ?
चातुर्यैवीण उंच पदवी । कदापी नाहीं ४

ऐसी प्रचीत येते मना । तरी कां स्वहित करा ना ?
सन्मार्गें चालतां जना । सज्जना माने ५

देह नेटके शृंगारिले । परी चातुर्यैवीण नासले
गुणेंवीण साजिरें केलें । आष्कळ जैसें ६

अंतर्कळा शृंगारावी । नानापरी उमजवावी
संपदा मेळवून, भोगावी । सावकाश ७

न्यायें वर्तेल तो शहाणा । अन्यायी तो दैन्यवाणा
नाना चातुर्यांच्या खुणा । चतुर जाणे ८

चातुर्यें शृंगारे अंतर । वस्त्रें शृंगारे शरीर
दोहींमध्यें कोण थोर । बरें पाहा ९

बाह्याकार शृंगारिलें । तेणें लोकांच्या हातास काय आलें ?
चातुर्यें बहुतांस रक्षिलें । नाना प्रकारें १०

बरें खावें, बरें जेवावें । बरें ल्यावें, बरें नेसावें
समस्तीं बरें म्हणावें । ऐसी वासना ११

तनें-मनें झिजावें । तेणें भले म्हणोनि घ्यावें
उगीच कल्पितां शिणावें । लागेल पुढें १२

लोकीं कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेणें घडे
लोक सहजचि वोढे । कामासाठीं १३

म्हणोनि लोक सुखी करावे । तेणें आपण सुखी व्हावें
दुसऱ्यांसी कष्टवितां, कष्टावें । लागेल पुढें १४

समजले आणि वर्तले । तेचि ‘ भाग्य पुरुष ’ जाले
यावेगळे उरले । ते करंटे पुरुष १५

जितुका व्याप, तितुकें वैभव । वैभवासारिखा हावभाव
समजले पाहिजे उपाव । प्रगटचि आहे १६

आळसें कार्यभाग नासतो । साक्षेप होत-होत होतो
दिसते गोष्टी कळे ना तो । शाहाणा कैसा ? १७

मैत्री करतां होतें कृत्य । वैर करतां होतो मृत्यु
बोललें हें सत्य कीं असत्य । वोळखावें १८

बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अंतरीं भरावें
उत्तम गुणीं विवरावें । प्राणिमात्रासी १९

शाहाणे करावे जन । पतित करावे पावन
सृष्टीमध्यें भगवद्भजन । वाढवावें २०

## चातुर्याचीं लक्षणें–२ द. १५-१

अस्थिमांसाचीं शरीरें । त्यांत राहिजे जीवेश्वरें
नाना विकारी विकारें । प्रवीण होइजे १

जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा
राहराहों शोध घ्यावा । परांतराचा २

अनुमानें अनुमान वाढतो । भिडेनें कार्यभाग नासतो
याकारणें प्रत्यय तो । आधीं पाहावा ३

दुसऱ्याचे जीवींचें कळे ना । परांतर तें जाणवे ना
वश्य होती लोक नाना । कोण्या प्रकारें ? ४

श्रेष्ठ कार्य करी तो श्रेष्ठ । कृत्रिम करी तो कनिष्ठ
कर्मानुसार प्राणी नष्ट । अथवा भले ५

राजे जाती राजपंथें । चोर जाती चोरपंथं
वेडे ठकले अल्पस्वार्थें । मूर्खपणें ६

मूर्खास वाटे ' मी शाहाणा ' । परी तो वेडा दैन्यवाणा
नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ७

जो जगदंतरें मिळाला । तो जगदंतरचि जाला
अरत्रीं परत्रीं तयाला । काय उणें ८

बुद्धि, ' देणें ' भगवंताचें । बुद्धीवीण माणुस कच्चें
राज्य सांडून फुकाचें । भीक मागे ९

सत्याचा जो अभिमान । तो जाणावा निरभिमान
न्याय अन्याय समान । कदापी नव्हे १०

न्याय म्हणजे तो शाश्वत । अन्याय म्हणजे अशाश्वत
बाष्कळ आणि नेमस्त । येक कैसा ? ११

आचारविचारेंवीण । जें जें करणें तो तो सीण
धूर्त आणि विचक्षण । तेचि शोधावे १२

उदंड बाजारी मिळाले । परी ते धूर्तेंचि आळिले
धूर्तापासी कांहीं न चले । बाजाऱ्यांचें १३

याकारणें मुख्य मुख्य । तयासी करावें सख्य
येणेंकरितां असंख्य । बाजारी मिळती १४

समर्थाचें राखतां मन । तेथें येती उदंड जन
जन आणि सज्जन । आर्जव करिती १५

बोळखीनें बोळखी साधावी । बुद्धीनें बुद्धी बोधावी
नीतिन्यायें वाट रोधावी । पाषांडाची १६

निस्पृह आणि नित्य नूतन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान
प्रगट जाणतां सज्जन । दुर्लभ जगीं १७

नाना जिनसपाठांतरें । निवर्ती सकळांचीं अंतरें
चंचळपणें तदनंतरें । सकळा ठाईं १८

भेट भेटों उरी राखणें । हीं चातुर्याचीं लक्षणें
मनुष्यमात्र उत्तम गुणें । समाधान पावे १९

## चातुर्याचीं लक्षणें–३ द. १५-६

बहुतांचे बोलीं लागले । ते प्राणी अनुमानीं बुडाले
मुख्य निश्चय चुकले । प्रत्ययाचा १

उदंडाचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पाहावें
खरेंखोटें निवडावें । अंतर्यामीं २

कोणासी ' नव्हे ' म्हणों नये । समजावे अपाय-उपाय
प्रत्यय घ्यावा, बहुत काय । बोलोनियां ! ३

माणूस हेंकाड आणि काचे । मान्य करावें तयाचें
येणें प्रकारें बहुतांचें । अंतर राखावें ४

वेडे करावे शाहाणे । तरीच जिणें श्लाघ्यवाणें
उगेंच वादांग वाढवणें । हें मूर्खपण ५

मिळोन जाऊन मेळवावें । पडी घेऊन उलथावें
कांहींच कळों नेदावें । विवेकबळें ६

दुसऱ्याचे चालणीं चालावें । दुसऱ्याचे बोलणीं बोलावें
दुसऱ्याचे मनोगतें जावें । मिळोनिया ७

जो दुसऱ्याच्या हितावरी । तो विपट कांहींच न करी
मानत मानत विवरी । अंतर तयाचें ८

आधीं अंतर हातीं घ्यावें । मग हळुहळू उकलावें
नाना उपायें न्यावें । परलोकासी ९

हेंकाडास हेंकाड मिळाला । तेथें गल्बलाच जाला
कळहो उठतां, चातुर्याला । ठाव कैंचा ? १०

उगीच करिती बडबड । परी करून दाखवणें औघड
परस्थळ साधणें, जड । कठीण आहे ११

प्रसंग जाणोनि बोलावें । जाणपण कांहींच न घ्यावें
लीनता धरून जावें । जेथें तेथें १२

कुग्रामें अथवा नगरें । पाहावीं घरांचीं घरें
भिक्षामिसें लहानथोरें । परीक्षून सोडावीं १३

बहुतीं कांहींतरी सांपडे । विचक्षणलोकीं मैत्री घडे
उगेंच बैसतां कांहींच न घडे । फिरणें-विवरणें १४

सावधपणें सर्व जाणावें । वर्तमान आधींच घ्यावें
जाऊं ये तिकडे जावें । विवेकेंसहित १५

नाना जिनस पाठांतरें । निवती सकळांचीं अंतरें
लिहोन देतां परोपकारें । सीमा सांडावी १६

जैसें जयास पाहिजे । तैसें तयास दीजे
तरी मग श्रेष्ठचि होइजे । सकळां मान्य १७

भूमंडळीं सकळांस मान्य । तो म्हणों नये सामान्य
कित्येक लोक अनन्य । तया पुरुषासी १८

ऐसीं चातुर्याचीं लक्षणें । चातुर्यें दिग्विजय करणें
मग तयास काय उणें । जेथें तेथें १९

## चातुर्याचीं लक्षणें-४ द. १९-२

शब्दभेद, अर्थभेद । मुद्राभेद, प्रबंधभेद
नाना शब्दांचे शब्दभेद । जाणोनि पाहावे १

नाना आशंका प्रत्योत्तरें । नाना प्रचीत साक्षात्कारें
जेणेंकरितां जगदांतरें । चमत्कारिती २

नाना पूर्वपक्ष सिद्धांत । प्रत्ययो पाहावा नेमस्त
अनुमानाचें खस्तवेस्त । बोलोंचि नये ३

प्रवृत्ति अथवा निवृत्ती । प्रचीतीवीण अवघी भ्रांतीं
गळंग्यामधील जगज्योती । चेतेल कोठें ? ४

हेत समजोन उत्तर देणें । दुसऱ्याचे जीवींचें समजणें
मुख्य चातुर्याचीं लक्षणें । तीं हीं ऐसीं ५

चातुर्येंवीण खटपट । ते विद्याचि फलकट
सभेमध्यें आटघाट । समाधान कैंचें ? ६

बहुत बोलणें ऐकावें । तेथें मौन्यचि धरावें
अल्पचिन्हें समजावें । जगदंतर ७

वाष्कळांमध्ये बैसों नये । उद्धटासी तंडों नये
आपणांकरितां खंडों नये । समाधान जनाचें ८
नेणतेंपण सोडों नये । जाणपणें फुगों नये
नाना जनांचें हृदये । मृदुशब्दें उकलावें ९
प्रसंग जाणावा नेटका । बहुतांसी जाजूं घेऊं नका
खरें असतांचि नासका । फड होतो १०
अंतर आर्तांचें शोधावें । प्रसंगीं थोडेंचि वाचावें
चटक लावूनि सोडावें । भल्या मनुष्यासी ११
उत्तम गुण प्रगटवावे । मग भलत्यासी बोलतां फावे
भले पाहोन करावे । शोधून मित्र १२
उपासनेसारिखें बोलावें । सर्व जनांसी तोषवावें
सगट बरेंपण राखावें । कोणीयेकासी १३
ठाईं ठाईं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा
प्राणीमात्र बोलवावा । आप्तपणें १४
जगामध्यें जगमित्र । जिव्हेपासी आहे सूत्र
कोठें तरी सत्पात्र । शोधून काढावें १५
कथा होती तेथें जावें । दूरी दीनासारिखें बैसावें
तेथील सकळ हरद्र घ्यावें । अंतर्यामीं १६
तेथे भले आढळती । व्यापक तेहि कळों येती
हळूहळू मंदगती । रीग करावा १७
सकळांमध्यें विशेष श्रवण । श्रवणाहूनि थोर मनन
मननें होय समाधान । बहुत जनांचें १८
धूर्तपणें सकळ जाणावें । अंतरीं अंतर बाणावें
समजल्यावीण सिणावें । कासयासी ? १९

**जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश** **द. १७-१**

देव पाहावया कारणें । देउळें लागती पाहाणें
कोठेंतरी देवळाच्या गुणें । देव प्रगटे १

देवळें म्हणजे नाना शरीरें । तेथें राहिजे जीवेश्वरें
नाना शरीरें नाना प्रकारें । अनंत भेदें २

चालतीं-बोलतीं देउळें । त्यांमधें राहिजे राउळें
जितकीं देउळें तितुकीं सकळें । कळलीं पाहिजे ३

संसारा आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्यविवेक
येहलोक आणि परलोक । दोनीं साधले ४

भजनशीळ लोकांपासीं । अखंड देव अहर्निसीं
पाहातां त्यांच्या पूर्वसंचितासीं । जोडा नाहीं ५

अखंड योग म्हणोनि योगी । योग नाहीं तो वियोगी
वियोगी तोहि योगी । योगबळें ६

भल्यांची महिमा ऐसी । जे सन्मार्ग लावी लोकांसी
पोहणार असतां बुडतयांसी । बुडों नेदावें ७

स्थूलसूक्ष्म तत्त्वझाडा । पिंडब्रह्मांडाचा निवाडा
प्रचीत पाहे ऐसा थोडा । भूमंडळीं ८

ये पृथ्वीमधें विवेकी असती । धन्य तयांची संगती
श्रवणमात्रें पावती गती । प्राणिमात्र ९

सत्संग आणि सच्छास्त्र श्रवण । अखंड होतसे विवरण
नाना सत्संग आणि उत्तम गुण । परोपकाराचे १०

जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश
धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंच वसे ११

विशेष सारासार विचार । तेणें होय जगदोद्धार
संगत्यागें निरंतर । होऊन गेले १२

## निस्पृहास शिकवण द. १८-३

आपला संसार नासला । मनामध्यें पस्तावला
तरी मग अभ्यास केला । पाहिजे विवेकाचा १

येकाग्र करावें मन । बळेंचि धरावें साधन
येत्नीं आळसाचें दर्शन । होऊंचि नये २

अवगुण अवघेचि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे
प्रबंध पाठ करीत जावे । जाड अर्थ ३

पद-प्रबंध, श्लोक-प्रबंध । नाना धाटी, मुद्रा, छंद
प्रसंगज्ञानेंचि आनंद । होत आहे ४

दुसऱ्याचें अंतर जाणावें । आदर देखोनि म्हणावें
आठवेल तें गावें । हें मूर्खपण ५

ज्याची जैसी उपासना । तेंचि गावें, चुकावें ना
रागज्ञाना, ताळज्ञाना । अभ्यासावें ६

साहित्य संगीत प्रसंगमानें । करावीं कथेचीं घमशानें
अर्थांतर श्रवणमननें । काढीत जावें ७

पाठ उदंडचि असावें । सर्वकाळ उजळीत जावें
सांगीतले गोष्टीचें असावें । स्मरण अंतरीं ८

अखंड येकांत सेवावा । ग्रंथमात्र धांडोळावा
प्रचीत येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ९

**विवेकें, विचारें, राजकारणें । अंतर शृंगारिजे** द. १८-६

नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर शृंगारणें
विवेकें-विचारें, राजकारणें । अंतर शृंगारिजे १

शरीर सुंदर सतेज । वस्त्रें-भूषणें केलें सज्ज
अंतरीं नसतां चातुर्यबीज । कदापी शोभा न पवे २

समयासारिखा समयो ये ना । नेम सहसा चाले ना
नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ३

अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें
हटनिग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ४

बहुतचि करितां हट । तेथें येऊन पडिले तट
कोणीयेकाचा शेवट । जाला पाहिजे ५

बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभवानी
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ६

अखंडचि सावधाना । बहुत काय करावी सूचना
परंतु कांहींयेक अनुमाना । आणिलें पाहिजे ७

समर्थापासी बहुतजन । राहिला पाहिजे साभिमान
निश्चळ करूनिया मन । लोक असती ८

म्लेंछ दुर्जन उदंड । बहुता दिवसांचें माजलें बंड
याकारणें अखंड । सावधान असावें ९

**धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार** द. १८-६

सकळ कर्ता तो ईश्वरू । तेणें केला अंगिकारू
तया पुरुषाचा विचारू । विरळा जाणे १

न्यायनीति, विवेकविचार । नाना प्रसंगप्रकार
परीक्षणें परांतर । देणें ईश्वराचें २

महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें
अद्‌भुतचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ३

यश, कीर्ति, प्रताप, महिमा । उत्तम गुणांसी नाहीं सीमा
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ४

देव, ब्राह्मण, आचारविचार । कित्येक जनांसी आधार
सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ५

इहलोक, परलोक पाहणें । सावधपणें राहणें
बहुत जनांचें साहणें । देणें ईश्वराचें ६

देवाचा कैपक्ष घेणें । ब्राह्मणाची चिंता वाहणें
बहुत जनांसी पाळणें । देणें ईश्वराचें ७

धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार
जाले आहेत, पुढें होणार । देणें ईश्वराचें ८

उत्तम गुणांचा ग्राहक । तर्क, तीक्ष्ण विवेक
धर्मवासना, पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ९

सकळ गुणांमध्ये सार । तजविजा, विवेक-विचार
जेणें पाविजे पैलपार । अरत्रपरत्रींचा १०

## ऐसी हे ‘ समर्थ ’ पद्वी — द. १८-१०

म्हणोनि जाणते विचक्षण । ते आधींच धरिती नेणपण
मूर्ख टोणपा आपण । कांहींच नाहीं १

आपणाहूनि देव थोर । ऐसा जयास कळला विचार
सकळ कांहीं जगदांतर । तेंहि राखावें २

सभेमध्यें कलहो जाला । शब्द येतो जाणत्याला
अंतरें राखों नाहीं सिकला । कैसा तो योगी ? ३

उपाय, पर्याय, दीर्घ प्रयत्न । विवेकबळें नाना येत्न
करील तयाचें महिमान । तोचि जाणे ४

पृथ्वीमध्यें उदंड जन । जनांमध्ये असती सज्जन
जयांकरितां समाधान । प्राणिमात्रांसी ५

तो मनोगतांचीं आंगें जाणे । मान-प्रसंग-समये जाणे
संतप्तालागीं निववूं जाणे । नाना प्रकारें ६

ऐसा तो जाणता लोक । समर्थ तयाचा विवेक
त्याचें करणें कांहींयेक । जनास कळे ना ७

बहुत जनांस चालवी । नाना मंडळें हालवी
ऐसी हे ‘ समर्थ ’-पदवी । विवेकें होते ८

विवेक येकांतीं करावा । जगदीश धारणेनें धरावा
लोक आपला आणि परावा । म्हणोंचि नये ९

येकांतीं विवेक ठाई पडे । येकांतीं येत्न सांपडे
येकांतीं तर्क बावडे । ब्रह्मांडगोळीं १०

येकांतीं स्मरण करावें । चुकलें निधान पडे ठावें
अंतरात्म्यासरिसें फिरावें । कांहींतरी ११

जयास येकांत मानला । अवघ्या आधीं कळे त्याला
त्यावेगळें वडीलपणाला । ठावचि नाहीं १२

**भाग्यशाली पुरुष** द. १९-४

**आतां अैका सदेवलक्षण । परम सौख्यदायक**

उपजतगुण शरीरीं । परोपकारी नाना परी
आवडे सर्वांचे अंतरीं । सर्वकाळ १

सुंदर अक्षर लेहो जाणे । चपळ शुद्ध वाचूं जाणे
अर्थांतर सांगो जाणे । सकळ कांहीं २

कोणाचें मनोगत तोडी ना । भल्यांची संगती सोडी ना
सदेवलक्षण अनुमाना । आणून सोडी ३

तो सकळ जनासी व्हावा । जेथें तेथें नित्य नवा
मूर्खपणें अनुमान गोवा । कांहींच नाहीं ४

नाना उत्तम गुण सत्पात्र । तेचि मनुष्य जगमित्र
प्रगट कीर्ति स्वतंत्र । पराधेन नाहीं ५

राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर
नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ६

नम्रपणें पुसो जाणे । नेमस्त अर्थ सांगो जाणे
बोलाऐसें वर्तो जाणे । उत्तम क्रिया ७

जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न सके त्यासी
धगधगीत पुण्यरासी । महापुरुष ८

तो परोपकार करितचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला
मग काय उणे तयाला । भूमंडळीं ! ९

बहुत जन वाट पाहे । वेळेसी तात्काळ उभा राहे
उणें कोणाचें न साहे । तया पुरुषासी १०

चौदा विद्या, चौसष्ट कळा । जाणे संगीत गायनकळा
आत्मविद्येचा जिव्हाळा । उदंड तेथें ११

सकळांसी नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें
अखंड कोणीयेकाचें उणें । पडोंच नेदी १२

न्यायनीति, भजनमर्यादा । काळ-सार्थक करी सदा
दरिद्रपणाची आपदा । तेथें कैंची ? १३

उत्तम गुणें शृंगारिला । तो बहुतांमध्ये शोभला
प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा १४

जाणता पुरुष असेल तेथें । कलहो कैंचा उठेल तेथें?
उत्तम गुणांविषयीं रिते । ते प्राणी करंटे १५

प्रपंचीं जाणे राजकारण । परमार्थीं साकल्य विवरण
सर्वांमध्यें उत्तम गुण । त्याचा भोक्ता १६

मागें येक पुढें येक । ऐसा कदापि नाहीं दंडक
सर्वत्रांसी अलोलिक । तया पुरुषाची १७

अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करूं नका
जेथें तेथें विवेका । प्रकट करी १८

पाहातां अवघे उत्तम गुण । तयास वाईट म्हणेल कोण?
जैसा आत्मा संपूर्ण । सर्वां घटीं १९

आपल्या कार्यास तत्पर । लोक असती ल्हानथोर
तैसाचि करी परोपकार । मनापासुनी २०

दुसऱ्याच्या दुःखें दुखावें । दुसऱ्याच्या सुखें सुखावे
अवघेचि सुखी असावें । ऐशी वासना २१

उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी
तैसी अवघ्यांची चिंता करी । 'महापुरुष' २२

बहुतांसी वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार
धीर, उदार, गंभीर । 'महापुरुष' २३

जितुके कांहीं उत्तम गुण । तें समर्थांचें लक्षण
अवगुण ते करंटलक्षण । सहजचि जालें २४

**परमार्थी आणि विवेकी । त्याचें करणें माने लोकीं** द. १९-६

परमार्थी आणि विवेकी । त्याचें करणें माने लोकीं
कां जे विवरविवरों चुकी– । पडोंचि नेदी १

कोणास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें
विवेकबळें जन लावावें । भजनाकडे २

परांतर राखायाचीं कामें । बहुत कठीण विवेकवर्मे
स्वेच्छेनें स्वधर्में । लोकराहाटी ३
ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या
संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ४
उत्कट, भव्य तेंचि घ्यावें । मळमळीत अवघेंचि टाकावें
निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ५
अक्षर बरें, वाचणें बरें । अर्थांतर सांगणें बरें
गाणें, वाचणें अवघेंचि बरें । पाठांतर ६
दीक्षा बरी, मैत्री बरी । तीक्ष्ण बुद्धि राजकारणीं बरी
आपणास राखे नानापरी । अलिप्तपणें ७
अखंड हरिकथेचा छंदु । सकळांस लागे नामवेदु
प्रगट जयाचा प्रबोधु । सूर्य जैसा ८
दुर्जनासी राखों जाणे । सज्जनासी निववूं जाणे
सकळांचें मनींचें जाणे । ज्याचें त्यापरी ९
संगतीचें मनुष्य पालटे । उत्तम गुण तात्काळ उठे
अखंड अभ्यासीं लगटे । समुदाव १०
जेथें तेथें नित्य नवा । जनासी वाटे, हा असावा
परंतु लालचीचा गोंवा । पडोंचि नेदी ११
उत्कट भक्ति, उत्कट ज्ञान । उत्कट चातुर्य, उत्कट भजन
उत्कट योग–अनुष्ठान । ठाईं ठाईं १२
उत्कट निःस्पृहता धरिली । त्याची कीर्ति दिगंतीं फांकली
उत्कट भक्तीनें निवाली । जनमंडळी १३
कांहींयेक उत्कटेंवीण । कीर्ति कदापी नव्हे जाण
उगेंचि वणवण हिंडोन । काय होतें ? १४
नाहीं देहाचा भरंवसा । केव्हा सरेल वयसा
प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे ? १५
याकारणें सावधान असावें । जितुकें होईल तितुकें करावें
भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ १६

आपणास जें जें अनुकूळ । तें तें करावें तात्काळ
होई ना त्यास निवळ । विवेक उमजावा १७

विवेकामध्यें सांपडे ना । ऐसें तों कांहींच असे ना
येकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडी १८

अखंड तजविजा चाळण्या जेथें । पाहतां काय उणें तेथें !
येकांतेंवीण प्राणीयाते । बुद्धि कैंची ? १९

येकांतीं विवेक करावा । आत्माराम वोळखावा
येथून तेथवरी गोवा । कांहींच नाहीं २०

**राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे** द. १९-९

ज्ञानी आणि उदास । समुदायाचा ह्व्यास
तेणें अखंड सावकाश । येकांत सेवावा १

जेथें तजविजा कळती । अखंड चाळणा निघती
प्राणिमात्रांची स्थिती–गती । कळों येते २

जरी हा चाळणाचि करी ना । तरी कांहींच उमजे ना
हिसेब्झाडाचि पाही ना । दिवाळखोर ३

जेणें जें जें मनीं धरलें । तें तें आधींच समजलें
कृत्रिम अवघेंचि खुंटलें । सहजचि येणें ४

अखंड राहतां सलगी होते । अतिपरिचयें अवज्ञा घडते
याकारणें विश्रांतीतें । घेतां नये ५

आळसें आळस केला । तरी मग कारभारचि बुडाला
अंतरहेत चुकत गेला । समुदायाचा ६

उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें
अवकाश कैंचा, कृत्रिमें । करावयासी ७

चोर भांडारी करावा । घसरतांच सांभाळावा
गोवा मूर्खपणाचा काढावा । हळूहळू ८

या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता कष्टी
राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ९

नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे
आपणावरी विकल्पाचे गोवे । पडोंच्चि नेदी १०
काटीने काटी झाडावी । झाडावी ते कळों नेदावी
कळकटेपणाची पदवी । असों न द्यावी ११
न कळतां करी कार्य जें, तें । तें काम तत्काळचि होतें
गचगचेंत पडतां तें । चमत्कारें नव्हे १२
ऐकोनी आवडी लावावी । देखोन बळकटचि व्हावी
सलगीनें आपली पदवी । सेवकांमध्यें १३
कोणीयेक काम करतां होतें । न करतां तें मागें पडतें
याकारणें ढिलेपण तें । असोंचि नये १४
जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला १५
अवघ्यांस अवघें कळलें । तेव्हां तें रितें पडलें
याकारणें ऐसें घडलें । न पाहिजे कीं १६
मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें
कित्तेक खलक उगवावे । राजकारणामध्यें १७
बोलके, पैलवान, कळकटे । तयासीच घ्यावे झटे
दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें १८
ग्रामण्य वर्मी सांपडावें । रगडून पीठचि करावें
करूनि मागुती सावरावे । बुडवूं नये १९
खळदुर्जनासी भ्याले । राजकारण नाहीं राखिलें
तेणें अवघे प्रगट जाले । बरेवाईट २०
समुदाव पाहिजे मोठा । तरी तनावा असाव्या बळकटा
मठ करून, ताठा । धरूं नये २१
दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे
सज्जनापरीस आळवावे । महत्त्व देउनी २२
जनामध्यें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट
याकारणें ते वाट । बुझूनि टाकावी २३

गनीमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा
ऐसा पाहिजे की राजा । कैपक्षी परमार्थी २४

तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे
बंडपाषांडाचे वाखे । सहजचि होती २५

हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें
ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये २६

कोठेंचि पडे ना दृष्टी । ठायीं ठायीं त्याच्या गोष्टी
वाग्विलासें सकळ सृष्टी । वेधिली तेणें २७

हुंब्यासी हुंबा लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद २८

धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट
खटनटासी खटनट । अगत्य करी २९

जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मजालसी बरी थाटे
इतुकें होतें, परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ३०

**तितुक्यांचीं अंतरें धरावीं । विवेकें-विचारें भरावीं** द. १९-१०

जेथें अखंड नाना चाळणा । जेथें अखंड नाना धारणा
जेथें अखंड राजकारणा । मनासी आणिती १

सृष्टीमध्यें उत्तम गुण । तितुकें चाले निरूपण
निरूपणेवीण क्षण । रिकामा नाहीं २

चर्चा, आशंका, प्रत्युत्तरें । कोण खोटें, कोण खरें
नाना वक्तृत्वें शास्त्राधारें । नाना चर्चा ३

भक्तिमार्ग विशद कळे । उपासनामार्ग आकळे
ज्ञानविचार विवळें । अंतर्यामीं ४

वैराग्याची बहु आवडी । उदासवृत्तीची गोडी
उदंड उपाधी तरी सोडी । लागोंच नेदी ५

प्रबंधाचीं पाठांतरें । उत्तरासी संगीत उत्तरें
नेमक बोलतां अंतरें । निववी सकळांचीं ६

आवडी लागली बहुजना । तेथें कोणाचें कांहीं चाले ना
दळवट पडिला, अनुमाना । येईल कैसा ? ७
उपासना करूनिया पुढें । पुरवले पाहिजे चहूंकडे
भूमंडळीं जिकडे तिकडे । जाणती तया ८
जाणती परी आढळे ना । काय करितो तें कळे ना
नाना देशींचे लोक नाना । येऊन जाती ९
तितुक्यांचीं अंतरें धरावीं । विवेकें विचारें भरावीं
कडोविकडीचीं विवरावीं । अंतःकरणें १०
किती लोक ते कळे ना । किती समुदाव आकळे ना
सकळ लोक श्रवणमनना । मध्यें घाली ११
फड-समजाविसी करणें । गद्यपद्य सांगणें
परांतरासी राखणें । सर्वकाळ १२
ऐसा ज्याचा दंडक । अखंड पाहाणें विवेक
सावधापुढें अविवेक । येईल कैसा ? १३
जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळू सिकवावें
शाहाणे करूनि सोडावे । बहुत जन १४
परोपकारी सिकवणें । आडणुका सांगत जाणे
निवड करूनी सोडणें । निःस्पृहासी १५
होईल तें आपण करावें । न होतां जनाकरवीं करवावें
भगवद्भजन राहावें । हा धर्म नव्हे १६
आपण करावें, करवावें । आपण विवरावें, विवरवावें
आपण धरावें, धरवावें । भजनमार्गासी १७
जुन्या लोकांचा कंटाळा आला । तरी नूतन प्रांत पाहिजे धरला
जितुकें होईल तितुक्याला । आळस करूं नये १८
देहाचा अभ्यास बुडाला । म्हणजे महंत बुडाला
लागवेगें नूतन लोकांला । शाहाणे करावें १९
उपाधींत सांपडो नये । उपाधीस कंटाळो नये
निसुगपण कामा नये । कोणी येकविषयीं २०

धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला
नाना बुद्धि शक्ताला । म्हणोनी सिकवाव्या २१
व्याप होईल तों सहावें । व्याप सहातां उठोनि जावें
आनंदरूप फिरावें । कोठेंतरी २२
उपाधीपासून सुटला । तो निःस्पृहपणें बळावला
जिकडे अनुकूल तिकडे चालला । सावकाश २३
कीर्ति पाहतां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाहीं
केल्यावीण कांहींच नाहीं । कोठेंतरी २४
आधींच तकवा सोडला । मध्येंच धिंवसा सांडिला
तरी संसार हा सेवटाला । कैसा पावे ? २५
संसार मुळींच नासका । विवेकें करावा नेटका
नेटका करिता, फिका । होत जातो २६
ऐसा याचा जिनसाना । पाहातां कळो येतें मना
परंतु धीर सांडवा ना । कोणी येके २७

●●●

। जय जय रघुवीर समर्थ ।

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
दि: ..................
दि: ..................

| श्रीराम |

# उपसंहार

## १. आत्माराम

**वन्दना :** जयाचेनि वेदशास्त्रें पुराणें । जयाचेनि नाना निरूपणें
जयाचेनि सुख लाधणें । शब्दीं निःशब्द १
जे शब्दांसी आकळे ना । शब्देंवीण तें कळे ना
कळे ना ऐसेंहि घडे ना । जये स्वरूपीं २
ऐसें सर्वत्र संचलें । तर्का न जाय अनुमानलें
तें जयेचेनि प्राप्त जालें । आत्मरूप ३
नमन तियेचे निजपदा । माया वाग्देवी शारदा
जिचेनि प्रवर्तती संवादा । संत महानुभाव ४
आतां नमस्कारीन राम । जो योग्याचें निजधाम
विश्रांतीचा निजविश्राम । जये ठायीं ५
जो नांवरूपावेगळा । जो मायेहून निराळा
जेथें जाणीवेचि कळा । सर्वथा न चले ६
जेथें भांबावला तर्क । जेथें पांगुळला विवेक
तेथें शब्दाचें कौतुक । केंवीं घडे ? ७
जयाकारणें योगी उदास । वनवासी फिरती तापस
नाना साधनें सायास । ज्याकारणें करिती ८
ऐसा सर्वात्मा श्रीराम । सगुण, निर्गुण, पूर्णकाम
उपमाचि नाहीं निरुपम । रूप जयाचें ९

**उपदेश :** 'अरे ! तूं कोण, कोणाचा ? । कोठून आलासी, कैंचा ?'
ऐसा विचार पूर्वींचा । घेईं बापा १०
अरे ! तुवां जन्मांतर घेतलें । काय मानितोसी आपुलें !
ऐसें तुवां विचारलें । पाहिजे आतां ११
तूं समर्थाचें लेकरूं । अभिमानें घेतला संसारू
तो टाकितां, पैलपारू । पावसी बापा १२

ईश्वरापासोनि जालासी । परंतु त्यास चुकलासी
म्हणोनि हें दुःख भोगिसी । वेगळेपणें १३

**माया सोडा :** नाशीवन्त तितका मळ । तुवा त्यजावा अमंगळ
तो गेलिया तूंच सकळ । आहेसी बापा ! १४
नाशिवन्त तूं जाण माया । मायीक जाईल विलया
ते मायाचि प्राणसखया । ऐक सांगतों १५
' अहं ' ऐसें जें स्फुरण । तेंचि मायेचें लक्षण
मायेपासून त्रिगुण । गुणांपासोनि भूतें १६
येक माया दो ठायीं वांटली । प्रकृति आणि पुरुष जाली
ऐसी दो दिवसांची बोली । येकचि परवा १७
जीव, शिव आणि ईश्वर । हाहि मायेचा विस्तार
शिवरूप विश्वंभर । अवघी माया १८
अरे ! जें जें मनास अनुभविलें । तें तें माईक नाथिलें
तितुकें तुवां टाकिलें । पाहिजे स्वानुभवें १९
सकळहि माया नाथिली । स्वरूपीं नाहीं राहिली
एवं ' नाहीं ' हे बोली । माया जाणावी २०
सकळ मायेचें रूप जालें । त्यांत तुझेंहि रूप आलें
इतुकेंहि आपुलें । मानूं नको २१
आतां सांगतों तुज खूण । त्वां नाशिवन्त केलें मदर्पण
आतां करिशी हलकेपण । तरी मज शब्द नाहीं २२
संग तितका नाशिवन्त । निसंग शब्द अशाश्वत
म्हणोनि संग-निसंगातीत । होवोनि राहें २३
' तो मी आत्मा ' ऐसा हेतू । हें नाशिवन्त टाकी तूं
'उन्मनी' अवस्थेचा प्रांतू । तें स्वरूप तुझें २४
ऐसा जो अनुभव जाला । तोहि नाशिवन्तामध्यें आला
अनुभवावेगळा राहिला । तो तूं आत्मा २५
स्वरूप निर्मळ निघोट । स्वरूप शेवटा शेवट
जिकडे तिकडे नीट । सन्मुख आहे २६

जें सकळांहूनि मृदु कोंवळें । सकळांहून अत्यंत जवळें
जें सकळांमध्यें परी निराळें । अलिप्तपणें २७
बोलणें तितकें व्यर्थ जातें । बोलतां अनुभवा येतें
अनुभव सांडितां तें । आपण होइजे २८
येकीं अनेक मुराले । येकपण अनेकांस वेगळें
उपरीं जें निःसंग उरलें । स्वरूप तें तुझें २९

**साधन** : नित्यनेम श्रवण-मनन । त्याऐसें नाहीं साधन
म्हणोनि हें नित्यनूतन । केलें पाहिजे ३०
जे ग्रंथीं जो विचार । वृत्ति होय तदाकार
म्हणोनि निरूपण सार । भक्ति–ज्ञान–वैराग्य ३१
अभिन्न ज्ञाता तोचि मान्य । साधक साध्य होतां धन्य
वेगळेपणें वृत्तिशून्य । पावती प्राणी ३२
हेंचि जाण भक्तीचें फळ । जेणें तुटे संसारमूळ
निःसंग आणि निर्मळ । आत्मा स्वयें ३३
संगातीत म्हणजे मोक्ष । तेथें कैंचें देखणें लक्ष
लक्ष आणि अलक्ष । दोहोंसी ठाव नाहीं ३४
प्राप्त जालें अद्वैतज्ञान । अभिन्नपणें जें विज्ञान
तेंचि जाण आत्मनिवेदन । जेथें ' मी ' नाहीं ३५

**स्वरूपस्थिति** : ' मी मानवी किंकर । येकायेकीं जालों विश्वंभर
संदेह तुटला थोर । यातायाती ३६
संसाराहून सुटलों । मीच सकळ देहो विस्तारलों
जन्मदुःखापासूनि मुकलों । सर्वांभूतीं ३७
मी करूनि अकर्ता । भोगूनि अभोक्ता
मजमाजीं वार्ता । मीपणाची नाहीं ' ३८
ऐसें जें कां निजबीज । गाळीव मीपणाचा फुंज
तो मुरालिया सहज । सिद्धचि आहे ३९
बहुतां जन्मांच्या शेवटीं । जाली स्वरूपाची भेटी
येका भावार्थासाठीं । परब्रह्म जोडलें ४०

संदेह हेंचि बंधन । निःशेष तुटलें तेंचि ज्ञान
निःसंदेहीं समाधान । आपैसे होय ४१

● ●

## २. रामदास्य

**गोदातटींच्या रामोपासकांना कृष्णातीरवासी रामदासांचा निरोप.**

जनस्थान गोदातटीं । परमपावन पंचवटी
जेथें पडली कृपादृष्टी । रघूत्तम रामाची १
तेथील राम–उपासक । त्यांच्या सेवकांचा सेवक
तुम्हांमध्यें मी येक रंक । सरते करावें २
तुम्ही निकट देवापासी । आणि मी पडलों दुरी देसीं
कृपाळूपणें रघुनाथासी । माझी करुणा भाकावी ३
" म्हणावें, ' ते अनाथ । समर्था, तूं दिनानाथ ! '
म्हणावें, ' ते परमकिंकर । देवा, तूं करुणाकर ! ' ४
म्हणावें, ' ते पतित । तूं पतितपावन ! '
म्हणावें, ' ते निराधार । आधार इच्छी ' ५
सत्य-मिथ्या तुझा म्हणवी । त्याची चिंता असों द्यावी "
ऐसी करुणा भाकावी । नानाप्रकारीं ६
' तुम्हा दासांमध्यें मी हीन । माझे कोट्यवधी अवगुण
परंतु आहे अनन्य । सेवक रघुनाथाचा ७
पुढें म्यां ऐसेंचि असावें । माझें मन न पालटावें '
इतुकें देवासी मागावें । तुम्ही बंधुवर्गीं ८
प्रत्यहीं माझा नमस्कार । देवासी करावा निरंतर
मजकारणें शरीर । इतुकें कष्टवावें ९
बाळ-वृद्ध-नर-नारी । सकळ भक्त कुमार–कुमारी
समस्तांसी नमस्कारी । ' कृष्णातीरवासी ' १०

शुद्ध उपासना, विमळ ज्ञान । वीतराग आणि ब्राह्मण्यरक्षण
गुरुपरंपरेचें लक्षण । शुद्धमार्ग ११
ऐसें पंचधा बोलिलें । इतुकें पाहिजे यत्नें केलें
म्हणजे सकळही पावलें । म्हणे दासानुदास १२

## तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य

काया, वाचा, मनें यथार्थ रामीं रमणें । तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य १
कामक्रोध दवडणें, मद-मत्सर दंडणें । तरीच... २
परस्त्री नपूंसक होणें, परद्रव्यीं पोळणें । तरीच... ३
जैसें मुखीं बोलणें, तैसी क्रिया करणें । तरीच... ४
' रामदास ' म्हणे, निर्गुण सुख लाधणें । तरीच... ५

## रामदासी बाणा–श्रीरामावर दृढविश्वास

आम्हां नाहीं चाड ते कोणी येकाची । दृढ राघवाची कास धरूं १
कास धरूं जेणें पावनचि केलें । तेथें माझें जालें समाधान २
समाधान जालें प्रत्ययासी आलें । धन्य तीं पाउलें राघवाचीं ३
राघवाचीं पदें मानसीं धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रें ४
हेळामात्रें मुक्त करीन या जना । तरीच म्हणवीन राघवाचा ५
राघवाचा दास मी जालों पावन । पतीत तो कोण उरों शके ? ६
उरों शके ऐसें कल्पांतीं घडे ना । जो कोणी पुसे ना त्यासी उणे ७
आम्हां नाहीं उणें राघवाच्या गुणें । श्रीदचि राखणें पावनाचें ८
कितीयेक जन ज्ञानें उद्धरीलें । कृतकृत्य जालें तात्काळची ९

## रघुनाथध्यान — जुना दासबोध-२

ऐसा सर्वात्मा राजाधीश । सकळ पाहती सावकाश
तेथें पिसाट रामदास । उभा असे दीनरूप १
रामचंद्रा, तुझा वियोग । ऐसा नको रे प्रसंग
तुजकारणें सर्व संग । त्यक्त केला २
रामा, तुझिये स्वामीपणें । मी हें ब्रह्मांड मानी ठेंगणें
स्वामी, तुजविण कोण जाणे । अंतर आमुचें ? ३

तुज समुदाय दासांचा । आम्हांसि स्वामी आणिक कैंचा ?
तुजकारणें जीवलगांचा । संग सोडला ४
सगुण-रघुनाथ-मुद्दल । माझें इतुकेंचि भांडवल
कास धरूनि टाकीन पैल- । पार भवाचा ५

## समर्थ रामाचें गुणगान

येकवचनी देव येक । जेणें सोडविले देव अनेक
सेवाहीन मी सेवक । त्याचा म्हणवि १
समर्थें अंगिकार केला । नाना संकटीं रक्षिला
त्याचिया अन्नें पिंड वाढविला । जन्मवरी २
जें जें मनें अभिलाषिलें । तें तें समर्थें पुरविलें
मज दीनास वाढविलें । मर्यादेवेगळें ३
समर्थानें समर्थ करावें । तरीच समर्थ म्हणवावें
त्रैलोक्यास पडिलें ठावें । सामर्थ्य ज्याचें ४
अजिक्य रजनीचर माजले । देव कारागृहीं घातले
म्हणोनि वैकुंठाहूनि पातले । देव सोडवावया ५
देवमात्र जाजावला । म्हणोनी कैंपक्षी पातला
भुवन-कंटक निर्दाळिला । दशमुख शत्रू ६
जिहीं त्रैलोक्य जिंकिलें । त्यास मर्कटाहातीं मारविलें
भुवनत्रय आनंदविलें । दाशरथीनें ७
देवांचे बंद सोडविले । देव स्वस्थानीं स्थापिले
प्राणीमात्र आनंदविले । रामराजें ८
बिभीषणास दिधली लंका । सुरवरांची फिटली शंका
समर्थें रामदासरंका । नवाजिलें ९

## रामकर्ता, रामच भोक्ता — मानपंचक

कास या रघुनाथाची । धरितां सुख पावलों
इतरे कष्टती प्राणी । थोर संसार–सांकडीं १
सांकडीं तोडिलीं माझीं । राघवें करुणालयें
पूर्वीच तुटली माया । दुःखशोक विसंचिला २

कूळ या जगदीशाचें । धन्य वंश भूमंडळीं
आपलीं वाटती सर्वें । धन्य तूं गा रघोत्तमा ! ३
देव हा सर्वांतरात्मा । वात हा त्याजपासुनी
वातसूत हनुमंतू । रामसेवक हा जनीं ४
शीव तो राघवा ध्यातो । राम ध्यातो सदाशिवा
सख्यत्वें चालती दोघे । प्रसिद्ध ठाउकें जनीं ५
राम-उपासना ऐसी । ब्रह्मांडव्यापिनी पाहा
रामकर्ता, रामभोक्ता । रामरूप वसुंधरा ६
नित्य दर्शन देवाचें । चालतां बोलतां घडे
नाना लघु देहधारी । भूमी पाहोनि चालणें ७
विषयो जाहला देवो । नाना सूखें विलासवीं
नाना दुःखें देव कर्ता । त्रासकें शरीरें धरी ८
शत्रु–मित्र देव जाला । सुख-दुःखें परोपरी
येकासी हंसवी देवो । येकासी रडवीतसे ९
शब्दज्ञान सरों आलें । ज्ञान सर्वत्र संचलें
जाणती जाणते ज्ञानी । मौन्यगर्भ विचारणा १०

## तो राम आम्हांला देतो ।

आम्ही काय कुणाचें खातों रे, तो राम आम्हांला देतो रे
बांधिले घुमट किल्ल्याचे तट । तयाला फुटती पिंपळ-वट
तेथें कोण लाविंतो मोट । बुडाला पाणी घालतो ? तो राम... १
खडक फोडितां सजीव रोडकी । पाहिली सर्वांनीं बेडकी
सिंधु नसतां तियेचे मुखीं । पाणी कोण घालितो ? तो राम... २
पहा रे पाहा मातेचिये स्तनीं । चिंतितां मांसमलखाणी
तिथें विमल दुग्ध घालोनी । कोण पोसितो ? तो राम... ३
नसतां पाण्याचे बुडबुडे । सदासर्वदा गगन कोरडें
'दास' म्हणे जीवन चहुंकडे । पाडुनि सडे पीक उगवितोतो राम... ४

## विश्वाचा मायबाप–श्रीराम

वैभव-प्रपंचीं वेंचावें । आणि अंतीं रामासी सरावें
रामें तयासी सांभाळावें । कृपाळूपणें १

प्राणी क्षीण जाला देहीं । वेढिला यमदूतीं तेही
तेव्हां सोडविता नाहीं । एका श्रीरामावांचुनी २
जेव्हां वैभवहीन व्हावें । जीवलगीं वोसंडावें
ते समयीं अपंगावें । कृपाळूपणें राघवें ३
रामासी कोणीच स्मरे ना । परी राम माझा विसंभे ना
गुण-दोष विचारी ना । मायबाप विश्वाचा ४
राम जीवींचा जिव्हाळा । राम मनींचा कोंवळा
राम जाणे अंतर्कळा । निज दासाची ५
समर्थें ज्याचा अंगिकार केला । कोण बोलों शके तयाला ?
माझ्या रामाशी जो शरण गेला । तो कळिकाळासी वंद्य ६

## राघवाची कास कधींही सोडणार नाहीं.

जठरीं लागो क्षुधा होत नाना आपदा । भक्ति प्रेम कदा न संडी सत्य १
शब्द न फुटे तरी चिंतीन अंतरीं । भक्ति-प्रेम परी न संडी सत्य २
नानापरी आघात चिरकाळ होत । भक्ति-प्रेमामृत न संडी सत्य ३
दाहूं वडवानल अथवा दंशूं काळ । भक्ति-प्रेमबळ न संडी सत्य ४
आतांच हा देह राहो अथवा जावो । भक्ति-प्रेमभावो न संडी सत्य ५
म्हणे ' रामदास ' वरी पडो आकाश । राघवाची कास न सोडी सत्य ६

## मन रात्रंदीस राघवीं असावें

रात्रंदीस मन राघवीं असावें । चिंतन नसावें कांचनाचें १
कांचनाचें ध्यान, परस्त्रीचिंतन । जन्मासी कारण हेची दोन्ही २
दोन्ही नको धरूं, निंदा नको करूं । तेणें हा संसार तरशील ३
नामरूपातीत जाणावा अनंत । दास म्हणे संत-संग धरा ४

## माझा समर्थ स्वामी श्रीराम

छत्रसिंहासनीं अयोध्येचा राजा । नांदतसे माझा मायबाप १
माझा मायबाप त्रिलोकीं समर्थ । सर्व मनोरथ पूर्ण करी २
पूर्ण प्रतापाचा कैवारी देवांचा । नाथ अनाथांचा स्वामी माझा ३
स्वामी माझा राम योगीयां विश्राम । सांपडलें वर्म थोर भाग्यें ४

थोर भाग्य ज्याचें राम त्याचे कुळीं । संकटीं सांभाळी भावबळें ५
भावबळें जीहीं धरिला अंतरीं । तया क्षणभरी विसंभे ना ६
विसंभे ना कदा आपुल्या दासासी । रामी रामदासी कुळस्वामी ७

## सर्व कांहीं श्रीरामच

दासाची संपत्ती राम सीतापती । जीवाचा सांगाती राम येक १
राम येक माता, राम येक पिता । राम येक भ्राता सहोदर २
सहोदर, विद्या, वैभव, कांचन । सर्व हा स्वजन राम येक ३
राम येक स्वामी, राम हा कैवारी । लाभ या संसारीं राम येक ४
राम येक ज्ञान, राम येक ध्यान । राम समाधान रामदासीं ५

## राम व दास एकच

दुष्टांचा संहार धर्माची स्थापना । जानकीजीवना राघवासी १
विबुधांचा राव आला सोडवणें । आम्हां तेणें गुणें जोडी जाली २
वैकुंठासी राम गेले विश्रांतीये । जनांसी उपाये हनूमंत ३
हनुमंतीं राम आहे निश्चयेसीं । रामीं-रामदासीं ऐक्यभाव ४

## पांगुळ— राघवाचा धर्म जागो

भरत गा खंडामाजीं । शरयूतीरीं बा, गांव
धर्माचें नगर तेथें । राज्य करी रामराव १
पांगुळां पाय देतो । देव जानकीचा नाथ
जाईन मी तया ठाया । देवा उत्तम तो ठाव २
राघवाचा धर्म जागो । सर्व अधर्मी भागो
अज्ञान निरसोनिया । विज्ञानीं लक्ष लागो ३
'मी' पणाचे मोडले पाय । म्हणउनि पांगुळ जालों
'तूं-पणाची कीर्ती देई' । ऐकोनियां शरण आलों ४
मी-तूं पण निरसी माझें । भजनभिंतीवरि बैसलों
प्रेम-फडकें पसरोनिया । कृपादान मागों आलों ५
जनीं एक तूंचि दाता । म्हणुनी आलों मागावया
मागणें निरसे जेणें । ऐसें दे गा रामराया ६

नवविधा दुभतें देई । भाव-हलगा बैसावया
ज्ञान-काठी देई करीं । वैराग्य-वोल पांघराया ७
दासी-हातीं देवव्रीसी । तें मी नेघे सर्वथा
द्वैतदान नेघे जाण । दोन वेळें आणितां ८
अपूर्णता देऊं नको । पूर्ण करी निःकामता
आपणा ऐसें दान देई । तूं तरी इच्छेचा दाता ! ९
तुझ्या कृपेचा कांबळा देई । मज पांगुळाकारणें
माया-मोहो हींव-वातें । तें हें निवारे जेणें १०
निष्कामता-भाकर देई । काम-क्षुधा हारे जेणें
बोधाचें ताक पाजी । शब्द खुंटे धालेपणें ११
रामदास-पांगुळासीं । रामें दिधलीया दान
घेणेंचि निरसिलें । कैची मागण्याची खूण ? १२
देणें घेणें निरसोनिया । पूर्ण केलें परिपूर्ण
दाता ना याचक तेथें । सहजीं सहज संपूर्ण १३

**ब्रह्मपिसा** ( शिष्यांची परीक्षा पाहाण्यासाठीं स्वामी हातीं खड्ग घेऊन शिष्यमंडळीवर धावले, त्या प्रसंगावर केलेली रचना. )

पळा, पळा ब्रह्मपिसा येतो जवळी । रामनामें हाक देऊनी डोई खांजोळी १
वृत्ति-शेंडी बंधनेंवीण सदा मोकळी । संसाराची धुळी करूनि अंगीं उधळी २
प्रपंच-उकरड्यावर बैसणें ज्याचें । भोंवता पाळा फिरून पाहे जन अविद्येचे ३
धावूनि बैसे, उठोनि पळे, दृश्य वाटतें अदृश्याचें । राहाणें घेतां न चले कोणाचें ४
औट हात गज नवा ठायीं वितुळले । दहावा ठाव म्हणोनि तेथें ठिगळ दीधलें ५
ऐसें मन हें चंचल वृत्तींत गुंतलें । परतोनि म्हणोनि जिवेंचि मारिलें ६
मीपणाचें शहाणपण जळालें माझें । कोण वाहे देहबुद्धिवस्त्राचें ओझें ? ७
न लगे आम्हां मानापमानाचें ओझें । तुझी शुद्धि घेतां गेलें मीपण माझें ८
आम्ही जन धन देखोनी वार करितों । आपणाऐसें म्हणउनी उमज धरितों ९
आतें भेटों येती त्यांस वेड लावीतों । रामी रामदास ऐसें अबद्ध बोलतों १०

**अद्‌भुत भूत-प्रभुरामराय.**

[ रामदास घर सोडून गेले ते शके १५६६ मध्यें जांबेस आईकडे परत आले. तेव्हां ‘ बाळा, तुला कोणतें भूत लागलें आहे ? ’ असें मातेनें विचारलें असतां तिला रामदासांनीं उत्तर दिलें तें : ]

होतें वैकुंठीचे कोनीं । शिरलें अयोध्याभुवनीं
लागे कौसल्येचे स्तनीं । तें चि भूत गे माये १
जातां कौशीक-राऊळीं । अवलोकितां भयंकाळी । ताटिका ते छळोनि मेली... २
मार्गी जातां वनांतरीं । पाय पडला दगडावरी । पाषाणाची जाली नारी... ३
जनकाचे अंगणीं गेलें । शिवाचें धनु भंगलें । वैदेही–अंगीं संचरलें... ४
पितयाचे भाकेसी । कैकयीचे वचनासी । मानुनी गेले अरण्यासी... ५
चौदा संवत्सर तापसी । अखंड हिंडे वनवासी । सांगाते भुजंग पोसी... ६
सुग्रीवाचें पाळण । वालीचें निर्दाळण । तारी पाण्यावरी पाषाण... ७
रक्षी मरणीं बिभीषण । मारी रावण-कुंभकर्ण । तोडी अमरांचें बंधन... ८
वामांगीं स्त्रियेला धरलें । धावूनि शरयूतीरा आले । तेथें भरतासी भेटले... ९
सर्वां भूतांचें हृदय । नाव त्याचें 'रामराय'
राम-दास नित्य गाय । तेंचि भूत गे माये !

## 'हरे राम' हा मंत्र सोपा जपा रे !

नको शास्त्र-अभ्यास व्युत्पत्ति मोठी । जडे गर्व ताठा अभीमान पोटीं
कसा कोणता नेणवें अ-जपा रे । 'हरे राम' हा मंत्र सोपा जपा रे १
तुला ही तनू मानवी प्राप्त जाली । बहू जन्मपुण्यें फळालागिं आली
तिला तूं कसा गोंविसी वीषयीं रे ॥हरे राम... २
दुराशा नको रे परस्त्री-धनाची । नको तूं करूं नीच सेवा जनाची
पराधीन कैसा भला दीससी रे । हरे राम... ३
बहू इच्छिसी कीर्ति-सन्मान कांहीं । सुखाचा तरी अंतरीं लेश नाहीं
फुकाचें मुखीं नाम तें का न ये रे ? । हरे राम... ४
तपस्वी, मनस्वी भले पार गेले । दुजी सृष्टिकर्ते असे थोर मेले
चिरंजीव कल्पायु गेले किती रे । हरे राम... ५
म्हणे देश माझे भुमी गांव वाडे । शिबीकासनीं बैससी उंच लोडे
कशा उंच तूं मंचकीं लोळसी रे । हरे राम... ६
नको वाउगी चावटी या मनासी । हरी-चिंतनीं ध्यास लावी मनासी
अमोलीक हा काळ जातो वृथा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ७

# ३. करुणा-स्तोत्र

## १. विमल विवेक

गजमुख सुखदाता मानसीं आठवावा । मग विमल मतीचा योग पूढें करावा
सुरवर, मुनि, योगी वंदिती धुंडिराजा । सकळ सफळ विद्या यावया आत्मकाजा १
खळखळ खळयोगें वाउगी होत आहे । तळमळ मळ पोटीं सज्जनातें न साहे
मळमळ करिताहे ते कदाही न राहे । परि विमळविवेकें कल्पना स्थीर राहे २
चटपट विषयांची सर्व सोडून द्यावी । वटवट न करावी भक्तिभावें करावी
खटपट हट्योगें कामना ते नसावी । झटपट श्रवणाची सार चित्तीं वसावी ३
गणपती मति दे मज लाघवी । जनकजापतिचा लघुसा कवी
विनवितों करुणालयकारणा । परम सुंदर दे मज धारणा ४
रघुपति-पद-युग्मीं लीन भावें असावें । रविकुळ टिळकाचें नाम वाचे वसावें
श्रवणमनन भावें आदरेसी करावें । परम-सुखसमाधी संतसंगें तरावें ५
तुजविण शिण जाला धाव रे रामराया । कठिण दिवस जातो तापली सर्व काया
सकळ विकळ गात्रें अवस्था लागली रे । तुजविण जगदीशा बुद्धि हे भंगली रे ६

## २. मागणें

रघुविरभजनाची मानसीं प्रीति लागो । रघुविरस्मरणाची अंतरीं वृत्ति जागो
रघुविरचरणाची वासना वास मागो । रघुविरगुण गातां वाणि हे नित्य जागो ७

## ३. श्रीरामाचे उपकार

जनीं भक्ति नाहीं मनीं भाव नाहीं । मला युक्ति ना बुद्धि कांहींच नाहीं
कृपाळूपणें राज्य रंकासि द्यावें । समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ? ८
'दिनानाथ' हें ब्रीद त्वां साच केलें । म्हणे दास भक्तांसि रे उद्धरीलें
सुखें सांडणें या देहाचें करावें । समर्था ! तुझें काय उत्तीर्ण व्हावें ? ९

## ४. श्रीरामाचें दर्शन

नव्हे राजयोगी, महद्भाग्य त्यागी । उदासीन जो वीतरागी विरागी
जनस्थान गोदातटीं वास केला । प्रभू देखिला 'दास' संतुष्ट जाला १०
लिळाविग्रही, देव ब्रह्मादिकांचा । सदा बोलणें-चालणें सत्य वाचा
जया चिंतितां चंद्रमौळी निवालाभू । प्र देखिला 'दास' संतुष्ट जाला ११

### ५. प्रार्थना

रघूनाथदासा कल्याण व्हावें । अती सौख्य व्हावें आनंदवावें
उद्वेग नासो, वर शत्रु नासो । नानाविलासें मग तो विलासो १२
कोडें नको रे कळहो नको रे । कापट्य-कर्मीं सहसा नको रे
निर्वाणचिंता निरसो अनंता । शरणागता दे बहु धातमाता १३
अ-जयो न हो रे, जयवंत हो रे । अपदा नको रे बहु-भाग्य हो रे
श्रीमंतकारी, जनहीतकारी । परऊपकारी हरि दास तारी १४

### ६. उदासीन हा काळ कोठें न कंठे

समाधान साधूजनाचेनि योगें । परी मागुतें दुःख होतें वियोगें
घडीनें घडी शीण अत्यंत वाटे । उदासीन हा काळ... १५
घरें सुंदरें सौख्य नानापरीचें । परी कोण जाणेल हें अंतरींचें
मनीं आठवीतांचि तो कंठ दाटे । उदासीन हा काळ... १६
बळें लावितां चित्त कोठें जडे ना । समाधान तें कांहिं केल्या घडे ना
नव्हे धीर नैनी सदा नीर लोटे । उदासीन हा काळ... १७
अवस्था मनीं लागली काय सांगों । गुणीं गुंतला हेत कोणासि मागों ?
बहूसाल भेटावया प्राण फूटे । उदासीन हा काळ... १८
कृपाळूपणें भेट रे रामराया । वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया
जनामाजिं लौकीक हाही न सूटे । उदासीन हा काळ... १९
समर्था मनीं सांडि माझी नसावी । सदासर्वदा भक्तचिंता असावी
घडे ना तुझा योग हा प्राप्त खोटें । उदासीन हा काळ... २०
म्हणे 'दास' मी वास पाहे दयाळा । रघूनायका भक्तपाळा भुपाळा
पाहावें तुला हें जिवीं आर्त मोठें । उदासीन हा काळ कोठें न कंठे २१

### ७. तुजवीण रामा ! मज कंठवे ना

तुझिया वियोगे जीवित्व आलें । शरीर-पांगें बहु दुःख जालें
अज्ञान, दारिद्य माझें सरे ना । तुजवीण रामा ! मज कंठवे ना २२
जडली उपाधी अभिमान साधी । विवेक नाहीं बहुसाल बाधी
स्वामी-वियोगें पळही गमे ना । तुजवीण रामा मज... २३
विश्रांति देहीं अणुमात्र नाहीं । कुळाभिमानें पडिलों प्रवाहीं
स्व-हीत माझें होतां दिसेना । तुजवीण... २४

विषयी जनानें मग लाजवीलें । प्रपंचसंगें आयुष्य गेलें
समयीं बहुक्रोध शांती घडे ना । तुजवीण... २५
निरूपणीं हे सद्वृत्ती होते । स्थळत्याग होतां सर्वेंचि जाते
काये करूं रे ! क्रीया घडे ना । तुजवीण... २६
संसारसंगें बहु शीणलों रे । कारुण्यसिंधू मज सोडवीं रे
कृपाकटाक्षें सांभाळि दीना । तुजवीण... २७
आम्हा अनाथा तूं येक दाता । संसारचिंता चुकवी समर्था
दासा मनीं आठव वीसरे ना । तुजवीण... २८

## ८. रघुनायका ! मागणें हेंचि आतां

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी । अती आदरें सर्व सेवा करावी
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां । रघूनायका मागणें हेंचि आतां २९
तुझें रूपडें लोचनीं म्यां पाहावें । तुझे गुण गातां मनासी रमावें
उठी आवडी भक्तिपंथेंचि जातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ३०
मनीं वासना भक्ति तूझी करावी । कृपाळूपणें राघवें पूरवावी
वसावें सदा अंतरीं नाम घेतां । रघूनायका मागणें हेंचि आतां ३१
सदा सर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा
नुपेक्षी कदा गूणवंता अनंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ३२
नको द्रव्य-दारा नको येरझारा । नको मानसीं ज्ञानगर्वें फुगारा
सगूणीं मला लावि रे भक्तिपंथा । रघूनायका मागणें हेंचि आतां ३३
मनीं कामना कल्पना ते नसावी । कुबुद्धी, कुडीं वासना नीरसावी
नको संशयो तोडि संसार व्यथा । रघूनायका मागणें हेंचि आतां ३४
समर्थापुढें काय मागों कळे ना । दुराशा मनीं बैसली हें ढळे ना
पुढें संशयो नीरसी सर्व चिंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ३५
ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तासि रे उद्धरावें
सुटे ब्रीद आम्हांसि सांडून जातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ३६

## ९. धाव रे धाव आतां

अनुदिन अनुतापें तापलों रामराया । परम दिनदयाळा, नीरसीं मोहमाया
अचपळ मन माझे नावरे आवरीतां । तुजविण शिण होतो धाव रे धाव आतां ३७

भजनरहित रामा, सर्वही जन्म गेला । स्वजन जन-धनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला
रघुपति मति माझी आपुलीशी करावी । सकळ त्यजुनि भावें कास तूझी धरावी ३८
विषयजनितसूखें सौख्य होणार नाहीं । तुजविण रघुनाथा वोखटें सर्व कांहीं
रविकुळ-टिळका रे हीत माझें करावें । दुरित दुरि हरावें स्वस्वरूपीं भरावें ३९
तनु-मन-धन माझें राघवा रूप तूझें । तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें
प्रचळित न करावी सर्वथा बुद्धि माझी । अचळ भजन-लीळा लागली आस तूझी ४०
चपळपण मनाचें मोडतां मोडवे ना । सकळ स्वजनमाया तोडितां तोडवे ना
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरींचा । म्हणउनि करुणा हे बोलतों दीन वाचा ४१
जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी । मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं
तळमळ निववी रे राम कारुण्यसिंधू । षड्रिपुकुल माझें तोडि याचा विरोधू ४२
सबळ जनक माझा राम लावण्यपेटी । म्हणउनि मज पोटीं लागली आस मोठी
दिवस गणित बोटीं प्राण ठेवूनि कंठीं । अवचट मज होतां भेटि घालीत मीठी ४३
जननिजनकमाया लेकरूं काय जाणे ? । पय न लगत मूखें हाणता वत्स नेणे
जलधरकण-आशा लागली चातकासी । हिमकर अवलोकी पक्षिया भूमिवासी ४४
तुजविण मज तैसें जाहलें देवराया । विलग विषमकाळीं तूटली सर्व माया
सकळजन सखा तूं स्वामि आणीक नाहीं । विषय-वमन जैसें त्यागिलें सर्व कांहीं ४५
सुखसुख म्हणतां हें दुःख ठाकूनि आलें । भजन सकळ गेलें चित्त दुश्चीत जालें
भ्रमित मन कळे ना हीत तें आकळे ना । परम कठिण देहीं देहबुद्धी वळे ना ४६
उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं । सकळ भ्रमविरामीं राम विश्रामधामीं
घडि घडि मन आतां रामरूपीं भरावें । रविकुळटिळका रे आपुलेंसें करावें ४७

## १०. तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों

असंख्यात रे भक्त होऊनि गेले । तिहीं साधनांचे बहू कष्ट केले
नव्हे कार्यकर्ता भुमीभार जालों । तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ४८
सदा प्रेमराशी तयां भेटलासी । तुझ्या दर्शनें स्पर्शनें सौख्यराशी
अहंता मनीं शब्दज्ञानें बुडालों । तुझा दास मी... ४९
किती योगमूर्ती किती पुण्यमूर्ती । किती धर्मसंस्थापना अन्नशांती
पस्तावलों कावलों तप्त जालों । तुझा दास मी ... ५०

## ११. समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें ?

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं । नसे प्रेम हें राम विश्राम नाहीं
असा दीन अज्ञान मी दास तूझा । समर्था, जनीं घेतला भार माझा ५१
रघूनायका जन्मजन्मांतरींचा । अहंभाव छेदोनि टाकी दिनाचा
जनीं बोलती 'दास' या राघवाचा । परी अंतरीं लेश नाहीं तयाचा ५२
मला कोंवसा राम कैवल्यदाता । तयाचेनि हे फीटली सर्व चिंता
समर्था, तया काय उत्तीर्ण व्हावें ? । सदा सर्वदा नाम वाचें वदावें ५३

## १२. बुद्धि हे रघुनायका !

युक्ति नाहीं, बुद्धि नाहीं । विद्या नाहीं विवेकिता
नेणता भक्त मी तूझा । बुद्धि दे रघुनायका ५४
मन हें आदरे ना की । वासना वावडे सदा
कल्पना धावते सैरा । बुद्धि दे रघुनायका ५५
अन्न नाहीं, वस्त्र नाहीं । सौख्य नाहीं जनांमधें
आश्रयो पाहातां नाहीं । बुद्धि दे रघुनायका ५६
नेटकें लीहितां ये ना । वाचितां चुकतो सदा
अर्थ तो सांगतां ये ना । बुद्धि दे रघुनायका ५७
प्रसंग वेळ तर्के ना । सुचे ना दीर्घसूचना
मैत्रिकी राखतां ये ना । बुद्धि दे रघुनायका ५८
कळे ना स्फूर्ति होई ना । आपदा लागली बहू
प्रत्यहीं पोट सोडी ना । बुद्धि दे रघुनायका ५९
संसार नेटका नाहीं । उद्वेग वाटतो जिवीं
परमार्थ कळे ना कीं । बुद्धि दे रघुनायका ६०
पिशूनें वाटती सर्वें । कोणीही मजला नसे
समर्था तूं दयासिंधू । बुद्धि दे रघुनायका ६१
उदास वाटतें जीवीं । आतां जावें कुणीकडे ?
तूं भक्तवत्सला रामा । बुद्धि दे रघुनायका ६२
काया-वाचा-मनोभावें । तुझा मी म्हणवीतसें
हे लाज तूजला माझी । बुद्धि दे रघुनायका ६३

सोडविल्या देवकोटी । भूभार फेडिला बळें
भक्तांसी आश्रयो मोठा । बुद्धि दे रघुनायका ६४
भक्त उदंड तुम्हांला । आम्हांला कोण पूसतें ?
ब्रीद हें राखणें आधीं । बुद्धि दे रघुनायका ६५
राम–दास म्हणे माझा । संसार तुज लागला
संशयो लागतो पोटीं । बुद्धि दे रघुनायका ६६

## १३. रघूनायका, काय–कैसें करावें ?

उदासीन हा काळ जातो गमे ना । सदा सर्वदा थोर चिंता शमे ना
उठे मानसीं सर्व सोडोनि जावें । रघूनायका काय कैसें करावें ? ६७
अवस्था मनीं होय नाना परींची । किती काय सांगू गती अंतरींची
विवेकेंचि या मानसा आवरावें । रघूनायका काय कैसें करावें ? ६८
म्हणे दास ऊदास जालों दयाळा । जनीं व्यर्थ संसार हा वायचाळा
तुझा मी तुला पूसतों प्रेमभावें । रघूनायका काय कैसें करावें ? ६९

## १४. सर्वोत्तमा, कैं मज भेटि देसी ?

दुःखानळें मी संतप्त देहीं । तुजवीण रामा विश्रांति नाहीं
आधार तूझा मज, मी विदेशी । सर्वोत्तमा ! कैं मज भेटि देसी ? ७०
तुझिया वियोगें बहु वेदना रे । विवेक नाहीं आम्हां दिना रे
पडिला सबंधू या दुर्जनासी । सर्वोत्तमा कैं मज भेटि देसी ? ७१
संसारचिंता मज वाटते रे । रामा, प्रपंचीं मन जातसे रे
संसर्ग आहे इतरां जनांसी । सर्वोत्तमा कैं मज भेटि देसी ? ७२

## १५. उदसीन वृत्ति

गुणीं गुंतलें चित्त हें आवरे ना । तयावीण आणीक कांहीं स्मरे ना
समाधान हें होय त्याचेनि संगें । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ७३
मनीं प्रीति हे लागली राघवाची । सदानंद हे राम-मूर्ति सुखाची
पदार्थीं बळें लावितां चित्त भंगे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ७४
मनीं आठवीतां समाधान वाटे । तया देखतां संशयो सर्व तूटे
न लिंपे कदा चित्त दुश्चीत भंगे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ७५
मनीं तंतु आनंत या राघवाचा । तुटे किंतु तो नावडे या भवाचा
सदा सर्वदा अंतरीं राम जागे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ७६

जनीं पाहतां भेदबुद्धी अनेका । मदें मत्सरें निंदिती येकमेकां
घडे त्याग याकारणें लागवेगें । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ७७
बहूसाल हें बोलणें आवडे ना । जनीं वासना शब्दज्ञानें पडे ना
क्रियेवीण हें बोलतां चित्त भंगे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ७८
मनीं सर्वथा सत्य हें सांडवेना । मनीं सर्वथा मिथ्य तें मांडवे ना
समाधान तें योगसंगें निसंगें । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ७९
मनीं सांडतां संगव्याधी उपाधी । पुढें सांपडे राम कारुण्यनीधी
विवेकें मनींचा अहंभाव भंगे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ८०
पराधीनता राम-दासीं घडे ना । देहो चाळतां रामभक्ती उडे ना
उभा राम सांभाळितो पृष्ठभागें । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ८१

## १६. श्रीरामराम हे म्हणा

सुरेंद्र चंद्रशेखरू । अखंड ध्यातसे हरू
जनांस सांगतो खुणा । श्रीरामराम हे म्हणा ८२
महेश पार्वतीप्रति । विशेष गूज सांगती
सलाभ होतसे दुणा । श्रीरामराम हे म्हणा ८३
विषें बहूत जाळिलें । विशेष अंग पोळलें
प्रचीत माझिया मना । श्रीरामराम हे म्हणा ८४
बहूत प्रेत्न पाहिले । परंतु सर्व राहिले
विबूध-पक्ष-रक्षणा । श्रीरामराम हे म्हणा ८५
विरांमधें विरोत्तमू । विशेष पहा रघूत्तमू
सकाम काळ आकणा । श्रीरामराम हे म्हणा ८६
मनीं धरून साक्षपें । अखंड नाम हें जपे
मनांतरीं क्षणक्षणा । श्रीरामराम हे म्हणा ८७

## १७. श्रीराम भक्तमूळ रे । प्रसन्न सानुकूळ रे

'समर्थ' तो तयागुणें । समस्त होय ठेंगणें ८८
प्रपंच संचितां हरी । विसंचितां बरोबरी
दयाळ तो परोपरी । विशाळ सेवकां करी ८९
समस्त हीं पदें पदें । प्रभूपदेंचि वीशदे
विचार सार जोडला । सदृश्य भास मोडला ९०

विवेक हा भला भला । उदंड राम देखिला
पदीं अनन्य मीळणी । उरी नसे दुजेपणीं ९१

**भीमरूपी स्तोत्र**

भीमरूपी महारुद्रा ! वज्रहनुमान् मारुती !
वनारी अंजनीसूता ! रामदूता प्रभंजना ! १
महाबळी प्राणदाता ! सकळां उठवी बळें
सौख्यकारी शोकहर्ता । धूर्त वैष्णवगायका २
दिनानाथा, हरीरूपा, सुंदरा जगदंतरा
पाताल-देवता-हंता, भव्य शेंदूरलेपना ३
लोकनाथा, जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना
पुण्यवंता, पुण्यशीला, पावना परितोषका ४
ध्वजांगें उचली बाहो । आवेशें लोटला पुढें
काळाग्नी काळरुद्राग्नी । देखतां कांपती भयें ५
ब्रह्मांडें माइलीं नेणों । आवळे दंतपंगती
नेत्राग्नीं चालिल्या ज्वाळा । भ्रुकुटी ताठिल्या बळें ६
पुच्छ तें मुर्डिलें माथां । किरीटीं कुंडलें वरी
सुवर्णकटिकासोटी । घंटा किंकिणि नागरा ७
ठकारे पर्वताऐसा । नेटका सडपातळू
चपलांग पाहतां मोठें । महाविद्युल्लतेपरी ८
कोटिच्या कोटि उड्डाणें । झेंपावें उत्तरेकडे
मंद्राद्रीसारिखा द्रोण । क्रोधें उत्पाटिला बळें ९
आणिला मागुती नेला । आला, गेला मनोगती
मनासी टाकिलें मागें । गतीसी तूळणा नसे १०
आणुपासूनि ब्रह्मांडाएवढा होत-जातसे
ब्रह्मांडाभोंवतें वेढे । स्वपुच्छें घालवूं शके ११
तयासी तूळणा कोठें ? मेरुमंदार धाकुटें !
तयासी तूळणा कैची ? ब्रह्मांडीं पाहतां नसे १२
आरक्त देखिलें डोळां । गिळीलें सूर्यमंडळा
वाढतां वाढतां वाढे । भेदिलें शून्यमंडळा १३

हे धरा पंधरा श्लोकी । लाभली-शोभली भली
दृढ देहो निसंदहो । संख्या चंद्रकलागुणें १४
रामदासीं अग्रगण्य । कपीकूळासि मंडण ।
रामरूपी अंतरात्मा । दर्शनें दोष नासती १५

● ●

# ४. रामराज्याची कल्पना

**राम-राज्य** **मानपंचक**

कीर्ति या रघुनाथाची । पाहातां तुळणा नसे
येक बाणी, येक वचनी । येकपत्नीच धार्मिक १
राज्य या रघुनाथाचें । कळिकळासि नातुडे
बहुवृष्टि अनावृष्टी । हें कदा न घडे जनीं २
उद्वेग पाहतां नाहीं । चिंता-मात्र नसे जनीं
व्याधी नाहीं, रोग नाहीं । लोक आरोग्य नांदती ३
युद्ध नाहींच आयोध्या । राग ना मत्सरू नसे
बंध निबंधही नाहीं । दंड दोष कदा नसे ४
कुरूपी पाहता नाहीं । जरा-मृत्यु असेचि ना
आदरू सकळां लोकां । सख्यप्रीति परस्परें ५
बोलणें सत्य न्यायाचें । अन्याय सहसा नसे
अनेक वर्तती काया । एकजीव परस्परें ६
दरिद्री धुंडतां नाहीं । मूर्खही तो असेचि ना
परोपकार तो मोठा । सर्वत्र लोकसंग्रही ७
अद्‌भुत पिकती भूमी । वृक्ष देती सदा फळें
अखंड दुभती धेनू । आरोग्य वाहती जळें ८
जळजें, श्वापदें पक्षी । नाना जीव भूमंडळीं
आनंदरूप बोभाती । नाना स्वर परस्परें ९
नद्या, सरोवरें, बावी । डोलती नूतनें वनें
फळती फुलती झाडें । सुगंध वन-वाटिका १०

उदंड वसली ग्रामें । नगरें-पूरें-चि पट्टणें
तीर्थक्षेत्रें तथा स्थानें । शिवालयें गोपुरें वरी ११
चढता–वाढता प्रेमा । सुखानंद उचंबळे
संतोष समस्तां लोकां । रामराज्य भूमंडळीं १२
रामदासीं ब्रह्मज्ञान । सारासार-विचारणा
धर्मस्थापनेसाठीं । कर्मकांड उपासना १३

**महंतास आज्ञापत्र :**

विवेक जालिया देवाचा योग । मग होणार नाहीं वियोग
देव सर्वांचें अंतरंग । अखंडीत भेटी १
या समाधानें असावें । निरूपणीं विवरावें
मानसपूजेनें आठवावें । सर्व कांहीं २
ऋणानुबंधें भेटी होईल । परस्परें समाचार कळेल
सहज वर्तमान निवळेल । ते प्रसंगीं ३
कांहीं समुदाव करणें । येविषयीं आलस्य न करणें
आलस्य करितां उदंड उणे । दिसेल परमार्थीं ४
पोहणारें बुडते तारावे । सामर्थ्यें बुडों नेदावे
मूर्ख ते शाहाणे करावें । विवेकी पुरुषें ५
आपणाहुनी जो धींग । त्यासी करूं नये प्रसंग
आपणाधीन जो प्रसंग । तोचि करावा ६
सोयऱ्या धायऱ्याचीं मुलें । तीक्ष्ण बुद्धीचीं सखोलें
तयासी बोलणें मुदु बोलें । करीत जावें ७
त्यांचा संसार समाचार । पुसत जावा विस्तार
उदंड सांगतां, तत्पर । होऊनि ऐकावें ८
दुःख ऐकतां दुःख जातें । त्याचें दुःख हळू होतें
मग तें सर्वेचि धरितें । मित्रभाव ९
निकट मैत्री बरी होतां । मग त्यासी न्यावें येकांता
म्हणावें रे भगवन्ता । कांहींतरी भजावें १०
मान्य होतां जप सांगावा । मग तो इकडे पाठवावा
मग तयाचा सकळ गोवा । उगवूं आम्ही ११

● ●

# ५. शक्तिदेवीचीं स्तोत्रें

## १. रामवरदायिनी माता

देखिली तुळजा माता । निवालों अंतरीं सुखें
तुटली सर्वही चिंता । थोर आधार वाटला १
संसार पाहातां मागें । पाळिलें सर्वही कुळां
प्रस्तूत प्रत्ययो आतां । रक्षिते बहुतापरी २
आघात संकटें वारी । नीवारी दुष्ट-दुर्जना
संकटीं भर्वसा मोठा । तत्काळ काम होतसे ३
लोभाळू बायका माया । त्यांमध्यें मुख्य जननी
बाळका वाढवी माता । मातेला मुख्य जननी ४
अनंत-रूपिणी माया । काया रक्षी परोपरी
विचित्र महिमा आहे । कळला न वचे कदा ५
राम-उपासना आहे । हे रामवरदायिनी
सख्य तें चालतें सर्वें । प्रवृत्ती-निवृत्तीकडे ६

## २. शक्तीवीण वृथा वृथा

मुळींची मूळमाया ते । आदिशक्ती परमेश्वरी
आमुची कुळदेव्या हे । म्हैसासुरासि मर्दिनी १
शक्तिरूप जगन्माता । वर्तते जगदंतरीं
त्रिलोकीं जितुके प्राणी । शक्तीवीण वृथा वृथा २
प्रसिद्ध तुळजामाता श्रीरामवरदायिनी
कुळासी पाळिले मूळीं । आतां आम्हासि पाळिते ३
चूकतां दाविते साक्षी । कोणीयेकें चुकों नये
बाळका जननी पाळी । तैसी ते पाळती जना ४
रामदास म्हणे माझी । माता ही जगदेश्वरी
ऐश्वर्य सर्व शक्तीचें । विवेकें प्रत्ययें पाहा ५

## ३. तुझेनि राजकारणें

प्रसन्नमूख सुंदरा । तुझेनि हे वसुंधरा
धराधरें फणीवरें । तुलाच्चि भाविलें खरें १

तुझेनि सर्व बोलणें । तुझेनि सर्व चालणें
तुझेनि योगधारणें । तुझेनि राजकारणें २
तुझीच चालते सत्ता । बुझेल तोचि पूरता
तुझी करूनि आस तो । फिरे उदास दास तो ३

## ४, शक्तियुक्ति जये ठायीं । तेथें श्रीमंत धावती

शक्तीनें पावती सुखें । शक्ती नसतां विटंबना
शक्तीनें नेटका प्राणी । वैभवें भोगितां दिसे १
कोण पुसे अशक्ताला । रोगीसें बराडी दिसे
कळा नाहीं, कीर्ति नाहीं । युक्ती, बुद्धी दुरावली २
साजिरी शक्ति तों काया । काया मायाचि वाढवी
शक्ती तों सर्वही सूखें । शक्ति आनंद भोगवी ३
सार संसार शक्तीनें । शक्तीनें शक्ति भोगिजे
शक्त तो सर्वही भोगी । शक्तीवीण दरिद्रता ४
शक्तीनें मिळती राज्यें । युक्तीनें यत्न होतसे
शक्ति-युक्ति जये ठायीं । तेथें श्रीमंत धावती ५
युक्तीनें चालती सेना । युक्तीनें युक्ति वाढवी
संकटीं आपणां रक्षी । रक्षी सेना परोपरी ६
फित्व्यानें बुडती राज्यें । खबर्दारी असेचि ना
युक्ति ना, शक्ति ना वेगी । लोक राजी असेच ना ७
लोकांस राखणें राजी । तें राज्य प्रबळें बळें
बंद-बेबंद जाणावें । ताबे ताबे परोपरी ८
कांहीं एक परीक्षावें । शोधावें बहुतां परी
नेटकें कार्य साधावें । रोधावें कुटिला जना ९
असो, हें बोलणें जालें । युक्तिवीण कामा नये
युक्तीला पाहिजे शक्ती । तस्मात् शक्ती प्रमाण हें १०

## ५. मुक्त केल्या देवकोडी

मुक्त केल्या देवकोडी । सर्वही शक्तिच्या बळें
समर्थ भवानी माता । समर्था वर दीधला ११

अंतरीं कल्पना केली । येकांतीं बोलिलों बहू
रक्षितां देव देवांचा । त्याचा उत्साव इच्छिला २
जीवींचा पुरला हेतू । कामना मनकामना
घमंड जाहलें मोठें । घबाड साधलें बळें ३
रामवरदायिनी माता । दासें धुंडून काढिली
वोळखी पाडितां ठायीं । भिन्न भेद असेचि ना ४
वोळतां भवानी माता । महींद्र दास्य इच्छिती
बोलणें हें प्रचीतीचें । अन्यथा वाउगें नव्हे ५
सख्य हें जाहालें मोठें । आवडी सांगतां नये
असो हें जीविचें जीवीं । सुखानंद चहूंकडे ६

**६. तुझा तूं वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखतां**

प्रपंचीं आमचे कुळीं । तुळजा कुळदेवता
नेणतां ऐकिलें होतें । जाणतां स्मरलें मनीं १
श्रेष्ठांची कामना होती । पुर्विली मनकामना
नौस तो नौसला होता । तो त्यापासूनी चूकला २
वैराग्य घेतलें पोटीं । सर्व संसार सांडिला
तूझिया दर्शना आलों । कृपादृष्टी नांवाजलों ३
तुझा नावाजिला आहे । 'महंत' म्हणती जनीं
तुझेंचि सर्वही देणें । सर्वही तुजपासुनी ४
संसारीं मोकळें केलें । आनंदीं ठाव दीधला
तोडिली सर्वही चिंता । तूं 'माया' सत्य जाहलें ५
सदानंदीं उदो जाला । सुख-संतोष फावला
पराधीनता गेली । सत्ता उदंड चालिली ६
उदंड ऐकिलें होतें । रामासी वरु दीधला
मी दास रघुनाथाचा । मजही वरदायिनी ७
श्रेष्ठांचा नौस जो होता । तो मी फेडीनसें म्हणें
पुष्प देऊनि उतराई । ऐसें हें कल्पिलें मनीं ८
तुळजापूर ठाके ना । चालली पश्चिमेकडे
पारघाटीं जगन्माता । सह्य येऊनि राहिली ९

येसें हें ऐकिलें होतें । हेत तेथेंचि पावला
पुष्पाची कल्पना होती । तेथें पुष्पचि दीधलें १०
ऐसी तूं दयाळू माता । हेमपुष्पचि घेतलें
संतुष्ट भक्तिभावानें । त्रैलोक्यजननीं पहा ११
थोड्यानें श्लाघ्यता केली । थोर संतोष पावलों
उत्तीर्ण काय म्यां व्हावें । तुझे कृपेसी रोकडें १२
तुझेंचि तुजला दील्हे । म्यां हें कोठूनि आणिलें ?
संकटें वारिलीं नाना । रक्षिलें बहुतांपरी १३
जीवींचें जाणते माता । तूं माता मज रोकडी
लोकांच्या चुकती माता । अचूक जननी मला १४
येकची मागणें आतां । द्यावें तें मजकारणें
तुझा तूं वाढवी राजा । सीघ्र आम्हांचि देखतां १५
दुष्ट संहारिले मागें । ऐसें उदंड ऐकतों
परंतू रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी १६
देवांचीं राहिलीं सत्त्वें । तूं सत्त्व पाहसी किती
भक्तांसी वाढवी वेगीं । इच्छा पूर्ण परोपरी १७
रामदास म्हणे माझें । सर्व आतूर बोलणें
क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी १८

●●

# ६. आनंदवनभुवन–धर्मस्थापनेचें स्वप्न साकारलें

## आनंदवन-भुवनाचें ऐश्वर्य

स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेंचि होतसे
हिंडतां फिरतां गेलों । आनंदवनभूवना १
हे साक्ष देखिली दृष्टीं । किती कल्लोळ ऊठिले
विघ्नघ्ना प्रार्थिलें, गेलों । आनंदवनभूवना २
स्वधर्माआड जें विघ्नें । तें तें सर्वत्र ऊठिलीं
लाटिलीं, कुटिलीं देवें । दापिलीं, कापिलीं बहू ३

विघ्नांच्या उठिल्या फौजा । भीम त्यावरि लोटला
घर्डिलीं, चिर्डिलीं रागें । रडविलीं, बडविलीं बळें ४
हाकिलीं, टाकिलीं तेणें । आनंदवनभूवनीं
हाक बोंब बहू झाली । पुढें खतल्ल मांडिलें ५
खौळले लोक देवाचे । मुख्य देवचि ऊठिला
कळे ना काय रे होतें । आनंदवनभूवनीं ६
स्वर्गीची लोटली जेथें । रामगंगा महानदी
तीर्थासी तूळणा नाहीं । आनंदवनभूवनीं ७
ग्रंथीं जे वर्णिली मागें । गुप्तगंगा महानदी
जळांत रोकडे प्राणी । आनंदवनभूवनीं ८
सकळ देवची साक्षी । गुप्त ऊदंड भूवनें
सौख्यची पावणें, जाणें । आनंदवनभूवना ९
अक्रा-अक्रा, बहू अक्रा । काय अक्रा कळेचि ना !
गुप्त तें गुप्त जाणावें । आनंदवनभूवनीं १०
त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्य बंद-विमोचनें
मोहीम मांडिली मोठी । आनंदवनभूवनीं ११
सूरेश ऊठिला अंगें । शूरसेना परोपरी
विकटें कर्कशें यानें । शस्त्रपाणी महाबळी १२
देव देव, बहू देव । नाना देव परोपरी
दाटणी जाहली मोठी । आनंदवनभूवनीं १३
दिग्पती चालिले सर्वे । नाना सेना परोपरी
वेष्टीत चालिले सकळे । आनंदवनभूवनीं १४
मंगळें वाजती वाद्यें । महागणासमागमें
आरंभीं चालला पूढें । आनंदवनभूवनीं १५
राशभें राखिलीं मागें । तेणें रागेंचि चालिला
सर्वत्र पाठिशी फौजा । आनंदवनभूवनीं १६
अनेक वाजती वाद्यें । ध्वनी-कल्लोळ ऊठिला
छबीनें डोलती ढाला । आनंदवनभूवनीं १७

वीजई दीस तो आहे । ते दिसीं सर्व ऊठती
अनर्थ मांडिला मोठा । आनंदवनभूवनीं १८
कल्पांत मांडला मोठा । म्लेंछ-दैत्य बुडावया
कैंपक्ष घेतला देवीं । आनंदवनभूवनीं १९
बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावलें
अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभूवनीं २०
पूर्वी जे मारिले होते । तेचि आतां बळावले
कोपला देव देवांचा । आनंदवनभूवनीं २१
त्रैलोक्य गांजिलें मागें । ढाउकें विवेकी जनां
कैंपक्ष घेतला रामें । आनंदवनभूवनीं २२
भीमचि धाडिला देवें । वैभवें धाव घेतली
लांगूळ चालिले पुढें । आनंदवनभूवनीं २३
येथून वाढला धर्मू । रमाधर्म-समागमें
संतोष मांडिला मोठा । आनंदवनभूवनीं २४
बुडाला औरंग्या पापी । म्लेंछ-संहार जाहला
मोडलीं मांडलीं क्षेत्रें । आनंदवनभूवनीं २५
बुडाले भेदवाही ते । नष्ट, चांडाळ, पातकी
ताडिले, पाडिले देवें । आनंदवनभूवनीं २६
गळाले, पळाले मेले । जाले देशधडी पुढें
निर्मळा जाहाली पृथ्वी । आनंदवनभूवनीं २७
उदंड जाहलें पाणी । स्नानसंध्या करावया
जप-तप-अनुष्ठानें । आनंदवनभूवनीं २८
नाना तपें पुरश्चरणें । नाना धर्म परोपरी
गाजली भक्ति ते मोठी । आनंदवनभूवनीं २९
लिहिला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहला
चढता-वाढता प्रेमा । आनंदवनभूवनीं ३०
बंड–पाषांड ऊडालें । शुद्ध अध्यात्म वाढलें
राम कर्ता, राम भोक्ता । आनंदवनभूवनीं ३१

देवालयें, दीपमाळा । रंगमाळा बहूविधा
पूजिला देव देवांचा । आनंदवनभूवनीं ३२

रामवरदायिनी माता । गर्द घेऊनि ऊठिली
मर्दिले पूर्विंचे पापी । आनंदवनभूवनीं ३३

प्रत्यक्ष चालिली राया । मूळमाया समागमें
नष्ट चांडाळ ते खाया । आनंदवनभूवनीं ३४

भक्तांसी रक्षिलें मागें । आतांही रक्षिते पाहा
भक्तांसी दीधलें सर्व । आनंदवनभूवनीं ३५

आरोग्य जाहली काया । वैभवें सांडिली सिमा
सार-सर्वस्व देवाचें । आनंदवनभूवनीं ३६

देव सर्वस्व भक्तांचा । देव-भक्त दुजे नसे
संदेह तुटला मोठा । आनंदवनभूवनीं ३७

देव-भक्त एक जाले । मिळाले सर्व जीवही
संतोष पावले तेथें । आनंदवनभूवनीं ३८

सामर्थ्यें यशकीर्तीचा । प्रतापें सांडिली सिमा
ब्रीदेंचि दिधलीं सर्वें । आनंदवनभूवनीं ३९

राम कर्ता, राम भोक्ता । रामराज्य भूमंडळीं
सर्वस्व मीच देवाचा । 'माझा देव,' कसा म्हणों ? ४०

हेंचि शोधून पाहावें । राहावें निश्चळीं सदा
सार्थक श्रवणें होतें । आनंदवनभूवनीं ४१

मनासी प्रचीत आली । शब्दीं विश्वास वाटला
कामना पुरती सर्वै । आनंदवनभूवनीं ४२

महिमा तो वर्णवे ना । विशेष बहुतांपरी
विद्यापीठ तें आहे । आनंदवनभूवनीं ४३

● ●

# ७. धर्मसंस्थापकांचा गौरव व मार्गदर्शन

## शिवराजाचा गौरव व प्रोत्साहन :

निश्चयाचा महामेरू । बहुत जनासी आधारू
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी १
परोपकाराचिया राशी । अखंड घडती जयासी
तयाचे गुणमहत्त्वासी । तूळणा कैंची २
नरपति, हयपति, गजपति । गडपति, भूपति, जळपती
पुरंधर आणि छत्रपती । शक्ती पृष्ठभागीं ३
यशवंत, कीर्तिवंत । सामर्थ्यवंत, वरदवंत
पुण्यवंत, नीतिवंत । जाणता राजा ४
आचारशीळ, विचारशीळ । दानशीळ, धर्मशीळ
सर्वज्ञपणें सुशीळ । सकळां ठाईं ५
धीर, उदार, गंभीर । शूर, क्रियेसी तत्पर
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ६
तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट जालीं
सकल पृथ्वी आंदोळिली । धर्म गेला ! ७
देव-धर्म-गो-ब्राह्मण । करावया संरक्षण
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ८
या भूमंडळाचे ठाईं । धर्म रक्षी ऐसा नाहीं
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हांकरतां ९
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले
कित्येकांस आश्रय जाले । शिव-कल्याण-राजा १०
समस्त मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुम्हांप्रती
धर्मस्थापनेची कीर्ती । सांभाळली पाहिजे ११

## राजधर्म

सावधपणें प्रपंच केला । तेणें सुखचि पावला
दीर्घ प्रयत्नें मांडला । कार्यभाग साधे १

आधीं मनुष्य ओळखावें । योग्य पाहून काम सांगावें
नि-कामी तरी ठेवावे । एकीकडे २
पाहोन-समजोन कार्य करणें । तेणें कदापि न ये उणें
कार्यकर्त्याच्या गुणें । कार्यभाग होतो ३
कार्यकर्ता प्रयत्नीं जाड । कांहीं येक असला हेकाड
तरी समर्थपणें पाठवाड । केली पाहिजे ४
अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संहार
शोधला पाहिजे विचार । यथातथ्य ५
मनुष्य राजी राखणें । हींचि भाग्याचीं लक्षणें
कठीणपणें दूरी धरणें । कांहीं येक ६
न्यायसीमा उल्लंघू नये । उल्लंघिता होतो अपाय
न्याय नसतां उपाय । होईल कैंचा ? ७
उपाधीस जो कंटाळला । तो भाग्यापासून चेवला
समर्यीं धीर सांडिला । तोही खोटा ८
संकटीं कंटाळों नये । करावे अत्यंत उपाय
तरी मग पाहतां काय । उणे आहे ! ९
बंध बांधावे नेटके । जेणें करतां चतुर तुके
ताबे न होतां फिके । कारभार होती १०
धुरेनें युद्धासी जाणें । ऐसी नव्हे तीं राजकारणें
धुराच करोनी सोडणें । कित्येक लोक ११
उदंड मुंडें असावीं । सर्वेही येक न करावी
वेगळालीं कामें घ्यावीं । सावधपणें १२
देखोनि व्याघ्राचा चपेटा । मेंढरें पळती बारा वाटा
मस्त जो तो रेडा मोठा । काय करावा ! १३
तुरंग, शस्त्र आणि स्वार । पहिला पाहावा विचार
निवटूं जातां थोर थोर । शत्रू पळती १४
ऐसा प्रपंचाचा विवेक । स्वल्प बोलिलों कांहीं येक
एका मनोगतें स्वामी-सेवक । असतां बरें १५

## आतां ऐका क्षात्रधर्म । परम दुर्लभ जो

जयास जिवाचें वाटे भय । तेणें क्षात्रधर्म करूं नये
कांहींतरी करूनि उपाय । पोट भरावें १
मारतां मारतां मरावें । तेंणे गतीस पावावें
फिरोन येतां भोगावे । भोग सकळ २
नजर करारी राखणें । कार्य पाहूनि खतल करणें
तेणें रणशूरांचीं अंतःकरणें । चकीत होती ३
जैसा भांड्यांचा गोळा । निर्भय भारामध्ये पडला
तैसा क्षत्रीय रिचवला । परसैन्यामध्यें ४
मर्दे तकवा सोडूं नये । म्हणजे प्राप्त होतो जय
कार्य, प्रसंग, समय । वोळखावा ५
कार्य समजे ना अंतरें । तें काय झुंजेल बिचारें !
युद्ध करावें खबरदारें । लोक राजी राखतां ६
दोन्ही दळें एकवटें । मिसळताती लखलखाटे
युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडुनी ७
देवमात्र उच्छेदिला ! जित्यापरीस मृत्यू भला !
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ८
मराठा तितका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा
येविषयीं न करतां तकवा । पूर्वज हांसती ९
मरणहांक तो चुके ना । देह वांचविता वांचे ना
विवेक होऊनि समजा ना । काय करावें १०
देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते
देवदास पावती फत्ते । यदर्थीं संशयो नाहीं ११
देव मस्तकीं धरावा । अवघा हल्कल्लोळ करावा
मुल्ख बडवा का बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं १२
विवेक, विचार, सावधपण । दीर्घप्रयत्न केलाचि करणें
तुळजावराचेनि गुणें । रामें रावण मारिला । १३

**सावधता :** ( श्री छत्रपतींनीं श्रीरामदासचरणीं सारें राज्य अर्पण केल्याची चिठी समर्थांच्या भिक्षेच्या झोळींत टाकली. तेव्हां स्वामींनीं शिवरायांना ' रामाचें राज्य ' म्हणून आपला राज्यसंपादनाचा प्रयत्न पुढे चालू ठेवण्याविषयीं उपदेशिलें--शके १५७७ )

कोणाचा भरंवसा न धरावा । आपुला आपण विचार पाहावा
तकवा उदंड धरावा । कांही एकविषईं १
देहदुःखें कदरों नये । उदंडच्चि करावे उपाय
मग सर्वसुखासी काय । उणें आहे ? २
एकांतीं चाळणा करावी । धारणा उदंड धरावी
नाना विचारणा करावी । अरिमित्रांची ३
प्रयत्नीं चुकों नये । सुखवासी कामा नये
सुचावे नाना उपाय । अनेक विषयीं ४
धुरेनें धीर सोडूं नये । मुख्य प्रसंग चुकों नये
उद्योगरहित कामा नये । पशू जैसे ५
उपाधीस कंटाळला । विचाराचा आळस केला
म्हणजे जाणावा चेवला । बुद्धीपासुनी ६
खबर्दारी आणि वेगी । तेणें सामर्थ्य चढे आंगीं
नाना प्रसंगीं कार्यभागीं । अंतरच्चि न पडे ७
कार्यकर्ते दूरी करावे । प्रसंगें सर्वेच्चि हातीं धरावें
परंतु शोधोनि पाहावे । कपटाविषयीं ८
जेथें बहुत विचार । तेथें ईश्वर-अवतार
मागें जाले थोर थोर । धके चपेटे सोसोनी ९
आपल्या मनास रोधावें । परांतर शोधावें
क्षणक्षणा सांभाळावें । बदलेल म्हणुनी १०
पाहिलेंच्चि पाहावें । केलेंच्चि करावें
शोधिलेंच्चि शोधावें । राजकारण ११
इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहूं नये
लिहावयाचें सांगू नये । जबानीनें १२

## ( संभाजीस उपदेश ) शिवरायास आठवावें

अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें
तजविजा करीत बसावें । एकांत स्थळीं १
कांहीं उग्रस्थिती सांडावी । कांहीं सौम्यता धरावी
चिंता लागावी परावी । अंतर्यामीं २
मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे
सुखी करूनि सोडावे । कामाकडे ३
पाटवणी तुंब निघे ना । तरी मग पाणी चाले ना
तैसें सज्जनांच्या मना । कळलें पाहिजे ४
जनाचा प्रवाह चालला । म्हणजे कार्यभाग आटोपला
जन ठाई ठाई तुंबला । म्हणजे खोटें ५
श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बैसले
मग जाणावें फावलें । गलीमांसी ६
ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्यासी जय
धीर धरोन महत्कार्य । समजून करावें ७
आधींच पडलीं धास्ती । म्हणजे कार्यभाग होय नास्ती
याकारणें समस्तीं । बुद्धि शोधावी ८
राजी राखतां जग । मग कार्यभागाची लगबग
ऐसें जाणोनियां सांग । समाधान राखावें ९
सकळ लोक एक करावे । गलीम निवटून काढावे
ऐसें करितां कीर्ती धावे । दिगंतरीं १०
आधीं गाजवावे तडाके । मग भूमंडळ धाके
ऐसे न होतां धक्के । राज्यास होती ११
समय-प्रसंग ओळखावा । राग निपटून काढावा
आला तरी कळों न द्यावा । जनांमध्यें १२
बहुत लोक मिळवावे । एक विचारें भरावे
कष्टें करोनि घसरावें । म्लेंछावरी १३
आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मिळवावें
महाराष्ट्रराज्य करावें । जिकडे तिकडे १४

लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तरवार करावी
चढती-वाढती पदवी । पावाल येणें १५
शिवरायास आठवावें । जीवित्व तृणवत मानावें
इहलोकीं-परलोकीं राहावें । कीर्तिरूपें १६
शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं १७
शिवरायाचें कैसें चालणें । शिवरायाचें कैसें बोलणें
शिवरायाची सलगी देणें । कैसी असे १८
सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग
राज्यसाधनाची लगबग । कैसी असे १९
त्याहूनि करावें विशेष । तरीच म्हणावें पुरुष
याउपरीं आतां विशेष । काय ल्याहावें ? २०

● ●

## ८. सामान्य जनांस उपदेश

### धन्य संसार कशानें होतो ?

स्नान-संध्या टिळेमाळा । अंतर्निष्ठ उपासना
नित्यानित्यविवेकानें । धन्य संसार होतसे १

मर्यादा न्यायनीतीची । अन्याय न घडे कदा
सन्मार्ग योग देवाचा । धन्य संसार होतसे २

पराचें जीविचें जाणें । अस्तिनास्ति-विचारणा
आत्यंत सर्व भूतांसी । धन्य संसार होतसे ३

होम, याग, पुरश्चरणें । निरूपणें, हरीकथा
ब्रह्मसंतर्पणें, यात्रा । धन्य संसार होतसे ४

नवविधा भक्ति देवाची । मुख्य कोण, विचारणें
अध्यात्म शोधितां सर्वें । धन्य संसार होतसे ५

पंचीकरण, महावाक्य । श्रवणें, मननें सदा
सत्संगें निःसंग होता । धन्य संसार होतसे ६
शब्देचि लाभती रत्नें । शब्दरत्नें अमूल्य की
कोंदणामाजीं तें सोनें । तैसा अर्थ प्रचीतिचा ७

## योग हा सुकृताचा !

मनासारिखी सुंदरा ते अनन्या । मनासारिखे पुत्र, जामात, कन्या
सदासर्वदा बोलती रम्य वाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा १
भली मायबापें, भले मित्रबंधू । भले सोयरे राखिती स्नेहवादू
मुलें-लेकुरें येक मेळा सुखाचा । जनीं जाणिजे... २
गुरें-वासरें-शिंगरें, दासदासी । गुराखे, सुणीं, मार्जरें गूणरासी
समा चालती लेश नाहीं तमाचा । जनीं जाणिजे... ३
धनें धान्यपात्रें अलंकार चीरें । विसोरें घरें सुंदरें रम्य सारें
देहे चालतो सर्व आरोग्य ज्याचा । जनीं जाणिजे.. ४
मनासारिखे ग्राम ग्रामाधिकारी । मनासारिखे लोक शोकापहारी
मनासारिखा संग साधूजनांचा । जनीं जाणिजे... ५
इहींलोकिचे लोक तेही गुणाचे । परत्रीक तेही बहू लक्षणाचे
समूदाव उत्साव एका मनाचा । जनीं जाणिजे... ६
मनासारिखे चिंतितां देव पावे । मनासारिखे भक्त भावें मिळावे
सदा बोलती बोल सारांश वाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ७

## ज्ञानसंपन्न व्हा

**मानपंचक**

आधीं तें करावें कर्म । कर्ममार्गें उपासना
उपासका सांपडे ज्ञान । ज्ञानें मोक्षचि पावणें १
उपासक देव धुंडाळी । सत्संगें देव सांपडे
देवाचा लागतां छंद । वैराग्य सहजीं घडे २
वैराग्यें त्यागितां सर्व । देव आपण येकला
देवाचें लागतां ध्यान । आपणा ठावचि नसे ३
अभेद भक्ति ते ऐसी । आत्मनिवेदनी स्थिती
प्रवृत्तीं बद्धता मोठी । निवृत्तीं मोक्ष बोलिजे ४

निश्चळीं घालितां ज्ञान । विज्ञान होतसे पुढें
मनास उन्मनी लागे । प्रवृत्ति निवृत्ति होतसे ५
परेहूनि जो पर्ता । परात्परचि बोलिजे
उन्मेष ते परा वाचा । वाचातीत निरंजनु ६
कर्म तें जड जाणावें । ज्ञान ते जाणती कळा
जाणते नेणते कांहीं । निर्गुणीं पाहतां नसे ७
पिंड-ब्रह्मांडिचे देह । निरसितां काय उरलें ?
विवरावें, विचारावें । प्रत्ययो पाहातां कळे ८

## पुण्यमार्ग प्रतिष्ठावा

अचूक शुद्ध ल्याहावें । वाचावें नीटनेटकें
साकल्य अर्थ सांगावा । यथातथ्य प्रचीतिनें १
बोलावें न्यायनीतीनें । मर्यादा राखणें जनीं
अभ्यास करावा आधीं । ताळबंध पाठांतरें २
प्रसंगमान जाणावें । बाणावें बहुतांपरी
भक्तिभाव असों द्यावा । घालावा भार ईश्वरीं ३
प्रत्यहीं मागणें भीक्षा । मिळाली, न मिळे तरी
नित्यनूतन हिंडावें । धुंडावे भक्त प्रेमळ ४
कथा ते करावी आधीं । बाधी ते दुराशा नको
उपाधी आतळावे ना । जावें ना वैभवाकडे ५
सर्वत्र लोक शोधावे । बोधावे भक्तिच्या गुणें
राहावें दुर्बळा येथें । देवालयीं, नदीतिरीं ६
पर्वतीं उदकापासीं । संनिधचि येकीकडे
फार येकांत सेवावा । अभ्यास नित्यनूतन ७
साहावें शीतऊष्णादी । पाहावी रम्यसी स्थळें
करावे आपण कष्टा । बांधावी ते हळुहळू ८
वोळखी कराव्या दाटा । येके ठायीं स्थिरों नये
वादवेवाद तो खोटा । दाटावा मदमत्सर ९
उद्धट बोलणें खोटें । बोला मृदूच उत्तरें
नेटकी पाहिजे दीक्षा । रक्षावी भक्ति आदरें १०

भक्ति-ज्ञान असो द्यावें । शुद्ध वैराग्य नेटकें
धरावीं कीर्तिंचीं द्वारें । तरावी भाविकें बहू ११
भक्तीस लोक लावावे । पावावे परपार ते
उपाधी पाहातां नाहीं । पाहों जातां उदंडही १२
परंतु सर्व देवाचे । आपलें तनही नसे
मनांत वावरे देवो । देव देव चहूंकडे १३
अत्यंत साक्षपी व्हावें । न व्हावें आळसी कदा
घ्यावा या देहाचा लाहो । जायाचें हें म्हणोनियां १४
मरोनी कीर्ति उरवावी । नुरवावी अपकीर्ति ते
'धन्य धन्य' म्हणे लोक । सत्क्रीया करतां बरी १५
पुण्यमार्ग प्रतिष्ठावा । लावावी धर्मवासना
देवाल्यें करावीं मोठीं । वापीकूप सरोवरें १६
सावधू सकळां ठायीं । न्यायनीती चळों नये
सकळांसी सख्य राखावें । वर्तावें तें मनोगतें १७

**लोकांत नीतिन्यायानें वागावें**

जग हें जगदीशाचें । जाणतें बहुतांपरी
उगेंचि अनुमाने ना । पाहिजे जाणती कळा १
लोक हे राखतां राजी । सर्व राजीच होतसे
अंतरें चुकतां तेथें । सर्व भाजीच होतसे २
जन हे बोळले जेथें । अंतरात्माचि बोळला
जन हे खोळले जेथें । अंतरात्माचि खोळला ३
करावें आपणासाठीं । बरें-वाईट वोखटें
करावें तेंचि पावावें । घ्यावें द्यावेंचि ऊसिणे ४
अरे-कारे, अहो-काहो । बोलती सकळै जनीं
समजावें ऊमजावें । जाणावें मनिचे मनीं ५
बऱ्यानें बरवें होतें । दुःखें दुःखचि वाढतें
सर्वही आपणापासी । लोकांसी म्हणतां नये ६
ऐसी हे वक्तयापासी । बोलावीं अमृतोत्तरें
प्रत्ययो नीतिन्यायाचा । मर्यादेचा परोपरी ७

स्तवावें बहुतां लोकां । मानावे बहुतापरी
विध्युक्त विश्व वंदावें । निंदा हे आत्मघातकी ८
सत्याची राखतां सोये । सकळां मानतां बरें
असत्य नावडे लोकां । अधिकारेंचि वर्तणें ९
अधिकार सोडितां खोटें । अधिकार राखतां बरें
प्रसंग साधितां साधे । प्रसंग चुकतां कळे १०
विवेकीनें चुकावें ना । घडीघडी क्षणाक्षणा
चुकतां साम्यता कैंची । अरत्र हो परत्र हो ११
येकांत सेवितां आधीं । चाळणा करतां बरी
अभ्यासी लावितां बुद्धी । अकस्मातच्चि संभवे १२
शिकले शब्द ते थोडे । जिव्हाळा पाहिजे बरा
जिव्हाळ्यावीण ते आटे । जिव्हाळा असतां तगे १३

**जाणत्याची संगति बरी**

कार्यभाग करूं जाणे । लोक राजी समस्तही
सर्वांसी पाहिजे ऐसा । अभ्यासें होतसे नरु १
ज्याचा अभ्यास जो जैसा । तैसा व्यापार पाहणें
पाहातां पाहातां जाणे । जाणतां जाणतां कळे २
कळतां कळतां सीके । सिकतां सिकतां करी
करितां करितां वाढे । वाढतां वाढतां भला ३
ल्याहावें शुद्ध वाच्चावें । जाणावें तदनंतरें
जाणतां कळतां बिंबे । बिंबतां स्फूर्ति होतसे ४
प्रत्ययें बोलतां आलें । अचूक न चुके जनीं
सत्य–मिथ्या कळों आलें । 'जाणता' त्यास बोलिजे ५
उणीव येऊं दे ना तो । कळहो न करी कदा
जनाचें मन तो राखे । युक्तीनें काम चालवी ६
सूचना, चाळणा जाणे । बोलका नित्य नूतनू
मानतां मानतां माने । सत्यवादीच नेमकू ७
ऐसा तो शाहाणा लोकीं । तयाची संगती बरी
धरितां सौख्य होताहे । प्रवृत्तीनिवृत्तीकडे ८

## भाग्यवान होऊन मोक्ष मिळवा

चतुर्थमान ३

कुबुद्धि लाथडावी ते । सुबुद्धि धरणें बरी
अपकीर्ति दूरी घालावी । सत्कीर्ती राखणें सदा १
अहंता पापिणी मोठी । थोरथोरांस सिंतरी
बुकलावी, धुमाळावी । लावावी भजनाकडे २
वासना वास पाहे रे । राहे रे अंतरीं सदा
वैराग्यें तोंड ठेचावें । चेंपावें मत वावगें ३
धारणा धरावी मोठी । विस्मृती हे कामा नये
आलस्य दुरी तें दौडा । साक्षेपें यत्न पाहणें ४
अभ्यास वाढवावा रे । इहलोक-परत्रिचा
जाणते–नेणते राजी । राखावे बहुतांपरी ५
गुण देखोनि लोभावें । वेधावें उत्तमा गुणां
ज्याचें त्या रीती जाणे । धन्य तो जाणता गुणी ६
प्रत्ययेंवीण जो ज्ञानी । तो ज्ञानी आत्मघातकी
तो संग त्यागणें खोटा । निःसंगें संग पाहणें ७
उमजणें समजणें आधीं । प्रवृती निवृतीकडे
भाग्यश्री मोक्षश्री होते । विवरतां विवरतां पुढें ८

## तनमनानें झिजून पूर्ण व्हा

तनें झिजेल त्या मनें । मनें झिजेल त्या तनें
तनें-मनें विशेषता । झिजेल तोचि पूरता १
मनें प्रसंग वीवरी । तनें प्रसंग जो करी
तनें-मनें चुकेचि ना । तया उणीव येचि ना २
रुपें रसाळ तो गुणी । तयास आवडी दुणी
रुपें-गुणें विशेषता । करील तोचि पूरता ३
विशेष वेष साजिरा । उदंड गूण तो बरा
प्रचीतिनें खरा खरा । चढेल कोण दूसरा ! ४
उदास दास तो धरी । परोपरी क्रिया करी
गुणें गुणी गुणाथिला । भला, भला, भला, भला ५

प्रताप सूर्यसा तपे । तयास कोण रे जपे ?
अनंत गूण उत्तमा । कदा कळेच्चि ना सिमा ६

**मनानें मनास राखा**

तनास भेटलीं तनें । मनास चूकलीं मनें
चुकी चुकी बहू चुकी । परस्परें चुकामुकी १
मळ्यास भेटलें मढें । करील काय बापुडें !
मनें मनाच्चिया खुणा । बुझेल लाभ त्या दुणा २
उगेंच्चि वेंच्चिलीं वयें । मनास भेटतां नये
मनें मनास राखणें । सुखें सुखास चाखणें ३
न सांगतांच जाणणें । खुणेसि खूण बाणणें
प्रसंगमान पूरतें । कदापि तें नव्हे रितें ४
प्रसंग धारणा धरी । मनें मनांत वीवरी
कदा भरी भरेच्चि ना । महत्त्व तें सरेच्चि ना ५
परांतरांस राखणें । अचूक सूख चाखणें
परंतु संग तो मिळे । तरी जनास नीवळे ६

**चतुर बना**

अंतरींच सावधान । उत्तरीं अवेवधान
सावरी प्रसंगमान । यावरी विधीविधान १
प्रेत्न पूरता करी । सदा विचार विवरी
चतूर तो परोपरी । तया सरी मनोहरी २

• •

## ९. मुलांना उपदेश

बरें सत्य बोला यथातथ्य चाला । बहू मानिती लोक येणें तुम्हांला
धरा बुद्धि पोटीं विवेकें तुम्ही हो । बरा गूण तो अंतरामाजि राहों १
सदा दांत घासोनि तोंडा धुवावें । कळाहीन घाणेरडें बा नसावें
सदा सर्वदा यत्न सोडूं नये रे ! बहूसाल हा खेळ कामा नये रे २

दिसामाजिं कांहींतरी तें लिहावें । प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें
गुणश्रेष्ठ, ऊपास्य त्यांचें करावें । बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ३
बहू खेळ खोटा, सदालस्य खोटा । समस्तांसि भांडेल तोचि करंटा
बहूतां जनालागिं जीवीं भजावें । भल्यासंगतीं न्याय तेथें बसावें ४
प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ होतें । विवेकेविणें सर्वही दंभ होते
बहू सज्जला नेटका साज केला । विचारेविणें सर्वही व्यर्थ गेला ५
वरी चांगला, अंतरीं गोड नाहीं । तया मानवाचें जिणें व्यर्थ पाही
वरी चांगला अंतरीं गोड आहे । तयालागि कोणीतरी शोधिताहे ६
'भलारे भला'! बोलती तें करावें । बहूता जनांच्या मुखें येश घ्यावें
परी शेवटीं सर्व सोडोनि द्यावें । मरावें परी कीर्तिरूपें उरावें ७

## रामाजवळ हें मागा

पावन भिक्षा दे रामा । दीनदयाळा दे रामा १
अभेदभक्ति दे रामा । अर्थारोहण दे रामा २
तद्रूपता मज दे रामा । आत्मनिवेदन दे रामा ३
सज्जनसंगति दे रामा । अलिप्तपण मज दे रामा ४
ब्रह्मानुभव मज दे रामा । अनन्य सेवा दे रामा ५
कोमल वाचा दे रामा । विमल करणी दे रामा ६
प्रसंगवोळखी दे रामा । धूर्तकळा मज दे रामा ७
अंतरपारख दे रामा । बहुजनमैत्री दे रामा ८
हितकारक तें दे रामा । जनसुखकारी दे रामा ९
विद्यावैभव दे रामा । उदासीनता दे रामा १०
मागो नेणें दे रामा । मज न कळे तें दे रामा ११
सावधपण मज दे रामा । बहु पाठांतर दे रामा १२
दास म्हणे रे गुणाधामा ! । उत्तमगुण मज दे रामा १३

## आईची सेवा करा

वीट नाहीं, कंटाळा नाहीं । आलस्य नाहीं, त्रास नाहीं
इतुकी माया कोठेंचि नाहीं । मातेवेगळी १
पुत्र वैभवहीन भिकारी । माता तैसाचि अंगिकारी
दगदगला देखोनि, अंतरीं । त्याच्या दुःखें दुखावे २

प्रपंच विचारें पाहतां । हें सकळ जोडे, न जोडे माता
हें शरीर जयेकरितां । निर्माण जालें ३
म्हणोनि धन्य धन्य ते प्रपंची जन । जे माय-बापाचें भजन
करिती, न करिती मन । निष्ठुर जिवलगांसी ४

**खूप शिकून जाणते व्हा**

शिका रे शिका रे फिका जन्म जातो । नका रे नका रे तुका घात होतो
तुटे तूक त्या भीक तेही मिळे ना । गुणेवीण लोकांस कांहीं कळे ना १
गुणें पाविजेते जनीं वैभवाला । विवेकी विभांडीतसे रौरवाला
कळों दे कळों दे मना नीवळों दे । ब्ळों दे, बळों दे, अहंता गळों दे २
शिके ना तरी त्यास कांहींच ये ना । शिके तो गुणाला कदा जाउं दे ना
गुण श्रेष्ठ तो श्रेष्ठसा वोळखावा । गुणेंवीण तो हीण जाणोन घ्यावा ३
बरें जाणतां तें कळे सर्व कांहीं । मनें नेणतां हीत कांहींच नाहीं
जनीं जाणतां शीकतां हीत होतें । न शिके तरी व्यर्थ आयुष्य जातें ४

**धीर धरा :** धीर्धरा, धीर्धरा तकवा । हडबडूं गडबडूं नका
काळ देखोनि वर्तावें । सांडावें भय पोटिचें १
धरावा धीर तो मोठा । विचारें पाहातां बरें
अधीर माणसें खोटीं । काम कांहीं कळेचि ना २

**बरी संगती हवी :** जाणता लोक भाग्याचा । नेणता दरिद्री सदा
दरिद्री आळसी मोठा । भाग्याचा यत्न वाढवी १
संगती सारिखे होती । नाना लोक भूमंडळीं
सुबुद्धी संगतीयोगें । कुबुद्धी संगतीगुणें २
कर्मानुसार या लोका । संगती सांपडे बरी
यहलोक–परलोकीं । संगती पाहिजे बरी ३

**नेणत्यांना जाणते करा :** अभ्यासें होत आहे रे । अभ्यास करणें सदा
उदंड बोलणें लागे । यथातथ्य हळुहळू १
तेव्हां ते समजती प्राणी । कोणी मानूं नये कदा
जीवांत जीव घालावा । चालावा भक्तिमार्ग हा २
सर्वत्र पेरणें विद्या । लोकांमध्यें हळूहळू
नेणत्या जाणते करणें । कथा-नीरूपणें सदा ३

निश्चय बिंबवावे ते । प्रत्यक्ष सद्य रोकडे
उकलुनी सांगणें सोपें । क्षणक्षणा पुनःपुन्हा ४
कंटाळा दूर टाकावा । मनीं त्रासों नये कदा
सांगतां सांगतां हांसे । हांसे खेळे अहर्निशीं ५

## अभ्यासाने मोठे कार्यकर्ते व्हा

अंतर्कळा चेतवावी । विद्या, बुद्धी शिकोनिया
उमजतां उमजतां सर्वे । समजतां समजतां बरें १
चुकतां निकामी होतो । करंटा तो म्हणोनिया
मूर्ख श्रेष्ठासि माने ना । दरिद्री साक्षपी नव्हे २
शरीर असुदें राखे । कष्टवी ना कदापिही
जेवणें-खेळणें माने । हासणें-निजणें सदा ३
संगती मूर्ख पोरांची । थोरासन्मुख नादळे
कामास चुकती जो तो । गयाळीं मोकळा सदा ४
खादाड, गोडखा, पापी । कळकटा, चोरटा बहू
खोडी तो न संडी पापी । रडतां जन्म घाल्वी ५
भला तो खोडि सांडीतो । श्रीमंत सर्वसाक्षपी
भल्यास निववूं जाणे । कार्यभाग परोपरी ६
कामास पाहिजे कामी । निकामी न लगे जनीं
कार्यभाग करावा रे । कार्यकर्ताचि धन्य तो ७
कार्यभाग करूं जाणे । लोक राजी समस्तही
सर्वांशीं पाहिजे ऐसा । अभ्यासें होतसे नर ८

## अभ्यास-साक्षेप-प्रयत्न करा

जो येकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर
अथवा शोधी अर्थांतर । ग्रंथगर्भींचें १
आधींच शिकोन जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी
गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें २
अरे, हें पाहिलेंचि पाहावें । विवरलेंचि विवरावें
वाचिलेंचि वाचावें । पुनःपुन्हां ३

रात्रंदिवस पाहावा अर्थ । अर्थ पाहेल तो समर्थ
परलोकींचा निजस्वार्थ । तेथेंचि घडे ४
अभ्यासाचा संग धरिला । साक्षेपासारिखा निघाला
प्रेत्न सांगाती भला । साधन पंथें ५
अवगुण अवघेचि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे
प्रबंध पाठ करीत यावे । जाड अर्थ ६
पाठ उदंडचि असावें । सर्व काळ उजळीत जावें
सांगीतलें गोष्टीचें असावें । स्मरण अंतरीं ७

**वाढत वाढत मोठें व्हावें**

ज्याचा जो अभ्यास जैसा । तैसा व्यापार पाहाणें
पाहातां पाहातां जाणे । जाणतां जाणतां कळे १
कळतां कळतां शीके । शिकतां शिकतां करी
करितां करितां वाढे । वाढतां वाढतां भला २

**अखंड सावधानतेनें प्रयत्नशील व्हा**

अखंड सावधान रे । प्रयोग प्रेत्न मान रे
प्रसंग हा तुफान रे । नकोचि वेवधान रे १
मनीं धरूनि धारणा । करा बरी विचारणा
प्रेत्न मूळकारणा । अतर्क्य ते विचारणा २
बहू विधिविधान हो । परंतु सावधान हो
प्रमाण जाण उत्तरें । प्रत्युत्तरें निरुत्तरें ३
म्हणे उदास 'दास' हा । बरें पाहा, बरें पाहा
करील येत्न जीतुका । तयास लाभ तीतुका ४

**धरा मनीं उपासना**

करील व्याप तो भला । बहूत भाग्य लाधला
नसेल व्याप तो हळू । पडेल रे पळें पळें १
अरत्र हो, परत्र हो । विचित्र काळसूत्र हो
अखंड सावधानता । सभाग्य तो नव्हे रिता २
अनेक भाव-भावना । सदा मनीं विवंचना
विशेष धारणा धरी । उदंड चाळणा करी ३

सखोल तो वळेचि ना । कदा लिळा तुळेचि ना
परांतरासि जाणता । दिसे जनास नेणता ४
कवी म्हणे बहू बरें । करील देव तें खरें
बरी धरूनि वासना । धरा मनीं उपासना ५

## प्रबोध घ्या खडाखडी

राम राम राम रे । समर्थ योगधाम रे
दयाळ तो दया करी । कवीजनांस वीवरी १
धनुष्य-बाणधारकू । हरी जनासि तारकू
प्रचंड ध्यान तें धरा । मनांतरींच वीवरा २
प्रसंग हा तडातडी । करा विवेक तांतडी
सुचीत व्हा घडी घडी । प्रबोध घ्या खडाखडी ३
प्रसंग हा कठीण हो । बहूत पावले मोहो
परंतु येत्न पाहती । सुखेंचि तेचि राहती ४
विवेक पाहाणें बरा । बरा विचार तो करा
उपासकांसि सूचना । उपासना, उपासना ५

## प्रयत्नाचा लोक भाग्याचा

यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेंवीण दरिद्रता
उमजला लोक तो धाला । उमजे ना तो हपापिला १
हिंडतां शाहाणे होतें । बोलतां बोल सीकतें
वाचितां लिहितां येतें । तेणें तें मान्य होतसे २
घरींच बैसतां खोटें । ब्राह्मणू हिंडतां बरा
आळसी घात घेणा तो । कष्टला म्हणजे बरा ३
भुकाळू म्हणिजे खोटा । धीराचा पाहिजे नरू
तार्कीक असावा प्राणी । सावधान चहूंकडे ४
प्रसंग वर्ततां आलें । यथातथ्यचि सूचलें
मनुष्य राखिलें राजी । तो प्राणी शाहाणा बरा ५
समयीं धीर सांडी ना । यत्नीं यत्न बरा करी
हिंडतां पारखी लोकां । कार्यकर्ता जीवीं धरी ६
मैत्रिकीहि विटों नेदी । सर्वांसी सारिखा दिसे

विचार जाणतो मोठा । दक्ष तो जाणतां जनीं ७
उदंड वोळखी होतां । उदंड भाग्य होतसे
उदंड कळहो होतां । उदंड लाथ खातसे ८

## विवेक-विचार

विचारें गोड बोलावें । बहुतां मान्यसें बरें
भांडतां पुरवे ना कीं । मैत्रिकी करितां बरें ९
'करावें तेंच पावावें' । हें आलें आपणाकडे
आपलें आपणापासी । जनासी काय बोल हा १०
झाडिल्या झाडतां ये ना । झडे ना गुण आपुला
आपणा विसरावे ना । घडी घडी, क्षणक्षणा ११
आपली चुकी जाणावी । सांडावी ते येकीकडे
विवेकें साजिरा जाला । येर उदंड मीळती १२
वेषानें कार्य साधे ना । विवेकें कार्य साधतें
विवेकी मानिती ज्याला । धन्य तो ब्राह्मणू जनीं १३

## यत्नशीळ व्हा ! नुसते बोलू नका

भाग्यासी काय उणे रे । यत्नावाचूनि राहिलें
यत्न तो करावा कैसा । हेंचि आधीं कळेचि ना १
मुख्य यत्न विचाराचा । त्यावरी बोलणें बरें
चालणें सत्य नेमाचें । नीतीन्याया चुकों नये २
गलबला नासतो बुद्धी । नाना निश्चय सांगती
ऐकावें कोणकोणाचें ? । बोलताहे बहूचकी ३
सांगोचि जाणती सर्वे । कर्ता कोणी दिसेचि ना !
जाणते नेणते सांगो । स्वभाव लागला जनीं ४
करंटे मिळाले सर्वै । जो तो बुद्धीच सांगतो
सांगावें तें आपणाला । आपणू करितां बरें ५

## अचूक यत्न तो देव

वन्ही तो चेतवावा रे । चेतवीतांचि चेततो
विवेक जाणिजे तैसा । वाढवितांचि वाढतो १

संग तो साक्षपीयांचा । धरितां साक्षपू घडे
साक्षपें साक्षपू वाढे । पुरती मनकामना २
कष्टतां सौख्य मानावें । कष्टीं फळचि पाविजे
आळसें सुख वाटे तें । दुःख ब्रह्मांड भोगवी ३
केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंचि पाहिजे
यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ४
अचूक यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे
न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया ५
सावधू देव जाणावा । उन्मत्तू दैत्य बोलिजे
साक्षपी वंश देवाचे । आळसी वंश दानवी ६
देव सर्वांस सांभाळी । तदंश जाणिजे तसा
दैत्य ते पीडिती लोकां । तदंश त्याचसारखे ७
तो देव जाणिजे ज्ञानें । ज्ञानी त्यासीच बोलिजे
विज्ञानी ब्रह्मयोगी तो । वृत्तिशून्य पुरातनू ८

## गुण जाणा; गुणी व्हा — चतुर्थमान ४

गुण जाणेल तो गुणी । पाहातां विरळा दिसे
परीक्षेवीण तें खोटें । परीक्षा करितां बरें १
अर्थी अर्थ मनें व्हावें । जाणावें बहुतांपरी
सौख्य उदंड तें होतें । राजी लोकांस राखतां २
अर्थ सर्वत्र शोधावा । रोधावें आपलें मन
लोक सर्वत्र बोधावा । यथा तथ्य प्रचीतिनें ३
न्याय-अन्याय जाणावा । बाणावा अंतरीं सदा
सत्य नेमस्त बोलावें । अचूक न चुके कदा ४
सामान्य मान्य होता हे । मान्य सामान्य तो नव्हे
जाणत्या जाणता भेटे । येक ते जगदंतरें ५

• •

# १०. मनाला शिकवण

## श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें

मना सज्जना ! भक्तिपंथेंचि जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें
जनीं निंद्य तें सर्व सोडून द्यावें । जनीं वंद्य तें सर्वभावें करावें १
प्रभातीं मनीं राम चिंतीत जावा । पुढें वैखरी राम आधीं वदावा
सदाचार हा थोर सांडूं नये तो । जनीं तोचि तो मानवीं धन्य होतो २
मना, वासना दुष्ट कामा नये रे । मना, सर्वथा पापबुद्धी नको रे
मना, सर्वथा नीति सोडूं नको हो । मना, अंतरीं सार-वीचार राहो ३
मना, श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें । मना, बोलणें नित्य शोधीत जावें
स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें । मना, सर्व लोकांस रे नीववावें ४
देह त्यागितां कीर्ति मागें उरावी । मना सज्जना, हेचि क्रीया धरावी
मना, चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जना नीववावें ५
मना, मानसीं दुःख मानूं नको रे । मना, सर्वथा शोक-चिंता नको रे
विवेकें देहेबुद्धि सोडूनि द्यावी । विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ६
मना, सर्वथा सत्य सांडूं नको रे । मना, सर्वथा मिथ्य मांडूं नको रे
मना, सत्य तें सत्य वाचें वदावें । मना, मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें ७

## रघुनायका दृढ चित्तीं धरावें

मना सज्जना, हीत माझें करावें । रघूनायका दृढ चित्तीं धरावें
महाराज तो स्वामि वायूसुताचा । जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा १
न बोले मना, राघवेंवीण कांहीं । जनीं वावगें बोलतां सूख नाहीं
घडीनें घडी काळ आयुष्य नेतो । देहांतीं तुला कोण सोडूं पाहातो ! २
रघूनायकावीण वाया सिणावें । जनासारखे व्यर्थ कां वोसणावें
सदा सर्वदा नाम वाचें वसो दे । अहंता मनीं पापिणी ते नसों दे ३
मना, वीट मानूं नको बोलण्याचा । पुढे मागुता राम जोडेल कैंचा ?
सुखाची घडी लोटतां सूख आहे ? । पुढें सर्व जाईल कांहीं न राहे ४
देहेरक्षणाकारणें यत्न केला । परी शेवटीं काळ घेऊन गेला
करीं रे मना, भक्ति या राघवाची । पुढें अंतरीं सोडि चिंता भवाची ५

समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ?
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ६
असे हो जया अंतरीं भाव जैसा । वसे हो तया अंतरीं देव तैसा
अनन्यास रक्षीतसे चापपाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ७
सदा सर्वदा देव संनीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे
सुखानंद-आनंद-कैवल्यदानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ८
मना, प्रार्थना तूजला एक आहे । रघूराज अंकीत होऊनि राहे
अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे । मना सज्जना, राघवीं वस्ति कीजे ९
मना, पाविजे सर्वही सूख जेथें । अती आदरें ठेविजे लक्ष तेथें
विवेकें कुडी कल्पना पालटीजे । मना सज्जना, राघवीं वस्ति कीजे १०
बहू हिंडतां सौख्य होणार नाहीं । सिणावें परी नातुडे हीत कांहीं
विचारें बरें अंतरा बोधवीजे । मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ११
बहूतापरी हेंचि आतां धरावें । रघूनायका आपुलेंसें करावें
'दिनानाथ' हें तोडरीं ब्रीद गाजे । मना सज्जना, राघवीं वस्ति कीजे १२
मना सज्जना, येक जीवीं धरावें । जनीं आपुलें हीत तूंवा करावें
रघूनायकावीण बोलूं नको हो । सदा मानसीं हा निदिध्यास राहो १३
मना, जे घडी राघवेंवीण गेली । जनीं आपुली ते तुवां हानि केली
रघूनायकावीण तो सीण आहे । जनीं दक्ष तो लक्ष लावूनि पाहे १४

## सर्वोत्तमाचा दास धन्य होय

मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे । जनीं जाणता भक्त होऊनि राहे
गुणीं प्रीति राखे क्रमू साधनाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा १
सदा बोलण्यासारखें चालताहे । अनेकीं सदा येक देवासि पाहे
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा २
सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ३
मदें-मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धी । प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ४
क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादें । न लिंपे कदा दंभवादें विवादें
करी सूखसंवाद जो ऊगमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ५

सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं । सदासर्वदा सत्यवादी विवेकी
न बोले कदा मिथ्यवाचा त्रिवाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ६
दिनाचा दयाळू, मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू
तया अंतरीं क्रोध संताप कैंचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ७
जगीं होइजे धन्य या रामनामें । क्रिया, भक्ति, ऊपासना नित्यनेमें
उदासीनता तत्त्वतां सार आहे । सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ८
अती मूढ त्या दृढ बुद्धी असे ना । अती काम त्या रामचित्तीं वसे ना
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा । अती वीषई सर्वदा दैन्यवाणा ९

**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा**

घनश्याम हा राम लावण्यरूपी । महाधीर गंभीर पूर्ण प्रतापी
करी संकटीं सेवकाचा कुडावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा १
सुखानंदकारी, निवारी भयातें । जनीं भक्तिभावें भजावें तयातें
विवेकें त्यजावा अनाचार हेवा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा २
न वेंचे कदा ग्रंथिचे अर्थ कांहीं । मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं
महाघोर संसार शत्रू जिणावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ३
बहूतांपरी संकटें साधनांचीं । व्रतें दान उद्यापनें तीं धनाचीं
दिनाचा दयाळू मनीं आठवावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ४
नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं । नव्हे भोग ना त्याग ना सांग पाही
म्हणे 'दास' विश्वास नामीं धरावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ५
मना मत्सरें नाम सोडूं नको हो । अतीआदरें हा निजध्यास राहो
समस्तामधें नाम हें सार आहे । दुजी तूळणा तूळितांही न साहे ६
मुखीं राम विश्राम तेथेंच्चि आहे । सदानंद आनंद सेवूनि राहे
तयावीण तो सीण संदेहकारी । निजधाम हें नाम शोकापहारी ७
बहू चांगलें नाम या राघवाचें । अती साजिरें, स्वल्प, सोपें फुकाचें
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें । जिवा मानवा हेंच्चि कैवल्य साचें ८
जनीं भोजनीं नाम वाचे वदावें । अती आदरें गद्य-घोषें म्हणावें
हरीचिंतनें अन्न सेवीत जावें । तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें ९
नको वीट मानूं रघूनायकाचा । अती आदरें बोलिजे राम वाचा
न वेंचे मुखीं सांपडे रे फुकाचा । करी घोष त्या जानकीवल्लभाचा १०

यथासांग तें कर्म कांहीं घडे ना । घडे कर्म तें पुण्य गांठीं पडे ना
दया पाहातां सर्व भूतीं असे ना । फुकाचें मुखीं नाम तेंही वसे ना ११

## बोलण्यासारखे चाल बापा

अती लीनता सर्वभावें स्वभावें । जना सज्जनालागि संतोषवावें
देहे कारणीं सर्व लावीत जावें । सगूणीं अती आदरेसी भजावें १

क्रियेवीण नानापरी बोलिजे तें । परी चित्त दुश्चीत तें लाजवीतें
मना, कल्पना धीट सैराट धावे । तया मानवा देव कैसेनि पावे ? २

विवेकें क्रिया आपुली पालटावी । अती आदरें शुद्ध क्रीया धरावी
जनीं बोलण्यासारिखें चाल बापा । मना, कल्पना सोडि संसारतापा ३

बरी स्नानसंध्या करी एकनिष्ठा । विवेकें मना, आवरी स्थानभ्रष्टा
दया सर्वभूतीं तया मानवाला । सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला ४

मना, कोप-आरोपणा ते नसावी । मना, बुद्धि ते साधुसंगीं वसावी
मना, नष्ट चांडाळ तो संग त्यागी । मना, होइ रे मोक्षभागीं विभागी ५

## तुटे वाद, संवाद तो हीतकारी

मना, सर्वदा सज्जनाचेनि योगें । क्रिया पालटे, भक्तिभावार्थ लागे
क्रियेवीण वाचाळता ते निवारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी १

जनीं वादवेवाद सोडूनि द्यावा । जनीं सूखसंवाद सूखें करावा
जनीं तोचि तो शोकसंतापहारी । तुटे वाद, संवाद तो हीतकारी २

तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें । विवेकें अहंभाव यातें जिणावें
अहंतागुणें वाद नाना विकारी । तुटे वाद, संवाद तो हीतकारी ३

हिताकारणें बोलणें सत्य आहे । हिताकारणें सर्व शोधूनि पाहे
हिताकारणें बंड पाखांड वारी । तुटे वाद, संवाद तो हीतकारी ४

जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला । परी वाद-वेवाद तैसाचि ठेला
उठे संशयो वाद हा दंभकारी । तुटे वाद, संवाद तो हीतकारी ५

फुकाचे मुखीं बोलतां काय वेंचे । दिसंदीस अभ्यंतरीं गर्व साचे
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे । विचारें तुझा तूंच शोधूनि पाहे ६

तुटे वाद, संवाद तेथें करावा । विवेकें अहंभाव हा पालटावा
जनीं बोलण्यासारिखें आचरावें । क्रिया पालटे भक्तिपंथेंचि जावें ७

## विचारूनि बोले, विवंचूनि चाले

जगीं धन्य तो रामसूखें निवाला । कथा ऐकतां सर्व तल्लीन जाला
देहेभावना रामबोधें उडाली । मनोवासना रामरूपीं बुडाली १
मना, वासना वासुदेवीं वसों दे । मना, कामना कामसंगीं नसों दे
मना, कल्पना वाउगी ते न कीजे । मना सज्जना, सज्जनीं वस्ति कीजे २
मना, अल्पसंकल्प तोही नसावा । मना, सत्यसंकल्प चित्तीं वसावा
जनीं जल्प वीकल्प तोही त्यजावा । रमाकांत येकांत काळीं भजावा ३
भजावा जनीं पाहतां राम येकू । करीं बाण येकू, मुखीं शब्द येकू
क्रिया पाहतां उद्धरे सर्व लोकू । धरा जानकीनायकाचा विवेकू ४
विचारूनि बोले, विवंचूनि चाले । तयाचेनि संतप्त तेही निवाले
बरें शोधिल्यावीण बोलों नको हो । जनीं चालणें शुद्ध नेमस्त राहो ५
हरीभक्त, वीरक्त, विज्ञानराशी । जेणें स्थापिलें मानसीं निश्चयासी
तया दर्शनें स्पर्शनें पुण्य जोडे । तया भाषणें नष्ट संदेह मोडे ६
नसे गर्व आंगीं, सदा वीतरागी । क्षमा-शांति भोगी दया-दक्ष योगी
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा । इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ७
भयें व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे । भयातीत ते संत आनंत पाहे
जया पाहतां द्वैत कांहीं दिसे ना । भये मानसीं सर्वथाही वसे ना

## संत आनंत शोधून पाहे

फुटे ना, तुटे ना, चळे ना, ढळे ना । सदा संचलें मीपणें तें कळे ना
तया येकरूपासि दूजे न साहे । मना, संत आनंत शोधूनि पाहे १
निराकार, आधार ब्रह्मादिकांचा । जया सांगतां सीणली वेदवाचा
विवेकें तदाकार होऊनि राहे । मना, संत आनंत शोधूनि पाहे २
दिसे ना जनीं तेंचि शोधूनि पाहे । बरें पाहातां गूज तेथेंचि आहे
करीं घेउं जातां कदा आढळे ना । जनीं सर्व कोंदाटलें तें कळे ना ३
म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहे । अतर्कासि तर्कीं असा कोण आहे ?
जनीं मीपणें पाहतां पाहवे ना । तया लक्षितां वेगळें राहवे ना ४

## सदा संगती सज्जनाची धरावी

देहेबुद्धिचा निश्चयो दृढ झाला । देहातीत ते हीत सांडीत गेला
देहेबुद्धि ते आत्मबुद्धी करावी । सदा संगती सज्जनाची धरावी १
बरा निश्चयो शाश्वताचा करावा । म्हणे दास संदेह तो वीसरावा
घडीनें घडी सार्थकाची करावी । सदा संगती सज्जनाची धरावी २
करी वृत्ति जो संत तो 'संत' जाणा । दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा
उपाधी देहेबुद्धितें वाढवीते । परी सज्जना केवि बाधूं शके ते ? ३
नसे अंत आनंत संता पुसावा । अहंकारविस्तार हा नीरसावा
गुणेंवीण निर्गूण तो आठवावा । देहेबुद्धिचा आठवो नाठवावा ४
देहेबुद्धि ते ज्ञानबोधें त्यजावी । विवेकें तये वस्तुची भेटि घ्यावी
तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें । म्हणोनी सदा तेंचि शोधीत जावें ५
जनीं भक्त, ज्ञानी, विवेकी, विरागी । कृपाळू, मनस्वी, क्षमावंत, योगी
प्रभू, दक्ष, व्युत्पन्न, चातुर्य जाणे । तयाचेनि योगें समाधान बाणे ६
नव्हे तेंचि जालें, नसें तेंचि आलें । कळों लागलें सज्जनाचेनि बोलें
अनिर्वाच्य तें वाच्य वाचें वदावें । मना, संत आनंत शोधीत जावें ७

## कळे आकळे रूप तें ज्ञान होता

मना, नाकळे, नाढळे रूप ज्याचें । दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचें
तया खूण तें हीण दृष्टांत पाहे । तेथें संग निःसंग दोनी न साहे १
वसे हृदयीं देव तो जाण ऐसा । नभाचे परी व्यापकू जाण तैसा
सदा संचला, येत ना जात कांहीं । तयावीण कोठें रिता ठाव नाहीं २
नभीं वावरे जो अणूरेणु कांहीं । रिता ठाव या राघवेंवीण नाहीं
तया पाहतां पाहतां तेंचि जालें । तेथें लक्ष आलक्ष सर्वै बुडालें ३
नभासारिखें रूप या राघवाचें । मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें
तया पाहतां देहबुद्धी उरे ना । सदा सर्वदा आर्त पोटीं पुरे ना ४
नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे । रघूनायका ऊपमा ते न साहे
दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावें । तया व्यापकू व्यर्थ कैसें म्हणावें ? ५
अती जीर्ण विस्तीर्ण तें रूप आहे । तेथें तर्क-संपर्क तोही न साहे
अती गूढ तें दृढ तत्काळ सोपें । दुजेवीण जें खूण स्वामिप्रतापें ६

कळे आकळे रूप तें ज्ञान होतां । तेथें आटली सर्वसाक्षी अवस्था
मना, उन्मनी शब्द कुंठीत राहे । तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे ७

□ □ □

मनाचीं शतें ऐकतां दोष जाती । मती-मंद, ते साधना-योग्य होतीं
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य आंगीं । म्हणे 'दास' विश्वासतां मुक्ति भोगी

● ●

# ११. ग्रंथाचा समारोप

## सकळ करणें जगदीशाचें द. २०-१०

ग्रंथाचें करावें स्तवन । स्तवनाचें काय प्रयोजन
येथें प्रत्ययास कारण । प्रत्ययो पाहावा १
देह तंव पांचा भूतांचा । कर्ता आत्मा तेथींचा
आणि कवित्वप्रकार मनुष्याचा । कशावरूनी ? २
सकळ करणें जगदीशाचें । आणि कवित्वचि काय माणसाचें ?
ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काय घ्यावें ! ३
सकळ देहाचा झाडा केला । तत्त्वसमुदाव उडाला
तेथें कोण्या पदार्थाला । आपुलें म्हणावें ? ४
ऐसी हे विचाराचीं कामें । उगेंच भ्रमो नये भ्रमें
जगदीश्वरें अनुक्रमें । सकळ केलें ५

## संसार जाला सफळ द. २०-१०

शुद्ध सार श्रवण । शुद्ध प्रत्ययाचें मनन
विज्ञानीं पावतां, उन्मन । सहजचि होतें १
जालें साधनाचें फळ । संसार जाला सफळ
निर्गुण ब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें २
हिसेब जाला मायेचा । जाला निवाडा तत्त्वांचा
साध्य होतां साधनांचा । ठाव नाहीं ३

स्वप्नीं जें जें देखिलें । तें तें जागृतीस उडालें
सहजचि अनिर्वाच्य जालें । बोलतां न ये ४
ऐसें हें विवेकें जाणावें । प्रत्ययें खुणेसी बाणावें
जन्ममृत्यूच्या नांवें । शून्याकार ५
भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें
समर्थ-कृपेचीं वचनें । तो हा दासबोध ६
वीस दशक दासबोध । श्रवणद्वारें घेतां शोध
मननकर्त्यास विशद । परमार्थ होतो ७
वीस दशक, दोनशे समास । साधकें पाहावें सावकाश
विवरतां विशेषाविशेष । कळों लागे ८

●●●

**प्रार्थना :**

रघुनाथदासा कल्याण व्हावें । अति सौख्य व्हावें आनंदवावें
उद्वेग नासो, वरशत्रु नासो । नाना विलासें मग तो विलासो १
कोडें नको रे, कळहो नको रे । कापट्यकर्मीं सहसा नको रे
निर्वाण-चिंता निरसी अनंता । शरणागता दे बहु धात-माता २
अजयो न हो रे, जयवंत हो रे । आपदा नको रे बहुभाग्य हो रे
श्रीमंतकारी, जनहीतकारी । परऊपकारी, हरिदास तारी ३

२

कल्याण करी देवराया । जनहित विवरी । कल्याण करी...
तळमळ होतचि आहे । हे जन हातीं धरी ।
अपराधी जन चुकतचि गेले । तुझा तूंचि सावरी...
कठीण त्यावरी कठीण जालें । आता न दिसे उरी...
कोठें जावें ? काय करावें ? । आरंभिली बोहरी...
'दास' म्हणे आम्ही केलें पावलों । दयेसी नाही सरी...

३

उपासनेला दृढ चालवावे । भू-देव-संतांसि सदा नमावें
सत्कर्म-योगें वय घालवावें । सर्वांमुखीं मंगल बोलवावें

। जय जय रघुवीर समर्थ ।

। श्रीराम ।

# श्रीरामदासांच्या आयुष्यांतल्या ठळक घटना

| | | |
|---|---|---|
| माघ शु. ७ शके १५२५ | : | सूर्याजीपंतांना सूर्यनारायणाचा वर. |
| मार्गशीर्ष शु. १३, १५२७ | : | श्रेष्ठांचा जन्म. |
| चैत्र शु. ९, १५३० | : | नारायणाचा (श्रीरामदासांचा) जन्म. |
| शके १५३५ | : | नारायणाचा उपनयन संस्कार. |
| मार्गशीर्ष शु. ९, १५३७ | : | सूर्याजीपंतांची इहलोकची यात्रा संपली. |
| माघ १५४२ | : | विवाहमंडपांतून नारायण निसटला. |
| माघ-फाल्गुन १५४२ | : | टाकळीला गायत्री-पुरश्चरणास शुभारंभ. |
| वैशाख शु. १०, १५४५ | : | मृत यजमानास जिवंत करून सतीस चुडेदान. |
| फाल्गुन व. ३, १५५१ | : | शिवरायाचा शिवनेरीस जन्म. |
| माघ १५५४ | : | स्वामी रामदासांचा भारत-भ्रमणास आरंभ. |
| वैशाख १५६६ | : | कृष्णातीरीं महाबळेश्वरास स्वामी आले. |
| शके १५६९ | : | अंगापूरच्या डोहांत श्रीरामाची मूर्ति मिळाली. |
| चैत्र शु. ९, १५७० | : | मसूर येथे श्रीरामजयंत्युत्सव. |
| चैत्र शु. ९, १५७० | : | चाफळास श्रीरामजन्मोत्सव. |
| वैशाख शु. ९, १५७१ | : | शिवाजीराजे स्वामींचे शिष्य झाले. |
| ज्येष्ठ शु. १५, १५७१ | : | शहाजीराजांची विजापूर–अटकेंतून मुक्तता. |
| १५६६ ते १५७१ | : | वेगवेगळ्या वेळीं आकरा मारुतींची स्थापना. |
| कार्तिक १५७२ | : | स्वामींचें परळीस ( सज्जनगडीं ) वास्तव्य. |
| शके १५७२ | : | रामजन्मोत्सवासाठीं जांबेस. |
| शके १५७५ | : | मातापूर-सारंगपूरचा प्रवास. |
| शके १५७६ | : | कृष्णातीरीं पुनरागमन. |
| वैशाख शु. २, १५७७ | : | छत्रपतींनी स्वराज्याच्या दानाची चिठी स्वामींच्या झोळींत टाकली. |
| ज्येष्ठ शु. ३, १५७७ | : | माता राणूबाईचें निधन. |
| श्रावण १५७७ | : | मिरजेस मठस्थापना, वेणाबाईची नियुक्ति. |
| कार्तिक १५७७ | : | तंजावरीं व्यंकोजीला गुरूपदेश. |

| | | |
|---|---|---|
| शके १५८० | : | छत्रपतींची रामजन्मोत्सवास २०० होनांची देणगी. |
| शके १५८० | : | चातुर्मास्यानिमित्त स्वामींचें महाबळेश्वरीं वास्तव्य |
| शके १५६६ ते १५८१ | : | सुंदर मठांत दासबोध समासांचें स्फुट लिखाण. |
| मार्गशीर्ष शु. ७, १५८१ | : | अफजलखानाचा वध. |
| शके १५८५ | : | जेजूरीस खंडेरावाच्या दर्शनासाठीं. |
| फाल्गुन १५८७ | : | शिवाजीराजांचें आग्र्याकडे प्रयाण. |
| आषाढ १५८८ | : | छत्रपतींना औरंगजेबाने बंदी बनविले. |
| श्रावण व. १२, १५८८ | : | छत्रपती आग्र्याहून निसटले. |
| मार्गशीर्ष १५८८ | : | शिवराय रायगडीं सुखरूप परतले. |
| चैत्र शु. ९, १५९४ | : | पारगांवीं रामजन्मोत्सव. |
| श्रावण १५९४ | : | छत्रपतींना अध्यात्माचा उपदेश. |
| ज्येष्ठ शु. १३, १५९६ | : | छत्रततींचे रायगडीं राज्यारोहण. |
| ज्येष्ठ व. १०, १५९६ | : | जिजामातेचें निधन. |
| शके १५९७ | : | शिवरायांचें तंजावरवरील आक्रमण. |
| आश्विन शु. १०, १६०० | : | चाफळच्या देवस्थानास सनद. |
| मार्गशीर्ष १६०० | : | संभाजी दिलीरखानाकडे. |
| मार्गशीर्ष १६०१ | : | संभाजीचें पन्हाळ्यास पुनरागमन. |
| माघ १६०१ | : | छत्रपतींचें सज्जनगडीं वास्तव्य. |
| चैत्र शु. १५, १६०२ | : | छत्रपतींचें निर्याण. |
| पौष १६०३ | : | संभाजीचें सज्जनगडीं आगमन व त्यास हितोपदेश. |
| माघ व. ५, १६०३ | : | सज्जनगडीं श्रीराममूर्ति–स्थापना. |
| माघ व. ९, १६०३ | : | श्रीरामदासांनीं सज्जनगडीं देह ठेवला. |

मराठी ग्रंथ

• • •

REFBK-0014812

REFBK-0014812